# दहावा वार्षिक अहवाल
# २०१४-२०१५

महावितरण

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित


नोंदणीकृत कार्यालय

प्लॉट क्र. जी - ९, प्रकाशगड, प्रा. अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# दहावा वार्षिक अहवाल २०१४-१५

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशील | | पान क्र. |
|---|---|---|---|
| १. | संचालकांची नावे | | १ |
| २. | संचालकांचा अहवाल | | ३-५० |
| ३. | स्वायत्त वित्तीय विवरण पत्रे | | |
| **अ.** | **महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित** | **टीप क्र.** | |
| १. | स्वतंत्र लेखापरिक्षकांचा अहवाल | | ५१-७२ |
| २. | स्वतंत्र लेखापरिक्षकांच्या अहवालास व्यवस्थापनाची उत्तरे | | ७३-९९ |
| ३. | भारताचे लेखानियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांचे अभिप्राय | | १००-१०४ |
| ४. | भारताचे लेखानियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांचे अभिप्रायास व्यवस्थापनाची उत्तरे | | १०५-११३ |
| ५. | ताळेबंद | | ११५-११६ |
| ६. | नफा व तोट्याचे विवरणपत्र | | ११७-११८ |
| ७. | रोख प्रवाहाचे विवरणपत्र | | ११९-१२१ |
| ८. | कंपनीची माहिती | १ | १२२ |
| ९. | महत्वाची लेखा धोरणे | २ | १२३-१२७ |
| १०. | भाग भांडवल | ३ | १२८ |
| ११. | राखीव व आधिक्य | ४ | १२९-१३१ |
| १२. | दीर्घ मुदतीची कर्जे | ५ | १३२-१३३ |
| १३. | इतर दीर्घ मुदतीची दायित्वे | ६ | १३४ |
| १४. | दीर्घ मुदतीच्या तरतुदी | ७ | १३५ |
| १५. | अल्प मुदतीची कर्जे | ८ | १३६ |
| १६. | व्यापारी देय | ९ | १३७ |
| १७. | इतर चालू दायित्वे | १० | १३८ |
| १८. | अल्प मुदतीच्या तरतुदी | ११ | १३९ |
| १९. | स्थिर मत्ता | १२ | १४० |
| २०. | अचल गुंतवणूक | १३ | १४१-१४२ |
| २१. | दिर्घ मुदत कर्जे व अग्रिम रक्कमा | १४ | १४३ |
| २२. | इतर अचल मत्ता | १५ | १४४ |
| २३. | वस्तू सूची | १६ | १४५ |
| २४. | व्यापारी येणी | १७ | १४६ |
| २५. | रोकड व बँकेतील शिलकी | १८ | १४७ |
| २६. | अल्प मुदतीची कर्जे व अग्रिमे | १९ | १४८ |
| २७. | इतर चालू मत्ता | २० | १४९ |

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित


| अ.क्र. | तपशील | टीप क्र. | पान क्र. |
|---|---|---|---|
| २८. | संचालनापासून मिळालेला महसूल | २१ | १५० |
| २९. | इतर उत्पन्न | २२ | १५१ |
| ३०. | वीज खरेदी | २३ | १५२ |
| ३१. | कर्मचारी खर्च | २४ | १५३ |
| ३२. | दुरुस्ती व देखभाल | २५ | १५४ |
| ३३. | प्रशासन व सर्वसाधारण खर्च | २६ | १५५ |
| ३४. | इतर खर्च | २७ | १५६ |
| ३५. | वित्तीय खर्च | २८ | १५७ |
| ३६. | मागील काळातील बाकी | २९ | १५८ |
| ३७. | लेखासंबंधी अतिरिक्त टीपा | ३० | १५९-१७४ |
| **ब** | **औरंगाबाद पॉवर कंपनी लिमिटेड** | | |
| १. | स्वतंत्र लेखापरिक्षकांचा अहवाल | | १७५-२०० |
| २. | ताळेबंद | | २०१-२०२ |
| ३. | नफा व तोट्याचे विवरणपत्र | | २०३-२०४ |
| ४. | रोख प्रवाहाचे विवरणपत्र | | २०५-२०६ |
| ५. | कंपनीची माहिती | १ | २०७ |
| ६. | महत्वाची लेखा धोरणे | २ | २०८ |
| ७. | भाग भांडवल | ३ | २०९ |
| ८. | राखीव व आधिक्य | ४ | २१० |
| ९. | इतर दीर्घ मुदतीची दायित्वे (अचल) | ५ | २११ |
| १०. | इतर चालू दायित्वे | ६ | २१२ |
| ११. | अल्प मुदतीच्या तरतुदी | ७ | २१३ |
| १२. | स्थिर मत्ता | ८ | २१४ |
| १३. | रोख व बँकेतील शिल्लक | ९ | २१५ |
| १४. | अल्पमुदतीची कर्जे व अग्रिमे | १० | २१६ |
| १५. | इतर उत्पन्न | ११ | २१७ |
| १६. | प्रशासन व सर्वसामान्य खर्च | १२ | २१८ |
| १७. | लेख्यांवरील अतिरिक्त टिपा | १३ | २१९-२२१ |
| **क** | **एकत्रित वार्षिक विवरण** | | |
| १. | स्वतंत्र लेखापरिक्षकांचा अहवाल | | २२३-२४० |
| २. | ताळेबंद | | २४१-२४२ |
| ३. | नफा व तोट्याचे विवरणपत्र | | २४३-२४४ |
| ४. | रोकडता प्रवाह विवरणपत्र | | २४५-२४७ |
| ५. | कंपनीची माहिती | १ | २४८-२४९ |

| अ.क्र. | तपशील | टीप क्र. | पान क्र. |
|---|---|---|---|
| ६. | महत्वाची लेखा धोरणे | २ | २५०-२५४ |
| ७. | भाग भांडवल | ३ | २५५ |
| ८. | राखीव व आधिक्य | ४ | २५६-२५८ |
| ९. | दीर्घ मुदतीची कर्जे | ५ | २५९-२६० |
| १०. | इतर दीर्घ मुदतीची दायित्वे | ६ | २६१ |
| ११. | दीर्घ मुदतीच्या तरतुदी | ७ | २६२ |
| १२. | अल्प मुदतीची कर्जे | ८ | २६३ |
| १३. | व्यापारी देय | ९ | २६४ |
| १४. | इतर चालू दायित्वे | १० | २६५ |
| १५. | अल्प मुदतीच्या तरतुदी | ११ | २६६ |
| १६. | स्थिर मत्ता | १२ | २६७ |
| १७. | अचल गुंतवणूक | १३ | २६८-२६९ |
| १८. | दीर्घ मुदत कर्जे व अग्रिम रक्कमा | १४ | २७० |
| १९. | इतर अचल मत्ता | १५ | २७१ |
| २०. | वस्तू सूची | १६ | २७२ |
| २१. | व्यापारी येणी | १७ | २७३ |
| २२. | रोकड व बँकेतील शिलकी | १८ | २७४ |
| २३. | अल्प मुदतीची कर्जे व अग्रिमे | १९ | २७५ |
| २४. | इतर चालू मत्ता | २० | २७६ |
| २५. | संचालनापासून मिळालेला महसूल | २१ | २७७ |
| २६. | इतर उत्पन्न | २२ | २७८ |
| २७. | विज खरेदी | २३ | २७९ |
| २८. | कर्मचारी खर्च | २४ | २८० |
| २९. | दुरुस्ती व देखभाल | २५ | २८१ |
| ३०. | प्रशासन व सर्वसाधारण खर्च | २६ | २८२ |
| ३१. | इतर खर्च | २७ | २८३ |
| ३२. | वित्तीय खर्च | २८ | २८४ |
| ३३. | मागील काळातील बाकी | २९ | २८५ |
| ३४. | लेखासंबंधी अतिरिक्त टीपा | ३० | २८६-३०२ |
| **ड** | **तक्ते व आलेख** | | |
| १. | एकूण मालमत्ता ३१.३.२०१५ रोजीचे | | ३०३ |
| २. | समभाग व दायित्वे ३१.३.२०१५ रोजीचे | | ३०४ |
| ३. | एकूण स्थायी मत्ता आणि भांडवली प्रगतीपथावरील कामे | | ३०५ |
| ४. | वीज विक्रीपासून महसुल आणि वीज खरेदी खर्च | | ३०६ |
| ५. | ग्राहक वर्गवारी नुसार वर्ष २०१४-१५ मधील वीज विक्री | | ३०७ |
| ६. | ग्राहक संख्या ३१.३.२०१५ रोजीचे | | ३०८ |

# कंपनीची माहिती

| संचालक मंडळ | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **संचालकांची नांवे** | **पद** |
| १. | **श्री. संजीवकुमार, भा.प्र.से.**<br>दि. २१.१२.२०१५ पासून | **अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक** |
| २. | **श्री. ओ. पी. गुप्ता, भा.प्र.से.**<br>दि. ६.०१.२०१५ पासून १६.१२.२०१५ पर्यंत | **अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक** |
| ३. | **श्री. अजॉय मेहता, भा.प्र.से.**<br>दि. २.२.२००९ पासून ५.१.२०१५ पर्यंत | **अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक** |
| ४. | **श्री. व्ही. के. कानडे, भा.प्र.से.**<br>दि. २१.११.२०११ पासून १४.०५.२०१४ पर्यंत | **संचालक, प्रधान सचिव (ऊर्जा)** |
| ५. | **श्री. मुकेश खुल्लर, भा.प्र.से.**<br>दि. ५.०१.२०१५ पासून ७.०५.२०१६ पर्यंत | **संचालक, प्रधान सचिव (ऊर्जा)** |
| ६. | **श्री. द. ध. वाव्हळ**<br>दि. २०.०८.२००९ पासून १.६.२०१५ पर्यंत३ | **संचालक (वित्त)** |
| ७. | **श्री. सुनिल ल. पिंपळखुटे**<br>दि. २४.०७.२०१५ पासून | **संचालक (वित्त)** |
| ८. | **श्री. अभिजीत देशपांडे** | **संचालक (संचालन)** |
| ९. | **श्री. प्र. उ. शिंदे** | **संचालक (प्रकल्प)** |
| १०. | **डॉ. अशोक हरणे** | **स्वतंत्र संचालक** |
| ११. | **श्री. प्र. वि. पागे**<br>दि. ५.०६.२०१४ ते २९.९.२०१५ | **स्वतंत्र संचालक** |
| १२. | **श्री. विश्वास पाठक**<br>दि. १४.०८.२०१५ पासून | **स्वतंत्र संचालक** |
| १३. | **श्रीमती. जुईली वाघ** | **स्वतंत्र संचालक** |

| | |
|---|---|
| **कंपनी सचिव**<br>श्रीमती अंजली गुडेकर | **सांविधिक लेखापरिक्षक**<br>मे. मित्तल ॲण्ड असोसिएट्स - सीए<br>मे. बी. एन. केडीया ॲण्ड कंपनी - सीए<br>मे. कलानी ॲण्ड कंपनी - सीए |

## नोंदणीकृत कार्यालय

प्रकाशगड, प्लॉट नं. जी-९, प्रा. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पू.) मुंबई - ४०० ०५१.
वेबसाईट : www.mahadiscom.in
सी आय एन क्र. यू ४०१०९ एम एच २००५ एस जी सी १५३६४५

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

# संचालकांचा अहवाल

**प्रति,**

**मा. सदस्य**

आपल्या कंपनीने दि. ३१ मार्च २०१५ रोजी संपलेल्या होय वित्तीय वर्षात केलेल्या कामगिरीचा वार्षिक अहवाल आणि त्यासोबत लेखापरिक्षित केलेली लेख्यांची विवरणपत्रे आपले संचालक सादर करत आहे.

**वित्तीय ठळक वैशिष्टे** (रु. लाखात)

| तपशील | वित्तीय वर्ष | |
|---|---|---|
| | २०१४-१५ | २०१३-१४ |
| **वीज विक्रीपासून महसूल** | ५,५५३,४७३ | ५,०६२,१६५ |
| **इतर उत्पन्न** | १९५,७५३ | १६४,०४१ |
| **घसारा व वित्तीय खर्चापूर्वीचा नफा** | १८१,९५६ | ३४१,०९२ |
| **घसारा** | १६७,९८९ | १६७,६४० |
| **वित्तीय खर्च** | २८१,८६८ | २९०,११६ |
| **करपूर्व नफा / (तोटा)** | (४६,२१५) | (११६,६६४) |
| **वजा १) करांसाठी तरतूद** | ४ | १०,३१९ |
| **२) स्थगित कराची समायोजने** | (९,६५०) | (९८,९४०) |
| **करोत्तर नफा/(तोटा)** | (३६,५७०) | (२८,०४२) |

**प्रवर्तमानातील कामगिरी :**

कंपनीनने आपल्या प्रवर्तनाच्या दहाव्या वर्षात ९४८०५ दशलक्ष युनिट विजेची विक्री केली. यातून रु. ५५५ ३४७२.८७ लाखाच्या महसूल मिळविला. मात्र घसारा, व्याज, वित्तीय आकार व इतर वजावटींसाठी तरतूदी केल्यानंतर कंपनीला करपूर्व रु. ४६२१५.३५ लाख तोटा झाला आहे. या तोटयाची प्रमख कारणे म्हणजे वीजदराचे आदेश मिळण्यास होणारा विलंब, ओ.ए. खेळत्या भांडवलीवरील व्याज नामंजूर होणे इ. आहे.

**भार नियमन पद्धती :**

गेल्या काही वर्षात अर्थव्यवस्थेत चांगली गती आल्यामुळे विजेच्या वापरात मोठी वाढ झाल्याचा अनुभव कंपनीला येत आहे. विजेची उपलब्धता वाढल्याने कंपनी भार नियमन हळूहळू कमी करण्यासाठी उपाय योजना करीत आहे.

महावितरणची वीज उपलब्धता वाढली आहे कारण राज्यातील क्षमता वाढीच्या सुनियोजित कार्यक्रम अमलात येत आहे. तसेच वीज वितरणाची यंत्रणा सुदृढ करण्यात येत आहे. म्हणून महावितरणने खालील निर्णय घेतले आहेत.

- म.औ.वि. महामंडळाच्या क्षेत्रातील उद्योग आय टी पार्क्ससाठी व महानगरपालिकेच्या जल व्यवस्था व अन्य उपयुक्त कामाच्या संस्था यांना वीज पुरवठा करणारे फिडर्स यांना भार नियमातून वगळले आहेत.

- सिंगल फेजींग स्किमसाठी थ्री फेज उपलब्धता आणि कृषींचे वेगळे फिडर्स या मध्ये दिवसाच्या वेळेत ८ तासाची उपलब्धता आणि रात्रीच्या वेळेत प्रत्येक दिवसी पाळी पाळी ते १० तास उपलब्धता असावी.
- अ,ब,क व ड गटातील एस टी डी असणारे सिंगल फेजींगचे फिडर्स आणि शेतीसाठी वेगळे केलेले फिडर्स यांना २४ तास सिंगल फेजचा वीज पुरवठा केला जाईल.
- एल आय एस योजनेतील एक्सप्रेस फिडर्स वर सलग सोळा (१६.००) तास थ्री फेजचा पुवरठा उपलब्ध करण्यात आला असून प्रत्येक सप्ताहात एक दिवस स्टँगटींग साठी ठेवला आहे.
- नक्षलग्रस्त क्षेत्रात सायंकाळी ०६ वाजेपासून सकाळी ०६ वाजेपर्यंत भार नियमन करण्यात येत नाही.
- दहावी/बारावीच्या परीक्षा व महत्त्वाचे सन उदा. रमझान, गणेशोत्सव, नवरात्री, मोहरम आदिच्या वेळी सांयकाळ नंतर भार नियमन केले जात नाही.

**वीज खरेदी**

वित्तीय वर्ष २०१४-१५ मध्ये खालील स्वतंत्र / खाजगी वीज वितरणाची केंद्रे कार्यान्वित झाली आणी ती महावितणला वीज पुरवठा करु लागली.

| वीज पुरवठादार कंपनीचे नांव | युनीट | क्षमता | कर्यान्वयाची तारीख |
|---|---|---|---|
| मे. अदाणी पॉवर महाराष्ट्र लिमिटेड | युनीट ४ | ६०० मे.वॅ. | ०१.०४.२०१४ |
| मे. अदाणी पॉवर महाराष्ट्र लिमिटेड | युनीट ५ | १२५ मे.वॅ. | ११.१०.२०१४ |
| मे. रत्तन इंडिया लि. | युनीट २ | २५० मे.वॅ. | २२.०४.२०१४ |
| मे. रत्तन इंडिया लि. | युनीट ३ | २५० मे.वॅ. | ०२.०२.२०१५ |
| मे. रत्तन इंडिया लि. | युनीट ४ | २५० मे.वॅ. | ०७.०३.२०१५ |
| मे. रत्तन इंडिया लि. | युनीट ५ | २५० मे.वॅ. | १३.०३.२०१५ |
| एकूण | | १७२५ मे.वॅ. | |

यावर्षी वायूची टंचाई असल्याने महानिर्मितीच्या दीर्घ मदतीचे स्त्रोत म्हणजे उरण वायू वीज केंद्र आणि आर जी पी पी एल यांची वीज निर्मिती कमी झाली. आर जी पी पी एल यांची वीज जानेवारी २०१४ पासून उपलब्ध नाही. भारनियमन कमी करण्यासाठी महावितरणला आय ई एस मार्फत १८६६.८५ दशलक्ष युनिट आणि पी एक्स आय आय यांचेकडून २८५.४२ दशलक्ष युनीट वीज, वित्तीय वर्ष २०१४-१५ मध्ये आकस्मित गरज भागविण्यासाठी, स्पर्धात्मक दर्शने मिळवावी लागली. तसेच महावितरण कडील मागणी जेव्हा कमी होती तेव्हा आय इ एक्स मार्फत ५४०.०९ दशलक्ष युनीट आणि पी एक्स आय एल मार्फत ३९.८९ दशलक्ष युनीट विजेची विक्री केली.

महावितरण कंपनी मे. बृहन्मुंबई इलेक्ट्रीक सप्लाय अॅड ट्रान्सपोर्ट कंपनी म्हणजे बेस्ट या उपक्रमांच्या वीज खरेदी लिलावत सहभागी झाली व बेस्टला खालीलप्रमाणे वीज विक्री करण्यासाठी एल ओ आय मिळविला.

- महावितरणने जुलै २०१४ ते मार्च २०१५ या काळात बेस्टला ४० मे. वॅ ते १४० मे. वॅ. या दरम्यान वीज विक्री केली. तिचा दर रु २.९० ते रु. ३.०५ प्रती युनिट या कक्षेत होता.

- महावितरण कडील अतिरिक्त वीज बेस्ट उपक्रमाला विकल्यामुळे अशा विजेच्यां वापराच्या समस्येतून महावितणाला सुटका मिळाली. मे. बेस्टला वकिलेल्या अतिरिक्त विजेच्या मिळालेल्या महसुलामुळे फक्त महावितरण कंपनीलाच नव्हे तर तिच्यां ग्राहकाच्याही अंतिमत: मदत होईल.

- **पूनर्रचित गतिमान वीज विकास व सुधारणा कार्यक्रम आर ए पी डी आर पी भाग 'अ':**

  या कार्यक्रामच्या भाग 'अ' मध्ये बेस लाईन डेटाचे प्रकल्प व ऊर्जा लेखे/ लेखा परिक्षण या कामासाठी माहिती तंत्रज्ञानाचे काम व माहिती तंत्रज्ञान आधारित ग्राहक सेवा केंद्रे यांचा समावेश होतो.

- **आर पी डी आर पी ए :** भाग अ चे ज्यांची लोकसंख्या ३००००पेक्षा जास्त आहे (जनगणना २००१ प्रमाणे) अशा १३० गावांची निवड भाग अ या कार्यक्रमाच्या अमंलबजावणीसाठी केली.

  यासाठी पी एफ सी ने सुधारित कर्ज रक्कम दि.१९.०३.२०१० रोजी मंजूर केली दोन शहरे फ्रॅचायझीमध्ये गेल्याने ती वगळण्यात आली. त्यामुळे मंजूरीत खर्च रु. ३१५ कोटीने कमी झाला.

- सर्व १२८ शहरात ऑक्टोंबर २०१४ मध्ये योजना सुरु झाल्याचे जाहीर करण्यात आले.

आर ए पी डी आर पी भाग अ यासाठी दि. ३१.०८.२०१५ पर्यंत रु. २३०.५५ कोटी खर्च झाले होते.

**आर ए पी डी आर पी स्काडा (भाग अ - भाग ब)**

**स्काडा भाग - अ :**

- ज्यांची लोकसंख्या ४ लाखांपेक्षा जास्त आहे आणि जेथील वार्षिक ऊर्जा वापर ३५० दशलक्ष युनीटस पेक्षा जास्त आहे त्याची निवड पी एफ सीने स्काडा/ डी एम एस च्या अमंलबजवणीसाठी केली व रु. १६१.६२ कोटी मंजूर केले यासाठी पात्र ठरलेली शहर अशी : **अमरावती, नाशिक पुणे, मालेगांव, सांगली, सोलापूर, बृहन्मुंबई आणि कोल्हापूर.**

**स्काडा भाग 'अ' ची व्याप्ती**

- निश्चित केलेल्या ८ शहरात स्काडा /डी एम एस नियंत्रण केंद्र स्थापणे
- आर एपीडी आर पी भाग अ अंतर्गत सुरु केलेल्या माहिती तंत्रज्ञान प्रणाली सोबत एकात्मिकरण करणे.
- सर्व ६६/३३/२२/११ केव्ही वीज उपकेद्रांत आर टी यू पुरविणे, ती स्थापित करुन तिचे एकात्मिकीकरण व कार्यान्वित करणे.
- ११ केव्ही वीज वितरण नेटवर्क मध्ये आर एम यू च्या जागेवर एफ आर टी यू स्थापित करणे.
- ३३/११ केव्ही उपकेंद्राचे व ३३ केव्ही यांचे नियंत्रण व पर्याविक्षाणासाठी स्काडा/ डी एम एस प्रणाली

**स्काडा भाग अ ची यशस्वी कामगिरी खालील प्रमाणे आहे.**

- शहरात स्काडा/ डी एम एसची अमंलबजावणी करण्यासाठी मे. सिमेन्स या कंपनीस दि. १३.१२.२०११ रोजी पत्र दिले त्यास रु १४४.२७ कोटी सिमेन्सच्या पत्रात दि. ०३.०९.२०१४ रोजी रु. १०३.४० कोटीची दुरुस्ती केली.
- सर्व स्काडा नियंत्रण केंद्राची कामे पूर्ण झाली . ९४ आर टी यू, ९७६ एफ आर टी यू आणि १२२७ आर एम यू यांचे कार्यावयन पूर्ण झाले.
- स्काडा (भाग अ) चा दि. ३१.०८.२०१५ चा खर्च रु. २१.९७ कोटी होता.

**स्काडा भाग ब ५ शहरे**

- जेथे सरासरी पारेषण व वाणिज्यक हानी १५ टक्यापेक्षा कमी आहे अशा ५ शहरांसाठी पी एफ सी १५४.५४ कोटी मंजूर केले. ही शहरे अशी बृहन्मुंबई, अमरावती, सोलापूर, सांगली व मालेगांव.
- स्काडा भाग ब ची व्याप्ती स्वयंचलनासाठी आवश्यक ती साधने स्थापन करणे. यामध्ये रिंग मेन युनीट्स, ११ केव्ही फिडर्सच्या रक्षणासाठी न्युमेरिकल रिले, कॅपसिटर्स व इनकमर्स, स्वयंचलीत व्होल्टेज रेग्यूलेटर्स, वाईडींग टेम्परेचर इंडिकेटर, इ समाविष्ट आहेत.

**स्काडा भाग ब चे यश**

- स्काडा भाग ब च्या कामासाठी मे.लीना पॉवरटेक यांना कंत्राट देण्याची प्रक्रिया चालू (कंत्राट खर्च रु. ११०.६२ कोटी)
- स्काडा (भाग ब) चा ३०.०४.२०१५ पर्यंतचा खर्च रु. ४६.७८ कोटी.

**स्काडा भाग ब - ( ३ शहरांसाठी)**

- कोल्हापूर, नाशिक व पुणे या तीन शहरातील ए टी अ‍ॅड सी हानी १५ टक्क्यापेक्षा जास्त असून त्यासाठी पी एफ सी ने रु. ३४.६७ कोटी मंजूर केले.

**स्काडा भाग ब ची व्याप्ती :**

- स्वयंचलनासाठी आवश्यक अशी साधने स्थापन करणे म्हणजे ११ केव्ही फिडर्सच्या रक्षणासाठी न्युमरिकल दिले, कपॅसिटर्स व इनकमर्स, अ‍ॅटोमॅटीक व्होलटेज रेग्यूलेटर्स पावर ट्रान्सफॉर्मरच्यासाठी वाईडिंग टेंपरेचर इंडिकेटर व आईल टेम्परेचर इडिकेटर इ.
- मे. महर अ‍ॅक्टीव्ह इंजिनियर्स प्रा.लि. यांनी मे. लिनियर एंटरप्राजेस सोबत सयुंक्त प्रकरणासाठी स्वीकार पत्र दि. १४/०५/२०१५ रोजी दिले. या (कंत्राटाचा खर्च रु. १४.३४ कोटी आहे.)

**आर ए पी डी आर पी भाग ब :**

या भागात प्रकल्पाचे नियमित बळकटीकरण करणे व क्षमता वाढवून ए टी अ‍ॅड सी हानी १५ टक्कयापेक्षा कमी करणे याचा समावेश आहे.

पी एफ सी ने आर ए पी डी आर पी भाग ब साठी १२३ शहरातील डी पी आर मंजूर केले त्या साठी रु. ३३१४.२० कोटी मंजूर केली. याची पत्रे खालीलप्रमाणे

- मंजूरी पत्र क्र. २:१० आर-ए पी डी आर पी (पी -बी ) : I : २०१० : महावितरण दि. ८/६/१०.
- मंजूरी पत्र क्र. ०२ : १० : आर -ए पी डी आर पी (पी- बी ):II: २०१० महावितरण दि. २३.०८.२०१०.

- मंजूरी पत्र क्र. :०२:१०: आर :ए पी डी आर पी (पी-बी ) : I : २०१० : महावितरण दि. ११.०३.२०११
- मंजूरी पत्र क्र. :०२:१० आर : ए पी डी आर पी (पी-बी) : II : २०१० : महावितरण दि. ३०.०६.२०११

  या १२३ शहरापैकी १२० शहरातील आर ए पी डी आर पी भाग ब योजनेच्या अंमलबजावणीसाठी निविदा प्रसारीत केल्या. त्यातील सर्व १२० शहरांसाठी समंतीपत्रे जानेवारी, फेब्रुवारी, मार्च, मे व जून २०१२ मध्ये दिली. याचा खर्च रु. १६९६.२१ कोटी आहे.

- आर ए पी डी आर पी भाग ब चा दि. ३०.०४.२०१५ रोजी पर्यंतचा खर्च रु. १०९४.०३ कोटी असून भाग ब चे एल ओ ए दिले आहेत.

  दि. ३०.०४.२०१५ पर्यंतची यशक्ती कामगिरी खालीलप्रमाणे आहे.

| अनुक्रम | कार्याचा तपशील | युनीट | व्याप्ती | यशस्वी कार्य |
|---|---|---|---|---|
| १ | नवीन वीज उपकेंद्र | संरक | १३६ | ९८ |
| २ | पॉवर ट्रान्स्फॉर्मरची क्षमता वाढविणे | संरक | २७ | २६ |
| ३ | पॉवर ट्रान्स्फॉर्मरची संख्या वाढविणे | संरक | ३२ | २७ |
| ४ | उच्च दाबाच्या वरच्या तारा | किमी | २११३ | १०६० |
| ५ | उच्च दाबाच्या भूमीगत तारा | किमी | १४९९ | ८८९ |
| ६ | कमी दाबाच्या खांबा वरच्या तारा | किमी | ११११९ | ६५१ |
| ७ | कमी दाबाच्या भूमीगत तारा | किमी | १२८४ | ९७१ |
| ८ | नवीन वितरण ट्रान्स्फॉर्मर / एच व्ही डी एस | संरक | ६४२१ | ४६८२ |

## वितरण

### प्रणाली सुधारणा योजना :

वितरण हानी कमी करण्यासाठी वर्ष २०१४-१५ मध्ये वरीलप्रमाणे ९९ नवीन वीज उपकेंद्रे व ११ नवीन स्विचिंग स्टेशन्सची भर करण्यात आली. याशिवाय वाणिज्यक हानी कमी करण्यासाठी जुन्या इलेक्ट्रो-मेकॅनिकल मिटर्स व खराब मिटर्सच्या जागी आय आर मिटर्स स्थापन केले.

### पारेषण व वितरण हानी कमी करण्यासाठी रिअॅक्टीव्ह पॉवरचे नियोजन करणे.

दि. ३१.०३.२०१५ पर्यंत विविध वीज उपकेंद्रात २१७०.२३ एम व्ही ए आर कपॅसिटर बँकस हे साधन स्थापित केले तर फिडर्सवर २४७४.१८ एम व्ही ए आर लाईन कपॅसिटर्स स्थापन केले. तसेच एल टी कपॅस्टिर बँकाची संख्या ११२४.८७ एम व्ही ए आर होती. एच व्ही स्तरावर ८७.५ एम व्ही एम ची भर केली.

## ग्रामीण विद्युतीकरण :

### १) ग्रामीण विद्युतीकरण व कृषीपंपाचे उर्जिकरण :

ग्रामीण विद्युतीकरणाच्या नवीन व्याख्येप्रमाने आणि वर्ष २०११ च्या जनगणनेप्रमाणे तसेच प्रारंभिक सर्वेक्षणच्या आधारे एकूण ४०९५९ खेडयांपैकी ४०८९७ खेडयांचे विद्युतीकरण झालेले आहे.

महावितरण कंपनीने वर्ष २०१४-१५ मध्ये १४७९३३ कृषीपंपाचे उर्जिकरण केले. या कार्यक्रमाच्या अमलबजावनीनंतर राज्यातील उर्जिकरण झालेल्या पंपाची एकूण संख्या ४२२२९६६ आहे ती देशातील सर्व राज्यांमध्ये सर्वोच्च आहे.

### २) दलित वस्त्यांचे विद्युतीकरण :

महावितरणाच्या धोरणानुसार कोणत्याही गावठाणाच्या विद्युतीकरणास मंजूरी देताना जर तेथे काही दलीत वसत्या असेल त्यांच्या विद्युतीकरणाच्या कामात समावेश केला जातो. दि. ३१.०३.१९९८ पर्यंत ज्यांचे विद्युतीकरण करणे शक्य आहे अशा सर्व ३३७११ दलीत वस्त्यांचे विद्युतीकरण पूर्ण झालेले आहे.

### ३) आदिवासी उपयोजना :

वर्ष २०११ च्या जनगणनेप्रमाणे आदिवासी क्षेत्रात २९ शहरे ८३९९ गांवे आहेत. महावितरणने वर्ष २०१४-१५ मध्ये आदिवासी उपयोजने अंतर्गत ११७६ कृषीपंपाचे उर्जिकरण केले. त्यामुळे आता आदिवासी उपयोजनेद्वारे उर्जिकरण झालेल्या पंपाची एकूण संख्या १५६२३५ झाली आहे.

### ४) दुर्बल गटातील घरकूलांना वीज जोडण्या :

दि. ०१.१०.१९७६ पासून महावितरण कंपनी समाजातील दुर्बल घटकातील व्यक्तींच्या घरकुलांना नेहमीचे सेवा आकार न घेता वीज जोडण्या पुरवित आहे. यामध्ये १) अनुसूचित जाती २) अनुसूचित जमाती ३) भटक्या जमाती ४) विमुक्त जाती आणि ५) नव बौद्ध यांचा समावेश आहे. वर्ष २०१४-१५ मध्ये अशा एकूण ११०९१ घरकूलांना वीज जोडण्या देण्यात आल्या. त्यापैकी ८७०२ जोडण्या अनुसूचित जाती व नवबौध्दांच्या घरकूलांना दिल्या. आतापर्यंत वरील पाच श्रेणी तील १७४९२९६ जोडण्या दिल्या त्यापैकी १३२७५८२ जोडण्या अनुसूचित जाती व नव बौद्धांना दिल्या.

## वाणिज्यिक :

**जमा करण्याची कार्यक्षमता :**

| वित्तीय वर्ष | जमा करण्याची कार्यक्षमता |
|---|---|
| ३१/०३/२०१४ रोजी | ९८.५ |
| ३१/०३/२०१५ रोजी | ९८.८६ |




**<u>पांरपारिक ऊर्जेला पूरक अपांरपारिक स्त्रोतला विजेचा वापर :</u>**

म.वि.नि.आयोगाच्या (आर पी ओ-आर इ सी) नियमन २०१० नुसार महावितरण कंपनीवर नूतणीकरण वीज खरेदीचे बंधन (पी आर ओ) आहे. यासाठी अपांरपारिक ऊर्जा मिळविण्याचे सर्वोत्तपरी प्रयात केले जातात व हे बंधन पूर्ण करण्याचे शक्यतेवढे प्रयत्न केले जातात.

**अपारंपारिक विजेची स्त्रोतनिहाय क्षमता वाढ (३१/०३/२०१५ रोजी)**

| अनु.क्र. | स्त्रोत | कार्यन्वित क्षमता (मे. वॅ.) (महावितरणला विक्री केलेली) | | |
|---|---|---|---|---|
| | | ३१/०३/२०१४ रोजी | क्षमता वाढ | ३१/०३/२०१५ रोजी |
| १ | पवन | ३०१२ | ० | ३०१२ |
| २ | सह-निर्मिती | १४९५.५५ | २००.८ | १६९६.३५ |
| ३ | बायोगास (जैविक पदार्थ) | १३७ | १० | १४७ |
| ४ | लघू जल विद्युत | २४५.९७५ | ४.४ | २५०.३७५ |
| ५ | सौर | १५२ | ५० | २०२ |
| ६ | एम एस डब्लू (घन कचरा) | ३ | ० | ३ |
| | एकूण | **५०४५.५२५** | **२६५.२** | **५३१०.७२५** |

टिप — १) वि. वर्ष २०१४-१५ मध्ये पवन विजेचे सुमारे ३६० मे.वॅ क्षमतेचे प्रकल्प कार्यान्वित झाले. मात्र आजपासून महावितरण ने उर्जाखरेदी करार केले नव्हते.

२) लघू जल विद्युत प्रकल्प क्षमतेमध्ये महानिर्मिती कंपनीचे लघू जल विद्युत प्रकल्प व डॉड सन -१ यांच्या समतेचा समोवश आहे.

३) पवन व सहनिर्मितीप्रकल्पाचा दि. ३१.०३.२०१४ रोजीची कार्यान्वित क्षमतेची पडताळणी व मेळ केला आहे.

**<u>माहिती तंत्रज्ञान :</u> वर्ष २०१४-१५ मधील माहिती तंत्रज्ञान उपक्रम व अमंलबजावणी इ आर पी उपाय**

महावितरण कंपनी आपली महत्वाची कार्ये म्हणजे वित्त, प्रकल्पकार्य व विद्यमान प्रणाली सोबत एकत्रीकरण करुन सुधारणा करण्यासाठी इ आर पी सोल्यूशनचा अंतर्भाव करीत आहे. विद्यमान प्रणालीत वारश्याने आलेल्या प्रणाली, पूर्व इ आर पी प्रणाली व सहयोगी प्रणाली इ च्या समावेश आहे. यामुळे कार्यक्षमता वाढून त्याचा महावितरणाच्या सर्वकंश कामगिरीकर प्रभाव पडेल. वरील कामांना ती उपयुक्त होईल.

**<u>या प्रकल्पांची व्याप्ती खालीलप्रमाणे आहे.</u>**

अ) इ आर पी प्रकल्प व संबंधित सॉप्टवेअर पुरविणे व स्थापित करणे.

ब) इ आर पी वित्तीय लेखे, प्रकल्प व्यवस्थापन यामध्ये स्थापना करणे व नियंत्रण ठेवणे.

क) विद्यमान एम आय एस आर एपिडी आर पी ॲप्लीकेशन्स स्काडा आणि डी एम एस यांचे सोबत एकात्मिकीकरण करणे ( या दोन्ही प्रणाली आर ए पी डी आर पी भाग अ व इतर संलग्न प्रणालीत अमलांत येत आहे.)

ड) विद्यमान देयक यंत्रणेची नवीन रचना करणे/दर्जा वाढविणे व त्यासाठी एन टियर आर्किटेक्चर तयार करणे व प्रस्तावित इ आर पी सोबत एकात्मिकीकरण करणे.

इ) एम आय एस चे मोडयूल्स व इतर सलग्न प्रणाली यात वृद्धी करण व त्यांची देखभाल करणे

एफ) कस्टम ॲप्लीकेशन विकसीत करणे व देखभाल करणे.

**इ. आर.पी प्रकल्पाच्या व्याप्तीत समावेश केलेले मोडयूल्स**

- वित्तीय व्यवस्थापन (एफ आय/सी ओ)
- .भांडारे, वस्तुसूची व खरेदी (एम एम)
- प्रकल्प व्यवस्थापन प्रक्रिया (पी एस)
- कारखाना व्यवस्थापन (पी एम)
- देयक योजनेचा एन टीयर आर्किटेक्चर मध्ये दर्जा उंचावणे
- भार व्यवस्थापन यात भार विश्लेषण समाविष्ट आहे.
- भविष्य निर्वाह निधीचे अंशदान
- पोर्ट फोलिओ मॅनेजमेंट
- कोटेशन मॅनेजमेंट
- वितरण फ्रँचायझी
- वीज दर नियमन कक्ष

हीइ आर पी प्रणाली महावितरणच्या सर्व कार्यालयात कार्यरत आहे.

**<u>बी आय जी डेटा सोल्यूशनची महावितरण मध्ये कार्यवाही</u>**

**प्रकल्पाचे लक्ष्य व हेतू :**

- महावितरणमध्ये बीग डेटा सोल्यूशनचे प्रत्येक कामात अमलबजावणी यात सॅप, एच ए एन ए, सायबस, आयक्यू आणि संबंधित सॉपटवेअर परवाने
- महावितरणमध्ये बिझनेस इंटिलीजन्स आणि हिस्टॉरीकल डेस यांचे विश्लेषणात्मक अहवालाचे सकंल्प चित्र करुन योजना तयार करणे.
- विद्यमान देयक प्रणालीचे नविन सायबेस आयक्यू डेटाबेसमध्ये स्थलांतर करणे
- डब्ल्यू इ बी आय रिपोर्ट आणि एक्झिक्यूटीव्ह डॅश बोर्डस तयार करणे, त्यासाठी के पी आय लँडीग पेजेस व ड्रील थ्रु रिपोटर्स वापरणे

- देयक प्रणाली, इ निविदा , एच आर एस एल, पे रोल, डेटा वेअरहाऊस, इ मेल, आर - एपीडी आर पी प्रणाली आदि विद्यमान प्रणाली सोबत विना अडथळा एकात्मिकीकरण करणे (नवीन वीज जोडण्या, जोडण्या बंद करणे, ऊर्जा अंकेक्षण, सी आर एम, वेब सेल्फ सर्विस , ऑन लाईन देयके भरणे इ) सर्व सॅप इ आर पी मोडयूलस, सिस्टम व भविष्यातील प्रणाली
- सर्वकेष तांत्रिक प्रशिक्षण देणे
- सोल्यूशन प्रभावी अंगीकार करण्यासाठी व्यवस्थापकीय बदल
- अमलांत आलेल्या सोल्यूशनसाठी एक वर्षाची वॉरंटी व सर्वकंष आधार पुरविणे. त्यासाठी सोल्यूशन सुरु झाल्यापासूनत्या तारखेपासून करार करणे.

**सद्यस्थिती :**

- सोल्यूशन, जवळजवळ पूर्ण झाली असून प्रॉडेक्शन सर्वरवर त्यांचा वापर सुरु केला आहे.
- वापर स्वीकार चाचण्या प्रगती पथावर आहेत.
- ऑक्टोंबर २०१५ पर्यंत बिग डेटा सोल्यूशन सुरु होतील. (गो-लाई)
- **वर्ष २०१४-१५ मधील प्रस्तावित कार्ये :**
  १. नव्या वीज जोडण्या , मीटर वावन , स्थळ शोधणे (खांबाच्या जागा) इत्यादि करिता मोबाईल ॲप्लीकेशन तयार करणे.
  २. महावितरणच्या ग्राहकांना देयकांविषयी एस एम एस द्वारे सावध करण्योच संदेश देणे.
  ३. ऑनलाईन भरणा करण्यासाठी जागरुकता निर्माण करणे
  ४. उच्च दाबाच्या ग्राहकांकरिता ऑनलाईन तक्रार नियंत्रण सुविधा

**<u>स्काडा / डी एम एस :</u> (सर्वेक्षणाद्वारे नियंत्रण व माहिती संपादन करणे वितरण व्यवस्थापन प्रणाली ) :**

आर ए पी डी आर पी कार्यक्रमातंर्गत ४ लाख पेक्षा जास्त लोकसंख्या असणारे (जणगणना २००१ ची मोजणी) आणि जेथे वार्षिक वीज वापर ३५० दशलक्ष युनीट पेक्षा जास्त आहे. असे शहरी भाग / नगरे ही स्काडा/डी एम एस अमलबजावणीसाठी पात्र आहेत. त्यानुसार महावितरणाच्या अधिकार क्षेत्रातील पुढील ८ शहरे स्काडा/डी एम एस साठी निवडली आहेत.

१. अमरावती २. नाशिक ३. पुणे ४. मालेगांव ५. सांगली

६. कोल्हापूर ७. बृहन्मुंबई ८. सोलापूर

**यात करावयाची महत्त्वाची कामे खालीलप्रमाणे आहेत.**

- या ८ शहरात स्काडा / डी एम एस नियंत्रण केंद्राची स्थापना
- आर ए पी डी आर पी भाग-अ अंतर्गत राबरिल्अेक्यार माहिती तंत्रज्ञान प्रणाली मध्ये एकात्मिकीकरण करणे.
- नागपूर येथे डेटा रिकव्हरी सेंटरची स्थापना
- सर्व ६६/३३/२२/११ केव्ही वीज उपकेंद्रात आर टी यू चा पुरवठा, स्थापना, एकात्मिकीकरण व कार्यान्वयन.
- ११ केव्ही वितरण जाळ्यात आर एम यू च्या जागेवर उपक्रेंद्र , एफ आर टी यू
- ३३/११ केव्ही उपकेंद्रे व ३३ केव्ही व ११ केव्ही यांचे नियंत्रण व पर्यावेक्षणासाठी स्काडा / डी एम एस.
- वितरण जाळे व स्काडा इन्फरमेशन स्टोरेज अॅड रिट्रायव्हल (ISR) कामे.
- नेटवर्क सोबत संपर्क व्यवस्था व बँडविड्थ ची तरतूद
- वितरण व्यवस्थापन प्रणाली त्यात खालील कामे केली जातील.
    - वीज जाळयांशी संपर्क व विश्लेषण
    - राज्यभराचे अंदाजपत्रक
    - लोड फलो अॅप्लीकेशन
    - व्होल्टेज कंट्रोल
    - भार नियमन अॅप्लीकेशन
    - दोष व्यवस्थापन व प्रणालीची पूर्ववत करणे
    - भार संतूलन फिडरच्या पूर्नजोडणीद्वारे
    - कार्यावर लक्ष देणे
    - वितरण भाराचा अंदाज करणे
    - स्काडा /डी एम एस/डिस्पॅचर ट्रेनिंग सिम्युलेटर

अमरावती, सोलापूर, सांगली, मालेगांव व बृहन्मुंबई या ५ शहरातील नियंत्रण केंद्रे यशस्वीपणे काम करीत आहेत स्काडा घटक (आर टी यू ऑनलाईन विथ कंट्रोल सेंटर) ५ शहरात कार्यरत आहेत.

या प्रकल्पाची संपूर्ण व्याप्ती मार्च २०१६ मध्ये पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. यासाठी मे. सिमेंन्सच्या कंत्राट ३१.०३.२०१६ पर्यंत वाढवून दिला.

| स्काडा-भाग 'अ' - मे. सिमेन्स - व्याप्ती | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शहर | नियंत्रण केंद्र | | जोडणी | | आर. टी. यू. | | |
| | स्थापना व कार्यान्वयत | दिलेली लिंक | उपकेंद्रांची व्याप्ती | स्थापना व कार्यान्वयत | उपकेंद्रांची व्याप्ती | स्थापना व कार्यान्वयत | ऑनलाईन वित्त सीसी |
| अमरावती | १ | १ | १४ | १० | १४ | १२ | १० |
| सांगली | १ | १ | १८ | ५ | १८ | ११ | २ |
| सोलापूर | १ | १ | १६ | ६ | १६ | ९ | ६ |
| बृहन्मुंबई | १ | १ | ८० | २१ | ८० | ५० | १६ |
| मालेगाव | १ | १ | १० | ५ | १० | ६ | ५ |
| **एकूण** | **५** | **५** | **१३८** | **४७** | **१३८** | **८८** | **३९** |

| शहर | एफ. आर. टी. यू. | | | |
|---|---|---|---|---|
| | व्याप्ती | पुरविलेले एफ आर टी यू | कार्यान्वयीत | ऑनलाईन वित्त सीसी |
| अमरावती | २४१ | २१७ | १५६ | १५६ |
| सांगली | १५३ | १४७ | १४७ | १०८ |
| सोलापूर | १९१ | १९१ | १५० | १३० |
| बृहन्मुंबई | १००८ | ६२७ | ३८४ | ३३१ |
| मालेगाव | ४३ | ० | ० | ० |
| **एकूण** | **१६३६** | **११८२** | **८३७** | **७२५** |

**अंतर्गत सुधारणा : महावितरणची वर्ष निहाय व वितरण हानी खालीलप्रमाणे :**

| वर्ष | वितरण हानी (%) | ए टी ॲंड सी हानी (%) |
|---|---|---|
| २००६-०७ | २९.५० | ३३.९८ |
| २००७-०८ | २४.०९ | २६.०८ |
| २००८-०९ | २१.९८ | २४.६० |
| २००९-१० | २०.६० | २१.४१ |
| २०१०-११ | १७.२८ | १८.४५ |
| २०११-१२ | १६.०३ | १८.४१ |
| २०१२-१३ | १४.६७ | १८.६८ |
| २०१३-१४ | १४.०० | १७.६८ |
| २०१४-१५ | १४.१७ | १८.७१ |

**हानी कमी करण्यासाठी कृती योजना : वितरण हानी कमी करण्याचे धोरण**

**तांत्रिक हानी कमी करणे – पायाभुत सुविधा योजना**

**उद्दिष्टे-**

- विश्वासार्ह व दर्जेदार वीज पुरवठा करणे
- भार वाढीची मागणी पूर्ण करणे
- वितरण हानी कमी करणे
- वितरण ट्रान्फॉर्मर बंद पडण्यचे प्रमाण कमी करणे

**<u>कामाची व्याप्ती</u>**

- ३३/११ केव्ही व २२/११ केव्ही उपकेंद्रे आणि २२ केव्ही आणि ११ केव्हीची स्विचींग स्टेशन्स उभारणे
- पॉवर ट्रान्सफॉमरची क्षमता संख्या वाढविणे.
- नवीन एच टी व एल टी लाईन्स उभारणे
- वितरण ट्रानस्फॉर्मरची क्षमता व संख्या वाढविणे.

**<u>पूर्नरचित गतिमान वीज विकास सुधारणा प्रकल्प</u>**

**उद्दिष्टे :**

- ग्राहकांच्या  सेवेची गुणवत्ता वाढविणे.
- मिटर वीज विक्री सुधारुन वितरण कंपन्यांची वाणिज्यकदृष्टया  जीवन क्षमता वाढविणे
- तांत्रिक व वाणिज्यक हानी कमी करणे
- वीज पुरवठयाची विश्वासार्हता व गुणवत्ता सुधारणे
- वीज यंत्रणा आत्याधुनिक करणे (स्काडा इ मध्ये वृद्धी करणे)

**भाग ब  वितरण प्रकल्प वाढविणे व सबळ करणे**

- ११ केव्ही स्तराच्या वीज उपकेंद्राचे नुतनीकरण, आधुनिकरण व सबलीकरण करणे.
- ट्रान्सर्फामर केंद्रे
- ११ केव्ही स्तर व त्याखालील वीजतारांची वाहकतेंचे पून:तपासणी करणे.
- भार विभाजन, फिडर अलग करणे, भाराचे संतूलन
- दाट लोकवस्तीच्या क्षेत्रात एरियल बंचड कंडक्टर्स
- इलेक्टोमॅग्नेटीक मिटर्सच्या जागी, ज्यामध्ये बिघाड करता येणार नाहीत. अशी मिटर्स (टेम्पर प्रुफ) स्थापन करणे
- कपॅसिटर बॉक्स स्थापन करणे व मोबाईल सर्विस सेंटर्स सुरु करणे इ.
- अपवादात्मक प्रकरणी जेथे उपपारेषण प्रणाली दूबळी आहे, तेथे ३३ केव्ही किंवा ६६ केव्ही स्तर सबल करणे.

**<u>वाणिज्यक हानी कमी करणे :</u>**

**आर ए पी डी आर पी भाग – अ  : प्रकल्प क्षेत्राला व्यापणारी आधार रेषेवरील माहिती संग्रह तयार करणे**

- ग्राहकांची अनुक्रमणिका व भौगोलिक नकाशे तयार करणे
- वितरण ट्रान्सफॉर्मर व फिडरसाठी स्वयंचलित मीटर वाचन

- ११ केव्ही व त्याखालील नेटवर्कसाठी ॲसेट मॅपींग करणे त्यामध्ये वितरण ट्रान्स्फॉमर्स, फिडर्स, एल टी लाईल्स, खांब व इतर वितरणाच्या साधनांच्या जागा नकाशात नोंदविणे.
- मिटर रिडींग, देयके देणे व रक्कम गोळा करणे, ऊर्जेचे लेखे तयार करणे व अंकेक्षण करणे या कामांसाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर करणे.

**आर ए पी डी आर पी :**

खालील नमूद केलेली सर्व मोडयुल्स (म्हणजेच सी आर एम, डी सी, इ ए, एन सी, एन डी एम , डब्लयू एस एस, आर ए पी डी आर पी – एम आय एस, एम डी ए एस, नेटवर्क ॲनॅसिअस, ॲड जी आय सी इ.) आर ए पी डी आर पी च्या स्किम शॉटवर पोर्टल वर आणून त्यांचे काम व्यवस्थित असण्याची तपासणी करणे. यामध्ये भांडूप व पुणे येथील केंद्रीय ग्राहक निगा कॅडांचाही समावेश आहे.

**स्वयंचलीत मिटर वाचन :**

- मीटरचे आकडे सेंट्रल सर्वरमधे पाठविण्यासाठी मीटर वर मोंडेम्स लावले आहेत. सेंट्रल सर्वरमधे ग्राहकांची माहिती साठविली जाते.
- मीटरचे अंक व भाराचे मापदंड यांची पूर्व निश्चित, ठराविक कालावधीनुसार पाठवणी करणे.
- वीज वापरातील मोठे बदल, मिटर बिघाड इ. शोधणे,

**वीज चोरीचर नियंत्रणे**

- वीज चोरीस आळा घालण्यासाठी ४२ भरारी पथके कार्यरत आहेत.
- वीज चोरी शोधणे या एकमेव कामासाठी ६ पोलिस ठाणे
- वीज चोरी शोधण्यासाठी नियमितपणे मोहिमांचे आयोजन

**वितरण फँचायझी :**

भारतातील वीज क्षेत्रांपुढे वीज वितरणातील तांत्रिक व वाणिज्यक क्षेत्रातील गंभीर हानीची समस्या आहे. ही समस्या प्रामुख्याने वीजचोरी व वसुलीची अकार्यक्षमता यामुळे निर्माण झाली आहे. त्यामुळे पुरविलेल्या सुमारे ५० टक्के विजेंची हानी होते. देशातील विविध वीज वितरण संस्थानी या क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी बऱ्याच उपाय योजना केल्या. त्यापैकी सार्वजनिक खाजगी सहभाग ही रचना मोठया प्रमाणात मान्य झाली आहे. त्यामुळे गुंतवणूक वाढते, कार्यक्षमता सुधारते व ग्राहकांना चांगली सेवा मिळते. वीज सेवा देणारी वितरण फँचायझी हा एक नवीन कार्यक्रम महावितरण कंपनीने अमलांत आणला.

**भिवंडी वितरण फँचायझी :**

महाराष्ट्रातील ठाणे जिल्हयातील भिवंडी मंडळासाठी वितरण फ्रँचायजी म्हणून मे. टोरेंट पॉवर लिमिटेड या कंपनीची

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## मे. टोरेंट पॉवरचे (टीपीएल) भिंवडी फ्रॅंचायझी क्षेत्रातील कामगिरी :

| तपशील | हस्तांतरणा पूर्वी | हस्तारंण केल्यानंतर | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष | २००६-०७ | २००७-०८ | २००८-०९ | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०११४-१५ |
| वीज पुरवठा (एम युज) | २५२०.९९ | २६२०.१९ | २७८३.४ | ३०३५.७२ | ३०६०.०६ | ३१८७.५३ | ३४३४.८ | ३४७२.६८ | ३७६५.६१ |
| वीज विक्री (एम यू) | १४६५.८८ | १९०८.०९ | २२४१.८९ | २४४८.९८ | २५१०.६८ | २६३६.१ | २८३२.६ | २७५९.६१ | २९५४.६३ |
| वितरण हानी (%) | ४१.८५ | २७.१८ | १९.४५ | १९.३३ | १७.९५ | १७.३० | १७.५३ | २०.५३ | २१.५४ |
| जमा करण्याची कार्यक्षमता % | ६८.२ | ८०.१ | ९५.९ | ९९.६१ | ९९.४ | ९९.१५ | ९४.१ | ९६.१७ | ९८.४९ |
| डी टी सी संख्या | २२४७ | २३०४ | २४१९ | २५७१ | २६३१ | २६९८ | २७७० | २८६४ | २९११ |
| डी टी सी बंद पडेल % | ३४.४१ | २०.४ | ७.४८ | ३.७७ | २.४३ | १.८५ | १.४४ | १.०१ | ०.९६ |

## मे. टी पी एल यांनी केलेल्या सुधारणा

१. विद्यमान ४६ फिडर्स मध्ये नवीन २२ केव्ही क्षमतेची २८ फिडर्स आणि २० नवीन रिंग मेन फिडर्सची भर घातली.

२. विद्यमान चार स्विचींग स्टेशनची तसेच २२००० वितरण ट्रान्स्फॉर्मसचे अद्यायावती करण केले.

३. १००० पेक्षा जास्त वितरण ट्रान्स्फॉर्मर बदलले.

४. पॉवर ट्रान्स्फॉर्मरची क्षमता ४२५ एम व्ही ए ने वाढविली

५. ११० एम व्ही ए आर कपॅसिटर्स स्थापन केले.

६. क्षेत्र ताब्यात घेण्यापूर्वी मिटर वाचनाच्या आधारे ४६ टक्के देयके दिली जात असत हे प्रमाण आता ९८ टक्के आहे.

७. २४ X ७ कार्यरत असणारे कॉल सेंटर सुरु केली.

८. २४ X ७ कार्यरत असणारी नियंत्रण कक्ष व दोष निवारण केंद्र स्थापन केले.

९. फक्त ग्राहकांची काळजी घेणारे दोन समर्थन केंद्रे सुरु केले.

१०. विद्युत अधिनियम २००३ च्या तरतूदीनुसार अंतर्गत गा-हाणी निवारण कक्ष स्थापन केले.

११. देयक रक्कम जमा करणारी फिरती मोबाईल व्हॅन.

१२. वीज बिले भरण्यासाठी ऑनलाईन भरणा करण्याचे पोर्टल सुरु

## नागपूर वितरण फॅंचायजी :

नागपूर नागरी मंडळातील सिव्हील लाईन्स, महाल व गांधीबाग या विभागासाठी फॅंचायझी देण्यासाठी इ जाहीर निविदा मागवून मे . स्पॅंको लि. या कंपनीची नियुक्ती करण्यात आली व फॅंचायझी क्षेत्राकडे हे क्षेत्र दि. १ मे २०११ पासून १५ वर्षाकरिता संपूर्त करण्यात आले.

## नागपूर वितरण फॅंचायझीची कामगिरी

| तपशील | हस्तांतरणा पूर्वी | हस्तांतरण केल्यानंतर | | | |
|---|---|---|---|---|---|
| वर्ष | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ |
| वीज पुरवठा (एम यू) | १३३२.३१ | १३६४.७९ | १४०८.५५ | १३६५.०४ | १४३४.७९ |
| वीज विक्री (एमयू) | ९३१.९४ | ९३७.४९ | १०४६.०५ | ११०५.७२ | १२०८.०२ |
| वितरण हानी (%) | ३०.०६ | ३१.३१ | २५.७४ | १९ | १५.८१ |
| जमा कराण्याची कार्यक्षमता (%) | ९९.०६ | ९७.४७ | ९८.५६ | ९८.४६ | ९९.६६ |
| डी टी सी संख्या | २४०८ | २५९३ | २६६१ | २७५८ | २८७५ |
| डी टी सी बंद पडले % | ३.३८ | ९.८९ | ४.७७ | ३.०८ | ३.१३ |

ताब्यात घेतल्यापासून मे. स्पॅन्को लि. (SNDLTD.) यांनी नागपूर फँचायझीच्या क्षेत्रात खालील सुधारणा केल्या.

१. ३३/११ केव्ही क्षमतेची ४ नवी उपकेंद्रे उभारली.

२. ३३ केव्ही क्षमतेचे ७ नविन फिडर्सची भर टाकली.

३. ११ केव्ही क्षमतेचे २० नविन फिडर्सची भर केली.

४. ८८ वितरण ट्रान्सफॉर्मर्सची क्षमता वाढविली.

५. वीज चोरी प्रवण क्षेत्रात नवीन ४१५ किमीच्या एल टी एरीयल बंच केबल दिल्या.

६. नवीन २४ X ७ कॉल सेंटर सुरु केले.

७. नवीन २४ X ७ नियंत्रण कक्ष व दोष निवारण केंद्र स्थापन केले

**<u>औरंगाबाद वितरण फँचायझी :</u>**

औरंगाबाद शहर विभाग क्र. १ व क्र. २ या क्षेत्रासाठी खूल्या निविदा पद्धतीद्वारे मे जी टी एल लि. या कंपनीची नियुक्ती करुन तिच्याकडे वितरण क्षेत्र दि. १ मे २०११ पासून १५ वर्षाकरिता हस्तांतरीत करण्यात आले.

## औरंगाबाद वितरण फॅचायझीच्या क्षेत्रात मे. जी. टी. एल. लि. ची कामगिरी :

| तपशील | हस्तांतरणा पूर्वी | हस्तांतरण केल्यानंतर | | | |
|---|---|---|---|---|---|
| वर्ष | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ (नोव्हे.१४ पर्यंत) |
| वीजपुरवठा (एम यू एस) इनपूट (डब्लू) | १६८५.८९ | १८५८.६ | १९७२.५२ | २०१८.०२ | १४८४.३१ |
| विक्री (एम. यू.) | १३४८.६२ | १४३९.८ | १५४७.७४ | १६४०.९७ | १२१२.९२ |
| वितरण हानी % | २०.०१ | २२.५३ | २१.५४ | १८.६८ | १८.२८ |
| जमा करण्याची क्षमता % | ९९.११ | ९९.६६ | ९९.६४ | ९९.०६ | ९७.०८ |
| डी टी सी संख्या | ३२७८ | ३२९४ | ३३४८ | ३४१० | ३४४८ |
| डी टी सी बंद % | ३.२९ | ४.४४ | ३.५ | ३.८१ | २.१५ |

**मे. जी टी एल लि. यांनी औरंगाबाद वितरण फँचायझी क्षेत्रात केलेल्या सुधारणा**

१. ३३ केव्हीचे ४ नवीन फिडर्सची भर केली.
२. ११ केव्हीचे १६ नवीन फिडर्सची भर केली.
३. २३ डी टी सी ची क्षमता वाढविली.
४. १० एम व्ही ए क्षमतेचे २ पॉवर ट्रान्फॉर्मरची भर केली.
५. नवीन २४X ७ कॉल सेंटर सुरु केले.
६. २४X ७ नियंत्रण करु व दोष निवारण केंद्र सुरु केले.

**औरंगाबाद फँचायझीचे क्षेत्र मे.जी.टी. एल कडून ताब्यात घेणे :**

औरंगाबाद वितरण फँचायझीचे कार्य चालू असताना असा अनुभवास आले आहे की, महावितरण दिलेल्या बिजकांचे (इनव्हॉईस) चे पैसे देणे, मे. जी टी एल ला करता येत नाही ही बाब त्याच्या वारंवार निदर्शनास आणाली त्यामुळे वितरण फँचायझीच्या करारामधील तरतूदीनुसार सदर करार दि. १०.११.२०१४ रोजी रद्द करण्यात आला आणि त्या क्षेत्रातील वीज वितरणाचे कार्य महावितरणाने दि. १५.११.२०१४ पासून आपल्या ताब्यात घेतले. कराराच्या तरतूदीनुसार लेख्यांचा अंतिम चुकारा करण्याची प्रक्रिया चालू आहे.

**जळगांव वितरण फँचायझी :**

जळगांव शहर नि ग्रामीण विभागाचे क्षेत्रासाठी में. क्रॉम्प्टन ग्रिव्हज कंपनी लि. याची नियुक्ती करण्यात आली व हे क्षेत्र मे. सी.जी.एल यांचेकडे दि. १ नोव्हेंबर २०११ पासून १० वर्षासाठी सुपूर्द करण्यात आले.

**मे. जी. टी. एल. लि. यांनी जळगाव वितरण फँचायझी क्षेत्रात केलेले कामगिरी**

| तपशील | हस्तांतरणापूर्वी | हस्तांतरण केल्यानंतर | | | |
|---|---|---|---|---|---|
| वर्ष | एप्रिल २०११ ते ऑक्टोबर २०१२ | नोव्हे. २०११ ते मार्च २०१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ |
| वीज वापर (इनपूट) एम. यू. | ४७६.१३ | ३१७.६ | ७८९.०९ | ७९३.१३ | ८८४.३९ |
| विक्री (एम यू) | ३४६.४८ | २४४.३७ | ५७९.६४ | ५९९.१५ | ६४१.३३ |
| वितरण हानी % | २७.९ | २३.०६ | २६.५४ | २४.४६ | २७.४८ |
| जमा करण्याची कार्यक्षमता % | ९५.९१ | ९१.६२ | ९३.४९ | ९३.३१ | ९८.१८ |
| डी टी सी संख्या | २६२२ | २६५५ | २७५८ | २८०७ | २८२९ |
| डी टी सी बंद | १६.२ | १४.७ | १५.२ | ६.२२ | ४.५ |

**मे. सी. जी.एल लि. ने जळगांव वितरण फँचायझी क्षेत्रात केलेल्या सुधारणा**

अ) ३३ केव्ही क्षमतेचे ६ नवीन फिडर्सची भर घातली

ब) ११ केव्ही क्षमतेचे २९ नवीन फिडर्सची भर घातली

क) २ पॉवर ट्रान्सफॉर्मर्सची भर घातली.

ड) ५४ डी टी सी ची क्षमता वाढविली.

ई) नवीन २४ X ७ कॉल सेंटर स्थापन केले

एफ) नवीन २४ X ७ नियंत्रण कक्ष व दोष निवारण केंद्र स्थापन केले.

**जळगांव वितरण फँचायझीचे क्षेत्र मे. सी जी एल कडून ताब्यात घेणे :**

सी जी एल तर्फे जळगांव वितरण फँचायझीचे व्यावसायिक कार्य चालू असताना असा अनुभव आला की ही कंपनी महावितरणाने दिलेल्या बिजकाचे वेळेवर पैसे भरु शकत नाही ही बाब त्यांच्या निदर्शनास वांरवार आणली. त्यानंतर वितरण फँचायझीच्या करारातील तरतूदीनुसार सीजीएल सोबतचा करार दि. १०.०८.१५ रोजी रद्द करुन महावितरणाने दि. १२.०८.२०१५ ने वीज वितरणाचे काम आपल्याकडे घेतले. करारातील तरतूदीप्रमाणे लेख्यांचा अंतिम चुकारा करण्याची प्रक्रिया चालू आहे.

**मानव संसाधन व्यवस्थापन :**

सामाजिक आर्थिक व नियामक वातावरण सतत बदलणाऱ्या या वातावरणात, कंपनीला स्थिर ठेवणा-या कामात मानव संसाधनाची भूमिका कमी महत्त्वाची मानता येणार नाही. महावितरणचे असे निरिक्षण आहे की, सकंटातील संघटना करीता कर्मचा-यांचा सहभाग व सांस्कृतिक बांधणी या आधारे दीर्घकाल टिकाऊ कर्मचारी व्यवस्थापनाची धोरणे प्रभावी ठरतात. नोकरीच्या प्रारंभापासून म्हणजे भरती पासून निवृत्तीपर्यंतची, मानव संसाधनाची सर्व कृती आता फक्त माहिती तंत्रज्ञानाच्या प्रणालीद्वारे करण्यात येते. मानव संसाधनाच्या कामात धोरणाचा रचनात्मक आकृतीबंध व पारदर्शकता याद्वारे प्रशासनाचे नियंत्रण विकासित करता येते. विद्युत अधिनियम २००३ हा कायदा झाल्यापासून वीज क्षेत्र अधिक स्पर्धोचे व ग्राहक स्नेही झालेले आहे. तसेच वीज क्षेत्रातील उपयोगी सेवा देणाऱ्या संस्थेची संघटनात्मक रचना आता अधिक व्यावसायिक पद्धतीमध्ये रुपांतरीत झालेली आहे व कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढली आहे. मानव संसाधनाच्या कार्याने या रुपांतरात महत्वाची भूमिका बजावली आहे.

**वर्ष २०१५ मधील महत्वाचे निर्णय**

| अनु. | वर्ष २०१४-१५ मधील निर्णय | कर्मचाऱ्यांवर झालेले परिणाम |
|---|---|---|
| १. | अभियत्यांच्या पदनामात बदल | अभियंता कर्मचारी वृंदाच्या पदनामाचा दर्जा उंचावला आहे. त्यामुळे अभियंत्याची प्रेरणा वाढली. तसेच विविध राज्याच्या तुलनेचा प्रश्नही सोडविण्यात आला. |
| २. | कर्मचाऱ्यांसाठी अंतर्गत अधिसूचना | थेट भरतीमध्ये विभागीय तांत्रिक कर्मचाऱ्यासाठी ५ टक्के पदे राखून ठेवली आहेत. त्यामुळे त्यांना संधी मिळेल. त्यासाठी अंतर्गत अधिसूचना देण्यात येते. |
| ३. | जी. ओ. ७४ साठी विशेष मोहिम | गेल्या काही वर्षापासून जी ओ ७४ च्या प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी परिमंडळ निहाय विशेष मोहिम राबविण्यात आली. |
| ४. | बदलीमध्ये पारदर्शकता | या वर्षभरात बदलीसाठी विनंती करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या अतिशय पारदर्शक पद्धतीने सर्वांत जास्त संख्येने करुन इतिहास घडविला. |
| ५. | प्रस्तावावर जलद गतीने निर्णय | ए सी बी, सी एस २८, राजीनामे, जेष्ठता आणि इतर सर्व प्रस्तावांवर आता त्वरेने निर्णय केले जातात. |
| ६. | सर्व नियमनांचे अद्यावती करण | सेवा/भरती/जेष्ठता नियमने यांचे अद्यावतीकरण वर्ष २००८ पासून झाले नव्हते. आता डिसेंबर २०१४ पर्यंतच्या सर्व सुधार चिठ्ठया विचारात घेण्यात आल्या. |

| अनु. | वर्ष २०१४-१५ मधील निर्णय | कर्मचाऱ्यांवर झालेले परिणाम |
|---|---|---|
| ७. | वेतन सुधारणा | म.रा. विद्युत वितरण कंपनी लि. च्या संचालक मंडळाने ठराव क्र. १८५ दि. २६.०६.२०१४ यानुसार महावितरण कंपनीच्या कर्मचा-यांच्या वेतन सुधारणेला मंजूरी दिली. ही वेतन सुधारणा दोन्ही बाजूस म्हणजे कर्मचारी व व्यवस्थापन या दोघांना विजयाचे समाधान देणारी आहे. त्यामुळे कंपनीला औद्योगिक संबंधाचे आरोग्यात कोणतीही समस्या आली नाही. |
| ८. | सर्व कर्मचाऱ्यांसाठी मेडिकलेम पॉलिसी | महावितरणच्या इतिहासात प्रथमच सर्व कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबिय सदस्य यांना मेडिकलेम पॉलिसी सुरु करण्यात आली आहे. |
| ९. | एच आर एम एस चे परिमंडळ निहाय अद्यावतीकरण | एच आर एम एस चे परिमंडळ निहाय अद्यावतीकरण – एच आर एम एस डेटाचे परिमंडळ निहाय अद्यावतीकरण करण्यासाठी मोहिम व विशेष बैठका आयोजित करण्यात आली. |
| १०. | पदोन्नातीची यादी उपअभियंता बाबतच्या चुका सुधारणे | पदोन्नतीची यादी करताना थेट व पदोन्नती यातील प्रमाणाबाबत काही चुका झाल्या होत्या. मात्र त्या सुधारण्यात आल्या. |
| ११. | सर्व परिमंडळात प्रमाणशीर रिक्त पद | कर्मचाऱ्यांना पदोन्नतीने किंवा बदलीवर पदे भरतांना प्रत्येक परिमंडळात समान रिक्तपदे ठेवण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला. |

**महावितरणने मानव संसाधनाच्या उपक्रमांना पुरस्काराने गौरव :**

महावितरण कंपनीच्या मानव संसाधनाच्या विकासासाठी मानव संसाधन विभागाने केलेल्या कार्याला पुढीलप्रमाणे पुरस्कार देऊन त्याला मान्यता देऊन गौरव करण्यात आला.

१. महाराष्ट्र शासनाच्या इ प्रशासन पुरस्कार एप्रिल २०१४
२. मानव संसाधनक्षेत्रात नवोन्मेषाची कार्यपद्धतीसाठी – १३ व्या आशिया पॅसिफीक एच आर एम कॉग्रेस या संस्थेतर्फे गौरव सप्टेंबर २०१४
३. कस्टमर एक्सपियरन्स अंडर एनर्जी व्हर्टीकल मधील सर्वोत्कृष्ट कार्याचा आय डी सी इन साईट ॲवार्ड डिसेंबर २०१४
४. जगातील सर्वोत्कृष्ट संस्था व कर्मचारी प्रशिक्षण ॲवॉर्ड - मा. सं. कॉंग्रेस ॲवॉर्ड - २०१४
५. प्रशिक्षणाचे सर्वोकृष्ट कार्यासाठी ८ व्या एम्प्लाई ब्रॅडींगअवार्ड - २०१४.

**जनसंपर्क विभाग :**

कंपनीची प्रतिमा निर्माण करण्यात महावितरणाच्या जनसंपर्क विभागाचे कार्य मोलाचे आहे. त्यासाठी विविध मुद्रण व इतर जनसंपर्क माध्यमांचा प्रभावी वापर करण्यात आला. तसेच ग्राहक- कर्मचारी व्यवस्थापन यांच्यात समन्वय राखण्याचे कामही हया विभागातर्फे केले जाते. या विभागापतर्फे 'महावितरण विद्युत वार्ता' ही गृहपत्रिका दर महिन्याला प्रसिद्ध केली जाते. त्यात कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचा कंपनीच्या महत्त्वाची विषयांवर संदेश, कंपनीची धोरणे व कार्यक्रम याची माहिती प्रणालीप्रमाणे सर्वांपर्यत पोहोचविण्यात येते.

सध्याची तांत्रिक प्रगती लक्षात घेऊन जनसंपर्क कार्यासाठी इंटरनेट, फेसबूक यांचाही उपयोग केला जातो. जनसंपर्क विभागाने फेसबुक वर एक पान सुरु करुन त्याद्वारे ग्राहक व कर्मचारी यांच्या समवेत प्रभावीपणे संवाद साधण्यात येतो. या शिवाय जनसपंर्क विभागातर्फे ग्राहकांची ऊर्जा संवर्धन, वीज सुरक्षा व अन्य लाभकारी विषयावर जागृती होण्यासाठी विविध ग्राहक मंचावर चर्चा, प्रदर्शने , पत्रकार परिषदा यामार्फत कार्यक्रम आयोजित केले जातात.

**उद्योग व्यवसायात बदल - (जर काही असल्यास) :**

कंपनीच्या उद्योग व्यवसाय यामध्ये कोणताही बदल झालेला नाही

**लाभांश :**

आढाव्याच्या वित्तीय वर्षासाठी आपल्या संचालक मंडळाने कोणताही लाभांस देण्याची शिफारस केलेली नाही.

**राखीव :**

वित्तीय वर्ष २०१४-१५आणि त्या आधीचे वर्ष यामध्ये कंपनीच्या मुख्य राखीव मध्ये निव्वळ स्थित्यंतर खालीलप्रमाणे आहे.

(रु. लाखात)

| तपशील | वि.वर्ष २०१४-१५ | वि.वर्ष २०१३-१४ |
|---|---|---|
| सर्व साधारण राखीव | ५८३०४८.४९ | ६६६०२०.०३ |
| नफा-तोटा पत्रकातील अधिक्य | (३६५६९.४५) | (२८०४२.२६) |

**भाग भांडवल :**

वित्तीय वर्ष २०१४-१५ मध्ये कंपनीचे अधिकृत भाग भांडवल फक्त रु. २०,०००/- कोटी होते. या मात्र या अहवलाच्या तारखेपर्यंत त्यात वाढ होऊन ते रु.६०,०००/- कोटी झाले.

**कपंनी अधिनियम २०१३ यातील कलम ९६ (१) प्रमाणे नियत तारखेनंतर वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करणे :**

कपंनीची सर्व साधारण सभा दि. ३१.१२.२०१५ पर्यंत घेण्याची मुदतवाढ कंपनी निबंधक, महाराष्ट्र यांनी त्यांचे प्रमाणपत्र दि. २९.०९.२०१५ यानुसार दिली.

**कंपनीचे संचालक व व्यवस्थापनातील महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती बदल :**

वित्तीय वर्ष २०१४-१५ मध्ये महावितरण कंपनीच्या संचालक मंडळाच्या रचनेत ऊर्जा विभाग, महाराष्ट्र शासन आणि मराविमं सुत्रधारी कंपनी लि. यांच्या आदेशानुसार खालीलप्रमाणे बदल करण्यात आले.

| अनु.क्र. | संचालकांचे नांव | नियुक्तीची तारीख | सेवा समाप्तीची तारीख |
|---|---|---|---|
| १. | श्री. संजीव कुमार भा.प्र.से | २१-१२-२०१५ | --- |
| २. | श्री. ओ.पी.गुप्ता भा.प्र.से | ०६-०१-२०१५ | १६-१२-२०१५ |
| ३. | श्री. अजय मेहता भा.प्र.से | ०२-०२-२००९ | ०५-०१-२०१५ |
| ४. | श्री. मुकेश खुल्लर भा.प्र.से | ०५-०१-२०१५ | ०७.०५.२०१६ |
| ५. | श्री. व्ही. के. कानडे भा.प्र.से | २१-११-२०११ | १४-०५-२०१४ |
| ६. | श्री. एस.एल.पिंपळखुटे | २४-०७-२०१५ | --- |
| ७. | श्री. द. ध. वाव्हळ | २०-०८-२००९ | ०१-०६-२०१५ |
| ८. | श्री. पी. यु. शिंदे | ३०-०८-२०१३ | --- |
| ९. | श्री. अभिजीत देशपांडे | ०४-०६-२०१४ | --- |
| १०. | डॉ. अशोक हरणे | ०५-०६-२०१४ | --- |
| ११. | श्री. विश्वास पाठक | १४-०८-२०१५ | --- |
| १२. | सी. ए. श्री. पी. व्ही पागे | ०५-०६-२०१४ | २९-०९-२०१५ |
| १३. | सौ. जुईली वाघ | ०४-०६-२०१४ | --- |

संचालक मंडळ, खालील संचालकांनी त्यांच्या कार्यकालात जे भरीव योगदान दिले, त्याबद्दल प्रसंशा नोंदवित आहे.

१. श्री अजय मेहता - भा. प्र. से. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

२. श्री ओ पी गुप्ता - भा. प्र. से. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

३. श्री व्ही.के.कानडे- भा. प्र. से. प्रधान सचिव (ऊर्जा)

४. श्री. मुकेश खुल्लर - भा. प्र. से. प्रधान सचिव (ऊर्जा)

५. श्री. द.ध. वाव्हळ- संचालक (वित्त)

६. श्री. प्रकाश पागे- स्वतंत्र संचालक

**या अहवालाच्या तारखेला खालील व्यक्ती संचालक पदावर आहेत.**

| अनु.क्र. | संचालकांचे नांव | पद |
|---|---|---|
| १. | श्री. संजीव कुमार भा.प्र.से. | अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक |
| २. | श्री. बिपीन श्रीमाळी भा.प्र.से. | प्रधानसचिव (ऊर्जा) - प्रभारी |
| ३. | श्री. एस एल पिंपळखुटे | संचालक (वित्त) |
| ४. | श्री. पी. यु. शिंदे | संचालक (प्रकल्प) |
| ५. | श्री. अभिजीत देशपांडे | संचालक (प्रवर्तने) |
| ६. | डॉ. अशोक हरणे | स्वतंत्र संचालक |
| ७. | श्री. विश्वास पाठक | स्वतंत्र संचालक |
| ८. | सौ. जुईली वाघ | स्वतंत्र संचालक |

**स्वंतत्र संचालकाचे घोषणापत्र :**

संचालक मंडळ जाहीर करते की, कंपनीचे स्वंतत्र संचालक सर्वश्री डॉ. अशोक हरणे, श्री विश्वास पाठक आणि श्रीमती जुईली वाघ हे :

अ) संचालक मंडळाच्या मते या व्यक्ती प्रामाणिक असून त्यांच्याकडे सबंधित कार्याचे नैपूत्य व अनुभव आहे.

ब) १) या कुणाही व्यक्तीही कंपनी किंवा तिची सुत्रधारी , उपकंपनी किंवा सहयोगी कंपनी यांच्या प्रवर्तक नाहीत किंवा पूर्वी नव्हत्या.

२) या व्यक्ती कंपनी, तिची सुत्रधारी, उपकंपनी किंवा सहयोगी कंपनी यासोबत किंवा त्यांचे प्रवर्तक किंवा सचांलक यांच्या नातलग नाहीत.

क) या व्यक्तींचे कंपनी, तिची सुत्रधारी, उपकंपनी किंवा सहयोगी या कंपन्या सोबत किंवा त्यांचे प्रवर्तक किंवा संचालक यांचे सोबत मागील सलग दोन वित्तीय वर्षात कोणतेही आर्थिक संबंध नव्हते तसेच चालू वर्षात नाहीत.

ड) या व्यक्तीच्या कुणीही नातलगाचे ही कंपनी किंवा तिची सुत्रधारी, उपकंपनी किंवा त्यांचे प्रवर्तक किंवा संचालक यांच्याशी कंपनीच्या एकूण उलाढाल किंवा एकूण उत्पन्न यांच्याशी दोन टक्के किंवा त्यातून अधिक रकमेचे किंवा रु पन्नास लाख किंवा अशा विहित केलेल्या जास्त रकमेचे मागील सलग दोन वित्तीय वर्षात आर्थिक संबंध किंवा व्यवहार नव्हते. किंवा चालू वित्तीय वर्षी तसे आर्थिक संबंध व्यवहार नाहीत.

इ) १) या व्यक्ती स्वत: किंवा त्यांचे इतर कोणतेही नातेवाईक सध्याचा वित्तीय वर्षाच्या मागील सलग तीन वित्तीय वर्षामधील कोणत्याही वर्षात जेव्हा त्याच्या नियुक्तीच्या प्रस्ताव केला तेव्हा ही कंपनी किंवा तिची सुत्र धारी उपकंपनी/सहयोगी कंपनी या कंपन्यांच्या व्यवस्थापनातील महत्त्वाचे पद धारण करीत नव्हत्या किंवा कर्मचारी नव्हत्या आणि नाहीत.

२) या व्यक्तींच्या नियुक्तीचा प्रस्ताव केला त्या सलग मागील तीन वित्तीय वर्षात कोणत्याही वर्षी हया व्यक्ती खालील संस्थेचा कर्मचारी किंवा मालक किंवा भागीदार नव्हत्या किंवा नाहीत.

अ) ही कंपनी किंवा तिची सुत्रधारी/उपकंपनी /सहयोगी कंपनी यांचे लेखापरिक्षक/ कंपनी सेक्रेंटरी किंवा कॉस्ट अकाउंट्ट यांच्या फर्म किंवा

ब) ही कंपनी किंवा तिची सुत्रधारी /उपकंपनी/सहयोगी कंपनी यांच्याशी व्यवहार करणारी कोणतीही कायदेविषयक किंवा सल्लाागार संस्था ज्यांची एकूण उलाढालीशी १० टक्केपेक्षा जास्त रकमेशी व्यवहार केलेले नाहीत/नव्हते.

३) कंपनीच्या एकूण मतदान शक्तीच्या दोन टक्के किंवा त्याहून अधिक मते ही व्यक्ती किंवा तिचे नातलग एकत्रितपणे धारण करीत नाहीत किंवा

४) ज्या संस्था नफा कमवित नाहीत परंतू त्यांना या कंपनीच्या एकूण प्राप्तीच्या २५ टक्के किंवा अधिक रक्कम ही कंपनी किंवा तिची सुत्रधारी /उपकंपनी/सहयोगी कंपनीद्वारे मिळते अशा संस्थेत मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा संचालक किंवा अन्य कोणत्याही नावाने संबोधले जाणारे पद ही व्यक्ती किंवा त्यांचे नातलग धारण करीत नाहीत किंवा कंपनीचे प्रवर्तक /संचालक एकूण मतदान शक्तीच्या २ टक्के किंवा अधिक धारण करीत नाहीत किंवा

**फ) इतर कोणतीही विहित केली जाणारी पात्रता धारण करीत नाहीत.**

**क) व्यवस्थापनातील महत्त्वाच्या पदावरील व्यक्तींची माहिती :**

वित्तीय वर्ष २०१४-१५ मध्ये कंपनीत व्यवस्थापनातील महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती कंपनी अधिनियम २०१३च्या तरतूदीनुसार खालीलप्रमाणे आहे.

| अनु. क्र. | व्यवस्थापनातील महत्त्वाच्या पदावरील व्यक्तीची नांवे | पद | नियुक्तीची तारीख | समाप्तीची तारीख |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. अजय मेहता भाप्रसे | अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक | ०२-०२-२००९ | ०५-०१-२०१५ |
| २. | श्री. ओ. पी. गुप्ता भाप्रसे | अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक | ०६-०१-२०१५ | १६-१२-२०१५ |
| ३. | श्री. संजीव कुमार भाप्रसे | अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक | २१-१२-२०१५ | - - - |
| ४. | श्री. सुनील पिंपळखुटे | संचालक (वित्त) सी एफ ओ | २४-०७-२०१५ | - - - |
| ५. | श्री. अभिजीत देशपांडे | संचालक (प्रवर्तन) | ०४-०६-२०१४ | - - - |
| ६. | श्री. पी. यु. शिंदे | संचालक (प्रकल्प) | ३०-०८-२०१३ | - - - |
| ७. | सौ. अंजली गुडेकर | कंपनी सेक्रेटरी | १७-०३-२०१२ | - - - |

**ड) बैठका**

**१) मंडळाच्या बैठका**

आढाव्याच्या वित्तीय वर्षात संचालक मंडळाच्या एकूण ११ बैठका खालील तारखांना संपन्न झाल्या.

| अनु.क्र. | मंडळ बैठकीची क्रमांक | मंडळ बैठकीची तारीख |
|---|---|---|
| १. | १५७ वी मंडळ बैठक | ८ मे २०१४ |
| २. | १५८ वी मंडळ बैठक | ४ जून २०१४ |
| ३. | १५९ वी मंडळ बैठक | २६ जून २०१४ |
| ४. | १६० वी मंडळ बैठक | ३० जुलै २०१४ |
| ५. | १६१ वी मंडळ बैठक | २० ऑगस्ट २०१४ |
| ६. | १६२ वी मंडळ बैठक | २४ सप्टेंबर २०१४ |
| ७. | १६३ वी मंडळ बैठक | १९ नोव्हेंबर २०१४ |
| ८. | १६४ वी मंडळ बैठक | १ जानेवारी २०१५ |
| ९. | १६५ वी मंडळ बैठक | ९ जानेवारी २०१५ |
| १०. | १६६ वी मंडळ बैठक | ११ फेब्रुवारी २०१५ |
| ११. | १६७ वी मंडळ बैठक | १३ मार्च २०१५ |

**संचालक मंडळाची वित्तीय वर्ष २०१४-१५ मधील बैठकीत संचालकांची उपस्थिती**

| संचालकांची नावे | मंडळाच्या बैठकीची संख्या | |
|---|---|---|
| | आयोजित | उपस्थिती |
| श्री अजय मेहता - भा.प्र.से. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक(१) | ७ | ७ |
| श्री ओ पी गुप्ता - भा.प्र.से. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक(२) | ३ | ३ |
| श्री व्ही.के.कानडे - भा.प्र.से. संचालक (३) | १ | ० |
| श्री. मुकेश खुल्लर - भा.प्र.से. संचालक | ३ | ३ |
| डी डी वाव्हळ - संचालक (वित्त) | ११ | १० |
| पी.यू.शिंदे - संचालक (प्रकल्प) | ११ | ११ |
| अभिजित देशपांडे - संचालक (प्रवर्तने) (५) | ९ | ९ |
| सी. ए. श्री. प्रकाश पागे - संचालक | ११ | ११ |
| डॉ. अशोक हरणे - संचालक | ११ | ११ |
| सौ. जुईली वाघ - संचालक (६) | ९ | ९ |

१) श्री अजय मेहता - भा.प्र.से. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचा कार्याकाळ ०५.०१.२०१५ रोजी संपला

२) श्री. ओ. पी. गुप्ता भा.प्र.से. यांची अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक पदावर दि. ०६.०१.२०१५ रोजी नियुक्ती झाली व कार्यकाळ दि. १६.१२.२०१५ रोजी संपला.

३) श्री व्ही के कानडे भा.प्र.से. सचालक यांचा कार्यकाळ दि. १४.०५.२०१४ रोजी संपला.

४) श्री मुकेश खुल्लर - संचालक यांचा कार्यकाळ ०९.०१.२०१५ रोजी संपला

५) श्री अभिजित देशपांडे संचालक (प्रवर्तन) पदी ०४.०६.२०१४ रोजी नियुक्ती झाली

६) सौ. जुईली वाघ स्वतंत्र महिला संचालिका पदावर दि. ०४.०६.२०१४ रोजी नियुक्ती झाली.

**२) संचालक मंडळाच्या समित्या**

कंपनीमध्ये संचालकांच्या खालील समित्या आहेत.

**लेखापरिक्षण समिती (AC)**

कंपनी अधिनियम १९५६ चे कलम २९२ ए व कंपनी अधिनियम २०१३ चे कलम १७७ यानुसार लेखापरिक्षण समितीची रचना दि. ०७.०९.२००७ रोजी झाली. अहवालाच्या तारखेला त्यात पुढील सदस्य होते.

| अनु. क्र. | समिती सदस्यांची नांवे | समितीमधील पदनाम | पदसिद्ध स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | श्री. विश्वास पाठक | अध्यक्ष | स्वतंत्र अकार्यकारी संचालक |
| २. | डॉ. अशोक हरणे | सदस्य | स्वतंत्र अकार्यकारी संचालक |
| ३. | श्री. सुनील पिंपळखुटे | सदस्य | संचालक (वित्त) - कार्यकारी संचालक |
| ४. | श्री. अभिजित देशपांडे | सदस्य | संचालक (प्रवर्तन) - कार्यकारी संचालक |

**या अहवाल वर्षात लेखापरिक्षण समितीच्या एकूण १६ बैठका पुढील तारखांना झाल्या.**

| अनु.क्र. | लेखा परिक्षण समितीच्या बैठकीचा अनुक्रमांक | बैठकीची तारीख |
|---|---|---|
| १. | ४६ वी लेखापरिक्षण समिती बैठक | २९ एप्रिल २०१४ |
| २. | ४७ वी लेखापरिक्षण समिती बैठक | ०९ मे २०१४ |
| ३. | ४८ वी लेखापरिक्षण समिती बैठक | २३ मे २०१४ |
| ४. | ४९ वी लेखापरिक्षण समिती बैठक | १९ जून २०१४ |
| ५. | ५० वी लेखापरिक्षण समिती बैठक | ११ जुलै २०१४ |
| ६. | ५१ वी लेखापरिक्षण समिती बैठक | ३० जुलै २०१४ |
२. या वर्षी कंपनीने वरील लेखा धोरणात बदल केला.त्याबाबत ‘‘महत्त्वाची लेखा धोरणे’’ यातील टिपा क्र २ चा परिच्छेद ३ (सी) आणि टिपा क्र ३०.१० यात नमूद केलेले आहे.

(अ) या बदलामुळे पुढील परिणाम झाले. (अ) अशा शासकीय अनुदानातून निर्माण केलेल्या मत्तांच्या आकारलेल्या घसाऱ्याच्या प्रमाणात या शासकीय अनुदाने, अर्थसाहय व ग्राहकांची अनुदाने लांबणीवर टाकलेली नाहीत. हे लेखा मानक १२ शासकीय अनुदानाचे लेखे करणे/लेखा मानक १०: स्थिर मत्तांचे लेखे करणे, यांच्याशी अनुरुप नाही.

(ब) दि.०६.०६.२००५ ते ३१.०३.२०१४ या कालावधीत मिळालेली ग्राहकांची अंशदाने अर्थ साहय व अनुदाने यांच्या १/१५रक्कम ही यापूर्वी जमा केलेल्या रक्मेनुसार कमी करुन तिचा लेखा मागील काळातील उत्पन्न रु. १,००,३५४.२६ लाख असा केला आहे. मागील लेखाधोरणानुसार अनुदानातून निर्माण केलेल्या मत्ताच्या घसा-याच्या समान रक्कम उत्पन्नात जमा करण्याच्या आवश्यकता, याबाबत पुरेसे व योग्य असे लेखापरिक्षणाचे

पुरावे उपलब्ध नव्हते. त्यामुळे लेखा मानक ५ यातील परिच्छेद ३२ कालावधीतील निव्वळ नफा व तोटा, मागील काळातील बाबी आणि लेखा धोरणातील बदल यानुसार लेखा धोरणात केलेल्या बद्लांचे परिणाम यांचे अनुपालन झालेले नाही.

**२. प्रगतीपथावरील भांडवली कामे व स्थिर मत्ता :**

१) टिप क्र. ३०.७ यात नमूद केल्याप्रमाणे भांडवली कामाच्या आदेशाचे योग्य व पूर्ण अभिलेख उपलब्ध नव्हते. त्यामुळे स्थिर मत्तांचे भांडवलीकरण केलेले नसणे किंवा ते विलंबाने करणे असे काही प्रकार आम्हास आढळले. याशिवाय भांडवलीकरणाची तारीख प्रमाणपत्राच्या तारीखेनंतरची मानली जाते, ती वापरात आणल्याच्या तारीखेनंतरची असून तशीच प्रत्यक्ष प्रमाणपत्रात प्रमाणित केलेली आहे. त्यामुळे भांडवलीकरणासही विलंब होवून त्यानुसार विलंबित मुदतीकरिता घसाऱ्याच्या आकारावरही परिणाम झाला. तसेच सी डब्लयू आय पी चा आरंभ व दीर्घकाळ थकीत राहणे याच्या तपशीलची पडताळणी करण्यास आम्ही असमर्थ आहोत.याचा वित्तीय विवरणपत्रावर होणा-या परिणामांचा अंदाज करता येत नाही.

२) 'महत्त्वाची लेखाधोरणे' यातील टिप क्र.२ चा परिच्छेद क्र ४ (अ) पहावा. कर्मचारी खर्च व कार्यालय आणि प्रशासकीय खर्चाची रक्कम रु. ३३,९४६ लाख यांचे भांडवलीकरण प्रगती पथावरील कामे यांच्या जादा १५ टक्के या दराने हंगामी तत्वावर यावर्षी करण्यात आले आणि असे खर्च प्रकल्पाचे बांधकाम किंवा स्थिर मत्तांचे संपादन किंवा त्या कामाच्या स्थितीत नेण्याचा खर्च यासाठी आहेत का हे निश्चित केले नाही.ते लेखा मानक१० : स्थिर मत्तांचा लेखा याप्रमाणे नाही

याशिवाय या वर्षात केलेले खर्च, स्थिरमत्तांच्या भांडवलीकरणाची प्रत्यक्ष तारीखेशिवाय पूर्ण वर्षासाठी वितरीत केले आहेत.

आम्हाला उपलब्ध करुन दिलेल्या अशा वाटपांच्या आधाराची पडताळणी करण्यासाठी लेखापरिक्षणाचे पुरेसे व योग्य पुरावे नसल्यामुळे आम्हाला त्यावर अभिप्राय देता येत नाही.

३) वित्तीय विवरणापत्रासोबतच्या ''महत्त्वाची लेखाधोरणे'' संबंधाचा टिप क्र. २ चा परिच्छेद क्र.४ (बी) ही पहावा. यात प्रगतीपथा वरील भांडवली कामांमधे भर करण्यासाठी खर्चाच्या उसनवारीची रु. १०,४९८.१४ लाख ही १२.३०टक्के (या रकमेचा हिशोब मागील वर्षातील सरासरी व्याज दराने केला आहे) दराची रक्कम असून ती पात्रतेच्या मत्ता व व्यत्यय आलेले प्रकल्प यांची निश्चिती न करता ती देण्यात आली आहे. ही कृती ''लेखा मानक:१६ ऊसनवारीचे खर्च'' याच्याशी सुसंगत नाही. याशिवाय पुढे केलेल्या प्रगतीपथा वरील भांडवली काम या पात्र मत्ता असून त्यांच्या शिलकीवरील आवश्यक त्या व्याजाचे भांडवलीकरण केलेले नाही. लेखापरिक्षणाचे पुरेसे व योग्य पुरावे नसल्याने त्याचे प्रभाव निश्चित करता येत नाही. अशा वाटपाची पडताळणी करण्यासाठी लेखापरिक्षणाचे पुरेसे व योग्य पुरावे नसल्याने आम्ही त्याचा वित्तीय विवरणपत्रावर होणा-या परिणामांचे सांख्यिकीकरण करण्यास असमर्थ आहोत.

४) व्यवस्थापनाकडून यावर्षी स्थिर मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी झालेली नाही. अशा प्रत्यक्ष पडताळणीच्या आधारे जर काही संभाव्य परिणाम वित्तीय विवरणपत्रांवर झाले तर तो निश्चितपणे सांगता येत नाही.

**३. घसारा :**

१) '' महत्त्वाची लेखा धोरणे'' यातील घसा-या संबंधीच्या टिप क्र २ आणि टिप क्र ३०.६ पहाव्यात. याविषयी आमचे असे निरीक्षण आहे की, काही प्रकरणात, स्थिर मत्तांचा घसारा योग्य प्रकारे अचूकपणे मोजलेले नाही. त्यात मत्ताचे उपयुक्त आयुष्य ठरविणे, वापराची तारीख, घसा-याचा दर इ. बाबत काही ठिकाणी विसंगती/विचलन आहे. याचे योग्य तपशील नसल्याने आम्ही अशा विसंगतीचे घसाऱ्याच्या रकमेवर आणि नंतर वित्तीय विवरणपत्रांवर होणाऱ्या परिणामांचे साख्यिंकीकरण करण्यास आम्ही असमर्थ आहोत.

२) वित्तीय विवरणपत्राची टिप क्र.३०.६ यात नमूद केले आहे की, सॅप-इआरपी यांची अंमलबजावणी करताना कंपनीने घसा-याचा पून:मोजणी पुर्वलक्षी प्रभावाने केली आहे आणि विविध स्थिर मत्तांवर हा घसारा जादा/कमी प्रमाणात निश्चित करण्यात आला. त्यामुळे मागील वर्षातील संचित घसारा यातून निव्वळ घसारा रु. ५१,२५५.५७ लाख उलट फिरवण्यात आला. आवश्यक माहिती उपलब्ध नसल्याने आम्ही मागील काळातील समायोजनांचे हिशोबाची पडताळणी करण्यास असमर्थ आहोत.

**४) व्यापारी येणी :**

१) लेखा पुस्तके आणि देयके करण्याची व वसुलीची सॉफट वेअर ज्यात समाविष्ट आहेत अशी आय टी डेटा बेस यानुसार मागील वर्ष २०१३-१४ मध्ये व्यापारी येण्यांचा संचित व मेळ न केलेल्या शिलकीची रु.२,२५.४४७ लाख एवढी रक्कम लेख्यांच्या पुस्तकात निर्लेखित करण्यात आली. कारण पुस्तकी शिल्लकीची ही आय टी डेटा बेस मधील शिलकी रकमेशी बरोबरी करावयाची होती. असे निर्लेखीकरण केल्यानंतरही दि.३१ मार्च २०१५ रोजीची लेखा पुस्तकानुसार व्यापारी येण्याच्या शिलकी, या आय टी डेटा बेसच्या आकडयाच्या तुलनेत रु.१६,७०७ लाखाने जास्त आहेत. याचा तपशील वित्तीय विवरणपत्राच्या टिप क्र.३०.४ मध्ये आहे. यामुळे याप्रमाणात व्यापारी येण्याचे विवरण जास्त झाले असून तोटयाचे कमी विवरण झाले आहे.

२) वित्तीय विवरण पत्रातील ''महत्त्वाची लेखा धोरणे'' यातील टिप क्र.२ मधील परिच्छेद क्र.११ पहावा. यामध्ये असे नमूद केले आहे की, म.वि.नि. आयोग, ग्राहकांकडून येणे असलेल्या वार्षिक लेखातील १.५ टक्के या दराने संशयास्पद येण्याची तरतूद मान्य करतो. मात्र ही रक्कम वार्षिक लेखांमध्ये दाखविलेल्या येण्याच्या रकमेच्या ५ टक्केपेक्षा जास्त नसावी. या धोरणांच्या आधारे कंपनीने व्यापारी येण्याचे चांगली व संशयास्पद अशी वर्गवारी केली आहे. आणि व्यापारी येण्यासाठी ठोक रक्कमेची तरतूदही केली आहे. मात्र असे करताना व्यापारी येण्यांची वसूलची स्थिती किती आहे हे पाहून निश्चित करणे, वर्षनिहाय विश्लेषण करणे, वसूलीसाठी केलेले प्रयत्न इ. बाबी विचारात घेतलेल्या नाहीत, याविषयी लेखा परिक्षणाचे पुरेशा प्रमाणातील अणि योग्य

असे कागदोपत्री पुरावे नसल्याने आम्ही व्यापारी येण्याची स्थिती व त्यासाठी माहिती नसल्यामुळे आम्ही व्यापारी येण्याची चांगले व संशयास्पद असे वर्गीकरण व त्यासाठी पारिणामकारक लेखापरिक्षणात्मक पुरावे नसल्याने आम्ही त्यावर अभिप्राय व्यक्त करण्यास असमर्थ आहोत कंपनीने व्यापारी येणी व त्याच्या तरतुदी यांचा स्थिती खालीलप्रमाणे आहे.

(रु. लाखात)

| अनु. क्र. | लेखा पुस्तकांप्रमाणे येणी | थकीत रक्कम | केलेला तरतूद |
|---|---|---|---|
| १. | अल्प मुदतीची व्यापारी येणी | १५,८५,२७१.६२ | २३,७७९.०७ |
| २. | दीर्घ मुदतीची व्यापारी येणी | ४,०१,२३०.८२ | ६,२९५.०५ |
| | **एकूण** | **१९,८६,५०२.४४** | **३०,०७४.१२** |

५) **ग्राहकांकडील सुरक्षा अनामती :**

वित्तीय विवरणपत्रकांच्या टिप क्र. ३०.५ यात नमूद केल्याप्रमाणे लेखा पुस्तकातील आणि एम आय एस यातील ग्राहकांच्या सुरक्षा अनामतींच्या शिलकी या मेळ करणे व त्यानंतरचे समायोजन यांच्या अधीन आहे लेखा पुस्तके व आय टी डेटाबेस यांनी शिलकीचे फरक खालीलप्रमाणे आहेत.

(रु. लाखात)

| सुरक्षा अनामत | पुस्तक नोंदीनुसार | आय टी डेटाबेस यानुसार | फरक |
|---|---|---|---|
| ग्राहकांकडून | ५,७७,३२४.८४ | ५,७२,१८९.९६ | ५,१३४.८८ |

पुरेसे व योग्य लेखापरिक्षणात्मक पुरावे नसल्याने सुरक्षा रकमेच्या प्रलंबित मेळांचे वित्तीय विवरणपत्रावर होऊ शकणा-या प्रभावीविषयी अभिप्राय व्यक्त करण्यास आम्ही असमर्थ आहेत.

६) **वस्तुसूची :**

१) टिप क्र. ३०.३ यात सांगितल्याप्रमाणे, सॅप प्रणालीची अमंलबजावणी करताना मंडळ कार्यालये, विभाग कार्यालये यांना त्यांच्याकडील माहिती सॅप-इआरपी याकडे दिलेल्या अंतिम तारखेपर्यन्त वाढविण्याची गरज होती. मात्र काही विभाग त्यांची माहिती (डेटा) योग्यप्रकारे अपलोड करु शकलेली नाहीत. या संबंधीच्या वित्तीय प्रभावांचा लेखा वित्तीय विवरणपत्रात केला आहे. वस्तूसूचीतील तूट रु.३६,६११ लाखांचा अंदाज, कंपनीने मासा (MASA) (पूर्वीचे वस्तूसूचीसाठी FABC (चे मोडयूल) आणि संबंधित लेखा कार्यालयात इआरपी - एस ए पी च्या अमंलबजावणीच्या तारखेला संबंधित तांत्रिक अधिका-यांनी प्रमाणित केलेले प्रत्यक्ष उपलब्ध वस्तूसूचीचे मूल्य यांची तुलना करुन तो खालीलप्रमाणे आहे :

(रु. लाखात)

| लेखाशीर्ष | इ आर पी अंमलबजावणीच्या तारखेचा फरक (वस्तूसूचीतील तूट) |
|---|---|
| प्रगतीपथावरील भांडवली कामे याकडे स्थानांतरीत केले | ८,५४४ |
| भाडांरातील वापरलेला माल व सुटे भाग | २५,६४५ |
| आतंर शाखा समायोजने | १,१६४ |
| डेटा (माहिती) स्थानांतरणातील फरक | १,२५८ |
| **एकूण** | **३६,६११** |

याबाबत संबंधित लेखा कार्यालयात इआरपी-सॅपच्या अमंलबजावणीच्या तारखेस तांत्रिक अधिका-यांनी प्रमाणित केलेली प्रत्यक्ष वस्तुसूचीचे कागदपत्र आणि मंडळाने दि.१२ डिसेंबर २०१५ रोजीची मंजूरी, या व्यतिरिक्त या वस्तुसूचीसंबंधी अन्य कागदपत्रे म्हणजे इशू पासेस (देण्याचे परवाने), इतर संबधित कागदपत्र तपशील इ. आम्हाला उपलब्ध झालेला नाही. त्यामुळे सी डब्ल्यु आय पी, या वर्षाचा तोटा, वस्तुस्थितीचे मूल्य आदिची पडताळणी करु शकले नाही.

**७) लेख्यांची उपार्जित पध्दती :**

वित्तीय विवरणापत्रासोबतची टिप क्र.२ ''महत्वाची लेखा धोरणे'' यातील परिच्छेद १(बी) पहावा:-आमच्या लेखापरिक्षणाच्या काळात, आम्हाला ज्यांचा लेखा उपार्जित / वाणिज्य तत्वानुसार करण्याऐवजी रोकडतेच्या आधारे करण्यात आला अशी काही खर्च आढळले. यामध्ये विशेषकरुन दुरुस्ती व देखभालीचे खर्च आहेत ही खर्च लेख्यांची मुलभूत गृहिते आणि कंपनीचे लेखा धोरण यांच्याशी सुसंगत नाही. त्यात लेखापरिक्षणाचा मागोवा नसल्याने आम्ही त्याचा नफा व तोटा पत्रकावर होणा-या परिणामाचा अंदाज करु शकत नाही.

**८) शिलकीची निश्चिती :**

वित्तीय विवरणपत्रातील टिप क्र. ३०.२ यानुसार व्यापरी येणी, कर्जे व अग्रिमे ग्राहकांच्या जमा शिलकी, विविध इतर खर्ची/जमा यांच्या शिलकी, शासनाकडील येणी, प्रवासातील रोकड, लेखा कार्यालयांतर्फे जमा करणारी बॅका व पोस्ट कार्यालये यातील शिलकी या सर्व बाबी त्यांची खात्री, मेळ व परिणामस्वरुप समायोजने यांच्या अधीन आहेत. तिस-या पक्षाच्या शिलकीची खात्री करण्याची कंपनीने अनुसरलेली पध्दत आणखी शक्तीशाली करण्याची गरज आहे. जुन्या येण्यांचा मेळ व समझोते, त्यामुळे नफा व तोटयावर होणारे परिणाम, अपूर्ण वसूली किंवा अजिबात वसूली न होणे, आणि दायित्वे अपूर्णपणे चुकती होणे या सर्वाबाबत योग्य अहवाल/तपशील उपलब्ध नसल्याने आम्ही त्यांचा अंदाज करु शकलो नाही.

**९) टपाल खाती व बॅंक खात्यातील शिलकी :**

१) वित्तीय विवरणपत्रातील टिप क्र.१८ व टिप क्र.३०.८ पहाव्यात. त्या टपाल कार्यालयातील खाती व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकांच्या शाखा यातील ज्या शिलकीच्या खात्री बाबत माहिती उपलब्ध नाही ती खालील तक्यात दिली आहेत.

(रु. लाखात)

| तपशील | लेखा पुस्तकांप्रमाणे ३१/३/१५ रोजी खर्चाची एकूण शिल्लक | लेखा पुस्तकांप्रमाणे ३१/३/१५ रोजी एकूण जमांच्या शिल्लक |
|---|---|---|
| टपाल कार्यालयातील रक्कम | १०६१४.३१ | ४०१२.३२ |
| जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंका | ६६४९.३३ | ३६४०.०५ |
| **एकूण** | **१७२६३.६४** | **७६५२.३७** |

शिलकीची खात्री उपलब्ध नसल्याने आम्ही त्यांच्या परिणामांचा वित्तीय विवरणपत्रावर होऊ शकणाऱ्या प्रभावावर अभिप्राय व्यक्त करण्यास असमर्थ आहेत.

२) वित्तीय विवरणपत्राची टिप क्र.३०.९ पहावी. विविध लेखा कार्यालयांच्या बॅंकेच्या स्थितीची मेळ घालणा-या विवरणांची अद्ययावत उपलब्ध स्थिती विषयी आहेत. कंपनीने बॅंकेत जमा केलेल्या रकमांच्या नोंदी केलेल्या असतात, परंतु बॅंकांच्या विवरणपत्रात त्यांचे प्रतिबिंब मात्र दिसत नव्हते.तसेच बॅंकेने नाकारलेली चेक्स आणि बॅंकेने दिलेले क्रेडीट यांची लेख्यांच्या पुस्तकात नोंद नव्हती. व त्याचा मेळ करणे बाकी होते.

पुरेसे व योग्य पुरावे नसल्याने या मेळ न केलेल्या बाबींचा वित्तीय विवरणपत्रावर होऊ शकणाऱ्या परिणामांवर अभिप्राय देण्यास आम्ही असमर्थ आहोत.

**१०) शासनाकडून मिळण्याजोग्या रक्मा :**

या विषयावरील वित्तीय विवरणपत्रांची टिप क्र. २० पहावी. कंपनीला महाराष्ट्र शासनाकडून अर्थसाहाय्य/अनुदान विद्युत शुल्क व राज्य मुल्य वर्धीत कर जमा करण्याची दलाली याप्रकारे मिळणा-या रकमांपैकी शिल्लक असलेल्या बाबींचा तपशील खाली दिले आहे.

| अनु. क्र. | मिळणाऱ्या दलालीचा तपशील | रक्कम रु. लाखात |
|---|---|---|
| १. | विद्युत शुल्क जमा केल्याबद्दल दलाली | १,५१६.०० |
| २. | राज्य मूल्य वर्धीत कर (व्हॅट) | ३,६८७.५५ |

वरील शिलकी महाराष्ट्र शासनाकडून कायम होण्याच्या अधीन आहेत. याविषयी पुरेशा व योग्य असा लेखापरिक्षणाचा पुरावा उपलब्ध नाही व या रकमेची वसुली अदयाप झाली नसल्यामुळे त्याचा वित्तीय विवरणपत्रावर होणारा संभाव्य परिणामाचा अंदाज करता येत नाही.

**११) मत्ता व दायित्वे यांचे चल/अचल नसलेल्या असे वर्गीकरण :**

टिपा क्र. ५ दीर्घ मुदतीची दायित्वे पहावी. कंपनीने खालील लेखा शीर्षतील दायित्वाचे चल व अचल नसलेल्या दायित्वे याप्रकारे वर्गीकरण केलेले नाही.

१) देयके गोळा करणा-या खाजगी संस्थांच्या ठेवी रु. ४,६१४.२० लाख

२) विद्युतीकरण व सेवा जोडणीसाठी अनामत रकमा रु. ८,३१४.८५ लाख उपरिनिर्दिष्ट प्रकटने, कंपनी अधिनियम २०१३ ची अनुसूची तीन यातील आवश्यकतेशी सुसंगत नाहीत.

**१२) वीज खरेदी :**

अ) महावितरण कंपनीने वीज खरेदीच्या देयकांची रक्कम भरण्यातील विलंबापोटी, विविध वीज पुरवठा कंपन्याचा देय असलेले विलंब आकार करिता अल्पशी तरतूद केली असून तिचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

(रु. लाखात)

| वीज विक्रित्याचे नाव | विक्रित्याचे विलंब शूल्क आकार (DPC) | कंपनी प्रमाणे डी.पी.सी. (DPC) | अल्प तरतूद |
|---|---|---|---|
| जे एस डब्ल्यू एनर्जी | ६,०९१ | ५,१६७ | ९२४ |
| अदानी १२०० | ६,६६० | ५,५३८ | १,१२२ |
| अदानी १३२० | १२,४७६ | ९,००९ | ३,४६७ |
| रत्तन इंडिया | २,६६८ | २,६३५ | ३३ |
| एकूण | | | **५,५४६** |

यामुळे तोटयाचे रु.५,५४६ लाखाने कमी विवरण झाले असून, त्याचा तेवढाच प्रभाव चालू दायित्वांवरही पडला आहे.

ब) कंत्राटे/भाडी/व्यावसायिक शुल्के यांच्या पैशात देणी देताना (TDS) हा काही प्रकरणी प्रत्यक्ष त्यांना देण्याच्या वेळी कापला आहे. मात्र आयकर कायदा, १९६१ च्या तरतुदीनुसार तो पैसे देण्याच्या वेळी किंवा जमा करणे यापैकी जे आधी असेल त्याप्रमाणे कापणे आवश्यक असते. लेखापरिक्षणाचा पाठपुरावा नसल्याने त्याच्या प्रभावाचा अंदाजे करता येत नाही.

**१३) लेखा मानक २९ : तरतुदी :**

आकस्मिक दायित्वे व आकस्मिक मत्ता आवश्यक कागदपत्रे व तपशील नसल्यामुळे , आम्ही वित्तीय विवरण पत्राची टिप क्र. ३०.१ यात प्रकट केलेल्या आकस्मिक दायित्वाचे परिक्षण व पडताळणी करण्यासाठी पुरेसे व योग्य पुरावे मिळविण्यात असमर्थ होतो. कंपनीने याची फक्त सूची जतन केलेली आहे. त्यातील रकमेचे सांख्यिकीकरण केलेले नाही. असे परिक्षण व पडताळणी नसल्याने त्याचा वित्तीय विवरणापत्रावरील परिणामांचा अंदाज करता येत नाही.

**१४) इतर विषय :**

(I) कंपनीच्या मत्ता व दायित्वे यामध्ये, महाराष्ट्र विद्युत सुधारणा हस्तांतरण योजना २००५ अंतर्गत असलेल्या हस्तातंरण योजनेनुसार हस्तांतरीत झालेल्या शिलकींचा समावेश आहे. आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार या शिलकी स्थिरमत्ता, अचल मत्ता, चल मत्ता, अचल व चल दायित्वे यांच्या असून त्याला मराविमं सूत्रधारी कं. लि. ने मान्यता दिली आहे आणि त्यांची महावितरण कंपनीच्या लेखा पुस्तकात नोंदी घेतल्या आहेत. महाराष्ट्र शासनाकडून अंतिम हस्तांतरण योजना अद्याप अधिसुचित होणे बाकी आहे. जर त्या अधिसुचनेच्या वेळी यांच्या आकडेवारीत काही फरक झाला तर त्याचा वित्तीय विवरणपत्रांवर होऊ शकणाऱ्या प्रभावांचा आत्ताच अंदाज करता येत नाही.

(II) वित्तीय विवरणपत्रांची टिप क्र.३०.२३ सूक्ष्म, लघू व मध्यम श्रेणीच्या उदयोगांची खाती निश्चित न करणे, व त्यासाठी देय असणाऱ्या व्याजाची तरतूद करणे या विषयाची आहे. या खात्यातील दायित्वाचे सांख्यिकीकरण कंपनीने केलेले नाही. त्यामुळे यासाठी (जर काही) व्याजाची तरतूद असल्यास तिचा व त्यामुळे या काळातील तोटयावर होणाऱ्या परिणामाचा अंदाज आम्हाला करता आलेला नाही. सूक्ष्म लघुत मध्यम श्रेणीचे उदयोग निश्चित केले नसल्याने त्या विषयांच्या संबंधित संविधि यातील गरजांप्रमाणे प्रकटन कंपनीने केलेले नाही.

(III) वित्तीय विवरणपत्रातील टिप क्र.१४ हा महाराष्ट्र पॉवर डेव्हलपमेंट कार्पोरेशन लि. (MPDCL) या कपंनीला दिलेल्या रु. २४६.७३ लाखाच्या कर्जासंबंधी आहे. परंतु ते कायम करणे व त्याविषयीचे पुरेसे व योग्य लेखी परिक्षणाचे पुरावे नसल्याने आम्ही त्या कर्जाच्या वसुलीबद्दल व त्याचा वित्तीय विवरणपत्रावर होणाऱ्या परिणामांवर अभिप्राय देण्यास असमर्थ आहेत.

(IV) टिप क्र.१५ ही मराविम उर्वरित यांचेकडून मिळणारी/देय असलेली रक्कम अनुक्रमे रु. ६३,८२०.३७ लाख (खर्च) व रु. ५०,०४४.९७ लाख (जमा करणे) या विषयी आहे. या विषयी खात्री केलेला नसल्याने व पुरेसे आणि लेखापरिक्षणात्मक पुरावे नसल्याने आम्ही त्यांचा वित्तीय विवरणपत्रावर होणा-या परिणामाचा अंदाज करण्यास असमर्थ आहोत.

**खालील सनदी लेखापालांसाठी व त्यांच्या वतीने**

| | | |
|---|---|---|
| **मित्तल ॲण्ड असोसिएट्स** | **बी. एन. केडीया ॲण्ड कंपनी** | **कलानी ॲण्ड कंपनी** |
| सनदी लेखापाल, | सनदी लेखापाल, | सनदी लेखापाल, |
| एफ आर एन १०६४५६ डब्ल्यु | एफ आर एन ००१६५२ एन | एफ आर एन ०००७२२ सी |
| **सही /-** | **सही /-** | **सही /-** |
| **(स.ले.हेमंत आर बोहरा)** | **(स.ले.एस. के. केडीया)** | **(स.ले.एस.पी.झंवर)** |
| भागीदार | भागीदार | भागीदार |
| एम नं. १६५६६७ | एम नं. ०५२५७९ | एम नं. ०७४४१४ |

**स्थळ : मुंबई**
**दि. : १९.१२.२०१५**

# स्वतंत्र लेखापरिक्षकांच्या अहवालाचे जोडपत्र 'ब'

**आमच्या अहवालातील 'जोर दिलेली प्रकरणे', या परिच्छेदासंबंधी :**

१) वित्तीय विवरणपत्राची टिप क्र.३०.१ (iii) यात नमूद केल्याप्रमाणे कंपनीने महानिर्मिती (MSPGCL) कंपनीला देय असलेले विलंब भरण्याची रक्कम रु.१,१२,५९२.३५ लाख याचा लेखा केला नाही. ती आकस्मिक दायित्व म्हणून दाखविली आहे.

२) वित्तीय विवरणपत्राची टिप क्र.४ पहावी. यानुसार महाराष्ट्र राज्य विदयुत नियामक आयोग यांच्या मार्गदर्शन सूचनांनुसार कंपनीने मागील वर्षी निर्माण केलेल्या 'आकस्मिक राखीव' यामध्ये प्रत्येक वर्षी आकस्मिक राखीवच्या समतुल्य रक्कम गुंतवणूक करणे अनिवार्य आहे. मात्र कंपनीने मागील तीन वर्षात अशा राखीव खात्यात कोणतीही रक्कम भरलेली नाही. या आकस्मिक राखीवचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

(रु. लाखात)

| संबधित वित्तीय वर्ष | गुंतवणुक करण्याचे आवश्यक वर्ष | रक्कम |
|---|---|---|
| २०११-१२ | २०१२-१३ | ४,८०० |
| २०१२-१३ | २०१३-१४ | ६,३०० |
| २०१३-१४ | २०१४-१५ | ८,३०० |

**खालील सनदी लेखापालांसाठी व त्यांच्या वतीने**

| **मित्तल ॲण्ड असोसिएट्स** | **बी. एन. केडीया ॲण्ड कंपनी** | **कलानी ॲण्ड कंपनी** |
|---|---|---|
| सनदी लेखापाल, | सनदी लेखापाल, | सनदी लेखापाल, |
| एफ आर एन १०६४५६ डब्ल्यु | एफ आर एन ००१६५२ एन | एफ आर एन ०००७२२ सी |
| **सही /-** | **सही /-** | **सही /-** |
| **(स.ले.हेमंत आर बोहरा)** | **(स.ले.एस. के. केडीया)** | **(स.ले.एस.पी.झंवर)** |
| भागीदार | भागीदार | भागीदार |
| एम नं. १६५६६७ | एम नं. ०५२५७९ | एम नं. ०७४४१४ |

**स्थळ : मुंबई**
**दि. : १९.१२.२०१५**

# स्वतंत्र लेखापरिक्षकांचे अहवालाचे जोडपत्र 'क'

(स्वतंत्र लेखापरिक्षक यांची मा.सदस्य, महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी लिमिटेड यांना, कंपनीच्या दि. ३१ मार्च २०१५ रोजी संपलेल्या वर्षाच्या वित्तीय विवरणपत्रावर समान तारखेच्या अहवालात इतर कायदेविषयक व नियामने संबंधित विषयावरील अहवालातील परिच्छेद क्र.१ पहावा. )

१) अ) कंपनीने सर्वसाधारणपणे मत्तांचे सांख्यिकीकरणाची माहिती दाखविणारे सर्व तपशीलांचे अभिलेख योग्यप्रकारे जतन केलेले आहेत. फक्त बहुसंख्य भाडेपट्टीच्या व मुक्त धारणेच्या जमिनी व स्थिरमत्तांची जागेची स्थिती यांच्या माहितीचा अपवाद आहे.

ब) या वर्षात व्यवस्थापनाने स्थिर मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी केलेली नाही स्थिर मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी करणे बाबत कंपनीची काही धोरण/कार्यक्रम नाही स्थिर मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी केली नसल्याने जरकाही मत्तांच्या साधनात विसंगती आहेत किंवा नाहीत याविषयी आम्ही काही सांगण्यास असमर्थ आहोत.

२) अ) कंपनीने वस्तूसूचांची त्यांच्या सर्व जागावर प्रत्यक्ष पडताळणी करण्याच्या कोणताही कार्यक्रम तयार केलेला नाही. मात्र यावर्षी काही जागी वस्तुसुचीची पडताळणी केली होती.

ब) कंपनीचे एकूण आकारमान व तिच्या व्यवहाराचे स्वरुप यांचा विचार केल्यास व्यवस्थापनाने वस्तूसूचीच्या पडताळणीसाठी अनुसरलेल्या पध्दती खाली दिल्याप्रमाणे प्रमाणशीर व पुरेश्या नाहीत.

- प्रत्यक्ष पडताळणी करण्याच्या कामाची व्याप्ती विहित केलेली नसणे.
- आवश्यक कार्यपध्दती शोधलेली निश्चित केलेली नसणे.
- वर्ष अखेरीस अभिलेखासमेत प्रत्यक्ष पडताळणीचा मेल केलेला नसणे.

क) वस्तुसूचीच्या अभिलेखांच्या आम्ही केलेल्या परिक्षणावरुन आमचे असे मत आहे की, वस्तुसुचीच्या योग्य अहवाल कंपनी ठेवत नाही. जागेवरील वस्तूसूचीचे पुरेसे अभिलेख नसणे व योग्य प्रत्यक्ष पडताळणी केलेली नसणे या कारणामुळे आम्ही या बाबतीत काही विसंगती असल्यास त्यावर अभिप्राय देऊ शकत नाही यासंबंधी लेखापरिक्षणाचे अहवाल यातील जोडपत्र अ ची टिप क्र.६ याकडे आम्ही लक्ष वेधतो.

३) आम्हास दिलेल्या माहितीनुसार, कंपनी अधिनियम २०१३ यातील कलम १८९ अंतर्गत जतन केलेल्या नोंदवहीत ज्याचा समावेश केला आहे अशा कंपन्या, फर्म्स किंवा इतर संस्था यांना महावितरण कंपनीने कोणतीही प्रतिभूत किंवा अप्रतिभूत कर्जे मंजूर केलेली नाहीत. म्हणून तिला खंड ३(अ) व (ब) यातील तरतूदी लागू नाहीत.

४) आमच्या मते व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीचे आकारमान व व्यवहारांचे स्वरुप यांना अनुरुप अशी अंतर्गत नियंत्रणाची कार्यप्रणाली वीज खरेदी, वस्तूसूची स्थिर मत्ता (प्रगतीपथावरील भांडवली कामे यासह) आणि माल व सेवांची विक्रीया श्रेत्रासाठी आधिक बळकट केली पाहिजे.

यासंबंधी आम्ही लेखापरिक्षणाची अहवालातील जोडपत्र अ यांनी टिप क्र. २ कडे लक्ष वेधतो.

५) आम्हांस दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने यावर्षी ठेवी स्विकारलेल्या नाहीत. म्हणून कंपनी अधिनियमांची कलमे ७३ ते ७६ किंवा अन्य कोणतीही हा संबंधित कलमे लागू नाहीत.

६) कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १४८ अनुसार वीज वितरणासाठी खर्चाचे अभिलेख जतन करावेत असे केंद्र सरकारने विहित केले आहे. कंपनीने या संबंधित जतन केलेल्या अभिलेखांचा आम्ही स्थूल मानाने आढावा घेतला, आणि त्यावरुन आमच्या मते तसेच आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यावरुन या कंपनीने विहित अहवाल तयार करुन ते व्यवस्थितरित्या जतन केलेले आहेत असे आमचे प्रथम दर्शनी मत झाले आहे. अशा प्रकारे जतन केल्या जाणा-या खर्चाच्या अहवालांची अचूकता व परिपूर्णता यादृष्टीने आम्ही त्यांचे परिक्षण केले नाही. कारण कंपनी खर्च लेखापाल यांचेकडून अनुपालनाचा अहवाल मिळविण्याच्या प्रक्रीयेत आहे.

७) अ) आम्हाला स्पष्ट केल्याप्रमाणे कंपनी सर्वसाधारणपणे वाद नसलेली सांविधिक देणी योग्य त्य प्राधिका-यांकडे नियमीतपणे जमा करीत आहे. यामध्ये भाविष्य निर्वाह निधी, कर्मचारी राज्य विमा, विक्री कर, आयकर सीमा शुल्के उत्पादन शुल्क, मूल्यवर्धीत कर, उपकर व इतर लागू होणारी प्रत्यक्ष देणी फक्त स्त्रोतापाशी कापलेला कर व सेवा कर दायित्वे यांचा लेखा करणे व ते जमा करणे याबाबत कंपनी काहीशी अनियमित आहे. तसेच आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार उपरोक्त निर्विवाद देण्यासंबंधात दि. ३१.०३.२०१५ पर्यन्तच्या काळात जी देणी ज्या तारखेस देय होती तेव्हापासून सहा महिन्यापेक्षा जास्त काळ थकीत नव्हती.

ब) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार खालील तक्यात दिलेल्या वादग्रस्त मागण्या व्यतिरिक्त विक्री कर, आयकर, सीमा शुल्क, संपत्ती कर मूल्य वर्धीत कर व उपकर यांची थकबाकी नाही.

| संविधीचे नाव | थकीत देण्याचे स्वरुप | रक्कम रु लाखात | संविधीत कालावधी | ज्या मंचाकडे वाद प्रलंबित आहे त्याचे नांव |
|---|---|---|---|---|
| आयकर कायदा १९६१ | कर व्याजासह | ३१,५५७.०० | निर्धारण वर्ष २००६-०७ | आय टी ए टी मुंबई |
| आयकर कायदा १९६१ | दंड | २५८.०० | निर्धारण वर्ष २००६-०७ | आय टी ए टी मुंबई |
| आयकर कायदा १९६१ | कलम २६३ नुसार मागणी | ५९,५९०.०० | निर्धारण वर्ष २००६-०७ | आय टी ए टी मुंबई |
| आयकर कायदा १९६१ | कर व्याजासह | ८०,२८७.०० | निर्धारण वर्ष २००७-०८ | मुंबई उच्च न्यायालय |
| आयकर कायदा १९६१ | कर व्याजासह | २३,३२६ | निर्धारण वर्ष २००७-०८ | सी आय टी (अपील) |
| आयकर कायदा १९६१ | दंडाची मागणी | ३८.७३ | निर्धारण वर्ष २००७-०८ | मुंबई उच्च न्यायालय |
| आयकर कायदा १९६१ | कर व्याजासह | १,००,३६०.०० | निर्धारण वर्ष २००८-०९ | मुंबई उच्च न्यायालय |
| आयकर कायदा १९६१ | कर व्याजासह | ८८,४६९.०० | निर्धारण वर्ष २००९-१० | आय टी ए टी मुंबई |
| आयकर कायदा १९६१ | कर व्याजासह | १४,०८५.०० | निर्धारण वर्ष २०१२-१३ | सी आय टी (अपील) |
| | एकूण | ३,९७,९७०.७३ | - | - |

क) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार गुंतवणूकदार शिक्षण व संरक्षण निधीची तरतूद कंपनीला लागू नाही.

८) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे आणि वित्तीय विवरणपत्राच्या आधारे, कंपनीचा संचित तोटा तिच्या निव्वळ मोलाच्या ५० टक्यापेक्षा जास्त आहे. आम्ही लेखापरिक्षण केलेल्या चालू वर्षात कंपनीला रोख तोटा झालेला आहे. याच्या नजिकच्या मागील वर्षात रोख तोटा नव्हता.

९) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने वित्तीय संस्था, बॅका किंवा बॉड धारक यांची देणी देण्यात कसूर केलेली नाही.

१०) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने आमचे मत असे आहे की, कंपनीने इतरांनी बॅका किंवा वित्तीय संस्थाकडून संस्थेच्या हितास बांधक ठरेल अशा इतरांच्या कर्जांना हमी दिलेली नाही.

११) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार मुदतीची कर्जे ज्या हेतुसाठी घेतली त्यासाठीच वापरण्यात आली.

१२) आमचे सर्वोत्तम ज्ञान व विश्वास आणि आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार, या वर्षात कंपनीकडून कोणतीही लबाडी झालेली नाही आणि कंपनीवर कोणतीही प्रत्यक्ष लबाडी झाल्याचे दिसले नाही. मात्र वीज चोरीची काही प्रकरणे घडली असली तरी, व्यवस्थापनाच्या मते, कंपनीचे आकारमान व व्यवस्थाचे स्वरुप लक्षात घेतल्यास, अशा वीज चोरीची रक्कम प्रत्यक्ष प्रभाव करणारी नाही.

**खालील सनदी लेखापालांसाठी व त्यांच्या वतीने**

**मित्तल ॲण्ड असोसिएट्स**
सनदी लेखापाल,
एफ आर एन १०६४५६ डब्ल्यु

**बी. एन. केडीया ॲण्ड कंपनी**
सनदी लेखापाल,
एफ आर एन ००१६५२ एन

**कलानी ॲण्ड कंपनी**
सनदी लेखापाल,
एफ आर एन ०००७२२ सी

**सही** /-
**(स.ले.हेमंत आर बोहरा)**
भागीदार
एम नं. १६५६६७

**सही** /-
**(स.ले.एस. के. केडीया)**
भागीदार
एम नं. ०५२५७९

**सही** /-
**(स.ले.एस.पी.झंवर)**
भागीदार
एम नं. ०७४४१४

**स्थळ : मुंबई**
**दि. : १९.१२.२०१५**

## स्वतंत्र लेखा परिक्षकांच्या अहवालाचे जोडपत्र 'ड'

### कंपनी अधिनियम १४३(५) नुसार निदेश व त्यावर लेखापरिक्षकांचे अभिप्राय

(महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी लिमिटेड (यापुढे 'हा कंपनी' असा उल्लेख केला आहे) च्या सदस्यांना सादर केलेल्या दि. ३१ मार्च २०१५ रोजी संपलेल्या वर्षाच्या वित्तीय विवरणपत्रावर स्वतंत्र लेखापरिक्षकांनी दिलेल्या अहवालातील 'इतर कायदे विषयक व नियमन विषयक आवश्यकता' या शीर्षकाखालील मजूकरातील परिच्छेद ४ मध्ये संदर्भ दिलेली बाब)

| | निर्देश | लेखा परिक्षकांचे अभिप्राय | |
|---|---|---|---|
| १. | जर कंपनीची निर्गुंतवणूकीसाठी निवड झाली असली तर त्याचा अहवाल द्यावा, त्यात मत्ता (अमूर्त मत्ता व जमिनी यासह व दायित्वे (वचन दिलेली व सामान्य राखीव यासह) यांचे मूल्यांकनाचे परिक्षण व सध्याच्या निर्गुंतवणूकीची पध्दत व सध्याचा टप्पा याबददल माहिती द्यावी. | व्यवस्थापनाने आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीची निर्गुंतवणूकीसाठी निवड झालेली नाही. म्हणून सदर खंड लागू नाही. | |
| २. | कर्जे/ऋणे/उसनवारी/व्याज इ. सोडून देणे/निर्लेखित करणे याची काही प्रकरणे असल्यास अहवाल द्यावा. उत्तर होय असल्यास त्याची कारणे व त्यातील रकमांची माहिती द्यावी. | आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार राज्य शासनाने कृषी व औदयोगिक वीज ग्राहकाच्या त्याची थकबाकी भरल्याबद्लचा आकार व व्याज सोडून देण्याची योजना तयार केली. त्यानुसार कंपनीने व्याज व विलंब भरणा आकार सोडून दिले त्याची माहिती खालील तक्यात दिली आहे. | |
| | | **सोडून देणे/निर्लेखित करणे यांचे स्वरुप** | **रक्कम रु.कोटीत** |
| | | महाराष्ट्र शासनाची 'कृषी संजिवनी योजना' अंतर्गत कृषी ग्राहकांकडून घ्यावयाचे थकबाकीच्या विलंब भरणा आकार व व्याज हे सोडून दिले. | ३९७.५० |
| | | महाराष्ट्र शासनाची 'अभय योजना' अंतर्गत औदयोगिक ग्राहकांकडून येणे असले व्याज आणि थकबाकीचा विलंब भरणा आकार सोडून दिले. | १.६० |
| | | **एकूण** | **३९९.१०** |

<table>
<tr><th colspan="2">निर्देश</th><th colspan="2">लेखा परिक्षकांचे अभिप्राय</th></tr>
<tr><td></td><td></td><td colspan="2">या ऋणकोंकडुन थकीत रक्कमीची वसूली खात्रीपूर्वक व्हावी म्हणून ही सूट दिली.</td></tr>
<tr><td>३.</td><td>महाराष्ट्र शासनाकडे किंवा अन्य प्राधिकरणांकडून देणगी म्हणून मिळालेल्या मत्ता आणि मिळाल्या असल्यास त्याचा व तिस-या पक्षाकडे असलेल्या वस्तूंचे योग्य अभिलेख जतन केले का ?</td><td colspan="2">आम्हास दिलेल्या स्पष्टीकरणानुसार तिस-या पक्षाकडे असलेल्या वस्तुसूचींचे योग्य अभिलेख संबंधित उप कार्यालयांनी जतन केलेले आहेत. तसेच महाराष्ट्र शासन किंवा अन्य कुणाही प्राधिकरणाकडून कुठल्याही मत्ता भेट म्हणून मिळालेल्या नाहीत.</td></tr>
<tr><td rowspan="8">४.</td><td rowspan="8">कायदेविषयक/लवादात प्रलंबित प्रकरणांचे वर्ष निहाय विश्लेषणात्मक अहवाल द्यावा. त्यात प्रलंबित असण्याची कारणे आणि कायदयाच्या खटल्यांचा (परेदशी व स्थानिक) खर्चावर लक्ष ठेवण्यासाठी अस्तित्वात असलेल्या/प्रभावी असलेल्या यंत्रणेची माहिती द्यावी.</td><td colspan="2">आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार प्रलंबित खटले/लवादातील प्रकरणे यांचे वर्षातील विश्लेषण खालीलप्रमाणे आहे.</td></tr>
<tr><td>खटल्याचे वय</td><td>प्रकरणांची संख्या</td></tr>
<tr><td>५ वर्षापर्यंत</td><td>३,९६१</td></tr>
<tr><td>५ ते १० वर्षे</td><td>९६७</td></tr>
<tr><td>१० ते १५ वर्षे</td><td>२८१</td></tr>
<tr><td>१५ वर्षापेक्षा जास्त</td><td>८०</td></tr>
<tr><td>एकूण</td><td>५,२८९</td></tr>
<tr><td colspan="2">आम्हास दिलेली प्रलंबित असल्याच्या कारणाची माहिती पुढीलप्रमाणे आहे:-<br><br>१) दिवाणी दाव्यांच्या न्यायचौकशीची कार्यपध्दती गुंतागुतींची व वेळ खाणारी आहे. न्यायालयांवर खूप भार आहे. त्यामुळे दिवाणी दावे प्रलंबित असण्याचे प्रमाण जास्त आहे. ज्यात वाद प्रतिवादी पूर्ण झालेले असतात त्यावर त्यांच्या वयाप्रमाणे व पाळीप्रमाणे सुनावणीसाठी घेतले जातात.<br><br>२) ५ वर्षापेक्षा जास्त काळ खटले प्रलंबित होण्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत:-<br><br>१) विविध न्यायालयात प्रलंबित प्रकरणांचा अनुशेष मोठया प्रमाणात असणे ;</td></tr>
</table>

| | निर्देश | लेखा परिक्षकांचे अभिप्राय |
|---|---|---|
| | | २) अंतरिम आदेशावर अपील केल्याने त्याच्या निर्णयापर्यंत मुख्य दाव्याची कामकाज स्थगित केले जाते.<br><br>३) खटल्यातील ज्या व्यक्तींना समन्स दिले जातात त्यांचे पत्ते बदलेले जातात व नव्या जागी त्यांचा थांगपत्ता शोधता येत नाही. संबंधित कारखाने बंद असतात व जागा बदलेल्या असतात. त्यामुळे समन्स बजावता येत नाही.<br><br>४) अमंलबजावणीचे विनंती अर्ज दाखल केले तर त्यातील वॉरंट बजावता येत नाही. कारण संबंधित कारखाना बंद करुन त्या संचालकाने पत्ता बदलेला असतो. नवा पत्ता सापडत नाही. व त्यांचा ठावठिकाणा शोधता येत नाही. वॉरंटच्या अंमलबजावणीसाठी मालमत्तेचा तपशील सापडत नाही.<br><br>५) उच्च न्यायालयातही प्रलबिंत खटल्याचा अनुशेष असल्याने दाखल केलेली विनंती अर्ज प्रलंबित स्थितीत राहतात.<br><br>६)उच्च न्यायालये प्रकरणे दाखल करुन घेतात. त्यावर तहकूबी आल्याने ती उठल्या वर बऱ्याच काळाने ते सुनावणीसाठी यादीवर घेतले जाते. ही प्रकरणे निकालात काढणे हे मा. उच्च न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात असते.<br><br>आम्हांस दिलेल्या माहितीनुसार कंपनीच्या अधिकाऱ्याच्या वतीने नेमलेले अभियोक्ते यांचे शुल्क मंजूर केलेल्या परिपत्रकानुसार दिले जाते. आम्हास दिलेल्या माहितीनुसार परदेशातील न्यायालयात कंपनीचे कोणतेही प्रकरण प्रलंबित नाही. |

<table>
<tr><th></th><th>उपनिर्देश</th><th>लेखा परिक्षकांचे अभिप्राय</th></tr>
<tr><td>१.</td><td>सर्व ग्राहकांसाठी बिघाड मुक्त (Tamper proof) मिटर्स स्थापित केले किंवा कसे? तसे नसल्यास देयकांची अचूकता खात्रीने कशी तपासली जाते.</td><td>आम्हास दिलेली माहिती प्रमाणे बहुतांश ग्राहकांसाठी बिघाड मुक्त मिटर्स स्थापित केले आहेत. मात्र बिना मीटरच्या शेतकरी ग्राहकांना कंपनी सेवा देत आहे.</td></tr>
<tr><td>२.</td><td>राज्य विदयुत नियामक आयोगांने (MERC) मंजूर केलेले इंधन व वीज खरेदी समायोजन खर्च कंपनी वसूल करुन त्याचे लेख करते किंवा कसे ?</td><td>होय, कंपनी मासिक इंधन समायोजन खर्चाचा हिशेब करते व तो ग्राहकांवर देयकांमधून आकारते, ‘ग्राहकांकडील महसूल’ म्हणून त्यांचा लेखा केला जातो. मासिक एफपीपीसीए चा हिशेब म.वि.नि. आयोग (MERC) फेरतपासणी व कार्योत्तर मंजूरीसाठी पाठविला जातो.</td></tr>
<tr><td>३.</td><td>कंपनी फ्रॅचायजी (उपवितरक संस्था) यांना वीज पुरवते का? जर तसे असेल तर कंपनी उपवितरकांना खरेदीच्या सरासरी किमतीपेक्षा कमी दराने वीज पुरवत नाही किंवा कसे ?</td><td>होय, कंपनी फ्रॅचायजींना वीज पुरविते. आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनी फ्रॅचायजींना सरासरी खरेदी किंमतीच्या कमी दराने वीज पुरवित नाही.</td></tr>
<tr><td>४.</td><td>‘टॅरिफ रोल बॅक’ अर्थसहाय्य करण्यास परवानगी किती प्रमाणात दिली ? त्याची प्रतिपूर्ती राज्यशासनाकडून नियमितपणे होते का ? त्यात काही तूट असल्यास त्याचा अभिप्राय काय ? आहे ?</td><td>आम्हास दिलेल्या माहितीनुसार काही श्रेणीतील ग्राहकांना विकत दिलेल्या विजेबाबत महाराष्ट्र शासन दरात सवलत देते. वर्षभरात कंपनीने ग्राहकांना सवलतीने केलेल्या वीज पुरवठयासाठी खालीलप्रमाणे अर्थसहाय्य मान्य केले.
<table>
<tr><th>सवलतीचा प्रकार</th><th>रक्कम रु. कोटीत</th></tr>
<tr><td>कृषीग्राहकांना नियमीत सवलती</td><td>३६३०.६२</td></tr>
<tr><td>वीजमाग ग्राहकांना नियमीत सवलती</td><td>१,२४०.७६</td></tr>
<tr><td>आर सी आय् ग्राहकांना २० टक्के सवलत</td><td>६,००७.७१</td></tr>
<tr><td>दुष्काळ ग्रस्त कृषी ग्राहकांना सवलती</td><td>२९८.१०</td></tr>
<tr><td>गारपीट ग्रस्त कृषी ग्राहकांना सवलती</td><td>१०३.९५</td></tr>
<tr><td>एकूण</td><td>११,२८१.१४</td></tr>
</table>
महाराष्ट्र शासन सवलतीच्या रकमेची प्रतिपूर्ती समायोजन/बॅक ड्राफ्ट याद्वारे नियमितपणे करते.</td></tr>
</table>

| | उपनिर्देश | लेखा परिक्षकांचे अभिप्राय |
|---|---|---|
| ५. | वीजनिर्मिती, वितरण व पारेषण कंपन्यांचे आपसातील देणी व येणी यांचा मेळ करणे पूर्ण झाले किंवा कसे ? फरकांच्या कारणांचे परिक्षण करावे. | वीजनिर्मिती व पारेषण कंपन्याच्या येणी व देणी यांच्या शिलकीचा लेखा नोंद पुस्तकासोबतच्या दि. ३१ मार्च २०१५ रोजी पर्यत योग्य प्रकारे मेळ करण्याचे काम पूर्ण झाले. फक्त महापोरषणच्या पारेषण आकारा व्यतिरिक्त इतर शिलकी रकमेचा मेळ करण्याचा अपवाद आहे.<br><br>मेळ करण्याच्या बार्बीमध्ये विंलब भरणा आकार (DPC) चा लेखा सूत्रधारी कंपनीसोबत खर्चाची वाटणी, जुने कर्मचारी व सहित्याचे व्यवहार यांचा समावेश आहे. |

**खालील सनदी लेखापालांसाठी व त्यांच्या वतीने**

**मित्तल ॲण्ड असोसिएट्स**
सनदी लेखापाल,
एफ आर एन १०६४५६ डब्ल्यु

**बी. एन. केडीया ॲण्ड कंपनी**
सनदी लेखापाल,
एफ आर एन ००१६५२ एन

**कलानी ॲण्ड कंपनी**
सनदी लेखापाल,
एफ आर एन ०००७२२ सी

**सही /-**
**(स.ले.हेमंत आर बोहरा)**
भागीदार
एम नं. १६५६६७

**सही /-**
**(स.ले.एस. के. केडीया)**
भागीदार
एम नं. ०५२५७९

**सही /-**
**(स.ले.एस.पी.झंवर)**
भागीदार
एम नं. ०७४४१४

**स्थळ : मुंबई**
**दि. : १९.१२.२०१५**

## वित्तीय वर्ष २०१४-१५ च्या साविधिक लेखा परिक्षकांच्या अहवालातील अभिप्रायांवर महावितरण कंपनीच्या व्यवस्थापनाची उत्तरे
## जोडपत्र 'अ'- अहवालातील परिच्छेद शिर्षक 'आक्षेपित मतांचा आधार'

| लेखापरिक्षकांचा अहवाल | व्यवस्थापनाचे उत्तर |
|---|---|
| **शासकीय अनुदाने अर्थसहाय्य व ग्राहकांचे अंशदान**<br>१. शासकीय अनुदाने, अर्थसहाय्य व ग्राहकांचे अंशदान यांच्या मान्यतेसाठी वित्तीय वर्ष २०१३-१४ पर्यंत महावितरण कंपनीचे लेखाधोरण खालीलप्रमाणे होते. ''लेखा मानक-१२, शासकीय अनुदानाचे लेखे करणे''. यात नमूद केलेल्या तत्वांच्या आधारे, स्थिर मत्तांच्या खर्चासाठी मिळालेल्या शासकीय अनुदानाच्या रक्मा 'भांडवली राखीव' यामध्ये जमा केल्या जातात आणि या अनुदानाद्वारे निर्माण केलेल्या मतांच्या घसाऱ्याच्या समान रक्कम नफा तोटा पत्रकात स्थानांतरीत केली जाते. जी अनुदाने सशर्त मिळतात, त्यांना 'स्थगित उत्पन्न' मानले जाते व अनुदान मिळालेल्या वर्षापासून पंधरा वर्षाच्या मुदतीकरिता उत्पनामध्ये या रकमेचे समान स्थानांतरण केले जाते.<br><br>वरील धोरण, विद्युत (पुरवठा) वार्षिक (लेखे) नियमावली १९८५ याचे परिशिष्ट-३, मधील खंड क्र.२.३३,२.३४, आणि २.३५ या आधारे ग्राहकांचे अंशदान याला लागू करण्यात आलेले आहे. | **शासकिय अनुदाने, अर्थसाहय व ग्राहकांचे अंशदान**<br>या विषयी कंपनीने लेखा वरील टिपा यामध्ये टिपा क्र. ३०.१० (अहवाल वर्ष २०१४-१५) येथे एक स्पष्टीकरणात्मक टिपणी/ माहिती दिली असून ती येथे पुन्हा उदघृत करण्यात येत आहे.<br>स्थिर मत्तांसाठी महावितरणला जी शासकिय अनुदाने / व ग्राहकांकडून अंशदान मिळाली ती भांडवली राखीव यात जमा केली जात होती. आणि त्यातून निर्माण केलेल्या मत्ताच्या घसाऱ्यांच्या सममूल्य रक्कम, कंपनी नफा व तोटा पत्रकात जमा करत असे मात्र या वर्षी कंपनीने हे धोरण बदलले.<br>आता अशा रक्कमा मिळाल्याच्या वर्षापासून पंधरा वर्षापर्यंत त्या समान हप्यात 'नफा व तोटा पत्रकात' जमा करण्यात येतात. अशा बदलामुळे वित्तीय विवरणपत्राचे अधिक योग्य सादरीकरण होईल असे व्यवस्थापनाचे मत आहे.<br>लेखा मानक ५ यातील परिच्छेद २९ ''कालावधीतील निव्वळ नफा व तोटा मागील काळातील बाबी व लेखा धोरणातील बदल'' यामध्ये लेखा धोरणातील बदल करण्याबद्दल खालीलप्रमाणे मार्गदर्शन केले आहे.<br>''जर सविंधानानुसार वेगळे धोरण स्वीकारण्याची आवश्यकता असेल किंवा अन्य लेखा मानकांच्या अनुपालनासाठी असे बदल करणे आवश्यक असेल किंवा जर अशा बदलामुळे सदर उद्योगाच्या वित्तीय विवरणपत्रांचे अधिक योग्य प्रकारे सादरीकरण होणार असेल तरच फक्त लेखा धोरणात बदल करावेत.''<br>गतवर्षाचा म्हणजे वित्तीय वर्ष २०१३-१४ च्या वित्तीय |

| लेखापरिक्षकांचा अहवाल | व्यवस्थापनाचे उत्तर |
| --- | --- |
| २. या वर्षी कंपनीने वरील लेखा धोरणात बदल केला.त्याबाबत ''महत्त्वाची लेखा धोरणे'' यातील टिप क्र २ चा परिच्छेद ३ (सी) आणि टिप क्र ३०.१० यात नमूद केलेले आहे. या बदलामुळे पुढील परिणाम झाले.<br><br>(अ) अशा शासकीय अनुदानातून निर्माण केलेल्या मत्तांच्या आकारलेल्या घसाऱ्याच्या प्रमाणात या शासकीय अनुदाने, अर्थसाहय व ग्राहकांची अनुदाने, लांबणीवर टाकलेली नाहीत. हे लेखा मानक १२ शासकीय अनुदानाचे लेखे करणे/लेखा मानक १०: स्थिर मत्तांचे लेखे करणे, यांच्याशी अनुरुप नाही.<br><br>(ब) दि.०६.०६.२००५ ते ३१.०३.२०१४ या कालावधीत मिळालेली ग्राहकांची अंशदाने, अर्थ साहय व अनुदाने यांच्या १/१५रक्कम ही यापूर्वी जमा केलेल्या रकमेनुसार कमी करुन तिचा लेखा मागील काळातील उत्पन्न रु. १,००,३५४.२६ लाख असा केला आहे. मागील लेखाधोरणानुसार अनुदानातून निर्माण केलेल्या मत्ताच्या घसा-याच्या समान रक्कम उत्पन्नात जमा करण्याच्या आवश्यकता, याबाबत पुरेसे व योग्य असे लेखापरिक्षणाचे पुरावे उपलब्ध नव्हते. त्यामुळे लेखा मानक ५ यातील पदिच्छेद ३२ कालावधीतील निव्वळ नफा किंवा तोटा, मागील काळातील बाबी आणि लेखाधोरणातील बदल या नुसार लेखा धोरणात केलेल्या बदलांचे 'परिणाम' यांचे अनुपालन झालेले नाही. | अहवालावर स्वतंत्र लेखा परिक्षकांनी दिलेल्या अहवालात परिच्छेद ६ (vii) या मध्ये लक्ष वेधले होते. त्या विषयी लेखा परिक्षण समितीने दिनांक – १३ मार्च २०१५ रोजी एच एस बी सी इमारतीतील कार्यालयात लेखा परिक्षक सर्व श्री मे. मित्तल ॲंड कंपनी, मे. केडाया ॲंड कं यांचे सोबत शासकिय अनुदाने व ग्राहकांचे अंशदान बाबत नवीन धोरणाची अमंलबजावणी करण्याविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली त्यानंतर या बदलास संचालक मंडळाने मंडळ ठराव क्र. ३५७ दि. १३ मार्च २०१५ नुसार मंजुरी दिली.<br>**प्रश्नांवर सविस्तर चर्चा** - कपंनीच्या व्यवहारांचे व्यामिश्र स्वरुप व व्यापक आकारमान विचारात घेतल्यानंतर आधीच्या धोरणाच्या अमंलबजावणीत येणाऱ्या व्यावहारिक अडचणी कंपनीने मान्य केल्या. हे जुने धोरण म्हणजे अशी अनुदाने/अंशदाने यातून निर्मिलेल्या घसाऱ्याच्या समान रक्कम नफा व तोटा पत्रकात जमा करण्याचे धोरण लेखामानक १२ प्रमाणे होते. त्यामुळे लेखा परिक्षकांना त्यांचे लेखा परिक्षणासाठी मागे जाण्यात अडचणी येत होत्या.<br>या सखोल चर्चेनंतर व्यवस्थापनास असा विश्वास वाटतो की, नवीन लेखा धोरण हे कंपनीच्या वित्तीय स्थितीची संबंधित योग्य व विश्वासर्ह माहिती देण्यास अधिक चांगले आहे. कारण संबंधित मत्तांचे उपयुक्त सरासरी आयुष्य सुमारे १५ ते १७ वर्ष या टप्प्यात असते. व लेखा मानक १२ चा उद्देश पूर्ण करते.<br><br>लेखा धोरणातील या बदलांमुळे यावर्षी रु. १००३५४.२६ लाख एवढी रक्कम इतर उत्पन्न-अपवादात्मक बाबी यामध्ये नोंदवण्यात आले. लेखाधोरणात बदल केला नसता तर या वर्षाचा तोटा तेव्हढयाने वाढला असता. ही बाब आमच्या लेख्यांवरील टिप क्र. ३०.१० यात निर्देशित केली आहे. |

| लेखापरिक्षकांचा अहवाल | व्यवस्थापनाचे उत्तर |
|---|---|
| | २. आधीच्या लेखाधोरणानुसार काही विशिष्ट मत्ता यांची काही विशिष्ट ग्राहकांचे अंशदान/अर्थसाहय/ अनुदाने या सोबत सांगड घालणे अवघड झाले होते. यामुळे ग्राहकांचे अंशदानासोबत मत्ता निश्चित करण्यात अडचणी येत होत्या. त्यामुळे उपरिनिर्दिष्ट लेखा धोरणातील बदलाचा परिणामांचा अंदाज करता येणार नाही. |
| **२. प्रगतीपथावरील भांडवली कामे व स्थिर मत्ता :**<br>१) टिप क्र. ३०.७ यात नमूद केल्याप्रमाणे, भांडवली कामाच्या आदेशाचे योग्य व पूर्ण अभिलेख उपलब्ध नव्हते. त्यामुळे स्थिर मत्तांचे भांडवलीकरण केलेले नसणे किंवा ते विलंबाने करणे असे काही प्रकार आम्हास आढळले. याशिवाय भांडवलीकरणाची तारीख प्रमाणपत्राच्या तारीखेनंतरची मानली जाते, ती वापरात आणण्याच्या तारीखेनंतरची असून तशीच प्रत्यक्ष प्रमाणपत्रात प्रमाणित केलेली आहे. त्यामुळे भांडवलीकरणासाठी विलंब होवून त्यानुसार विलंबित मुदतीकरिता घसा-याच्या आकारावरही परिणाम झाला. तसेच सी डब्ल्यू आय पी चा आरंभ व दीर्घकाळ थकीत राहणे याच्या तपशीलाची पडताळणी करण्यास आम्ही असमर्थ आहोत. याचा वित्तीय विवरणपत्रावर होणा-या परिणामांचा अंदाज करता येत नाही. | **प्रगतीपथावरील भांडवली कामे व स्थिर मत्ता**<br>(१) विविध योजनानुसार करण्यात येणा-या भांडवली कामाच्या कार्यादेशाचे अभिलेख संबंधित क्षेत्रीय कार्यालयात जतन केलेले असतात. मात्र या अहवालाचे एकमेंकासोबत एकात्मिकीकरण करणारी योग्य पद्धती नसल्यामुळे लेखा पुस्तकात प्रगतीपथावरील भांडवली कामांची रक्कमेची सांगड अशा अभिलेखात करता येत नव्हती. मात्र आता कंपनीने इ आर पी सॅप प्रणालीत या समस्येवर तोडगा काढला असून तो भविष्यात उपलब्ध होईल ही बाब आमच्या लेख्यांवरील टिपा क्र. ३०७ मध्ये स्पष्ट केली आहे. |
| २) 'महत्त्वाची लेखाधोरणे' यातील टिप क्र.२ चा परिच्छेद क्र ४ (अ) पहावा. कर्मचारी खर्च व कार्यालय आणि प्रशासकीय खर्चाची रक्कम रु. ३३,९४९.९६ लाख यांचे भांडवलीकरण भांडवली डब्ल्यू आय पी च्या जादा १५ टक्के या दराने हंगामी तत्वावर यावर्षी करण्यात आले आणि असे खर्च प्रकल्पाचे बांधकाम किंवा स्थिर मत्तांचे संपादन किंवा त्या कामाच्या स्थितीत नेण्याचा खर्च यासाठी आहेत का हे निश्चित केले नाही.ते लेखा 'मानक १०: स्थिर मत्तांचा लेखा' याप्रमाणे नाही. | २) महावितरण कंपनीत भांडवलीकरण व संचालक व सुव्यवस्था कामे यांची हाताळणी करणारे दोन वेगवेगळया शाखा नाहीत. क्षेत्रीय स्तरावरील विभाग/कर्मचारी ही दोन्ही कामे करतात. तर क्षेत्रीय व मुख्यालय स्तरावरील तांत्रिक व इतर कर्मचारी वृंद भांडवली व सं व सू कार्ये या दोन्ही प्रकारच्या कामांची काळजी घेतात. म्हणून महावितरणामध्ये पूर्वी पासून आता पर्यंत म्हणजे वित्तीय वर्ष २०१४-१५ पर्यंत १५ टक्के दराने भांडवलीकरण करण्याचे लेखा धोरण सातत्याने पाळले जात आहे. |

| लेखापरिक्षकांचा अहवाल | व्यवस्थापनाचे उत्तर |
|---|---|
| ३) वित्तीय विवरण पत्रासोबतच्या ''महत्त्वाची लेखाधोरणे'' संबंधाचा टिपा क्र.२ चा परिच्छेद क्र.४ (बी) ही पहावी. यात प्रगती पथावरील भांडवली कामामध्ये भर करण्यासाठी खर्चाच्या उसनवारीची रु. १०,४९८.१४ लाख ही १२.३२ टक्के (या रकमेचा हिशोब मागील वर्षातील सरासरी व्याज दराने केला आहे) दराची रक्कम असून ती पात्रतेच्या मत्ता व व्यत्यय आलेले प्रकल्प यांची निश्चिती न करता ती देण्यात आली आहे. ही कृती ''लेखा मानक-१६: उसनवारीचे खर्च'' याच्याशी सुसंगत नाही. याशिवाय पुढे केलेल्या प्रगती पथावरील भांडवली काम या पात्र मत्ता असून त्यांच्या शिलकीवरील आवश्यक त्या व्याजाचे भांडवलीकरण केलेले नाही. लेखापरिक्षणाचे पुरेसे व योग्य पुरावे नसल्याने त्याचे प्रभाव निश्चित करता येत नाही. अशा वाटपाची पडताळणी करण्यासाठी लेखापरिक्षणाचे पुरेसे व योग्य पुरावे नसल्याने, आम्ही त्याचा एकत्रित वित्तीय विवरणपत्रावर होणाऱ्या परिणामांचे सांख्यिकीकरण करण्यास असमर्थ आहोत. | या सबंधीत लेखाधोरण हे ''महत्त्वाची लेखाधोरणे'' मधील परिच्छेद क्र. ४ (ब) मध्ये खालील प्रमाणे दर्शविले आहे.<br><br>पात्र मत्तांच्या संपादनावरील त्यांच्या बांधकामाच्या काळातील व्याजाचे वर्षातील प्रगती पथावरील बांधकामे याच्या व्यतिरिक्त जादा असे समजून व कर्जाला लागू होणारा सरासरी व्याजदर या आधारे भांडवलीकरण केले जाते.<br><br>वरील धोरण हे कंपनी सुरुवातीपासून सातत्याने अंवलंबीत आहे. |
| ४) व्यवस्थापनाकडून यावर्षी स्थिर मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी झालेली नाही. अशा प्रत्यक्ष पडताळणीच्या आधारे जर काही संभाव्य परिणाम वित्तीय विवरणपत्रांवर झाले तर तो निश्चितपणे सांगता येत नाही. | आर्थिक वर्ष २०१४-१५ मध्ये स्थिर मत्तांच्या तपासणीसाठी वैधानिक लेखापरिक्षकांची मुख्य कार्यालय व मंडल कार्यालयांमध्ये नेमणूक करण्यात आली आहे. या व्यावसियकांनी हे प्रत्यक्ष तपाणीचे काम २००५-०६ ते २०१३-१४ या कालावधीकरीता पूर्ण केले आहे. |

| लेखापरिक्षकांचा अहवाल | व्यवस्थापनाचे उत्तर |
|---|---|
| **३. घसारा :**<br>१) ''महत्त्वाची लेखा धोरणे'' यातील घसा-या संबंधीच्या टिप क्र. २ आणि टिप क्र. ३०.६ पहाव्यात. याविषयी आमचे असे निरीक्षण आहे की, काही प्रकरणात, स्थिर मत्तांचा घसारा योग्य प्रकारे अचूकपणे मोजलेली नाही. त्यात मत्ताचे उपयुक्त आयुष्य ठरविणे, वापराची तारीख, घसाऱ्याचा दर इ. बाबत काही ठिकाणी विसंगती/विचलन आहे. याचे योग्य तपशील नसल्याने आम्ही अशा विसंगतीचे घसाऱ्याच्या रकमेवर आणि नंतर एकत्रित वित्तीय विवरणपत्रांवर होणाऱ्या परिणामांचे सांख्यिकीकरण करण्यास आम्ही असमर्थ आहोत.<br><br>२) वित्तीय विवरणपत्राची टिपा क्र.३०.६ यात नमूद केले आहे की, सॅप-इआरपी यांची अंमलबजावणी करताना कंपनीने घसा-याचा पुन:मोजणी पुर्वलक्षी प्रभावाने केली आहे आणि विविध स्थिर मत्तांवर हा घसारा जादा/कमी प्रमाणात निश्चित करण्यात आला. त्यामुळे मागील वर्षातील संचित घसारा यातून निव्वळ घसारा रु. ५१,२५५.५७ लाख उलट फिरवण्यात आला. आवश्यक माहिती उपलब्ध नसल्याने आम्ही मागील काळातील समायोजनांचा हिशोबांची पडताळणी करण्यास असमर्थ आहेत. | **घसारा :**<br>**१ व २)** सॅप व इ आर पी प्रणालीद्वारे स्थिर मत्तांचा घसारा आकारण्यात आला आहे. त्यातून चुकीच्या कामासंबंधी (त्याचा मुद्देसूद तपशील उपलब्ध नाही.)<br>मात्र घसा-यासंबंधीच्या ज्या प्रश्नांवली सॅप प्रणालीत समाविष्ट झाले नाहीत त्या संबंधीचे प्रकटने लेखा टिप क्र. ३०.६ या प्रकट केली आहेत<br>**अ) पार्श्वभूमी-**महावितरणने वर्ष २००७-०८ पासून, कंपनी अधिनियम १९६५ सुधारित अनुसूची सहा (VI) स्वीकारली आहे. वित्तीय वर्ष २००९-१० पर्यंत वीज मंत्रालय, भारत सरकार यांनी अधिसूचित केलेल्या दरानूसार घसारा आकारण्यात येत असे. कंपनीने बहुवर्षीय वीजदर (MYT २००५) नुसार वित्तीय वर्ष २०१०-११ मध्ये घसा-याचे दर बदलून ते वि. वर्ष २००७-२००८ पासून म्हणजे कंपनी अधिनियम १९६५ सुधारित अनुसूची सहा स्वीकारल्यापासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू केले. वित्तीय वर्ष २०१०-११ मध्ये पद्धत बदल्याने झालेले घसा-यातील फरक घसाऱ्यांच्या लेख्यांत आकारण्यात आले.<br><br>**ब) पद्धतीतील बदल-** बहवर्षीय वीजदर नियमन २०११ खालील कलम ३१.२ (बी) नुसार घसा-यांच्या हिशेब सरळ रेषा पद्धतीने व या नियमानातील जोडपत्र १ यात विनिर्देशित केलेल्या दराने केला जाईल. विवरण परवाना धारकांना खात्री करावी लागेल. की एका व्यक्तीगत मत्तांचा घसारा ३१ मार्च रोजी ७० टक्के झाल्यावर उर्वरित मूल्य, मत्तांचे उपयुक्त आयूष्यात विभागले जाईल.<br><br>बहुवार्षिय नियमने २०११ यास धरुन राहण्यासाठी कंपनीने वि. वर्ष २०१४-१५ मध्ये सदर धोरण अनुसरणे व त्याची अमलबजावणी वि.वर्ष २०१३-१४ पासून सुरु केली. |

| लेखापरिक्षकांचा अहवाल | व्यवस्थापनाचे उत्तर |
|---|---|
| | **क) गतकाळात आकारलेल्या वेगळया (भेददर्शी) रकमांचा तपशील:** विविध नफा केंद्रे वेगवेगळया तारखांना सॅप मध्ये सामील झाले सर्व नफा केंद्रांची माहिती गोळा करणे हे प्रचंड मोठे काम असल्याने हे कार्य डिसेंबर २००८ मध्ये सुरु करण्यात आले होते. डिसेंबर २००८ मध्ये वेगवेगळया लेखा नोंदीच्या जागेवरुन मत्ता व संचित घसारा यांची माहिती गोळा करण्यात आली ही माहिती (डेटा) एम आय एस सिस्टम मध्ये अपलोड करण्यात आली. मात्र प्रणालीच्या तपासणी मुळे अपलोड केलेली माहिती आणि वारश्याने आलेल्या प्रणालीतील माहिती या वेगळया व सदोष होत्या.<br>एम आय एस-२ मध्ये घसाऱ्याचा (रन) घेता आली नाही कारण घसाऱ्याचे मापन एम ओ पी नुसार करण्यात आले होते कंपनीने मात्र बहुवर्षीय नियमन २००५ मध्ये नमूद केलेले दर स्वीकारले होते. म्हणून सर्व मत्तांसाठी मार्च २०१३ पर्यंतचा घसारा एकसेल शिट मध्ये जतन केला.<br>१) हा डेटा सॅप मध्ये अपलोड केला. त्यात संचित घसाऱ्यामध्ये फरक होता. तो व्यक्तिगत रितीने क्षेत्रीय स्तरावर एफ ए बी मध्ये आकारण्यात आला हा फरक रु. ३९३ कोटी होता. तो वि. वर्ष २०१४-१५ मध्ये मागील काळासाठी आकारण्यात आला.<br>२) वित्तीय वर्ष २०१३-१४ साठी घसाऱ्याचा (रन) सॅपमध्ये घेण्यात आला त्यातून घसाऱ्याची पद्धती बदललेल्याने रक्कमेत झालेला फरक मिळविण्यात आला. ही गतकाळासाठी आकारण्यात आलेली रक्कम रु. ११९ कोटी एवढी झाली.<br>दि. ३१ मार्च २०१४ रोजी एकूण संचित घसारा रु. ११६६८.२९ कोटी असून मागील काळातील खर्ची रक्कम रु. ३९३ कोटी आहे. ती आरंभीच्या संचित घसाऱ्याच्या ३.५७ टक्के आहे. ही बाब आमच्या लेखा टिपा क्र. ३०.६ मध्ये नमूद केली आहे. |

## लेखापरिक्षकांचा अहवाल

**४) व्यापारी येणी :-**

१) लेखा पुस्तके आणि देयके करण्याची व वसुलीची सॉफट वेअर ज्यात समाविष्ट आहेत अशी आय टी डेटा बेस यानुसार मागील वर्ष २०१३-१४ मध्ये व्यापारी येण्यांचा संचित व मेळ न केलेल्या शिलकीची रु.२,२५.४४७ लाख एवढी रक्कम लेख्यांच्या पुस्तकात निर्लेखित करण्यात आली. कारण पुस्तकी शिल्लकीची ही आय टी डेटा बेस मधील शिलकी रकमेशी बरोबरी करावयाची होती. असे निर्लेखीकरण केल्यानंतरही दि.३१ मार्च २०१५ रोजीची लेखा पुस्तकानुसार व्यापारी येण्याच्या शिलकी, या आय टी डेटा बेसच्या आकडयाच्या तुलनेत रु.१६,७०७ लाखाने जास्त आहेत. याचा तपशील वित्तीय विवरणपत्राच्या टिप क्र.३०.४ मध्ये आहे. यामुळे याप्रमाणात व्यापारी येण्याचे विवरण जास्त झाले असून तोटयाचे कमी विवरण झाले आहे.

२) वित्तीय विवरण पत्रातील ''महत्त्वाची लेखा धोरणे'' यातील टिपा क्र.२मधील परिच्छेद क्र.११ पहावा. यामध्ये असे नमूद केले आहे की, म.वि.नि. आयोग, ग्राहकांकडून येणे असलेल्या वार्षिक लेख्यातील १.५ टक्के या दराने संशयास्पद येण्याची तरतूद मान्य करतो. मात्र ही रक्कम वार्षिक लेख्यांमध्ये दाखविलेल्या येण्याच्या रकमेच्या ५ टक्केपेक्षा जास्त नसावी. या धोरणांच्या आधारे कंपनीने व्यापारी येण्याची चांगली व संशयास्पद अशी वर्गवारी केली आहे. आणि व्यापारी येण्यासाठी ठोक रक्कमेची तरतूदही केली आहे. मात्र असे करतांना व्यापारी येण्यांची वसूलीची स्थिती किती आहे हे पाहून निश्चित करणे, वर्षनिहाय विश्लेषण करणे, वसूलीसाठी केलेले प्रयत्न इ. बाबी विचारात घेतलेल्या नाहीत, याविषयी लेखा परिक्षणाचे पुरेशा प्रमाणातील अणि योग्य असे कागदोपत्री पुरावे नसल्याने आम्ही याबद्दल व्यापारी येण्याची चांगले व संशयास्पद असे वर्गीकरण व त्यासाठी परिणामकारक लेखापरिक्षणात्मक पुरावे नसल्याने त्यावर अभिप्राय व्यक्त करण्यास आम्ही असमर्थ आहोत. कंपणीने केलेली व्यापारी येणी व त्यांच्या तरतूद यांची स्थिती खालील प्रमाणे आहे.

## व्यवस्थापनाचे उत्तर

**४) व्यापारी येणी:-**

१) मागील वर्षी लेखा पुस्तके आणि आय टी सिस्टिम यानुसार व्यापारी येण्याची संचित व मेळ न केलेली शिल्लक रु.२२५४४७ लाख निर्लेखित करण्यात आली. विश्लेषणातून असे उघड झाले की, अनेक घटकां/ कारणांमुळे कंपनीच्या लेखा पुस्तकात ग्राहकांच्या देयकांचे चुकीच्या नोंदी झाल्या होत्या ही कारणे अशी प्रणालींचे एकात्मिकी करण न होणे, मानवी हस्तक्षेपाचे मोठे प्रमाण असणे, कुशल कर्मचा-यांची टंचाई इ. विविध कारणामुळे वेगवेगळया चुका झाल्या होत्या.

मेळ केल्यानंतर असे उघड झाले की वित्तीय लेजर मधील रक्कम ही ग्राहकांच्या व्यक्तीशः लेजर मधील रक्कमे तुलनेत प्रचंड मोठी होती. याचा अर्थ असा की, वित्तीय लेजर मध्ये दाखविलेली रक्कम ही प्रत्यक्षात ग्राहकांकडून वसूल होणारी नव्हती. या समस्येवर लेखा परिक्षण समितीमध्ये चर्चा झाली व संचालक मंडळाने या बुडीत कर्जाच्या निर्देशीकरणास मंजुरी दिली.

(कारण ही रक्कम वसूल होण्यासारखी नसली तरी ती येण्याच्या लेख्यांत होती.)

मात्र चालू आर्थिक वर्षात असे निदर्शनास आले की, अजुनही लेखा पुस्तके व माहिती तंत्रज्ञानाचे अभिलेख यात नोंदलेल्या व्यापारी येण्यांमध्ये रु. १६,७०६ लाखाचा फरक असून तो खाली तक्त्यामध्ये दर्शविला आहे. यांचे मुख्य कारण म्हणजे ज्या ग्राहकांना मार्च २०१४ मध्ये देयके दिली त्याची देय तारिख एप्रिल २०१४ मध्ये होती. मात्र आय. टी. अहवालात त्याचा तसा विचार झालेला नव्हता. गत वर्षाचा मेळ करतांना व रु. २२५४४७ लाखाचे निर्लेखन करतांना असे घडले होते.

(रु. लाखात)

| लेखा पुस्तकांप्रमाणे | एम आय एस प्रमाणे | फरक |
|---|---|---|
| १६९०९६८ | १६७४२६१ | १६७०७ |

ही बाब आमच्या लेखा टिप क्र. ३०.४ मध्ये प्रकट केली आहे.

| लेखापरिक्षकांचा अहवाल | व्यवस्थापनाचे उत्तर |
|---|---|

(रु. लाखात)

| अनु. क्र. | लेखा पुस्तकांप्रमाणे येणी | थकीत रक्कम | केलेला तरतूद |
|---|---|---|---|
| १. | अल्प मुदतीची व्यापारी येणी | १५,८५,२७१.६२ | २३,७७९.०७ |
| २. | दीर्घ मुदतीची व्यापारी येणी | ४,०१,२३०.८२ | ६,२९५.०५ |
| | एकूण | १९,८६,५०२.४४ | ३०,०७४.१२ |

२) कंपनी बहुवर्षीय वीजदर नियमन २०११ यानुसार बुडीत व संशयास्पद कर्जाकरिता लेखा पुस्तकातील येण्याच्या रकमेच्या १.५ टक्के या दराने तरतुद करीत असते. व कंपनीच्या मते ती पुरेशी आहे. या शिवाय एक वर्षापेक्षा अधिक काळ थकित असलेली येण्याची रक्कम वसुली होण्याजोगी नाही असे मानणे ही योग्य नाही. कंपनीच्या व्यवहाराचे स्वरुप वेगळे आहे व संपूर्ण भारतातील विद्युत कंपन्याप्रमाणे कार्यपद्धतीचे अनुसरण केले जाते.

५) **ग्राहकांकडील सुरक्षा अनामती :**

वित्तीय विवरणपत्रकांच्या टिपा क्र. ३०.५ यात नमूद केल्याप्रमाणे लेखा पुस्तकातील आणि एम आय एस यातील ग्राहकांच्या सुरक्षा अनामतींच्या शिलकी या मेळ करणे व त्यानंतरचे समायोजन यांच्या अधीन आहे. लेखा पुस्तके व आय टी डेटाबेस यातील शिलकीचे फरक खालीलप्रमाणे आहेत.

(रु. लाखात)

| सुरक्षा अनामत | पुस्तक नोंदीनुसार | आय टी डेटाबेस यानुसार | फरक |
|---|---|---|---|
| ग्राहकांकडून | ५,७७,३२४.८४ | ५,७२,१८९.९६ | ५,१३४.८८ |

पुरेसे व योग्य लेखापरिक्षणात्मक पुरावे नसल्याने सुरक्षा रकमेच्या प्रलंबित मेळांचे एकत्रीत वित्तीय विवरणपत्रावर होऊ शकणाऱ्या प्रभावी विषयी अभिप्राय व्यक्त करण्यास आम्ही असमर्थ आहोत.

**५. ग्राहकांची सुरक्षा अनामत**

महावितरण ही सर्वात मोठी वीज वितरण कंपनी आहे तिचे सुमारे २.६० कोटी ग्राहक आहेत. ग्राहकांच्या सुरक्षा अनामतींच्या शिलकी , वारसा पद्धतीने कंपनीकडे आल्या आहेत. त्याबाबत ग्राहक जनरल लेजर मधील आय टी प्रणाली नुसार शिलकी आणि वित्तीय लेजर मधील शिलकी यांचा मेळ प्रलबिंत आहे.

(रु. लाखात)

| पुस्तकांप्रमाणे | एम आय एस नुसार | फरक |
|---|---|---|
| ५,७७,३२४.८४ | ५,७२,१८९.९६ | ५,१३४.८८ |

लेखा परिक्षण अहवालात या संबंधी पात्रता दिली होती या समस्येकरिता वर्ष २०१५-१६ मध्ये वेगळी उपाययोजना करण्यात येईल.

ही बाब आमच्या लेखा टिपा क्र. ३०५ मध्ये नमूद केली आहे.

**६) वस्तुसूची :**

१) टिप क्र. ३०.३ यात सांगितल्याप्रमाणे, सॅप प्रणालीची अमंलबजावणी करताना मंडळ कार्यालये, विभाग कार्यालये यांना त्यांच्याकडील माहिती, सॅप-इआरपी याकडे दिलेल्या अंतिम तारखेपर्यन्त पाटविण्याची गरज होती. मात्र काही विभाग त्यांची माहिती (डेटा) योग्यप्रकारे अपलोड करु शकलेली नाहीत. या संबंधीच्या वित्तीय

**६. वस्तूसूची :**

या वर्षात मंडळ कार्यालये व त्यांचे विभाग येथे वेगवेगळया तारखांना इ आर पी सॅप वित्तीय मोडयूल अमलांत आले. संबंधित लेखा कार्यालयात इ आर पी सॅप सिस्टिमच्या अमलंबजावणीच्या तारखेला तेथील तांत्रिक पदधारी व्यक्तीने प्रमाणित केलेली प्रत्यक्ष वस्तूसूचीचे अंदाजित मूल्य रु. ४७ ८०५ लाख होते. जर अंतिम तारखेला

| लेखापरिक्षकांचा अहवाल | व्यवस्थापनाचे उत्तर |
|---|---|

**लेखापरिक्षकांचा अहवाल**

प्रभावांचा लेखा वित्तीय विवरणपत्रात केला आहे. वस्तूसूचीतील तूट रु.३६,६११ लाखांचा अंदाज, कंपनीने मासा (MASA) (पूर्वीचे वस्तूसूचीसाठी FABC चे मोडयूल) आणि संबंधित लेखा कार्यालयात इआरपी –एस एपी च्या अमंलबजावणीच्या तारखेला संबंधित तांत्रिक अधिकाऱ्यांनी प्रमाणित केलेला व प्रत्यक्ष उपलब्ध वस्तूसूचीचे मूल्य याची तुलना खालीलप्रमाणे आहे :

(रु. लाखात)

| लेखाशीर्ष | इ आर पी अंमलबजावणीच्या तारखेचा फरक (वस्तूसूचीतील तूट) |
|---|---|
| प्रगतीपथावरील भांडवली कामे याकडे स्थानांतरीत केलेले | ८,५४४ |
| भाडांरातील वापरलेला माल व सुटे भाग | २५,६४५ |
| आतंर शाखा समायोजने | १,१६४ |
| माहिती स्थानांतरणातील फरक | १,२५८ |
| **एकूण** | **३६,६११** |

याबाबत संबंधित लेखा कार्यालयात इआरपी-सॅपच्या अमंलबजावणीच्या तारखेस तांत्रिक अधिका-यांनी प्रमाणित केलेली प्रत्यक्ष वस्तुसूचीचे कागदपत्र आणि मंडळाने दि.१२ डिसेंबर २०१५ रोजीची मंजूरी, या व्यतिरिक्त या वस्तुसूचीसंबंधी अन्य कागदपत्रे म्हणजे इशू पासेस (देण्याचे परवाने), इतर संबधित कागदपत्र तपशील इ. आम्हाला उपलब्ध झालेला नाही. त्यामुळे सी डब्ल्यु आय पी, या वर्षाचा तोटा, वस्तुस्थितीचे मूल्य आदिची पडताळणी करु शकलो नाही.

**व्यवस्थापनाचे उत्तर**

संबंधित जागेवरील वस्तू सूचीचे मूल्य रु . ८४ ४१६ लाख होते. त्याची तूलना पूर्वीच्या एफ ए बी सी च्या वस्तूसूची मोडयूल नुसार म्हणजे प्रत्यक्ष जागेवरील साहित्य (Material at Site Account MASA) यानुसार वस्तूमालाच्या मूल्यांशी तूलना केली असता रु. ३६६११ लाखाचा फरक आढळला यांचे कारण असे आहे की, चालू वर्षाची व मागील काही वर्षाची वापरलेल्या वस्तूमालाची नोदं वेगवेगळया लेखा शीर्षात केली नसल्याने ती संचित तूट तयार झाली. कंपनीने आता योग्य प्रकारे मेळ अंदाज केले असून या फरकांची लेखा नोंद खालीलप्रमाणे आहे.

(रु. लाखात)

| लेखाशीर्ष | इ आर पी अंमलबजावणीच्या तारखेचा फरक (वस्तूसूचीतील तूट) |
|---|---|
| प्रगतीपथावरील भांडवली कामे याकडे स्थानांतरीत केलेले | ८,५४४ |
| वस्तूमाल व सुटेभाग यांचा वापर | २५,६४५ |
| आतंर शाखा समायोजने | १,१६४ |
| माहिती स्थानांतरणातील फरक | १,२५८ |
| **एकूण** | **३६,६११** |

सपॅ इ आर ची अमलंबजावणी करतांना तांत्रिक अडचणी आल्यामुळे, कंपनीला सॅप इ आर पी अमलंबजावणीच्या तारखेला, तांत्रिक व्यक्तींनी प्रमाणात केलेली वस्तूमालाची संपूर्ण शिल्लक इ आर पी सॅप प्रणालीत अपलोड करता आलेली नव्हती अशा शिलकी नंतर वित्तीय वर्षाच्या अखेरीस किंवा वि. वर्ष २०१५-१६ मध्ये खालील तक्यात दिल्याप्रमाणे अपलोड करण्यात आल्या. (रु. लाखात)

| इआरपी सॅप अंमलबजावणीच्या तारखेला प्रत्यक्ष उपलब्ध वस्तूसूची मूल्य | ३१ मार्च २०१५ पर्यंत अपलोड केलेल्या वस्तूसूची मूल्य | वर्ष २०१५-१६ मध्ये अपलोड केलेल्या उर्वरित सूचीचे मूल्य |
|---|---|---|
| ९१६७४.३४ | १६०६६५.६० | ६८९९१.२५ |

आमच्या लेखा टिपा क्र. ३०३ ही बाब प्रकट केली आहे

| लेखापरिक्षकांचा अहवाल | व्यवस्थापनाचे उत्तर |
| --- | --- |
| **७) लेख्यांची उपार्जित पध्दती :**<br>एकत्रीत वित्तीय विवरणापत्रा सोबतची टिप क्र.२ ''महत्वाची लेखा धोरणे'' यातील परिच्छेद १ (बी) पहावा:-आमच्या लेखापरिक्षणाच्या काळात, आम्हाला ज्यांचा लेखा उपार्जित/वाणिज्यक तत्वानुसार करण्याऐवजी रोकडतेच्या आधारे करण्यात आला असे काही खर्च आढळले. यामध्ये विशेषकरुन दुरुस्ती व देखभालीचे खर्च आहेत.हे खर्च लेख्यांची मुलभूत गृहिते आणि कंपनीचे लेखा धोरण यांच्याशी सुसंगत नाही. त्यात लेखापरिक्षणाचा मागोवा नसल्याने आम्ही त्याचा नफा व तोटा पत्रकावर होणाऱ्या परिणामाचा अंदाज करु शकत नाही. | **७. उपार्जन लेखा पद्धती :**<br>लेखे उपार्जन तत्वांनुसार तयार केले जातात. थकित दायित्वे/ खर्च यासाठी उपलब्ध माहिती व सर्वोत्तम अंदाज या आधारे तरतूद केली जाते. सॅप प्रणाली सुरु केल्यानंतर छोटे किरकोळ खर्च वगळता, अन्य खर्च रोख तत्त्वावर नोंदले जाण्याची शक्यता दुर्मिळ होईल. मात्र, लेखा परिक्षकांनी व्यक्त केलेल्या चिंतेचे निराकारण करण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयांना योग्य सूचना दिल्या जातील. |
| **८) शिलकीची निश्चिती :**<br>एकत्रीत वित्तीय विवरणपत्रातील टिप क्र. ३०.२ यानुसार व्यापारी येणी, कर्जे व अग्रिमे, ग्राहकांच्या जमा, शिलकी, विविध इतर खर्ची/जमा यांच्या शिलकी, शासनाकडील येणी, प्रवासातील रोकड, लेखा कार्यालयांतर्फे जमा करणारी बॅंका व पोस्ट कार्यालये यातील शिलकी या सर्व बाबी, त्यांची खात्री, मेळ व परिणामस्वरुप समायोजने यांच्या अधीन आहेत. तिसऱ्या पक्षाच्या शिलकीची खात्री करण्याची कंपनीने अनुसरलेली पध्दत आणखी शक्तीशाली करण्याची गरज आहे. जुन्या येण्यांचा मेळ व समझोते, त्यामुळे नफा व तोटयावर होणारे परिणाम, अपूर्ण वसुली किंवा अजिबात वसूली न होणे, आणि दायित्व अपूर्णपणे चुकती होणे या सर्वाबाबत योग्य अहवाल/ तपशील उपलब्ध नसल्याने आम्ही त्यांचा अंदाज करु शकलो नाही. | **८. शिलकींची निश्चिती करणे :**<br>किरकोळ ऋणकोंच्या बाबत, सर्व ग्राहकांना नियत काळानंतर ऊर्जा देयके देण्यात येतात. आणि त्यामुळे त्यांच्याकडून येणे असलेली रक्कम योग्य प्रकारे त्यांना कळविली जाते. जर काही दुमत असले तर असे ग्राहक संबंधित कार्यालयाशी संपर्क साधून स्थानिक स्तरावर तक्रार करतात. या तक्रारी विषयी क्षेत्रीय कार्यालये लक्ष घालून तपासणी करतात व जर देयकात चूकभूल असेल तर ती दुरुस्त करतात म्हणून देयके देणे हिच अशा ऋणकोंच्या शिल्लक थकबाकी बाबत निश्चिती करणे आहे.<br><br>कर्जाच्या प्रकरणी वित्तीय संस्था / बॅंका यांचेकडून खातरजमा मिळविण्यात येते. याशिवाय वीज खरेदी बहुसंख्य प्रकरणातील धनकोंच्या बाबत खात्री मिळविण्यात येते किंवा मेळ केला जातो. ही कार्यपद्धती आमची लेख्यांची टिपा क्र. ३०.२ यात नमूद केली आहे. वि. वर्ष २०१५-१६ मध्ये शिलकींची खातरजमा करण्याची पद्धती अधिक शक्तीशाली व प्रभावी करण्यात येईल. |

## लेखापरिक्षकांचा अहवाल

**९) टपाल खाती व बॅंक खात्यातील शिलकी :**

१) एकत्रित वित्तीय विवरणपत्रातील टिप क्र.१८ व टिप क्र.३०.८ पहाव्यात. टपाल कार्यालयातील खाती व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकांच्या शाखा यातील ज्या शिलकीच्या खात्री बाबत माहिती उपलब्ध नाही ती खालील तक्त्यात दिली आहे.

शिलकीच्या खात्री उपलब्ध नसल्याने आम्ही त्यांच्या परिणामांचा एकत्रीत वित्तीय विवरणपत्रावर होऊ शकणाऱ्या प्रभावावर अभिप्राय व्यक्त करण्यास असमर्थ आहेत.

(रु. लाखात)

| तपशील | लेखा पुस्तकाप्रमाणे ३१/३/१५ रोजी खर्चाची एकूण शिल्लक | लेखा पुस्तकांप्रमाणे ३१/३/१५ रोजी एकूण जमांच्या शिलकी |
|---|---|---|
| टपाल कार्यालयातील रक्कम | १०६१४.३१ | ४०१२.३२ |
| जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक | ६६४९.३३ | ३६४०.०५ |
| **एकूण** | **१७२६३.६४** | **७६५२.३७** |

२) एकत्रीत वित्तीय विवरणपत्राची टिपा क्र.३०.९ पहावी. विविध लेखा कार्यालयांच्या बॅंकेच्या स्थितीची मेळ घालणाऱ्या विवरणांची अदावत उपलब्ध स्थिती विषयी आहेत. कंपनीने बॅंकेत जमा केलेल्या रकमांच्या नोंदी केलेल्या असतात, परंतु बॅंकांच्या विवरणपत्रात त्यांचे प्रतिबिंब मात्र दिसत नव्हते. तसेच बॅंकेने नाकारलेली चेक्स आणि बॅंकेने दिलेले क्रेडीट यांची लेख्यांच्या पुस्तकात नोंद नव्हती व त्यांचा मेळ करणे बाकी होते.

पुरेसे व योग्य पुरावे नसल्याने या मेळ न केलेल्या बाबींचा एकत्रीत वित्तीय विवरणपत्रावर होऊ शकणाऱ्या परिणामांवर अभिप्राय देण्यास आम्ही असमर्थ आहोत.

## व्यवस्थापनाचे उत्तर

९. टपाल खाती व बॅंक खात्यातील शिल्लकी :

१) क्षेत्रीय कार्यालये तेथील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंका (डी सी सी) आणि स्थानिक टपाल कार्यालये येथून शिलकींची निश्चिती मिळविणे व खात्यांची तपशिलवार विवरणपत्रे मिळविणे या कामासाठी पाठपुरावा करत असतात हे काम त्वरीने व्हावे व कंपनीची लेखा पुस्तके व संबंधित (डी सी सी) बॅंकांची विवरणपत्रे यातील शिलकींमध्ये ज्या बाबी मध्ये फरक आहे त्या विषयी मेळ करुन पत्रक तयार करणे यासाठी योग्य त्या सूचना दिल्या आहेत ही बाब आमची लेखा टिप क्र. ३०.८ मध्ये प्रकट केली आहे.

२) राष्ट्रीकृत बॅंकातील चालू व चालू नसलेल्या खात्यातील मेळ करण्याचे काम बहुतेक सर्व लेखा कार्यालयांनी पूर्ण केले.

मात्र, ज्यांचा मेळ करण्यात येत आहे, त्या बाबींचे लेखा पुस्तकात योग्य प्रक्रिया करण्याचे काम प्रलंबित आहे. मेळ करण्यात येणाऱ्या बाबींचे लेखे योग्य प्रकारे करावेत यासाठी योग्य त्या सूचना क्षेत्रीय कार्यालयांना दिल्या आहेत. तसेच या समस्येवर नवीन इ आर पी प्रणालीतही उपाय योजना केली जाईल. ही वस्तूस्थिती आमच्या लेख्यांवरील टिप क्र. ३०.९ मध्ये स्पष्ट केली आहे.

| लेखापरिक्षकांचा अहवाल | व्यवस्थापनाचे उत्तर |
|---|---|
| **१०) शासनाकडून मिळण्या जोग्या रकमा :**<br>या विषयावरील वित्तीय विवरणपत्रांची टिपा क्र. २० पहावी. कंपनीला महाराष्ट्र शासनाकडून अर्थसाहाय्य /अनुदान विद्युत शुल्क व राज्य मुल्य वर्धीत कर जमा करण्याची दलाली याप्रकारे मिळणाऱ्या रकमांचा तपशील खाली दिला आहे.<br>(रु. लाखात)<br>अनु. क्र. / मिळणाऱ्या दलालीचा तपशील / रक्कम रु. लाखात<br>१. विद्युत शुल्क जमा केल्याबद्दल दलाली (कमीशन) — १,५१६.००<br>२. राज्य मूल्य वर्धीत कर (व्हॅट) — ३६,८७.५५<br>वरील शिलकी महाराष्ट्र शासनाकडून कायम होण्याच्या अधीन आहेत. याविषयी पुरेशा व योग्य असा लेखापरिक्षणाचा पुरावा उपलब्ध नाही व या रकमेची वसुली अद्याप झाली नसल्यामुळे त्याचा एकत्रीत वित्तीय विवरणपत्रावर होणाऱ्या संभाव्य परिणामाचा अंदाज करता येत नाही. | **१०. शासनाकडून मिळण्याजोग्या रकमा :**<br>वीज शूल्क गोळा करण्याबद्दलच्या कमीशन यासाठी महाराष्ट्र शासनाच्या शासकिय निर्णयानंतर मान्यता देण्यात आली.<br>मूल्य वर्धीत कराची रक्कम परत मिळविण्यासाठी त्याचे लेखा परिक्षण पूर्ण केल्यावर परताव्याची अंतिम मागणी विक्री कर विभागाकडे करण्यात येईल. |
| **११) मत्ता व दायित्वे यांचे चालू /चालू नसलेल्या असे वर्गीकरण :**<br>टिप क्र. ५ : दीर्घ मुदतीची दायित्वे पहावी. कंपनीने खालील लेखा शीर्षतील दायित्वाचे 'चालू व चालू नसलेल्या दायित्वे' याप्रकारे वर्गीकरण केलेले नाही.<br>१) देयके गोळा करणाऱ्या खाजगी संस्थांच्या ठेवी रु. ४,६१४.२० लाख<br>२) विद्युतीकरण व सेवा जोडणीसाठी अनामत रकमा रु. ८,३१४.८५ लाख उपरिनिर्दिष्ट प्रकटने, कंपनी अधिनियम २०१३ ची अनुसूची तीन यातील आवश्यकतेशी सुसंगत नाहीत. | **११. मत्ता व दायित्वे यांचे चालू / चालू नसलेल्या असे वर्गीकरण :-**<br>वीज देयके गोळा करणाऱ्या खाजगी संस्थाकडून गोळा केलेल्या ठेवींच्या संबंधीत सामन्यपणे कराराचा अवधी ३ वर्षाचा असतो व त्याचे नुतनीकरण करता येते. सातत्य टिकविण्यासाठी देयके गोळा करणाऱ्या संस्थाकडून घेतलेली ठेव वित्तीय वर्षाच्या अखेरीपासून १ वर्षाच्या आत परत करण्याचे आधी अंदाज केले जात नाहीत. ती चालू नसलेली अशा स्वरुपाची असतात.<br>विद्युती करण / सेवा जोडणी यासाठीच्या अनामतीचे चालू व चालू नसलेल्या असे वर्गीकरण यापूर्वीच केले आहे.<br>(चालू भाग रु.८६४१.९३ लाख व चालू नसलेला रु.८३१४.८५ लाख) ही माहिती आमच्या लेखा टिपा क्र.१० व ५ यात अनुक्रमे दिली आहे. |

| लेखापरिक्षकांचा अहवाल | व्यवस्थापनाचे उत्तर |
|---|---|

**१२) वीज खरेदी :**

अ) महावितरण कंपनीने वीज खरेदीच्या देयकांची रक्कम भरण्यातील विलंबापोटी, विविध वीज पुरवठा कंपन्यांचे देय असलेले विलंब आकार या करिता अल्पशी तरतूद केली असून तिचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

(रु. लाखात)

| वीज विक्रेत्याचे नाव | विक्रेत्याचे विलंब शूल्क आकार (DPC) | कंपनी प्रमाणे डी.पी.सी. (DPC) | अल्प तरतूद |
|---|---|---|---|
| जे एस डब्ल्यू एनर्जी | ६,०९१ | ५,१६७ | ९२४ |
| अदाणी १२०० | ६,६६० | ५,५३८ | १,१२२ |
| अदानी १३२० | १२,४७६ | ९,००९ | ३,४६७ |
| रत्तन इंडिया | २,६६८ | २,६३५ | ३३ |
| एकूण | | | ५,५४६ |

यामुळे तोट्याचे रु. ५,५४६ लाखाने कमी विवरण झाले असून, त्याचा तेव्हढाच प्रभाव चालू दायित्वांवरही पडला आहे.

**१२. वीज खरेदी**

वित्तीय वर्ष २०१४-१५ साठीचा विलंब भरणा आकार (डी पी सी) महावितरणच्या हिशेबानुसार पुढील कंपन्यांसाठी नोंदण्यात आला. कंपन्यांची नांवे अशी अदाणी पॉवर लि. जे एस डब्ल्यू लि., आणि रत्तन इंडिया लि. मात्र या कंपन्यांनी मागणी केलेला डी पी सी वेगळा होता या फरकांची रक्कम रुपये ५५.४६ कोटी ही आकस्मिक दायित्व म्हणून मानण्यात आली ही बाब आमच्या लेखांवरील टिपा क्र. ३०.१ यात प्रकट केली आहे.

ब) कंत्राटे/भाडी/व्यावसायिक शुल्के यांची पैशात देणी देताना स्त्रोतापाशी कर (TDS) हा काही प्रकरणी प्रत्यक्ष त्यांना पैसे देण्याच्या वेळी कापला आहे. मात्र आयकर कायदा १९६१ च्या तरतुदीनुसार तो पैसे देण्याच्या वेळी किंवा जमा करणे यापैकी जे आधी असेल त्याप्रमाणे कापणे आवश्यक असते. लेखापरिक्षणाचा पाठपुरावा नसल्याने त्याच्या प्रभावाचा अंदाज करता येत नाही.

ब) अशी प्रकरणे थोडीशी आहेत. या शिवाय त्याची खबरदारी सॅपमध्ये लगेच म्हणजे खर्चाचे दायित्व निर्माण झाल्याबरोबर घेण्यात येते. आणि स्त्रोतापाशी कर (टी डी एस) आपोआपच कापला जातो. टी डी एस चा भरणा पैसे भरण्याची वेळ किंवा क्रेडीट या पैकी जे आधी असेल त्याप्रमाणे केला जातो.

**१३) लेखा मानक २९ : तरतुदी :**

आकस्मिक दायित्वे व आकस्मिक मत्ता आवश्यक कागदपत्रे व तपशील नसल्यामुळे , आम्ही एकत्रीत वित्तीय विवरण पत्राची टिपा क्र. ३०.१ यात प्रकट केलेल्या आकस्मिक दायित्वाचे ठरीवप्रमाणाचे परिक्षण व पडताळणी करण्यासाठी पुरेसे व योग्य पुरावे मिळविण्यात असमर्थ होतो. कंपनीने याची फक्त सूची जतन केलेली आहे. त्यातील रकमेचे सांख्यिकीकरण केलेले नाही. असे परिक्षण व पडताळणी नसल्याने त्याचा एकत्रीत वित्तीय विवरणापत्रावरील परिणामांचा अंदाज करता येत नाही.

**१३. लेखा मानक : २९ तरतूदी, आकस्मिक दायित्वे व आकस्मिक मत्ता :-**

कंपनी प्रत्येक ताळेबदांच्या तारखेला आकस्मिक स्वरुपाच्या दायित्वाची नव्याने अंदाज करते कंपनीचे कार्ये विकेंद्रीत असून विखुरलेली आहेत. यामुळे संबंधीत माहिती क्षेत्रीय कार्यालयाकडून व तेथे असलेल्या अभिलेखांच्या आधारे गोळा केली जाते. आणि नंतर मूख्यालयात ती वित्तीय विवरण पत्रात प्रकट करण्यासाठी एकत्रित केली जाते. कंपनीने ही कार्यपद्धती ब-याच वर्षापासून अमलांत आणली आहे.

| लेखापरिक्षकांचा अहवाल | व्यवस्थापनाचे उत्तर |
|---|---|
| **१४) इतर विषय :**<br>१) कंपनीच्या मत्ता व दायित्वे यामध्ये, महाराष्ट्र विद्युत सुधारणा हस्तांतरण योजना २००५ अंतर्गत असलेल्या हस्तातंरण योजनेनुसार हस्तांतरीत झालेल्या शिलकींचा समावेश आहे. आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार या शिलकी स्थिरमत्ता, चालू नसणाऱ्या मत्ता, चालू मत्ता, चालू नसेलली व चालू असलेली दायित्वे यांच्या असून त्याला मराविमं सूत्रधारी कं. लि. ने मान्यता दिली आहे आणि त्यांची महावितरण या कंपनीच्या लेखा पुस्तकात नोंदी घेतल्या आहेत. महाराष्ट्र शासनाकडून अंतिम हस्तांतरण योजना अद्याप अधिसुचित होणे बाकी आहे. जर त्या अधिसूचनेच्या वेळी यांच्या आकडेवारीत काही फरक झाला तर त्याचा एकत्रीत वित्तीय विवरणपत्रांवर होऊ शकणाऱ्या प्रभावांचा आत्ताच अंदाज करता येत नाही. | **१४. इतर विषय :**<br>अ) कंपनीचे आरंभीचे दि. ०६.०६.२००५ तारखेचा ताळेबंद मराविमं सूत्रधारी कंपनी लिमिटेडने तिच्या दि. २६.०९.२००६ रोजी झालेल्या बैठकीत मंजूर केला होता.<br>महाराष्ट्र शासनाकडून मंजूरी दिलेली अंतिम हस्तांतरण योजना असून अधिसूचित व्हायची आहे. |
| ब) एकत्रीत वित्तीय विवरणपत्रांची टिपा क्र.३०.२३ : सूक्ष्म, लघू व मध्यम श्रेणीच्या उदयोगांची खाती निश्चित न करणे, व त्यासाठी देय असणा-या व्याजाची तरतूद करणे या विषयाची आहे. या खात्यातील दायित्वाचे सांख्यिकीकरण कंपनी समूहाने केलेले नाही. त्यामुळे यासाठी (जर काही) व्याजाची तरतूद असल्यास तिचा व त्यामुळे या काळातील तोटयावर होणा-या परिणामाचा अंदाज आम्हाला करता आलेला नाही. MSM उदयोग निश्चित केले नसल्याने त्या विषयांच्या संबंधित संविधि यातील गरजांप्रमाणे प्रकटन कंपनीने केलेले नाही. | ब) सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योगकां संबंधित लेखे शोधणे हे कामबहु रचनेचे, गुंतागुतीचे व अवघड स्वरुपाचे आहे. त्यामुळे एम एस एम इ डी कायदा २००६ च्या आवश्यकता प्रमाणे अशा उद्योजकांना देय असलेली रक्कम दिलेली नसणे व त्यांना त्यावर व्याज देणे / देय असणे याची माहिती प्रकट करता आलेली नाही. ही बाब आमची लेखा टिपा क्र. ३०.२३ मध्ये प्रकट केली आहे. |
| क) वित्तीय विवरणपत्रातील टिपा क्र.१४ हा महाराष्ट्र पॉवर डेव्हलपमेंट कार्पोरेशन लि. (MPDCL) या कपंनीला दिलेल्या रु. २४६.७३ लाखाच्या कर्जासंबंधी आहे. परंतु ते कायम करणे व त्याविषयीचे पुरेसे व योग्य लेखी परिक्षणाचे पुरावे नसल्याने आम्ही त्या कर्जाच्या वसुलीबद्दल व त्याचा | क) दाभोळ पॉवर कंपनी (डी पी सी) ही अनलिमिटेड स्वरुपाची कंपनी आहे. तिच्याकडून पूर्वीच्या म.रा.वि.मं. बाबत उदभवू शकणा-या संभाव्य जोखमांपासून रक्षण करण्यासाठी एम पी डी सी एल यांनी एक विशेष हेतूची संस्थेची (एस पी व्ही)रचना केली. एम पी डी सी एल |

| लेखापरिक्षकांचा अहवाल | व्यवस्थापनाचे उत्तर |
|---|---|
| एकत्रीत वित्तीय विवरणपत्रावर होणाऱ्या परिणामांवर अभिप्राय देण्यास असमर्थ आहेत. | यांचेकडे उत्पन्नाचे कोणताही प्रवाह नाही व एम पी डी सी एल चालविण्याचा खर्च व कायदेशिर प्रकरणांसाठी लागणारा निधी हा महावितरणने कर्जाने पुरविला आहे. जेव्हा डी पी सी आणि एम पी डी सी एल या कंपन्या अस्तित्वात ठेवण्याची आवश्यकता संपेल तेव्हा त्यांचे अंतिम समायोजन केले जाईल. |
| ड) टिप क्र.१५ ही 'मराविमं उर्वरित' यांचेकडून मिळणारी/देय असलेली रक्कम अनुक्रमे रु.६३,८२०.३७ लाख खर्च व रु. ५०,०४४.९७ लाख (जमा करणे) या विषयी आहे. या विषयी खात्री केलेला नसल्याने व पुरेसे आणि लेखापरिक्षणात्मक पुरावे नसल्याने आम्ही त्यांचा एकत्रीत वित्तीय विवरणपत्रावर होणाऱ्या परिणामाचा अंदाज करण्यास असमर्थ आहोत. | ड) या उर्वरित रकमा मराविमं सूत्रधारी कंपनी लि. कडे स्थानांतरीत करण्याची गरज आहे कारण हा क्रेडीट बॅलन्स मराविमं सूत्रधारी कंपनीच्या लेखा पुस्तकात नोंदविला आहे. मात्र म.रा.वि.म. सुत्रधारी कंपनीच्या स्वायत्त लेख्यांचे यापूर्वीच अंतिमीकरण झाल्याने व सांविधिक लेखापरिक्षककांडून त्यांचे प्रमाणिकरण झाल्याने सदर शिलकी पुढील वर्षी मराविमं सूत्रधारी क.लि. कडे स्थानांतरीत केल्या जातील.<br>ही बाब आमची लेखा टिपणी क्रमांक ३०.२८ यात प्रकट केली आहे. |

## जोडपत्र ब
## जोर दिलेली प्रकरणे या परिच्छेदांसंबंधी

| लेखापरिक्षकांचा अहवाल | व्यवस्थापनाचे उत्तर |
|---|---|
| १) वित्तीय विवरणपत्राची टिपा क्र.३०.१ यात नमूद केल्याप्रमाणे कंपनीने महानिर्मिती (MSPGCL) कपंनीला देय असलेले विलंब भरण्याची रक्कम रु.१,१२,५९२.३५ लाख याचा लेखा केला नाही. ती आकस्मिक दायित्व म्हणून दाखविली आहे. | १. महावितरणाची एक सहोदर उप कंपनी महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लि. (महानिर्मिर्ती) या कंपनीने वीज खरेदीसाठी या वर्षी विलंबाने पैशाचा भरणा केल्याबद्दल विलंब आकार डी पी सी लावला आहे. मात्र महावितरणाची वित्तीय स्थिती चांगली नसल्याने, महावितरणाने महानिर्मिती कंपनीला हे विलंब भरणा आकार सोडून देण्याची विनंती केली. तसेच मराविमं सूत्रधारी कंपनीला ही आवश्यक ते आदेश देण्याची विनंती केली.<br>म.रा.वि.म. सूत्रधारी कंपनीने महानिर्मितीला निर्देश दिले की, महावितरणवर लावलेला विलंब भरणा आकार सोडून द्यावा. त्यानुसार महावितरणने विलंब भरणा आकार रु. ११२५ कोटी सोडून देण्यासाठी महानिर्मितीशी सपंर्क साधला.<br>मरविमं सूत्रधारी कं. चे आदेश व त्यानुसार महावितरणाने केलेली विनंती यांचा विचार करुन या वर्षाच्या वित्तीय विवरणपत्रात विलंब भरणा आकारासाठी कोणतीही तरतूद केली नाही. महानिर्मितीकडून याबाबतची निश्चिती प्रलंबित असल्याने ती लेख्यांच्या टिप क्र.३० १ (३) यात आकस्मिक दायित्व असे दाखविले आहे. |
| २) वित्तीय विवरणपत्राची टिप क्र.४ पहावी. यानुसार महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग यांच्या मार्गदर्शन सूचनांनुसार कंपनीने मागील वर्षी निर्माण केलेल्या 'आकस्मिक राखीव' यामध्ये प्रत्येक वर्षी आकस्मिक राखीवच्या समतूल्य रक्कम गुंतवणूक करणे अनिवार्य आहे. मात्र कपंनीने मागील तीन वर्षात अशा राखीव खात्यात कोणतीही रक्कम भरलेली नाही. या आकस्मिक राखीवचा तपशील खालीलप्रमाणे आहे. | २. कपंनी सध्या बिकट आर्थिक स्थितीतून जात असून दायित्वे फेडण्यासाठी व अपरिहार्य देणी देण्यासाठी ही पुरेसा निधि कंपनीकडे नाही. याची माहिती संचालक मंडळास सादर करण्यात आली व त्यावेळी असा निर्णय झाल की, अशावेळी जादा व्याज दराने बँकेचे कर्जे घेऊन त्या रकमेची कमी दराच्या आकस्मिक निधीत गुंतवणूक करणे असे करणे सुज्ञपणाचे होणार नाही.<br>उपरिनिर्दिष्ट परिस्थितीमुळे व विद्राव्य निधीची टंचाई |

<table>
<tr><th>लेखापरिक्षकांचा अहवाल</th><th>व्यवस्थापनाचे उत्तर</th></tr>
<tr><td>

(रु. लाखात)

| संबधित वित्तीय वर्ष | गुंतवणुक करण्याचे आवश्यक वर्ष | रक्कम |
|---|---|---|
| २०११-१२ | २०१२-१३ | ४,८०० |
| २०१२-१३ | २०१३-१४ | ६,३०० |
| २०१३-१४ | २०१४-१५ | ८,३०० |

</td><td>असल्याने, कंपनीने आकस्मिक निधीत गुंतवणूक करु नये असा निर्णय घेतला त्याची माहिती मा. म. वि. नि. आयोग यांना देण्यात आली व आयोगाने तो वीज दरात देण्याची परवानगी दिली नाही.</td></tr>
</table>

## स्वतंत्र लेखा परिक्षकांच्या अहवालाचे जोडपत्र क

स्वतंत्र लेखापरिक्षक यांनी कंपनीच्या ३१ मार्च २०१५ रोजी संपलेल्या वर्षाच्या वित्तीय विवरणपत्रांवर समान तारखेच्या अहवालात इतर कायदेविषयक व नियमने संबंधित आवश्यक त्या विषयावरील अहवालातील परिच्छेद क्र. १ च्या संदर्भात सांविधिक लेखापरिक्षकांच्या प्रश्नांना कंपनीच्या व्यवस्थापनाची उत्तरे

| लेखापरिक्षकांचा अहवाल | व्यवस्थापनाचे उत्तर |
|---|---|
| १)<br>अ) कंपनीने सर्वसाधारणपणे मत्तांचे सांख्यिकीकरणाची माहिती दाखविणारे सर्व तपशीलांचे अभिलेख योग्यप्रकारे जतन केलेले आहेत. फक्त बहुसंख्य भाडेपट्टीच्या व मुक्त धारणेच्या जमिनी व स्थिरमत्तांची जागेची स्थिती यांच्या माहितीचा अपवाद आहे. | अ) जमिनीचे संपादनाची कामे करण्यासाठी महावितरण कंपनीत 'स्थापत्य शाखा' या नावांची स्वतंत्र कार्य शाखा आहे. म्हणून भाडेपट्टीची व मालकीच्या जमिनी या संबंधीचे इच्छित अभिलेख मुख्य अभियंता (स्थापत्य) यांचे कार्यालय आणि संबंधित स्थापत्य मंडळे व विभाग येथे उपलब्ध आहेत. |
| ब) या वर्षात व्यवस्थापनाने स्थिर मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी केलेली नाही स्थिर मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी करणे बाबत कंपनीची काही धोरण/कार्यक्रम नाही. स्थिर मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी केली नसल्याने जरकाही मत्तांच्या साधनात विसंगती आहेत किंवा नाहीत याविषयी आम्ही काही सांगण्यास असमर्थ आहोत. | ब) वित्तीय वर्ष २०१४-१५ मध्ये कंपनीचे मुख्यालय व मंडळ कार्यालये येथील सामान्य मत्तांचे प्रत्यक्ष पडताळणी करण्यास सनदी लेखापाल नियुक्त केले होते या व्यावसायिकांनी २००५-०६ ते २०१३-१४ या काळातील पडताळणीचे काम केले. |
| २)<br>अ) कंपनीने वस्तूसूचीची त्यांच्या सर्व जागावर प्रत्यक्ष पडताळणी करण्याचा कोणताही कार्यक्रम तयार केलेला नाही. मात्र यावर्षी काही जागी वस्तुसुचीची पडताळणी केली होती. | २)<br>अ) प्रत्येक वर्षी दि. ३१ मार्च रोजी सर्व भांडार केंद्रात असलेल्या वस्तूमालाचे वस्तूसुची प्रमाणे प्रत्यक्ष पडताळणीचे काम नियमीतपणे केले जाते त्यासाठी बाहेरचे व्यावसायिक तज्ञ म्हणजे सनदी लेखापाल नेमूण करण्याची पद्धत मागील ५-६ वर्षापासून चालू आहे. |
| ब) कंपनीचे एकूण आकारमान व तिच्या व्यवहाराचे स्वरुप यांचा विचार केल्यास व्यवस्थापनाने वस्तूसूचीच्या पडताळणीसाठी अनुसरलेल्या पध्दती खाली दिल्याप्रमाणे प्रमाणशीर व पुरेश्या नाहीत. | ब) भांडारातील वस्तूसूचीची प्रत्यक्ष पडताळणीचे काम स्वंतंत्र व्यावसायिक म्हणजे सनदी लेखापाल यांचेकडे सोपवले आहे आणि ते त्यांना दिलेल्या कामाच्या व्याप्ती मध्ये व विहित मानकांनुसार हे कार्य करीत आहेत. |

| लेखापरिक्षकांचा अहवाल | व्यवस्थापनाचे उत्तर |
|---|---|
| • प्रत्यक्ष पडताळणी करण्याच्या कामाची व्याप्ती विहित केलेली नसणे.<br>• आवश्यक कार्यपध्दती शोधलेली निश्चित केलेली नसणे.<br>• वर्षा अखेरीस अभिलेखासमेत प्रत्यक्ष पडताळणीचा मेळ केलेला नसणे. | प्रत्यक्ष वसतूमालाच्या तूलना भांडारातील वस्तूसूची अभिलेखानुसार केली जाते. त्यातील तूट / आधिक्य जर काही आढळले, तर त्याचा अहवाल दिला जातो. |
| क) वस्तुसूचीच्या अभिलेखांच्या आम्ही केलेल्या परिक्षणावरुन आमचे असे मत आहे की, वस्तुसुचीचा योग्य अहवाल कंपनी ठेवत नाही. जागेवरील वस्तूसूचीचे पुरेसे अभिलेख नसणे व योग्य प्रत्यक्ष पडताळणी केलेली नसणे या कारणामुळे आम्ही या बाबतीत काही विसंगती असल्यास त्यावर अभिप्राय देऊ शकत नाही यासंबंधी लेखापरिक्षणाचे अहवाल यातील जोडपत्र अ ची टिपा क्र.६ याकडे आम्ही लक्ष वेधतो. | क) भांडाराच्या जागेपासून सामानाची हलवाहलवी केल्यास ती योग्य प्रकारे नोंदण्यात येते मात्र जागेवरील सामानाची नोंद पद्धतशीररित्या ठेवलेली नसते. या समस्येबाबत इ आर पी प्रणालीत उपाय करण्यात येत आहे सॅपच्या अमलानंतर मटेरियल मॅनेजमेंट मोडयूल यात वस्तूसूचीचे तपशीलावर अभिलेख शक्य होतो. |
| ३) आम्हास दिलेल्या माहितीनुसार, कंपनी अधिनियम २०१३ यातील कलम १८९ अंतर्गत जतन केलेल्या नोंदवहीत ज्याचा समावेश केला आहे अशा कंपन्या, फर्म किंवा इतर संस्था यांना महावितरण कंपनीने कोणतीही प्रतिभूत किंवा अप्रतिभूत कर्जे मंजूर केलेली नाहीत. म्हणून तिला खंड ३(अ) व (ब) यातील तरतूदी लागू नाहीत. | ३) होय कंपनीने अशा संस्थानां कोणतीही कर्ज मंजूर केली नाहीत. |
| ४) आमच्या मते व आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीचे आकारमान व व्यवहारांचे स्वरुप यांना अनुरुप अशी अंतर्गत नियंत्रणाची कार्यप्रणाली वीज खरेदी, वस्तूसूची स्थिर मत्ता (प्रगतीपथावरील भांडवली कामे यासह) आणि माल व सेवांची विक्री या क्षेत्रासाठी आधिक बळवट केली पाहिजे. यासंबंधी आम्ही लेखापरिक्षणाची अहवाहातील जोडपत्र अ यांनी ४ टिप क्र. २ कडे लक्ष वेधतो. | ४) लेखापरिक्षणाच्या अहवालाचे जोडपत्र 'अ' यात मांडलेल्या समस्येवर मुद्दे सुद उत्तर वरीलप्रमाणे दिले आहे. |

| लेखापरिक्षकांचा अहवाल | व्यवस्थापनाचे उत्तर |
|---|---|
| ५) आम्हांस दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने यावर्षी ठेवी स्विकारलेल्या नाहीत. म्हणून कंपनी अधिनियमांची कलमे ७३ ते ७६ किंवा अन्य कोणतीही संबंधित कलमे लागू नाहीत. | ५) कपंनीने यावर्षी कोणत्याही ठेवी स्वीकाराचा नसल्यामुळे रिझर्व बँक ऑफ इंडिया चे निदेश आणि कंपनी अधिनियमचे कलम क्र. ७३ ते ७६ यातील किंवा अन्य कोणत्याही संबंधित तरतूदी व त्यानुसार तयार केलेली नियमावली लागू होत नाही. |
| ६) कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १४८ अनुसार वीज विवरणासाठी खर्चाचे अभिलेख जतन करावेत असे केंद्र सरकारने विहित केले आहे. कंपनीने या संबंधित जतन केलेल्या अभिलेखांचा आम्ही स्थूल मानाने आढावा घेतला, आणि त्यावरुन आमच्या मते तसेच आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यावरुन या कंपनीने विहित अहवाल तयार करुन ते व्यवस्थितरित्या जतन केलेले आहेत असे आमचे प्रथम दर्शनी मत झाले आहे. अशा प्रकारे जतन केल्या जाणा-या खर्चाच्या अहवालांची अचूकता व परिपूर्णता यादृष्टीने आम्ही त्यांचे परिक्षण केले नाही. कारण कंपनी खर्च लेखापाल यांचेकडून अनुपालनाचा अहवाल मिळविण्याच्या प्रक्रीयेत आहे. | कंपनीने वि. वर्ष २०१४-१५ साठी खर्च लेखे परिक्षक म्हणून मे. धनंजय व्ही जोशी ॲड असोसिएटस् खर्च लेखापाल, पुणे तसेच मे. ए.जी.अनिखिंडी ॲड कं. खर्च लेखापाल, कोल्हापूर यांची नियुक्ती केली असून खर्चाचे लेखापरिक्षणाचे काम चालू आहे. |
| ७)<br>अ) आम्हाला स्पष्ट केल्याप्रमाणे कंपनी सर्वसाधारणपणे वाद नसलेली सांविधिक देणी योग्य त्य प्राधिका-यांकडे नियमीतपणे जमा करीत आहे. यामध्ये भाविष्य निर्वाह निधी, कर्मचारी राज्य विमा, विक्री कर, आयकर सीमा शुल्के उत्पादन शुल्क, मूल्यवर्धीत कर, उपकर व इतर लागू होणारी प्रत्यक्ष देणी फक्त स्त्रोतापाशी कापलेला कर व सेवा कर दायित्वे यांचा लेखा करणे व ते जमा करणे याबाबत कंपनी काहीशी अनियमित आहे. तसेच आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार उपरोक्त देण्यासंबंधात दि. ३१.०३.२०१५ पर्यन्तच्या काळात जी देगणी ज्या तारखेस देय होती तेव्हापासून सहा महिन्यापेक्षा जास्त काळ थकीत नव्हती. | ७)<br>अ) सॅप अमलबजावणी सुरु केल्यानंतर, स्त्रोतापाशी कर कपात (टी डी एस) करणे व व टी डी एस चे दायित्व जमा तसेच सेवा कर दायित्वे यांची सर्व लेखा करण्याच्या जागी त्वरीत पूर्तता केली जाईल.<br><br>महाराष्ट्र शासनास देय असलेल्या वीजशुल्कांचे सामान्यत: कंपनीला मिळू शकणा-या अर्थ साहयाशी सांगड केली जाते आणि महाराष्ट्र शासन कंपनीकडून देय असलेल्या वीज शुल्कांचे कंपनीला द्यावयाचे अर्थ साह्य / अनुदाने यांच्या रक्कमेसोबत समायोजन करते. महाराष्ट्र शासन जेव्हा व जसे वीज शुल्काचे समायोजनाबाबत शासन निर्णय जारी करते तेव्हा त्याचा लेखा पुस्कात केला जातो. |

| लेखापरिक्षकांचा अहवाल | व्यवस्थापनाचे उत्तर |
|---|---|
| ब) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार खालील तक्यात दिलेल्या वादग्रस्त मागण्या व्यतिरिक्त विक्री कर, आयकर, सीमा शुल्क, संपत्ती कर मूल्य वर्धीत कर व उपकर यांची थकबाकी नाही. | ब) जेव्हा कंपनी आयकरचे मूल्यमापन/ निर्धारण/ पूर्नमूल्यांकन याबद्दल सहमत नसते तेव्हा कंपनी अपिल प्राधिकरणाकडे अपिल करणे पसंत करते आणि कनिष्ट अधिका-यांच्या निर्णयामुळे दुखावलेल्या बाबी तसेच कराची मागणी व्याज व दंड याबाबत दावे करते. |

| संविधीचे नाव | थकीत देण्याचे स्वरुप | रक्कम रु लाखात | संबंधित कालावधी | न्या मंचाकडे वाद प्रलंबित आहे त्याचे नांव |
|---|---|---|---|---|
| आयकर कायदा १९६१ | कर व्याजासह | ३१,५५७.०० | निर्धारण वर्ष २००६-०७ | आय टी ए टी मुंबई |
| आयकर कायदा १९६१ | दंड | २५८.०० | निर्धारण वर्ष २००६-०७ | आय टी ए टी मुंबई |
| आयकर कायदा १९६१ | कलम २६३ नुसार मागणी | ५९,५९०.०० | निर्धारण वर्ष २००६-०७ | आय टी ए टी मुंबई |
| आयकर कायदा १९६१ | कर व्याजासह | ८०,२८७.०० | निर्धारण वर्ष २००७-०८ | मुंबई उच्च न्यायालय |
| आयकर कायदा १९६१ | कर व्याजासह | २३,३२६ | निर्धारण वर्ष २००७-०८ | सी आय टी (अपील) |
| आयकर कायदा १९६१ | दंडाची मागणी | ३९.०० | निर्धारण वर्ष २००७-०८ | मुंबई उच्च न्यायालय |
| आयकर कायदा १९६१ | कर व्याजासह | १,००,३६०.०० | निर्धारण वर्ष २००८-०९ | मुंबई उच्च न्यायालय |
| आयकर कायदा १९६१ | कर व्याजासह | ८८,४६९.०० | निर्धारण वर्ष २००९-१० | आय टी ए टी मुंबई |
| आयकर कायदा १९६१ | कर व्याजासह | १४,०८५.०० | निर्धारण वर्ष २०१२-१३ | सी आय टी (अपील) |
| **एकूण** | | **३,९७,९७१.००** | - | - |

| | |
|---|---|
| क) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार गुंतवणूकदार शिक्षण व संरक्षण निधीची तरतूद कंपनीला लागू नाही. | क) होय गुंवणूकदार प्रशिक्षण व रक्षण निधी संबंधीच्या तरतूदी कंपनीला लागू नाहीत. |

| लेखापरिक्षकांचा अहवाल | व्यवस्थापनाचे उत्तर |
|---|---|
| ८) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे आणि वित्तीय विवरणपत्राच्या आधारे, कंपनीचा संचित तोटा तिच्या निव्वळ मोलाच्या ५० टक्यापेक्षा जास्त आहे. आम्ही लेखापरिक्षण केलेल्या चालू वर्षात कंपनीला रोख तोटा झालेला आहे. याच्या नजिकच्या मागील वर्षात रोख तोटा नव्हता. | ८) वित्तीय वर्ष २००७-०८ चा अपवाद वगळता ही कंपनी सातत्याने तोटयात आहे त्यामुळे संचित तोटा वाढत आहे.<br><br>पूर्व काळातील उत्पन्नाचे परिणाम वेगळे दाखविले असून त्यांचे परिणाम विचारात घेतल्यास कपंनीला रोखीचे तोटे झालेले नाहीत. |
| ९) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीने वित्तीय संस्था, बॅंका किंवा बॉड धारक यांची देणी देण्यात कसूर केलेली नाही. | ९) होय, कंपनीने कर्जाची परत फेड करण्यात कोणतीही कसूर केली नाही. उलट वित्तीय संस्था कडून कंपनीला वेळेवर नियमित तारखेला भरणा केल्याबद्दलच्या सवलतीची प्रोस्ताहाने यांचा लाभ मिळवित आहे. |
| १०) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार आमचे मत असे आहे की, कंपनीने इतरांना बॅंका किंवा वित्तीय संस्थाकडून संस्थेच्या हितास बांधक ठरेल अशा इतरांच्या कर्जांना हमी दिलेली नाही. | १०) होय, कंपनीने अन्य कुणीही घेतलेल्या कर्जाबद्दल हमी दिलेली नाही. |
| ११) आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार मुदतीची कर्जे ज्या हेतुसाठी घेतली त्यासाठीच वापरण्यात आली. | ११) होय, कंपनीने मुदतीची कर्जे ज्या कामांकरिता घेतली, त्यासाठीच ती वापरली. |
| १२) आमचे सर्वोत्तम ज्ञान व विश्‍वास आणि आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार, या वर्षात कंपनीकडून कोणतीही लबाडी झाली नाही आणि कंपनीवर कोणतीही प्रत्यक्ष लबाडी झाल्याचे दिसले नाही. मात्र वीज चोरीची काही प्रकरणे घडली असली तरी, व्यवस्थापनाच्या मते, कंपनीचे आकारमान व व्यवस्थाचे स्वरुप लक्षात घेतल्यास, अशा वीज चोरीची रक्कम प्रत्यक्ष प्रभाव करणारी नाही. | १२) कंपनीच्या विजेच्या चोऱ्यांची प्रकरणे वगळता वर्ष भरात लबाडीची कोणतीही प्रकरणे घडली नाहीत. |

# स्वतंत्र लेखा परिक्षकांच्या अहवालाचे जोडपत्र 'ड'

## कंपनी अधिनियम १४३(५) नुसार निदेश व त्यावर लेखापरिक्षकांचे अभिप्राय

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड (यापुढे 'हा कंपनी' असा उल्लेख केला आहे) च्या सदस्यांना सादर केलेल्या दि. ३१ मार्च २०१५ रोजी संपलेल्या वर्षाच्या वित्तीय विवरणपत्रावर स्वतंत्र लेखापरिक्षकांनी दिलेल्या अहवालातील इतर कायदे विषयक व नियमन विषयक आवश्यकता या शीर्षकाखालील मजूकरातील परिच्छेद ४ मध्ये संदर्भ दिलेली बाब)

<table>
<tr><th></th><th>निर्देश</th><th colspan="2">लेखा परिक्षकांचे अभिप्राय</th></tr>
<tr><td>१.</td><td>जर कंपनीची निर्गुतवंणूकीसाठी निवड झाली असली तर त्याचा अहवाल द्यावा, त्यात मत्ता (अमूर्त मत्ता व जमिनी यासह) व दायित्वे (वचन दिलेली व सामान्य राखीव यासह) यांचे मूल्यांकनाचे परिक्षण व सध्याच्या निर्गुतवणूकींची पध्दत व सध्याचा टप्पा याबददल माहिती द्यावी.</td><td colspan="2">व्यवस्थापनाने आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनीची निर्गुतवणूकीसाठी निवड झालेली नाही. म्हणून सदर खंड लागू नाही.</td></tr>
<tr><td>२.</td><td>कर्जे/ऋणे/उसनवारी/व्याज इ. सोडून देणे/निर्लेखित करणे याची काही प्रकरणे असल्यास अहवाल द्यावा. उत्तर होय असल्यास त्याची कारणे व त्यातील रकमांची माहिती द्यावी.</td><td colspan="2">आम्हास दिलेली माहिती व स्पष्टी-करणे यानुसार राज्य शासनाने कृषी व औदयोगिक वीज ग्राहकाच्या त्याची थकबाकी भरल्याबद्लचा आकार व व्याज सोडून देण्याची योजना तयार केली. त्यानुसार कंपनीने व्याज व विलंब भरणा आकार सोडून दिले त्याची माहिती खालील तक्यात दिले आहे.</td></tr>
<tr><td rowspan="4"></td><td rowspan="4"></td><td>सोडून देणे/निर्लेखित करणे यांचे स्वरुप</td><td>रक्कम रु.कोटीत</td></tr>
<tr><td>महाराष्ट्र शासनाची कृषी संजिवनी योजना अंतर्गत कृषी ग्राहकांकडून घ्याव-याचे थकबाकीच्या विलंब भरणा आकार व व्याज हे सोडून दिले.</td><td>३९७.५०</td></tr>
<tr><td>महाराष्ट्र शासनाची 'अभय योजना' अंतर्गत औदयो-गिक ग्राहकांकडून येणे असले व्याज आणि थकबा-कीचा विलंब भरणा आकार सोडून दिले.</td><td>१.६०</td></tr>
<tr><td>एकूण</td><td>३९९.१०</td></tr>
</table>

<table>
<tr><th colspan="2">निर्देश</th><th colspan="2">लेखा परिक्षकांचे अभिप्राय</th></tr>
<tr><td></td><td></td><td colspan="2">या ऋणकोंकडुन थकीत रक्कमेची वसूली खात्रीपूर्वक व्हावी म्हणून ही सूट दिली.</td></tr>
<tr><td>३.</td><td>महाराष्ट्र शासनाकडे किंवा अन्य प्राधिकरणांकडून देणगी म्हणून मिळालेल्या मत्ता आणि मिळाल्या असल्यास त्याचा व तिस-या पक्षाकडे असलेल्या वस्तूंचे योग्य अभिलेख जतन केले का ?</td><td colspan="2">आम्हास दिलेल्या स्पष्टीकरणानुसार तिस-या पक्षाकडे असलेल्या वस्तुसूचींचे योग्य अभिलेख संबंधित उप कार्यालयांनी जतन केलेले आहेत. तसेच महाराष्ट्र शासन किंवा अन्य कुणाही प्राधिकरणाकडून कुठच्याही मत्ता भेट म्हणून मिळालेल्या नाहीत.</td></tr>
<tr><td rowspan="8">४.</td><td rowspan="8">कायदेविषयक/लवादात प्रलंबित प्रकरणाचा वर्ष निहाय विश्लेषणात्मक अहवाल द्यावा. त्यात प्रलंबित असण्याची कारणे आणि कायदयाच्या खटल्यांचा (परेदशी व स्थानिक) खर्चावर लक्ष ठेवण्यासाठी अस्तित्वात असलेल्या/प्रभावी असलेल्या यंत्रणांची माहिती द्यावी.</td><td colspan="2">आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार प्रलंबित खटले/लवादातील प्रकरणे यांचे वर्षातील विश्लेषण खालीलप्रमाणे आहे.</td></tr>
<tr><td>खटल्याचे वय</td><td>प्रकरणांची संख्या</td></tr>
<tr><td>५ वर्षापर्यंत</td><td>३,९६१</td></tr>
<tr><td>५ ते १० वर्षे</td><td>९६७</td></tr>
<tr><td>१० ते १५ वर्षे</td><td>२८१</td></tr>
<tr><td>१५ वर्षापेक्षा जास्त</td><td>८०</td></tr>
<tr><td>एकूण</td><td>५,२८९</td></tr>
<tr><td colspan="2">आम्हास दिलेली प्रलंबित असल्याच्या कारणाची माहिती पुढीलप्रमाणे आहे:-<br><br>१) दिवाणी दाव्यांच्या न्यायचौकशीची कार्यपध्दती गुंतागुतींची व वेळ खाणारी आहे. न्यायालयांवर खूप भार आहे. त्यामुळे दिवाणी दावे प्रलंबित असण्याचे प्रमाण जास्त आहे. ज्यात वाद प्रतिवाद पूर्ण झालेले असतात त्यावर त्यांच्या वयाप्रमाणे व पाळीप्रमाणे सुनावणीसाठी घेतले जातात.<br><br>२) ५ वर्षापेक्षा जास्त काळ खटले प्रलंबित होण्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत:-<br><br>१) विविध न्यायालयात प्रलंबित प्रकरणांचा अनुशेष मोठया प्रमाणात असणे.</td></tr>
</table>

| निर्देश | | लेखा परिक्षकांचे अभिप्राय |
|---|---|---|
| | | २)अंतरिम आदेशावर अपील केल्यास त्याच्या निर्णयापर्यंत मुख्य दाव्याची कामकाज स्थगित केले जाते.<br><br>३) खटल्यातील ज्या व्यक्तींना समन्स दिले जातात त्यांचे पत्ते बदललेले असतात. नव्या जागी त्यांचा थांगपत्ता शोधता येत नाही. संबंधित कारखाने बंद असतात व जागा बदललेल्या असतात. त्यामुळे समन्स बजावता येत नाही.<br><br>४) अमंलबजावणीचे विनंती अर्ज दाखल केले तर त्यातील वॉरंट बजावता येत नाही कारण संबंधित कारखाना बंद करुन त्या संचालकाने पत्ता बदलेला असतो. नवा पत्ता सापडत नाही. व त्यांचा ठावठिकाणा शोधता येत नाही. वॉरंटच्या अंमलबजावणीसाठी मालमत्तेचा तपशील सापडत नाही.<br><br>५) उच्च न्यायालयातही प्रलबिंत खटल्याचा अनुशेष असल्याने दाखल केलेली विनंती अर्ज प्रलंबित स्थितीत राहतात.<br><br>६) उच्च न्यायालये प्रकरणे दाखल करुन घेतात. त्यावर तहकूबी आल्याने ती उठल्या वर बऱ्याच काळाने ते सुनावणीसाठी यादीवर घेतले जाते. या प्रकरणी निकालात काढणे हे मा. उच्च न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात असते. आम्हांस दिलेल्या माहितीनुसार कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या वतीने नेमलेले अभियोक्ते यांचे शुल्क मंजूर केलेल्या परिपत्रकानुसार दिले जाते. आम्हास दिलेल्या माहितीनुसार परदेशातील न्यायालयात कंपनीचे कोणतेही प्रकरण प्रलंबित नाही. |

| | उपनिर्देश | लेखा परिक्षकांचे अभिप्राय |
|---|---|---|
| १. | सर्व ग्राहकांसाठी बिघाड मुक्त (Temper proof) मिटर्स स्थापित केले किंवा कसे? तसे नसल्यास देयकांची अचूकता खात्रीने कशी तपासली जाते. | आम्हास दिलेली माहिती प्रमाणे बहुतांश मिटर्स स्थापित केले आहेत. मात्र बिना मीटरच्या शेतकरी ग्राहकांना कंपनी सेवा देत आहे. |
| २. | राज्य विदयुत नियामक आयोगांने (MERC) मंजूर केलेले इंधन व वीज खरेदी समयोजन कंपनी वसूल करुन त्याचे लेखे करते किंवा किंवा कसे ? | होय, कंपनी मासिक इंधन समायोजना खर्चाचा हिशेब करते व तो ग्राहकांवर देयकांमधून आकारते, 'ग्राहकांकडील महसूल' म्हणून त्यांचा लेखा केला जातो. मासिक एफपीपीसीए चा हिशेब म.वि.नि आयोगाकडे (MERC) फेरतपासणी व कार्योत्तर मंजूरीसाठी पाठविला जातो. |
| ३. | कंपनी फ्रॅचायजी (उपवितरक संस्था) यांना वीज पुरवते का ? जर तसे असेल तर कंपनी उपवितरकांना खरेदीच्या सरासरी किमतीपेक्षा कमी दराने वीज पुरवित नाही किंवा कसे ? | होय, कंपनी फ्रॅचायजींना वीज पुरविते. आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार कंपनी फ्रॅचायजींना सरासरी खरेदी किंमतीच्या कमी दराने वीज पुरवित नाही. |
| ४. | 'टॅरिफ रोल बॅक' अर्थसाहय करण्यास परवानगी किती प्रमाणात दिली ? त्याची प्रतिपूर्ती राज्यशासनाकडून नियमितपणे होते का ? त्यात काही तूट असल्यास त्याचा अभिप्राय काय आहे ? | आम्हास दिलेल्या माहितीनुसार काही श्रेणीतील ग्राहकांना विकत दिलेल्या विजेबाबत महाराष्ट्र शासन दरात सवलत देते. वर्षभरात कंपनीने ग्राहकांना सवलतीने केलेल्या वीज पुरवठयासाठी खालीलप्रमाणे अर्थसाहय मान्य केले. |

| सवलतीचा प्रकार | रक्कम रु. कोटीत |
|---|---|
| कृषीग्राहकांना नियमीत सवलती | ३६३०.६२ |
| वीजमाग ग्राहकांना नियमीत सवलती | १,२४०.७६ |
| आर सी आय् ग्राहकांना २० टक्के सवलत | ६,००७.७१ |
| दुष्काळ ग्रस्त कृषी ग्राहकांना सवलती | २९८.१० |
| गारपीट ग्रस्त कृषी ग्राहकांना सवलती | १०३.९५ |
| **एकूण** | **११,२८१.१४** |

महाराष्ट्र शासन सवलतीच्या रकमेची प्रतिपूर्ती समायोजन/बँक ड्राफ्ट याद्वारे नियमितपणे करते.

| | उपनिर्देश | लेखा परिक्षकांचे अभिप्राय |
|---|---|---|
| ५. | वीजनिर्मिती, वितरण व पारेषण कंपन्यांचे आपसातील देणी व श्रेणी यांचा मेळ करणे पूर्ण झाले किंवा कसे ? फरकांच्या कारणांचे परिक्षण करावे. | वीजनिर्मिती व पारेषण कंपन्याच्या येणी व देणी यांच्या शिलकीची लेखा नोंद पुस्तकासोबतच्या दि. ३१ मार्च २०१५ रोजी पर्यत योग्य प्रकारे मेळ करण्याचे काम पूर्ण झाले. फक्त महापोरषणच्या पारेषण आकारा व्यतिरिक्त इतर शिलकी रकमेचा मेळ करण्याचा अपवाद आहे. मेळ करण्याच्या बाबींमध्ये विलंब भरणा आकार (DPC) चा लेखा सूत्रधारी कंपनीसोबत खर्चाची वाटणी, जुने कर्मचारी व सहित्याचे व्यवहार यांचा समावेश आहे. |

## भारताचे लेखा नियंत्रक आणि महालेखापरिक्षक यांनी कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १४३ (६) (ब)यानुसार महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित मुंबई या कंपनीच्या दि. ३१ मार्च २०१५ रोजी संपलेल्या वर्षाच्या वित्तीय विवरण पत्रावर दिलेले अभिप्राय :

कंपनी अधिनियम २०१३ यामध्ये विहित केलेल्या वित्तीय अहवाल सादर करण्याबाबतच्या आकृतीबंधानुसार **महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई या कंपनीच्या दि. ३१ मार्च २०१५ रोजी** संपलेल्या वर्षाची वित्तीय विवरणपत्रे तयार करणे ही सदर कंपनीच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. या अधिनियमांच्या कलम १३९ (५) नुसार भारताचे लेखा नियंत्रक व महालेखा परिक्षक यांनी नियुक्त केलेले सांविधिक लेखा परिक्षक यांचेवर या अधिनियमाच्या कलम १४३ नुसार हे सदर अधीनियमाच्या कलम १४३ (१०) यामध्ये विहित केलेल्या लेखा परिक्षणांच्या मानकांनुसार, या वित्तीय वितरण पत्राचे स्वंतत्र लेखा परिक्षण करुन त्यावर अभिप्राय व्यक्त करण्यांची जवाबदारी आहे. **त्यांना हे कार्य पूर्ण केले असलेल्याचा लेखापरिक्षण अहवाल दि. १९ डिसेंबर २०१५ या मध्ये नमूद केलेले आहे.**

मी, भारताचे लेखा नियंत्रक व महालेखा परिक्षक यांच्या वतीने, सदर अधिनियमाच्या कलम १४३ (६) (ए) यानुसार महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मुंबई या कंपनीच्या दि. ३१ मार्च २०१५ रोजी संपलेल्या वर्षाच्या वित्तिय विवरणपत्राचे पूरक लेखा परिक्षणाचे संचालन केले. हे पुरक लेखापरिक्षण स्वतंत्रपणे करण्यात आले. त्यासाठी सांविधिक लेखापरिक्षकांच्या कामकाजाची कागदपत्रे मिळविलेली नाहीत. सदर सांविधिक लेखापरिक्षकांकडे आणि कंपनीचे कर्मचारी वृंद यांकडे प्राथमिक विचारणा करणे आणि लेख्यांचे निवडक अभिलेखांचे परिक्षण करणे या मर्यादेत हे पूरक लेखापरिक्षण करण्यात आलेले आहे. माझ्या, या पूरक लेखा परिक्षणाच्या आधारे, मला सदर अधिनियमाच्या कलम १४३ (६) (बी) अंतगर्त, माझ्या लक्षात आलेल्या महत्वाच्या बाबी खालीलप्रमाणे असून त्यावर मी ठळकपणे लक्ष वेधीत आहे. कारण सदर वित्तिय विवरणपत्रे व त्यांचे संबंधित लेखा परिक्षण अहवाल अधिक चांगल्या प्रकारे समजण्यासाठी ते आवश्यक आहे, असे माझे मत आहे.

### नफ्यासंबंधी अभिप्राय

### नफा व तोटा विवरण पत्र

### प्रवर्तनापासून महसूल (टिप क्र. २१) रुपये ५५५३४.७३ कोटी

१. म.वि.नि. आयोगाने प्रकरण क्र. १२१ वर्ष २०१४ यासाठी दिनांक २६.०६.२०१५ रोजी दिलेल्या वित्तीय वर्ष २०१३-१४ च्या समायोजनाच्या आदेशात रु. १९८१ कोटीचे ''आधिक्य'' मान्य केले. हे आधिक्य अद्याप ग्राहकांकडे वितरीत केलेले नसल्याने आणि हा आदेश लेख्यांच्या अंतिमीकरण्यापूर्वी मिळाला असल्याने, ते अधिक्य प्रवर्तनातील महसूलातून वजा करुन दर्शविणे आवश्यक होते. यामुळे प्रवर्तनातील महसूल आणि चालू दायित्वे व्यापारी येणे यांच्यामध्ये रुपये १९८१ कोटीचे जादा विवरण झाले आहे.

या कपंनीने मागील वर्ष २०१३-१४ मध्ये म.वि.नि. आयोगाच्या आदेशाप्रमाणे ''येणी'' महसूली तूट यास ''उत्पन्न'' म्हणून दाखविले होते. म्हणून तेच लेखाधोरण चालू वर्षी सुद्धा सातत्याने अनुसरावयास हवे होते.

२. यामध्ये चालु वर्षी नोव्हेंबर २०११ ते डिसेंबर २०११ या काळासाठी (जळगांव मंडल) हंमागी दर घटकाचे समायोजन याकरिता रु.३.६७ कोटी समाविष्ट केले आहेत. ही रक्कम 'पूर्व कालिन' उत्पन्न म्हणून लेख्यात मांडावयास हवी होती. यामुळे त्या वर्षातील महसूल आणि पूर्वकालिन उत्पन्न यामध्ये रु.३.६७ कोटीचे जादा विवरण झालेले आहे.

३. कंपनीची महत्त्वाची लेखाधोरणे- २ महसूली मान्यता (अ) वीज विक्री (उपपरिच्छेद ४/४) यात नमूद केले आहे की, जेव्हा ग्राहक किंवा बाहेरच्या व्यक्ती यांच्याकडून विजेच्या चोरीबद्दल च्या मूल्यकंनाची आकारलेली देयके कंपनीचे सक्षम प्राधिकारी यांचेकडून मान्य केली जातात, तेव्हा लगेच त्यांस पूर्णपणे मान्यता दिली जाते. विद्युत अधिनियम २००३ यामधील (विजेचा अनधिकृत वापर) यासंबंधीचे कलम १२६ नुसार 'मूल्याकंनापासूनच्या' महसूलास मान्यता देणे या विषयी कंपनीचे धोरण नि:शब्द आहे. म्हणून कंपनीचे लेखा धोरणाची व्याप्ती त्या मर्यादेत पुरेशी नाही.

या बाबतच्या तीन प्रकरणात (वाशी मंडल) कलम १२६ अंतर्गत मूल्यांकन केलेल्या रु. २.७९ कोटी महसूलला कंपनीने मान्यता दिली नाही. म्हणून प्रवर्तनापासूनचा महसूल व व्यापारी येणी यामध्ये रु. २.७९ कोटीचे कमी विवरण झाले आहे.

## खर्च

### वीज खरेदी (टिप क्र. २३) रु. ४९०८८.३५ कोटी

४) वरील बाबीमध्ये कंपनीने कॉर्पस फंड म्हणून जमा केलेल्या रु. ७३.१० कोटीचा समोवश आहे. (वर्ष २०१४-२०१५ मध्ये रुपये ६६.३० कोटी आणि वर्ष २०१५-१६ मध्ये रुपये ६.८० कोटी) ही रक्कम महाराष्ट्र राज्य वीज समिती यांचेकडे त्यांनी साप्ताहिक देयकांच्या थकीत रक्कमेच्या पूर्तीसाठी केलेल्या मागणीनुसार जमा करण्यात आली.

महावितरणाला पूर्वीच साप्ताहिक राज्यांतर्गत देयके मिळाली होती. त्यात महावितरणचा राज्य यु.आय बिलांमधील वाटा समाविष्ट होता. तसेच त्यांचा वेगळा चुकता केला होता. म्हणून कॉर्पस फंड मधील निधी हा ''ठेव'' मानावयास हवा होता. तसे करण्याचे राहिल्याने वीजेचे रु. ७३.१० कोटीने जादा विवरण झाले आहे. तसेच चालू रु. ६६.३० कोटीने कमी विवरण तर चालू दायित्वाचे रु. ६.८० कोटीने ज्यादा विवरण झाले आहे.

५) कंपनीने 'राज्यांतर्गत ऊर्जा संतूलन व समझोता लेखा' या विषयावरचे तिचे लेखाधोरण नमूद केलेली नाही येथे सूचना करण्यात येते की, कॉर्पस फडांत भरलेल्या पैशा ''ठेव'' समजण्यात यावे आणि प्रत्यक्ष देयकांचा चुकता करण्यासाठी प्रत्यक्ष मिळालेले पैसेच फक्त नफा व तोटा पत्रकातून वजा करावेत.

६) वरील बाबीमध्ये म.वि.नि. आयोगाने (ऑगस्ट २०१४) मध्ये कारखान्याचे वीज निर्मिती संच या विषयी घोषित केलेली संस्था मे. साई वर्धा पॉवर लि. हैद्राबाद (वीजनिर्मिती संच) यांना वित्तीय वर्ष २०१३-१४ साठी मे २०१५ मध्ये क्रॉस सबसिडीच्या आधिभाराचे रु. ४.४२ कोटी या रक्कमेचा समावेश नाही. यामुळे वीज आणि चालू दायित्वे यांचे रु. ४.४२ कोटीने कमी विवरण झालेले आहे.

**कर्मचारी (टिप क्र. २४) रु. ४५५.४७ कोटी**

**बाहयस्त्रोत कर्मचाऱ्यांवरील खर्च रु. १६२.८९ कोटी**

७) वरील बाबीमध्ये बाहय स्त्रोतातील कर्मचाऱ्यांना वर्ष २०१४-१५ वेतनासाठी दिलेल्या रु. १७.३१ लाख या रक्कमेचा समावेश नाही. कर्मचा-यांना या खर्चाची माहिती लेख्यांच्या अंतिमीकरण्यापुर्वी असल्याने या रु.१७.३१ लाखाच्या दायित्वाचा समावेश लेख्यांमध्ये करावयास हवा होता. ही तरतूद केली नसल्याने चालू वर्षाचे खर्च व चालू दायित्वे यांचे रु. १७.३१ लाखाने कमी विवरण झालेले आहे.

**वैद्यकिय खर्च रु. १३.४० कोटी**

८) यामध्ये जानेवारी ते मार्च २०१५ या काळासाठीच्या मेडिकलेम पॉलिसीच्या प्रिमियमच्या प्रमाणात असलेल्या रु. १.६९ कोटीचा समोवश नाही. कंपनीला लेख्यांचे अंतिम करण्यापूर्वी या खर्चाची माहिती होती. म्हणून लेख्यांमध्ये या दायित्वांची तरतूद करावयास हवी होती. अशी तरतूद केली नसल्याने चालू वर्षाचे खर्च व चालू दायित्वे यांचे रु. १.६९ कोटीने कमी विवरण झाले आहे.

**दुरुस्ती व देखभाल (टिप क्र. २५) रु. ९०३.३९ कोटी**

**संयत्रे व यंत्र सामग्री, तारा, केबल नेटवर्क इ. रु. ७५२.५३ कोटी**

९) वरील खर्चात जानेवारी २०१५ ते मार्च २०१५ या कालावधीतील वार्षिक देखभालीच्या कंत्राटाचे रु. १.४१ कोटी या रक्कमेचा समावेश नाही. कंपनीला लेख्यांचे अंतिम करण्यापूर्वी या खर्चाची माहिती होती. त्यामुळे या दायित्वाची तरतूद करावयास हवी होती. ती केला नसल्याने चालू वर्षीचे खर्च व चालू दायित्वें यांचे रु. १.४१ कोटीने कमी विवरण झाले आहे.

**प्रशासकीय व सर्व सामान्य खर्च टिप क्र. २६ रु. ७०२.७७ कोटी**

**ग्राहकांकडून जमा केल्याबद्दलची दलाली रु. ७५.३७ कोटी**

१०) वरील खर्चात वाशी, औरंगाबाद (ग्रामीण) व जळगांव मंडळातील ग्राहकांकडून देयके जमा करणाऱ्या संस्थांना वर्ष २०१४-१५ यासाठी त्यांनी मागीतलेल्या पण वर्ष २०१४-१५ मध्ये लेखाकिंत न केलेल्या रु. ०.६३ कोटी समाविष्ट आहेत. यामुळे प्रशासकीय व सामान्य खर्चाचे व चालू दायित्वाचे रु. ०.६३ कोटीने कमी विवरण झाले आहे.

**कायदेविषयक आकार रु. ८.९७ कोटी**

११) वरील खर्चामध्ये वर्ष २०१४-१५ साठीचे जे कायदेविषयक शूल्क रु. ५८.०६ लाख वर्ष २०१५-१६ मध्ये देण्यात आले त्याचा समावेश नाही. कंपनीला लेख्यांच्या अंतिमी करणापूर्वी या खर्चाची माहिती होती. तरीही या दायित्वाची

तरतूद केली नाही यामुळे प्रशाकिय सामान्य खर्च आणि चालू दायित्वे यांचे रु. ५८.०६ लाखाने कमी विवरण झाले आहे.

**संगणक देयके व इ.डी.पी. आकारावर खर्च रु. ८५.९१ कोटी**

१२) वरील खर्चात जुलै २०१३ ते मार्च २०१४ या काळातील संगणकांची देयके व इ.डी.पी. आकार यांचे रु. ०.८७ कोटीचा समोवश नाही. हा खर्च पूर्वकालीन असल्याने त्याचे तसे वर्गीकरण करावयास पहिजे होते. यामुळे प्रशासकिय व सामान्य खर्च व पूर्व कालिन उत्पन्न (निव्वळ) यांचे त्या प्रमाणात जादा विवरण झाले आहे.

**इतर व्यावसायिक आकार रु. ३.८९ कोटी**

१३) वरील आकारामध्ये वर्ष २०१४-१५ च्या कालावधीसाठी व्यावसायकि आकाराची रक्कम ०.३५ कोटी जी वर्ष २०१५-१६ मध्ये दिली, तिचा समावेश नाही. या खर्चाची कंपनीला लेख्यांच्या अंतिमीकरणापूर्वी माहिती होती. त्यामुळे त्या दायित्वासाठी लेख्यांमध्ये तरतूद करावयास हवी होती यामुळे प्रशासकीय व सर्वसाधारण खर्च आणि चालू दायित्वे यांचे रु. ०.३५ कोटीने कमी विवरण झाले आहे.

**वित्तीय स्थितीवर अभिप्राय**

**ताळेबंद**

**मत्ता**

**चालू नसलेल्या मत्ता रु.३५७३१.३० कोटी**

**स्थिर मत्ता- रु. ३०३५९.८७ कोटी**

**प्रगती पथावरील भांडवली कामे (टिप क्र. ३०.७) रु. १२८१.९० कोटी**

१४ ) उपरोक्त बाबीत मार्च २०११ ते मार्च २०१५ या काळात पूर्ण बंद केलेल्या कामांच्या रु.३४.०६ कोटीचा समावेश आहे. त्याचे भांडवलीकरण केले नसल्याने घसारा आकारण्यात आला नाही. यामुळे प्रगती पथावरील कामे यांचे रु. ३४.०६ कोटीने जादा विवरण झाले आणि स्थिर मत्तांचे तेवढ्याच रक्कमेने कमी विवरण झाले. तसेच त्यामुळे घसाऱ्याचे कमी विवरण होऊन त्याचे सांख्यिकी करण करता आले नव्हते.

१५) उपरोक्त बाबीत तीन मंडळामधील (औरगांबाद - ग्रामीण, जळगांव व वाशी) भांडवली कामांची चालू लेख्यांची देयकांची रक्कम रु. २४.५६ कोटी समाविष्ट नाही. ती या मंडळाना मिळाली आहेत. यासाठी चालू दायित्वांची तरतूद करण्यात आली व तिचा लेखा प्रगतीपथावरील भांडवलीकामे यामध्ये करण्यात आला, तरतूद केली नसल्याने चालू दायित्वे व प्रगतीपथावरील भांडवली कामे यांचे रु. २४.५६ कोटीने कमी विवरण झाले.

**चालू मत्ता :**

**ब) व्यापारी येणी (टिप क्र.१७) रु. १५६१४.९३ कोटी**

१६) वरील बाबीमध्ये पूर्वीच्या मराविमंच्या ऐवजी कंपनीची स्थापना केल्यापासूनच्या रु.९.८६ कोटीची रक्कम समाविष्ट आहे. यासाठी तरतूद करावयास हवी होती. या रकमेचे तपशील कंपनीकडे नाहीत. यामुळे चालू मत्ताचे रु. ९.८६ कोटीने जादा विवरण तर इतर खर्चाचे तेवढ्याच रकमेने कमी विवरण झाले आहे.

**समभाग व दायित्वे**

**(३) चालू नसलेली दायित्वे रु. २२१९२.०३ कोटी**

**(सी) इतर दीर्घ मुदतीचा दायित्वे (टिप क्र. ----) रु. २४३२.२६ कोटी**

१७) वरील बाबीमध्ये पुरवठा देयक विभागातील वर्ष २००५-०६ ते २००९ ते १० या काळातील पुरवठादार व कंत्राटदार यांचेकडील ठेवी व त्यांच्या ठेवून घेतलेला पैसा यांची रु. १६.९५ कोटी समाविष्ट आहेत. याबाबत बराच काळ लोटला आहे आणि या रक्कमांचा दावे केले जाण्याची शक्यता कमी असल्याने त्याची व्यक्तीश: प्रमाणात आवश्यक पडताळणी आणि समायोजन केल्यानंतर ती रक्कम त्या वर्षाच्या उत्पन्नात जमा करावयास हवी होती.

१८) पुरवठा देयके विभागातील लेजर नुसार वर्ष २०१०-११ ते २०१३-१४ या काळात पुरवठादार व कंत्राटदार लेख्यांच्या ठेवी व ठेवून घेतलेल्या रकमां यांच्या शिल्लकी संबंधात रु. ६.५१ कोटी ही रक्कम मेळ केली नसल्याने जमा शिल्लक याऐवजी खर्ची शिल्लक अशी दर्शविली आहे.

**प्रकटनावर अभिप्राय**

**१) लेख्यांवर टिप**

**टिप क्र. ३० लेख्यांवर अतिरिक्त टिप**

**१) आकस्मिक दायित्वे व बांधिलकी**

**ब) कंपनीवरील दावे आणि मान्य न केलेले कर्ज- रु. ७९५३.२६ कोटी**

१९) वरील बांबीमध्ये महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीला ''देय'' असलेला विलंब भरणा आकार रु. ११२५.९२ कोटी समाविष्ट आहे परंतू त्यांच्या लेखा/ तरतूद कंपनीने केलेली नाही. मात्र महानिर्मिती व महावितरण कंपनी यांच्यात केलेल्या मेळानंतर महानिर्मितीला देय असणा-या विलंब भरणा आकाराची रक्कम. दिनांक ३१ मार्च २०१५ रोजी रुपये १७७५.८५ कोटी होती. यामुळे आकस्मिक दायित्वाचे रु. ६४९.९२ कोटीने कमी विवरण झाले.

**स्वतंत्र लेखापरिक्षकांचा अहवाल**

**''आक्षेपित मतांचा आधार'' हा परिच्छेद**

**परिशिष्ट-अ १२ वीज खरेदी**

२०) कंपनीने खाजगी संस्थासोबतच्या वीज खरेदी करार/ कंत्राट याबाबतचे पैसे भरण्यास विलंब केला व त्याबाबत वाद / मेळ करण्याचे प्रश्न होते. हा फरक आकस्मिक दायित्वात दर्शविण्यात येतो.

त्यापैकी एका विक्रेत्याच्या बाबत आकस्मिक दायित्व चुकीने रु. १८.३२ कोटीने जास्त दर्शविले गेले. त्यावर सांविधिक लेखापालांनी अभिप्राय दिली नाही.

**भारताचे लेखानियंत्रक आणि महालेखापरिक्षक**
**यांच्यावतीने व त्यांच्या करिता**
**सही/-**
**(श्रीमती संगीता चौरे)**
**मुख्य महालेखापाल**
**(लेखापरिक्षण III)**

**स्थळ : मुंबई**
**दिनांक : ०१ मार्च २०१६**

| अ. क्र | लेखानियंत्रक व लेखापरिक्षकांचा अभिप्राय | व्यवस्थापनाचे उत्तर |
|---|---|---|
| | **नफ्या संबंधी अभिप्राय**<br>**नफा व तोटा पत्रक**<br>**प्रवर्तनाचा महसूल (टिप क्र. २१)**<br>**रुपये ५५५३४.७३ कोटी** | |
| १. | म.वि.नि. आयोगाने प्रकरण क्र. १२१ वर्ष २०१४ यासाठी दिनांक २६.०६.२०१५ रोजी दिलेल्या वित्तीय वर्ष २०१३-१४ च्या समायोजनाच्या आदेशात रु. १९८१.०० कोटींचे ''आधिक्य'' मान्य केले हे आधिक्य अद्याप ग्राहकांकडे वितरीत केलेले नसल्याने आणि हा आदेश लेख्यांच्या अंतिमीकरणापूर्वी मिळाला असल्याने, ते अधिक्य प्रवर्तनातील महसूलातून वजा करुन दर्शविणे आवश्यक होते. यामुळे प्रवर्तनातील महसूल आणि चालू दायित्वे व्यापारी येणे यांच्यामध्ये रुपये १९८१ कोटीचे जादा विवरण झाले आहे.<br><br>या कपंनीने मागील वर्ष २०१३-१४ मध्ये म. वि. नि. आयोगाच्या आदेशाप्रमाणे ''येणी'' महसूली तूट यास ''उत्पन्न'' म्हणून दाखविले होते. म्हणून तेच लेखाधोरण चालू वर्षी सुद्धा सातत्याने अनुसरावयास हवे होते. | कंपनीने उपार्जित लेखातत्वाचा अंगिकार केला आहे. आणि कंपनीने संबंधित वर्षानुसार नियामक मत्ता/दायित्वे निर्माण /केल्या आहेत त्यानुसार वित्तीय वर्ष २०१३-१४ मध्ये कंपनीने अंदाजे रु. ३९५.७९ कोटीचा फरकांची आणि वि. वर्ष २०१४-१५ साठी तेव्हढयाच फरकांच्या अंदाज केला होता व रु.२२४.०० कोटीची तरतूद केली होती.<br><br>कंपनीने अनुसरलेल्या नेहमीच्या कार्यपद्धतीनुसार वि.वर्ष २०१३-१४ मध्ये नियामक मत्तांसाठी रु ३९५.७९ कोटीची केलेली तरतूद वि. वर्ष २०१४-१५ मध्ये उलट फिरविण्यात आली. मा.म.वि.नि. आयोग यांनी वित्तीय वर्ष २०१३-१४ साठी दिलेला समायोजनांचा आदेश २०१५-१६ मध्ये मिळाला. अशा प्रकारे ''लेखा मानक -४'' ''ताळेबंदाच्या तारखेनंतर उदभवणारी आकस्मिकता व प्रसंग'' यांस अनुसरुन वर्ष २०१४-१५ मध्ये कोणत्याही प्रसंगाचे अस्तित्व नव्हते. म्हणून रु. १९८१.०० कोटीचा आदेशाचा परिणाम लेख्यांमध्ये केला नाही. |

| अ. क्र | लेखानियंत्रक व लेखापरिक्षकांचा अभिप्राय | व्यवस्थापनाचे उत्तर |
|---|---|---|
| २. | यामध्ये चालु वर्षी नोव्हेंबर २०११ ते डिसेंबर २०११ या काळासाठी (जळगांव मंडळ) हंमागी दर घटकाचे समायोजन याकरिता रु. ३.६७ कोटी समाविष्ट केले आहेत. ही रक्कम पूर्व कालिन उत्पन्न म्हणून लेख्यात मांडावयास हवी होती. यामुळे त्या वर्षातील महसूल आणि पूर्वकालिन उत्पन्न यामध्ये रु. ३.६७ कोटीचे जादा विवरण झालेले आहे. | रु. ३.६७ कोटी ही रक्कम वि. वर्ष २०११-१२ यातील हंगामी दर घटकांची (टीटीसी) समायोजनाची आहे. अशा प्रकारे वसुली केल्यानंतर सदर (टीटीसी) रक्कम मागील वर्षाच्या उत्पन्नात लेखांकित करण्याऐवजी नजर चुकीने चालू वर्षाच्या उत्पन्नात धरण्यात आली. याबाबत भविष्यासाठी नोंद घेण्यात आली आहे. |
| ३. | कंपनीची महत्त्वाची लेखाधोरणे- २ महसूली मान्यता (अ) वीज विक्री (उपपरिच्छेद ४/४) यात नमूद केले आहे की, जेव्हा ग्राहक किंवा बाहेरच्या व्यक्ती यांच्याकडून विजेच्या चोरीबद्दलच्या मूल्याकंनाची आकारलेली देयके कंपनीचे सक्षम प्राधिकारी यांचेकडून मान्य केली जातात, तेव्हा लगेच त्यांस पूर्णपणे मान्यता दिली जाते. विद्युत अधिनियम २००३ यामधील ( विजेचा अनधिकृत वापर )यासंबंधीचे कलम १२६ नुसार मूल्यांकना पासूनचा महसूलास मान्यता देणे या विषयी कंपनीचे धोरण नि:शब्द आहे. म्हणून कंपनीचे लेखा धोरणाची व्याप्ती त्या मर्यादित पुरेशी नाही.<br><br>या बाबतच्या तीन प्रकरणात (वाशी मंडळ) कलम १२६ अंतर्गत मूल्यांकन केलेल्या रु. २.७९ कोटी महसुलाला कंपनीने मान्यता दिली नाही. म्हणून प्रवर्तनापासूनचा महसूल व व्यापारी येणी यामध्ये रु. २.७९ कोटीचे कमी विवरण झाले आहे. | लेखा धोरणात बदल करण्यासाठी केलेल्या शिफारसीची आम्ही नोंद घेतली आहे व भविष्यात तशी काळजी घेण्यात आली.<br><br>मात्र सूज्ञतेची संकल्पना स्विकारल्यानंतर आणि लेखा मानकांनुसार वादगस्त व आकस्मित उत्पन्न यांचा लेखा करण्यात येत नाही. जेव्हा ज्या वसुलीची योग्य शाश्वती असते तेव्हाच त्या उत्पन्नाचा लेखा केला जातो. या दिलेल्या प्रकरणातील रक्कम वादग्रस्त आहे. म्हणून त्यास उत्पन्न मानलेले नाही. |
| ४) | **खर्च**<br>**वीज खरेदी (टिप क्र. २३) रु. ४९०८८.३५ कोटी**<br>वरील बाबीमध्ये कंपनीने कॉर्पस फंड म्हणून जमा केलेल्या रु. ७३.१० कोटीचा समोवश आहे. (वर्ष | लेखापरिक्षणातील निरिक्षणांची नोंद घेतली आहे. वि. वर्ष २०१५-१६ मध्ये तशी दुरुस्ती करण्यात येईल. |

| अ. क्र | लेखानियंत्रक व लेखापरिक्षकांचा अभिप्राय | व्यवस्थापनाचे उत्तर |
|---|---|---|
अ) कंपनीने कार्यालये व कर्मचारी याकरिता विविध कार्यालयीन व निवासी जागा भाडयाने घेतल्या आहेत. त्या कराराने नुतनीकरण किंवा रद्द करणे याचे पर्याय असतात. यावर्षी नफा व तोटा पत्रकात भाडेपट्टीचा मान्य खर्च रु. २७३०.४२ लाख (मागील वर्षी रु. २८१५ लाख) आहे. या तारखेपोवतो कंपनीचा कोणतेही प्रवर्तनीय भाडे करार रद्द करण्याजोगा नाही. भाडे रु. २७३०.४२ लाख (मागील वर्षी रु. २८१५ लाख) ही रक्कम भाडे, दर व कर यात समाविष्ट आहे.(टिपा क्र. २६ प्रशासकीय व सामान्य खर्च)

ब) कंपनीने मराविम सुत्रधारी कंपनीसोबत प्रकाशगड इमारत, धारावी येथे व्यापलेली मुख्य कार्यालये नवी दिल्ली येथे अतिथीगृह आणि मुंबईत विविध ठिकाणी निवासी गाळे यासाठी भाडे करार केलेले आहेत. त्यासाठी या वर्षात रु. १९८४ लाख (मागील वर्षी रु.१९५५ लाख) एवढी रक्कम वरील (अ) यात समाविष्ट केली आहे.

२०) **प्रतिभाग मिळकत :** (लेखा मानक -२०) :

प्रतिभाग मिळकत (मूळ व सौम्यकृत) यांचा हिशेब करण्यासाठी खालील मूळतत्वे विचारात घेण्यात आली.

| तपशील | ३१-०३-२०१५ रोजी | ३१-०३-२०१४ रोजी |
|---|---|---|
| निव्वळ नफा-आकस्मिक राखीव नंतरचा ( रु. लाखात) | (१२७८९०) | (३६३४२) |
| मूळ प्रतिभाग मिळकतीसाठी समभागांची संख्या | ५७०३३१०५०० | ५३१६९८१८०० |
| प्रतिभाग मिळकत मूळ (रु.) | (२.२४) | (०.६८) |
| सौम्यकृत प्रतिभाग मिळकतीसाठी भारांकित केलेल्या समभागांची संख्या | ६१२६८९९९४७ | ५७५०३७८५०९ |
| प्रतीभाग मिळकत (सौम्यकृत) (रु.) | (२.०९) | (०.६३) |
| प्रत्येक समभागाची दर्शनी किंमत (रु.) | १० | १० |

महाराष्ट्र शासन / मराविमं सुत्रधारी कं. लि. यांना अद्यप न दिलेल्या शेअर्सची सममूल्य सौम्यीकृत करण्यासाठी हिशेबात धरले आहे.

२१) **कर :**

**१) चालू कर :**

चालू वर्षी कोणतेही करपात्र उत्पन्न नाही. म्हणून आयकर कायदा १९६१ च्या यातील कलम ११५ (जेबी) यातील तरतूदीप्रमाणे करांचे दायित्व मिनिमम अल्टरनेट टॅक्स (MAT) रेट याप्रमाणे गणण्यात आले आणि रु. निरंक (मागील वर्ष रु. निरंक) अशी त्यासाठी तरतूद करण्यात आली.तोटा पुढे नेण्यात आल्याने आयकरासाठी तरतूद केलेली नाही.

**२) स्थगित कर :**

स्थगित करांमध्ये पुढील बाबींचा समावेश होतो.

**(रक्कम रु. लाखात)**

| अ. क्र. | तपशील | ३१-०३-२०१५ रोजी | ३१-०३-२०१४ रोजी |
|---|---|---|---|
| | **स्थगित कर दायित्व** | | |
| १. | घसाऱ्यातील फरक | ४३६७४१ | ३३०७०० |
| २. | आयकर कायद्यानुसार निर्लेखित / अमान्य केलेल्या मत्ता | | |
| | **स्थगित कर मत्ता** | | |
| १. | देय तत्वावर मान्य होणारे खर्च | १४०२७१ | १०३९८० |
| २. | आयकर काद्यानुसार निर्लेखित /अमान्य केलेल्या मत्ता | | |
| ३. | अशोषित घसारा / हानी | २८१२८३ | २०१९३९ |
| ४. | बुडीत कर्जासाठी तरतूद | १०४११ | १०८९७ |
| | **निव्वळ स्थगित कर मत्ता / (दायित्व)** | **(४२३५)** | **(१३८८५)** |

अशोषित घसारा/हानी यावरील स्थगिती कर मत्तांना भविष्यात खालील कारणामुळे एक प्रकारची निश्चितता असल्याने त्यांना कंपनीने मान्यता दिली आहे.

महावितरण कंपनी पायाभूत सुविधा तयार करण्याच्या योजनांवर मोठया प्रमाणात खर्च करीत आहे. त्यामुळे भविष्यामध्ये कंपनीची वितरण हानी भविष्यात कमी होईल. त्यामुळे महसूल वाढेल व कंपनीची प्रगती होईल.

२२) **मत्ता कमी करणे :**

लेखा मानक २८ 'मत्ता कमी करणे' या मानकांनुसार व्यवस्थापनाने आपल्या मत्तांचा त्यांच्या आर्थिक कामगिरीच्या संबंधात आढावा घेतला. त्याच्या आधारे व्यवस्थापनाचे असे मत आहे की, कंपनीच्या मत्तांची आर्थिक कामगिरी चांगली आहे म्हणून ताळेबंदाच्या तारखेला मत्ता कमी केलेल्या नाहीत.

२३) **सुक्ष्म, लघू व मध्यम उदयोगांच्या लेख्यांच्या निश्चिती :**

सुक्ष्म, लघू व मध्यम उदयोग अधिनियम २००६ यातील आवश्यकतेनुसार प्रकटने केलेले नाहीत. कारण असे सुक्ष्म, लघू व मध्यम उदयोगांचे लेख्यांच्या आधारे निश्चितं करण्याचे कामात गुंतागुंती व अडचणी आहेत.

२४) **परकीय चलनातील कंत्राटे :**

दि. ३१ मार्च २०१५ पर्यत कंपनीच्या परकीय चलनातील कंत्राटाची कोणतीही थकबाकी नाही.

२५) **खरेदी केलेल्या व विक्रीचा तपशील :**

खरेदी केलेल्या व विक्री केलेल्या विजेचा संख्यात्मक तपशील खालीलप्रमाणे : **(MKWH मध्ये)**

| तपशील | वर्ष २०१४-१५ | वर्ष २०१३-१४ |
|---|---|---|
| एकूण वीज खरेदी | ११२५६५ | १००११५ |
| वीज जाळ्यातील व पारेषणातील हानी | २१०७ | ५४० |
| विक्रीसाठी उपलब्ध वीज | ११०४५८ | ९९५७५ |
| विकलेला वीज | ९४८०५ | ८५६३१ |
| वितरण हानी | १५६५३ | १३९४४ |
| वितरण हानीची टक्केवारी | १४.१७ | १४.०० |

वरील माहिती कंपनीने एकत्र करुन दिली आहे. ती ऊर्जा संतुलन अहवाल यावर आधारित आहे. व त्यावर लेखापरिक्षकांनी विश्वास ठेवला आहे.

२६) **लेखापरिक्षकांचे परिश्रमिक :-** (रु. लाखात)

| अ.क्र. | तपशील | वर्ष २०१४-१५ | वर्ष २०१३-१४ |
|---|---|---|---|
| १. | लेखापरिक्षकांनी - सांविधिक लेखापरिक्षणासाठी | ५१.०० | ३९.०० |
| २. | इतर सेवा आकार | ०.०० | ० |
| ३. | खर्चाची प्रतिपूर्ती | २.४३ | ५.७८ |
| ४. | लेखापरिक्षण शुल्कावर सेवा कर | ७.३९ | ४.८२ |

२७) **परकीय चलनातील खर्च:-** परकीय चलनातील प्रवास खर्च रु. निरंक आहे (मा.वर्षी रु. ६.२३ लाख)

२८) **मराविम उर्वरित कंपनीच्या शिलकी :**
मराविम उर्वरित कंपनीच्या शिलकी मराविमं सुत्रधारी कंपनीच्याकडे हस्तांतरीत करण्याची गरज आहे. कारण त्यासाठी जमेची शिल्लक मराविमं सूत्रधारी कंपनीच्या लेखा पुस्तकात पडून आहे. मराविम सूत्रधारी कंपनीचे स्वायत्त लेख्याचे यापूर्वीचे अंतिमीकरण झाले असल्याने व सांविधिक लेखापरिक्षकांनी ते प्रमाणित केले असल्याने या शिलकी पुढील वित्तीय वर्षात मराविमं सूत्रधारी कंपनीकडे हस्तांतरीत केल्या जातील.

२९) मागील वर्षातील आकडेवारीचे आवश्यक तेथे, पूनर्गटीकरण/पुर्नरचना केली आहे.

३०) टिपा क्र. १ ते ३० या दि. ३१ मार्च २०१५ रोजी संपलेल्या वर्षाच्या वार्षिक लेख्यांच्या भाग आहेत.

**अ. ना. कालेकर**
महाव्यवस्थापक (सांघिक लेखा)

**वि. रा. शिरुरकर**
मुख्य महाव्यवस्थापक (सांघिकलेखा)

**अं. म. गुडेकर**
कंपनी सचिव
सदस्य, क्र. ए.सी.एस. १९९३७

**सु. ल. पिंपळखुटे**
संचालक (वित्त)

**बिपीन श्रीमाळी**
व्यवस्थापकीय संचालक

**येथे आमच्या याच तारखेच्या जोडलेल्या अहवालानुसार**

**मित्तल ॲण्ड असोसिएट्स**
**करिता**
**सनदी लेखापाल**

**सही /-**
**(हेमंत आर बोहरा)**
भागीदार
एम नं. १६५६६७

**बी. एन. केडीया ॲण्ड कंपनी**
**करिता**
**सनदी लेखापाल**

**सही /-**
**(एस. के. केडीया)**
भागीदार
एम नं. ०५२५७९

**कलानी ॲण्ड कंपनी**
**करिता**
**सनदी लेखापाल**

**सही /-**
**(एस.पी.झंवर)**
भागीदार
एम नं. ०७४४१४

**स्थळ : मुंबई**
**दि. : १९.१२.२०१५**

**स्वतंत्र लेखापरिक्षकांचा अहवाल**

**प्रति,**

**मा. सभासद,**

**औरंगाबाद पॉवर कंपनी लिमिटेड**

**वित्तीय विवरण पत्रांवर अहवाल :** आम्ही,(भट, केळकर अँड कं.) येथे सोबत दिलेली औरंगाबाद पॉवर कंपनी लिमिटेड, या कंपनीच्या वित्तीय विवरणापत्रांचे लेखा परिक्षण केलेले आहे. या विवरणपत्रामध्ये दि. ३१ मार्च २०१५ रोजी संपलेल्या वर्षाचा ताळेबंद आणि या संपलेल्या वर्षातील कंपनीचे नफा व तोटा पत्रक आणि रोकडता प्रवाह विवरणपत्र तसेच महत्वाच्या लेखाधोरणांचा सारांश आणि इतर स्पष्टीकरणार्थ माहिती यांचा समावेश आहे.

**वित्तीय व्यवस्थापनाबाबत व्यवस्थापनाची जबाबदारी :-**

कंपनी अधिनियम २०१३ (''कायदा'') यातील कलम १३४ (५) मध्ये नमूद केलेल्या आशंयाप्रमाणे आणि या कायद्याचे कलम, १३३ ज्याचे सहवाचन कंपनी (लेखा) नियमावली २००४ यातील नियम ७ सोबत होते, त्यातील तरतुदीनुसार व भारतात सर्वसाधारणपणे स्वीकारलेल्या लेख्यांची तत्वे यांना अनुसरुन कंपनीची वित्तीय स्थिती, वित्तीय कामगिरी आणि रोकडता प्रवाह यांचे सत्य व योग्य दर्शन घडविणारी स्वायत्त वित्तीय विवरण पत्रके तयार करणे यास कंपनीचे संचालक मंडळ जबाबदार असते. तसेच या जबाबदारीमध्ये कंपनीच्या मत्तांचे रक्षण करण्यासाठी कायद्यातील तरतुदीप्रमाणे लेख्यांचे दस्तऐवजांचे योग्य प्रकारे जतन करणे आणि लबाडी व इतर अनियमितता शोधणे व त्यांना आळा घालणे, लेख्याची योग्य धोरणे आखणे व ती अमलांत आणणे, वस्तुनिष्ठा व सुज्ञ न्यायनिर्णय असे अंदाज करणे, अंतर्गत वित्तीय नियंत्रणासाठी रचना करुन ती अमलांत आणणे आणि जतन करणे, त्याद्वारे लेख्यांचे अचूक व परिपूर्ण दस्तऐवजांचे संचालन करणे, त्याद्वारे कोणतीही लबाडी किंवा कोणतेही गैर विवरणापासून मुक्त अशी सत्य व रास्त दर्शन घडविणारी वित्तीय विवरणपत्रे तयार करणे व ती सादर करणे आदि कामांचा समावेश होतो.

**लेखापरिक्षकांची जबाबदारी :-**

या कायदयाच्या कलम १४३ (१०) यात दिलेल्या लेखा परिक्षणाच्या मानकानुसार अनुसरुन आम्ही लेखा परिक्षण करावे आणि त्या आधारे या वित्तीय विवरणपत्रांवर अभिप्राय व्यक्त करावेत, ही आम्हा लेखा परिक्षकांची जबाबदारी आहे.

यासाठी आम्ही कायदयातील तरतुदी, लेख्यांची व लेखापरिक्षणाची जी मानके प्रकरणे कायदयातील तरतुदी व त्यानुसार केलेली नियमावली नुसार लेखापरिक्षणात समााविष्ट

करणे आवश्यक आहे, त्या विचारात घेतल्या आहेत. आम्ही आमचे लेखापरिक्षण कायद्याच्या कलम १४३(१०) मध्ये विहित केलेल्या लेखा परिक्षणांच्या मानकांनुसार केले आहे. या लेखामानकांनुसार आम्ही नैतिक गरजांचे अनुपालन करणे, आणि ही विवरणपत्रे कोणत्याही प्रत्यक्ष गैरविवारणपासून मुक्त आहेत किंवा कसे याचे सकारण आश्वासन मिळविणे आवश्यक आहे.

या वित्तीय विवरणपत्रातील रकमा व प्रकरणे याविषयी लेखापरिक्षणातून पुरावे मिळविणे या हेतूने लेखापरिक्षणाची कार्यपध्दती तयार करावी लागते. यासाठी निवडलेल्या कार्यपध्दती लेखापरिक्षकाच्या न्यायनिर्णयावर अवलंबून असतात. तसेच या वित्तीय विवरणपत्रातून लबाडी किंवा चुकीने काही प्रत्यक्ष गैरविवरण होण्याच्या धोक्याचे मूल्यमापन करणे याचाही समावेश असतो. या धोक्याचे मूल्यमापन करताना लेखा परिक्षक सत्य व रास्त दर्शन घडविण्यास कंपनीची अंतर्गत नियंत्रण प्रणाली विचारात घेतात. तसेच परिस्थितीस अनुरुप अशी लेखा परिक्षणाची कार्यपध्दतीची रचना करतात. मात्र कंपनीच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणाची पध्दत वित्तीय अहवालाच्या दृष्टीने पुरेशी आहे किंवा कितपत प्रभावी आहे यावर मत व्यक्त करण्याचा हेतू नसतो. लेखा परिक्षणात वापरलेल्या लेखा धोरणांच्या योग्यतेचे मूल्यांकन करणे, संचालक मंडळाने केलेल्या लेख्यांच्या अंदाजाचा कार्यकारण भाव शोधणे आणि वित्तीय विवरणपत्राच्या सादरीकरणाचे सर्वांगिण मुल्यांकन करणे याचाही समावेश असतो.

आमचा विश्वास आहे की, आम्ही मिळविलेले लेखापरिक्षण विषयक पुरावे पुरेसे व योग्य जागी लागू होणारे आहेत. आम्ही या स्वायत्त वित्तीय विवरणपत्रावर आमचे लेखापरिक्षणाद्वारे केलेले पात्र मत याला आधार देण्यासाठी पात्रतेच्या मताच्या परिच्छेदात नमूद केलेल्या मतांचा अपवाद आहे.

**मत :-**

आमच्या मते व आमचे सर्वोत्तम ज्ञान तसेच आम्हास दिलेली स्पष्टीकरणे यानुसार उपरिनिर्दिष्ट वित्तीय विवरणपत्रे कायदयास आवश्यक असणारी व ज्या पध्दतीने ती माहिती देणे आवश्यक आहे, त्यानुसार माहिती सादर करतात आणि भारतात सर्वसाधारणपणे स्वीकारलेली लेख्यांची तत्वे यांच्याशी तंतोतंत पालन करुन कंपनीचे कामाचे सत्य व योग्य स्वरुपात दर्शन घडवितात ती अशी

अ) **ताळेबंदाच्या विषयी** :- दि. ३१ मार्च २०१५ रोजी असणारी कंपनीची व्यवहारांची स्थिती

ब) **नफा व तोटा विवरणपत्राविषयी** :- या तारखेला संपलेल्या वर्षाचा नफा आणि रोकडता प्रवाह

क) **रोकडता प्रवाह विवरणपत्राविषयी :-**

**इतर कायदेशिर व नियामक आवश्यकतांवर अहवाल** :- केंद्र सरकाराने कंपनी अधिनियम २०१३ यातील कलम १४३चे उपकलम (११) यानुसार दिलेला कंपन्यांचे (लेखापरिक्षकांचे अहवाल) आदेश २०१५ (यापुढे आदेश असा उल्लेख आहे) यातील आवश्यकता यानुसार आम्ही सदर आदेशाचे परिच्छेद ३ व ४ ज्या मर्यादित लागू होतात, त्यात विनिर्देशित केलेल्या विषयावर आम्ही एक निवेदन एका जोडपत्रात दिलेले आहे.

अधिनियमांचा कलम १४३(३) च्या आवश्यकतानुसार आम्ही अहवाल देतो.

अ) आम्ही आमचे सर्वोत्तम ज्ञान व विश्वास यानुसार आमच्या लेखा परिक्षणाच्या उद्दिष्टांसाठी आवश्यक अशी सर्व माहिती शोधली व स्पष्टीकरणे मिळविली आहेत.

ब) आमच्या मते या कंपनी कायद्यानुसार आवश्यक अशी लेख्यानोंद वहया पुस्तके योग्य प्रकारे जतन केलेली आहेत असे आम्ही केलेल्या या पुस्तकांच्या परिक्षणावरुन दिसून येते (तसेच आमच्या लेखा परिक्षणाच्या हेतुसाठी आवश्यक असलेल्या ज्या लेखा नोंदीचे आम्ही भेट न दिलेल्या शाखा कार्यालयातून योग्य ते पुरेशा प्रमाणात अभिलेख आमच्याकडे पाठविण्यात आले होते.)

क) या अहवालाशी संबंधित ताळेबंद, नफा व तोटा पत्रक, रोकडता विवरणपत्रक ही कागदपत्रे या लेखा नोंद पुस्तकांशी सुसंगत आहेत.

ड) आमच्या मते, उपरिनिर्दिष्ट वित्तीय विवरणपत्रे ही संबधित कायदयाचे कलम १३३ ज्याचे सहवाचन कंपनीज (अकांउट्स) रुल्स २०१४ साली यातील नियम ०७ सोबत होते. त्यात विनिर्देशत केलेल्या लेखा मानकांचे अनुपालन करतात.

इ) वरील 'विषयावर भर' या परिच्छेदाचा उप-परिच्छेद यामध्ये कार्यरत संस्थेचे विषय असे जे वर्णन केलेले विषय यांचा कंपनीच्या कामकाजावर प्रतिकूल परिणाम होवू शकतो असे आमचे मत आहे.

फ) संचालक मंडळाने अभिलेखात नमूद केल्याप्रमाणे जे लेखी प्रतिवेदन संचालकांना मिळालेले आहे, त्या आधारे दि. ३१ मार्च २०१५ पर्यत नियुक्त केलेले कोणतेही संचालक, हे कंपनी कायदयाचे कलम १६४(२) यातील अटींनुसार नियुक्तीसाठी अपात्र नव्हते.

**कायद्याच्या कलम १४३ (५) यातील आवश्यकतेनुसार आम्ही पुढीलप्रमाणे अहवाल देतो :-**

अ) या कंपनीची निर्गुंतवणूकीसाठी निवड झालेली नाही.

ब) कंपनीमध्ये ऋणे/ कर्ज/ उसनवारी / व्याज इ. सोडून देणे/ निर्लेखित करणे याची प्रकरणे नाहीत.

क) कंपनीच्या वस्तूमाल तिस-या पक्षाकडे ठेवलेला नाही. तसेच शासन किंवा अन्य प्राधिकारी यांचेकडून कोणत्याही देणग्या मिळालेल्या नाहीत.

ड) न्यायालय/ लवाद येथे कंपनीची कोणताही प्रलंबित प्रकरणे नाहीत. म्हणून त्याविषयीचा अहवाल दिलेला नाही.

इ) होय, या कंपनीने कार्य करण्याची (प्रवर्तन/संचालन) यांची प्रमाणके निश्चित केलेली आहेत. मात्र मागील काही वर्षात त्यापासून विचलन झालेले नाही.

एफ) कंपनीची कोणतीही व्यापारी येणी, व्यापारी देणी किंवा मुदतीच्या ठेवी नाहीत. बॅक खात्यातील शिलकी व रोकड शिलकीचा खातरजमा केली आहे.

जी) कंपनीने किंमतीचे धोरण आखलेले नाही.

एच) कंपनीला केंद्र/राज्य शासन किंवा अन्य संस्थाकडून काही विविधत कार्ये करण्यासाठी कोणतेही अनुदान किंवा

**भट, केळकर ॲड कंपनी, करिता**
**सनदी लेखापाल**
फर्मचा नोंदणी क्र. १०१२८५ डब्ल्यू
सही /-
सी.ए. (सनदी लेखापाल) संदिप डी. केळकर
भागीदार
सदस्य क्र. १२३४४३

**दिनांक २२ सप्टेंबर २०१५,**

**स्थळ :- डोंबिवली**

## औरंगाबाद पॉवर कंपनी लि. संबंधि स्वतंत्र लेखापरिक्षकांचा अहवालाचे जोडपत्र

औरंगाबाद पॉवर कंपनी लिमिटेडच्या ३१ मार्च २०१५ रोजी संपलेल्या वर्षाच्या कार्यावर कंपनीच्या मा. सदस्यांना सादर केलेल्या आमच्या अहवालातील संदर्भानुसार जोडपत्र येथे दिले आहे:- आम्ही खालीलप्रमाणे अहवाल देत आहेत:-

| अनु.क्र. | तपशील | लेखापरिक्षकांचा अभिप्राय |
|---|---|---|
| १. | अ) कंपनीने संख्यात्मक तपशील व स्थिर मत्तांच्या जागा यांचा समावेश असलेले योग्य अभिलेखांचे व्यवस्थित जतन केले आहे किंवा कसे. | लागू नाही |
| | ब) व्यवस्थापनाने योग्य त्या कालंतराने स्थिर मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी केली आहे किंवा कसे अशा पडताळणीमध्ये काही विसंगती आढळल्यात का ? जर तसे असेल त्यावर लेखापुस्तकांप्रमाणे योग्य कार्यवाही केली किंवा कसे. | लागू नाही |
| २. | अ) व्यवस्थापनाने वस्तू मालाच्या सूचीनसुार मालाची प्रत्यक्ष पडताळणी योग्य त्या कालंतराने केली किंवा कसे. | लागू नाही |
| | ब) व्यवस्थापनाने वस्तूमाल सूचीच्या पडताळणीसाठी अनुसरलेल्या कार्यपध्दती कंपनीचे आकारमान व उद्योग व्यवसायाचे स्वरुप यांच्याशी योग्य प्रमाणानुसार आहेत किंवा कसे. तसेच नसल्यास अशा कार्यपध्दतीचा अपूरेपणाबद्दल अहवाल द्यावा | लागू नाही |
| | क) कंपनीने वस्तूमालाचे योग्य अभिलेखा ठेवले आहेत का ? आणि जर प्रत्यक्ष पडताळणीत काही साहित्याची विसंगती असेल तर त्यावर लेखापुस्तकां प्रमाणे योग्य कार्यवाही केली किंवा कसे. | लागू नाही |

| अनु.क्र. | तपशील | लेखापरिक्षकांचा अभिप्राय |
|---|---|---|
| ३. | कंपनी अधिनियमाच्या कलम १८९ नुसार जतन केलेल्या रजिस्टरमध्ये समाविष्ट केलेल्या कंपन्या, फर्म किंवा अन्य व्यक्ती/संस्था यांना कंपनीने कोणतीही प्रतिभूत अथवा अप्रतिभूत कर्जे मंजूर केली का ? जर तसे असल्यास | नाही |
| | अ) मुद्दलाची रक्कम आणि व्याज वेळेवर मिळतात का? आणि | लागू नाही |
| | ब) जर थकीत रक्कम रुपये एक लाख यापेक्षा जास्त असेल तर मुद्दल व व्याज वसुलीसाठी कंपनीने योग्य ती कारवाई केली काय ? | लागू नाही |
| ४. | वस्तूमाल, स्थिर मत्तांची खरेदी, माल व सेवांची विक्री या व्यवहारांसाठी कंपनीचे आकारमान व उदयोगाचे स्वरुप यांच्याशी सुसंगत अशी अंतर्गत नियंत्रण प्रणाली कंपनीमध्ये आहे का? या अंतर्गत नियंत्रण प्रणालीतील मोठ्या दुर्बल जागा दुरुस्त करण्यास सात्याने अपयश येते का? | अंतर्गत नियंत्रण प्रणाली अस्तित्वात आहे. तिच्यात कोणताही मोठा दुर्बल दोष नाही. |
| ५. | जर कंपनीने ठेवी स्वीकारल्यास, रिझर्व बँक ऑफ इंडियाने दिलेले निर्देश आणि कंपनी अधिनियमाच्या कलम ७३ ते ७६ किंवा अन्य संबधित तरतूदी व त्यानुसार केलेली नियमावली इ. लागू होत असल्यास त्याचे अनुपालन केले किंवा कसे ? केले नसल्यास उल्लंघनाचे स्वरुपाचे निवेदन करावे. तसेच कंपनी लॉ बोर्ड किंवा नॅशनल कंपनी लॉ ड्रायब्यूनल किंवा रिझर्व बॅंक ऑफ इंडिया किंवा अन्य कोणतेही न्यायालय/ लवाद मंडळ यांनी काही आदेश दिला आहे काय ? असल्यास त्याचे अनुपालन केले का नाही ? | लागू नाही |

| अनु.क्र. | तपशील | लेखापरिक्षकांचा अभिप्राय |
| --- | --- | --- |
| ६. | कंपनी अधिनियमाचे कलम १४८ यातील उपकलम (१) अंतर्गत केंद्र सरकारने विहित केलेले खर्चाचे अभिलेख जतन केले का ? अशा लेखा व त्यांचे दस्तऐवज तयार करुन ते नीट ठेवले आहेत काय ? | लागू नाही |
| ७. | अ) कंपनी सांविधिक देणी म्हणजेच भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी राज्य विमा, आयकर, विक्रीकर, संपत्ती कर, सेवाकर, सीमा शुल्क, उत्पादन शुल्क, मुल्यवर्धीत कर, उपकर आणि अन्य सांविधिक देणी योग्य त्या प्राधिका-यांकडे नियमीतपणे जमा करते काय? नसल्यास, संबधित वित्तीय वर्षाच्या अखेरच्या दिवशी , जी देणी त्यांच्या नियत तारखेपासून सहा महिन्यापेक्षा जास्त काळ थकीत असतील ती लेखापरिक्षकांनी निर्देशीन करावी. | होय |
| | ब) जर आयकर, विक्री कर किंवा संपत्ती कर किंवा सेवा कर, सीमा/उत्पादन शुल्क, व्हॅट उपकर यांची देणी वादामुळे जमा केली नसल्यास त्यातील रक्कम व ज्या मंचाकडे वाद प्रलंबित आहेत ते सांगावे (संबधित विभागाकडे केवळ प्रतिवेदन करणे म्हणजे वाद नव्हे.) | लागू नाही |
| | क) कंपनी अधिनियम १९५६ (क.१वर्ष १९५६ चा) आणि त्या अंतर्गत नियमावली यातील तरतुदीनुसार गुंतवणूक शिक्षण आणि रक्षण निधीकडे स्थानांतरीत करण्याची गरज असलेली रक्कम वेळेवर स्थानांतरीत केली किंवा कसे. | लागू नाही |
| ८ | जर कंपनीची नोंदणी पाच वर्षपेक्षा कमी नाही अशा मुदतीसाठी झाली असल्यास आणि वित्तीय वर्षाच्या अखेरीस तिचा संचित तोटा हा निव्वळ मोल यापेक्षा पन्नास टक्याहून कमी नसेल तर, आणि जर तिने असा तो चालू वित्तीय वर्षी तसेच त्यापूर्वीच्या वित्तीय वर्षी केला आहे किंवा कसे. | लागू नाही |

| अनु.क्र. | तपशील | लेखापरिक्षकांचा अभिप्राय |
|---|---|---|
| ९ | कंपनीने वित्तीय संस्था/बॅंका/डिबेंचर धारक याच्या देण्याची परतफेड करण्यास कसूर केला आहे काय ? होय असल्यास कसुरीचा कालावधी व रक्कम याची माहिती द्यावी. | लागू नाही |
| १० | कंपनीने तिच्या हितसंबंधास बाधक ठरेल अशाप्रकारे अन्य व्यक्तीला बॅंका किंवा वित्तीय संस्था यांच्याकडून घेतलेल्या कर्जास हमी दिली आहे काय. | लागू नाही |
| ११ | मुदतीच्या कर्जाचा वापर त्यांच्या हेतु साठीच झाला आहे किंवा कसे. | लागू नाही |
| १२ | अहवाल वर्षात या कंपनीवर किंवा कंपनीकडून कुठलेही लबाडी झाली आहे काय ? असल्यास त्याचे स्वरुप व त्यातील रक्कम यांचा तपशील द्यावा. | नाही |

**भट, केळकर ॲंड कंपनी, करिता**
**सनदी लेखापाल**
फर्मचा नोंदणी क्र. १०१२८५ डब्ल्यू
सही /-
सी.ए. (सनदी लेखापाल) संदिप डी. केळकर
भागीदार
सदस्य क्र. १२३४४३

**दिनांक २२ सप्टेंबर २०१५,**
**स्थळ:- डोंबिवली**

## औरंगाबाद पॉवर कंपनी लिमिटेड

### ३१ मार्च २०१५ रोजी संपलेल्या कालावधीचे लेखापरिक्षण
### कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम ६१९ (३) (अ) अंतर्गत निर्देश

| अ. क्र | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| I | **कंपनीचे प्रशासन व लेखापरिक्षण समिती** | |
| १. | कंपनीची स्टॉक एक्सचेंज यादीवर नोंद केली आहे का ? असल्यास स्टॉक एक्सचेंजेस ची नावे कृपया द्यावीत. तसेच सेबीच्या यादीवरील नोंदीच्या करारातील तरतुदीचे अनुपालन कंपनी करते किंवा कसे ? | कंपनीच्या समभागाची नोंदणी कोणत्याही स्टॉक एक्सचेजमध्ये केलेली नाही. |
| २. | से बी च्या मार्गदर्शक सूचनाप्रमाणे आवश्यक असलेले ५० टक्के स्वतंत्र संचालक कंपनीच्या मंडळामध्ये आहेत का ? | अहवाल वर्षात सेबीच्या मार्गदर्शक सूचना लागू नाहीत. |
| ३. | कंपनी अधिनियम १९५६ कलम २९२ ए यांची पूर्तता करण्याकरीता कंपनीने लेखापरिक्षण समितीची रचना केली आहे का नसल्यास त्याची कारणे द्यावीत ? | लागू नाही. |
| ४. | लेखापरिक्षण समितीने पुढील बाबीवर चर्चा केली का. १) लेखापरिक्षकांचे अहवाल दिलेल्या पात्रता आणि महत्त्वाचे अहवाल २) शासकीय लेखापरिक्षकातील महत्तवाचे परिच्छेद व ३) पुढील वर्षात लेख्यांच्या सुधारणासाठी दिलेल्या कृतीच्या शिफारशी. | लागू नाही. |

| अ. क्र | तपशील | उत्तर |
|---|---|---|
| ५. | लेखापरिक्षण समितीने कॅगच्या विविध लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेदांना दिलेली उत्तरे, संक्षिप्त आढावे, विभागीय आढावे सर्वकष परिक्षण इ. यांच्या उत्तरांचे शासन/लेखापरिक्षक/सार्वजनिक उपक्रम समिती यांना सादर करण्यापूर्वी परिक्षण केले आहे किंवा कसे ? | लागू नाही |
| ६. | लेखा परिक्षण समितीने कंपनीच्या लेख्यांची व वित्तीय नियंत्रणांची परिणामकारकता, व ते पुरेसे आहे किंवा कसे, तसेच कंपनीची वित्तीय व जोखीमांचे व्यवस्थापनाची धोरणे याचा आढावा घेऊन याविषयी व्यवस्थापनाशी चर्चा केली का ? | लागू नाही |
| ७. | संचालक मंडळाने BOD कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम २१७ (२ ए ए) अनुसार त्यांच्या जबाबदारीच्या अनुपालनाचे निवेदन भागधारकांना संचालकाच्या अहवालद्वारे कळविले का ? | होय |
| ८. | यादीच्या करारातील अटीनुसार सीइओ/सी एफ ओ यांचे प्रमाणपत्र मिळविले का ? | लागू नाही |
| **II** | **उदयोग व्यवसायातील जोखिमा** | लेखा परिक्षणाच्या कालावधीत कोणतीही वाणिज्यिक कार्ये केलेला नाहीत. |
| १. | अस्तित्वात असलेल्या या कंपनीच्या वित्तीय स्र्थैर्याला किंवा नफ्याला बाधक ठरेल अशी कोणतीही नवीन सांविधिक किंवा नियामकांची नवी गरज किंवा शासकीय धोरणात बद्दल झाला काय ?. | लागू नाही |
| २. | या उद्योग क्षेत्रातील इतर कंपन्याच्या तुलनेत काही अनैसर्गिक शीघ्र वाढ झाली आहे का? | लागू नाही |
| ३. | व्यावसायिक जोखिमा ओळखण्यासाठी व त्या कमी करण्यासाठी व्यवस्थापनाची उपाययोजना ? | लागू नाही |

| अ. क्र | तपशील | उत्तर |
|---|---|---|
| ४. | जर काही अवास्तव स्वरुपाची आक्रमक विक्री किंवा नफा वृध्दीचा कार्यक्रम असल्यास ? | लागू नाही |
| ५. | अल्प/दीर्घ मुदतीची व्यवसाय योजना आखण्याची प्रणाली व तिचा प्रत्यक्षासोबत आढावा ? | लागू नाही |
| ६. | भांडवली खर्च/ भांडवली गुंतवणूक - जी उपयोगात आणलेली नाही ? | लागू नाही |
| ७. | महत्वाचे मोठे भांडवली खर्च/विस्तार आय आर आर व पे बॅक पिरीएड सह | लागू नाही |
| ८. | व्यवसायाच्या नमून्यात मूलभूत बद्दल करु शकतील असे सूक्ष्म, विभागीय व प्रर्वतनाला धमकी देणा-या घटकांचे अस्तित्व | लागू नाही |
| **III** | **निर्गुतंवणूक (जर लागू असेल तर)** | |
| १. | निर्गुतंवणूकीची पध्दत कोणती ? (म्हणजे व्यापारी विक्री, व्यवस्थापन व कर्मचारी ताब्यात घेणे, व्यापक खाजगीकरण, जाहीर लिलाव, वित्तीय पुरवठा, परिसमापन, खाजगी नियुक्ती ) | लागू नाही |
| २. | निर्गुतंवणूकीची प्रकिया सध्या कोणत्या पायरीवर आहे? | लागू नाही |
| ३. | कंपनी निर्गुतंवणूकीसाठी निवड झाली असल्यास पुढील बाबींचा अहवाल द्यावा<br><br>अ) कंपनीने तिच्या सर्व मत्ता, दायित्वे, उत्पन्न खर्च याचा संबधित लेखा मानकांप्रमाणे लेखे नोंद केली का ? आणि पुस्तक लेखा वहया बाहय काही राहिलेले नाही ना? | लागू नाही |
| | ब) विक्रीच्या हेतुसाठी कंपनीचे निव्वळ मोल रास्त बाजारभावाने ठरविण्यासाठी, कंपनीच्या मत्ता विशेषत जमीन जी पूर्वी नाममात्र किमतीने मुल्यांकित केली होती. तिचे बाजार भावाने पून मूल्यांकन केले किंवा कसे? | लागू नाही |

| अ. क्र | तपशील | उत्तर |
|---|---|---|
| | क) मागिल काही वर्षं मध्ये निर्माण केलेली सर्वसाधारण राखीवता व बाधिलिकेची राखीवता याचे ठळकपणे वेगळे प्रकटन केले आहे का ? जर सर्वसाधारण राखीवता जास्त प्रमाणात असेल तर वापराच्या अटी स्पष्ट कराव्यात आणि या अटीचा समावेश कंपनीचे उप-नियम अस्तित्व लेख हयात आणि कंपनी अधिनियम १९५६ च्या तरतूदी मध्ये केलेले आहे किंवा कसे ? | लागू नाही |
| | ड) निर्गुतवणूकीचा प्रकिया चालू असताना कंपनीने काही गुंतवणूक केली किंवा कसे ? केली असल्यास, अशा गुंतवणूकी कंपनीच्या हितासाठी केल्या की, बोलीदाराच्या गैरवाजवी फायदावर त्याचा परिणाम व्हावा यासाठी केल्या | लागू नाही |
| **IV** | **लेखे नोंदी व वित्तीय नियंत्रणाची कार्यपध्दती** | |
| १. | व्यवस्थापनात कर्तव्ये व जबाबदार यांचे वाटप झाले आहे किंवा कसे ? यामध्ये व्यवस्थापनाच्या विविध स्तरांवर प्रदान केलेले अधिकार हे रास्त/योग्य/न्याय असणाच्या समावेश आहे आणि त्यांच्या योग्य व्याख्या केल्या का ? | कंपनीमध्ये कोणतेही कर्मचारी नाहीत, म्हणून हे कलम लागू नाही. |
| २. | लेखे व वित्तीय नियंत्रणे यांची कार्यप्रणालीचे परिक्षण करावे व त्यातील उणिवासंबंधी आपली मते देऊन त्यावर उपाय योजनाही सूचवाव्यात. | कंपनीच्या हितसंबंधात अडथळे निर्माण करतील अशा कोणत्याही उणिवा आढळल्या नाहीत. |
| ३. | याच क्षेत्रातील उदयोग व्यावसायीक/कंपन्या यांना लागू होणारी लेखे धोरणे याच्याशी कंपनीने अमलंत आणलेली जी लेखा धोरणे सुसंगत नाहीत त्याची माहिती द्यावी. विशेषत: शासकीय कंपन्यांच्या बाबत अशा धोरणांचा लेख्यांवर कोणता प्रभाव पडतो ? | आढाव्याचा वर्षात कंपनीने फक्त संचालन पूर्व कार्य चालू केलेले आहे. अन्यथा लागू होणारी कंपनी धोरणे या उदयोग क्षेत्रशी सुसंगत आहेत. |

| अ. क्र | तपशील | उत्तर |
|---|---|---|
| ४. | मागील तीन वर्षातील लेखापरिक्षकांच्या अहवालातील लेख्यांवरील नोंदी, पात्रता व अभिप्राय यांचा आढावा घ्यावा. आणि व्यवस्थापनाने सुधारणा करण्याची कृती केली किंवा कसे यावर मत नमूद करावे. | व्यवस्थापनाने आम्हास दिलेल्या स्पष्टीकरणानुसार गेल्या तीन वर्षात कॅगने लेखापरिक्षण केलेले नाही. |
| ५. | कंपनीचे सुस्पष्ट पतधोरण आहे का ? तसेच संशयास्पद कर्जे यासाठी तरतूद करणे, निर्लेखत करणे परिसमापनातील खराबी यासाठी धोरण आहे का ? कार्यपालनाच्या चाचण्या पूर्ण न करणे, वाद विक्रीतील बाकी इ. अपूर्ण असणे याच्या कारणांचे विश्लेषण करावे आणि किरकोळ ऋणको यांच्याविषयीच्या धोरणांवर अहवाल द्यावा. | कंपनीने आपले औद्योगिक कार्य अद्याप सुरु केले नसल्याने ही बाब लागू नाही. |
| ६. | विक्री प्रोत्साहनाच्या सवलतींची पध्दती योग्य आहे किंवा कसे यावर कृपया अहवाल द्यावा. या सवलती देण्याच्या सूचना बाहेरच्या विक्री केंद्रांना लेखी स्वरुपात योग्य प्रकारे कळविल्या होत्या का? | लागू नाही |
| ७. | थकीत येण्यांची वेळेवर वसुली होण्याच्या दृष्टीने लक्ष ठेवणारी यंत्रणा कंपनीमध्ये आहे किंवा कसे याचे परिक्षण करावे व निर्देशित करावे ही यंत्रणा अयशस्वी झाली असल्यास तशी लक्षणीय उदाहरणे ठळकरित्या स्पष्ट करावी. | लागू नाही |
| ८. | ऋणको /धनको व अन्य संस्था यांच्याकडून शिल्लक निश्चिताची कायम करण्यासाठी कोणती कार्यपध्दती आहे ? शासकीय विभाग/ सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, आणि खाजगी संस्था यांच्याकडील ज्या थकीत रकमा निश्चित झालेल्या नाहीत त्याची वेगवेगळी माहिती द्यावी. आणि प्रत्येक लेखाशीर्षतील एकूण रकमेची त्यांची टक्केवारी द्यावी. | आम्हास स्पष्ट केल्याप्रमाणे कंपनीने वर्षभरात चालू लेख्यांचे व्यवहार केले. दि. ३१/३/२०१५ रोजी खालीलप्रमाणे जमा शिल्लक होती.<br>महावितरण रु. १,४२,१४,१४१<br>महानिर्मिती रु. ४,७१,१७,५४४<br>**एकूण रु. ६,१३,३१,६८५** |

| अ. क्र | तपशील | उत्तर |
|---|---|---|
| ९. | कृपया कोणतीही कर्जे/ॠणे/व्याज इ. सोडून देण्याची प्रकरणे असल्यास त्याची माहिती द्यावी जर असल्यास त्याची कारणे व रकमांचा तपशील द्यावा. | लागू नाही |
| १०. | बाहेरच्या संस्थावर मागण्या/दावे वेळेवर करण्यासाठी पुरेशी कार्यपध्दती आहे काय ? अशा दाव्यांवर योग्य प्रकारे लक्ष दिले जाते का? | लागू नाही |
| ११. | मिळविलेले पत (ओव्हर ड्राफ्ट सह) यावर नियमितपणे लक्ष ठेवले जाते का? तसेच कर्जाच्या अटींचा कंपनीच्या मिळकतीवर नकारात्मक परिणाम होतो? किंवा कसे? कर्जाचा वापर प्रभावीरित्या होण्यासाठीच्या आणि सांविधिक लाभ मिळविण्यासाठीच्या कार्यप्रणाली यांचे परिक्षण करावे. | लागू नाही |
| १२. | निधीचा अयोग्य वापर किंवा तो वाया जाण्याची काही घटना/प्रसंग प्रकार आढळलेले किंवा कसे ? | नाही |
| १३. | लेखामानक १५ नुसार कर्मचारी लाभाचा तरतूद करण्यासाठी विमागणित तज्ञ यांनी गृहित धरलेल्या बाबींच्या योग्यता यांचे परिक्षण करावे व त्यावर अभिप्राय द्यावा ? | लागू नाही |
| १४. | कामाचा प्रवाह आणि कागदपत्रांचा प्रवाह तो अनुरुप आहेत किंवा कसे ? त्यासाठी योग्य नियंत्रणाची खातरजमा केली जाते का ? आणि कार्यप्रणाली कामाच्या वाटपाशी सुसंगत आहे का ? | कंपनीकडे कर्मचारी नसल्याने लागू नाही. |
| V | **लबाडी/धोके** | |
| १. | कंपनीने लबाडी संबंधी प्रभावी व रेखांकित धोरण आखले आहे काय ? ते धोरण नियमनांच्या गरजा व कंपनीच्या व्यावसायिक गरजांशी सुसंगत आहे का ? | कंपनीची अद्याप रचना झालेली नाही व ती पूर्णपणे कार्यरत नाही. |
| २. | कंपनीने वरिष्ठ व्यवस्थापनासाठी 'आचार संहिता' तयार केली आहे काय ? | आम्हास दिलेल्या माहितीनुसार कंपनीत अजून आचार संहिता नाही. |

| अ. क्र | तपशील | उत्तर |
|---|---|---|
| ३. | लबाडीची माहिती कळल्यावर कंपनीने त्यावर कशी कार्यवाही केली आणि त्याला आळा घालण्यासाठी कोणते प्रतिबंधक उपाय योजेले ? | आम्हास दिलेल्या माहितीनुसार अहवालच्या कालवधीत कोणतीही लबाडी झाल्याचे आढळले नाही. |
| ४. | अहवालाच्या काळात ज्यामुळे सखोल लेखापरिक्षणाची गरज हवी असे सूचविणारे वित्तीय अधिकाराचे उल्लंघन करणारे प्रकार घडले का ? जर असेल तर त्या प्रकरणाची यादी द्यावी | लेखापरिक्षणाच्या कालावधीत असे कोणतेही प्रकार आढळलेले नाहीत. |
| ५. | कंपनीमध्ये वेगळी दक्षता विभाग/शाखा आहे का ? ती कितपत प्रभावी आहे ? आणि त्याचे अहवाल संचालक मंडळास सादर होतात काय ? | लागू नाही |
| ६. | लबाडया व इतर अनियमितता शोधणे त्याला आळा घालणे ते कमी करणे व उघडकीस आणणे यासाठी व्यवस्थापनाने पुरेशा प्रतिबंधात्मक यंत्रणेची रचना केली आहे का ? | कंपनीची अद्याप पूर्ण रचना झालेली नाही व ती अजून कार्यरत झालेली नाही |
| ७. | कंपनीकडे जागल्याचे (व्हिसल ब्लोअंश) धोरण आहे का? | कंपनीकडे कोणतेही कर्मचारी नाहीत म्हणून लागू नाही. |
| ८. | लबाडी संबधीच्या धोरणांचा ठराविक काळाने आढावा घेतला जातो का ? आणि त्याची रचना व अंमलबजावणीचा पर्याप्त प्रभाव पडल्यासाठी मूल्यांकन केले जाते. का ? | लागू नाही |
| **VI** | **मत्ता (वस्तूमाल सूची समाविष्ट)** | |
| १. | स्थिर मत्तांचे रजिस्टर इ. अभिलेख जतन करण्याची स्थिती कशी आहे. | स्थिर मत्ता नसल्याने लागू नाही. कंपनीने फक्त संचालन पूर्व काही खर्च केले ते प्रगतीपथावरील भांडवली कामे म्हणून प्रकट केले. |
| २. | मंडळाने प्रदान केलेल्या अधिकारांनुसार संबंधित प्राधिकाऱ्यांनी कारखाना व यंत्रसामग्री यांची स्थापना व कार्यान्वयन याच्या तारखा सुस्पष्टपणे निश्चित केल्या काय ? | लागू नाही |

| अ. क्र | तपशील | उत्तर |
|---|---|---|
| ३. | मत्तांचे भांडवलीकरण नियत तारखांना केले जाते काय? आणि प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष महसुली खर्चाची आकारणी होते का ? | लागू नाही |
| ४. | भांडार मालाच्या व्यवस्थापनासाठी कंपनीने खालील बाबी विहित केल्या आहे का ? | लागू नाही |
| | अ) भांडारमाल व सुटेभाग इ.साठी कमाल आणि किमान मर्यादा- | लागू नाही |
| | ब) भांडारमालाच्या प्रापणासाठी संख्याची आर्थिक क्रमवारी/आदेश | लागू नाही |
| ५. | भांडार मालाच्या नियंत्रणासाठी केलेल्या नियमनाची पुरेशी व योग्य अमलबजावणी होते काय ? यामध्ये वर्षाच्या अखेरीस मालाची प्रगती पथावरील कामे याची तपासणी व मूल्याकने यांचा समावेश आहे. | लागू नाही |
| ६. | प्रगतीपथावरील कामे यामध्ये प्रदीर्घ अवाजवी काळ एखादी बाब ठेवलेली आहे काय अशा वस्तूमालाची यादी त्यातील रक्कम प्रलंबित कालावधी व कारणे यासह सादर करावी. | प्रगतीपथावरील भांडवली कामे-संचालन पूर्व खर्चाशी संबंधित आहेत. त्याची विभागणी टिप क्र. १३ मध्ये दिली आहे. आम्हास दिलेल्या प्रतिवेदनानुसार कंपनीचे काम अद्याप सुरु व्हायचे आहे. |
| ७. | वस्तूमाल सूचीच्या नियंत्रणासाठी ए बी सी (ABC) ॲनॅलिसिस अंगिकारले आहे का ? नसल्यास त्याचे वस्तूमाल सूचीवर होणा-या परिणामांचे विश्लेषण करावे. | लागू नाही |
| ८. | स्थिर मत्तांच्या मूल्यांकनाच्या कार्यपद्धतीचे तसेच मत्तांची सर्वेक्षण पध्दती व तरतूदी व सर्वेक्षण केलेले भांडवली सूटेभाग यांचे परिक्षण करुन त्यावर अभिप्राय द्यावेत. | लागू नाही |
| ९. | मागील ३ वर्षापासून अधिक/निरुपयोगी अचल अशा स्थितीतील माल, कच्चा माल, तयार वस्तू, यांची यादी द्यावी. | लागू नाही |

| अ. क्र | तपशील | उत्तर |
|---|---|---|
| १०. | तिसऱ्या पक्षाकडे ठेवलेल्या वस्तूमालासंबंधी आणि शासन किंवा अन्य प्राधिकरणे यांच्याकडून देणगी मिळालेल्या वस्तूंचे योग्य अभिलेख जतन केले आहेत का किंवा कसे? | लागू नाही |
| ११. | वस्तूमालाचा आदेश देणे पासून ते उपयोगात आणण्यापर्यतंच्या काळात अंतर्गत नियंत्रण पध्दतीचे काही उणीवा आहेत काय किंवा कसे ? तसे असल्यास त्यावर विशेष भर द्यावा. | लागू नाही |
| १२. | ज्या मत्ता, कारखाने, यंत्रसामग्री मधील साधने इ. प्रदीर्घ काळ (उदा.५ वर्षे) वापरात नसल्यास त्याची यादी करावी व कारणे सांगावित. | लागू नाही |
| १३. | ताळेबंदाच्या तारखेच्या निकट काळात काही मालाची गुणवत्ता कमी असल्याचे कारण दाखवून त्याची बाजारभावापेक्षा कमी दरांने विक्री करुन मोठा तोटा झाल्याची घटना घडल्या का ? | लागू नाही |
| १४. | वस्तूमालाच्या हानीबाबत काही प्रमाणके निश्चित केली आहेत का ? वस्तूमालाची हानी कोणत्या आधारे नियमित केली जाते ? लेखा परिक्षणात्मक वर्षात भांडार मालाचे असाधारण नुकसान झाल्याचे व त्याची रक्कम याची माहिती द्यावी. | लागू नाही |
| १५. | या वर्षात केलेले विलंबाचे/धक्क्याचे आकार किती आले आणि त्याची कारणे . | लागू नाही |
| १६. | कंपनीने यावर्षात स्थिर मत्ताची प्रत्यक्ष स्थितीची पडताळणी केली काय ?आणि त्याचा अहवाल तयार केला का ? | लागू नाही |
| १७. | मत्ता कमी करण्याची कार्यवाही करण्यासाठी आढावा घेण्याचे धोरण आहे का ? | लागू नाही |

| अ. क्र | तपशील | उत्तर |
| --- | --- | --- |
| VII | **गुंतवणूकी** | आढावा वर्षात कंपनीने कोणतीही गुंतवणूक केलेली नाही. |
| १. | कंपनीचे सक्षम प्राधिका-यांनी योग्य प्रकारे मंजूर केलेले गुंतवणूकीचे धोरण आखले आहे का ? असल्यास कृपया खालील बाबींचे निर्देशन करावे. | लागू नाही |
| | अ) हे कंपनी अधिनियम १९५६ च्या कलम २९२ मधील तरतुदींशी तसेच लागू होणारे इतर कायदे, नियमावली व नियमने शासनाचे निर्देश यांच्याशी सुसंगत आहे का? | लागू नाही |
| | ब) केलेल्या गुंतवणूकी न्याय व गुंतवणूकीच्या धोरणानुसार होत्या का ? | लागू नाही |
| | क) गुंतवणूकी कंपनीच्या हितासाठी केल्या काय ? | लागू नाही |
| | ड) चालू गुतंवणूकीचे बाजार मूल्यातील तूट आणि दीर्घ मुदतीच्या गुतंवणूकीच्या मूल्यातील कायमस्वरुपी घट या लेखा पुस्तकात दर्शविल्य का ? तसे केले नसल्यास त्याची कारणे द्यावीत. | लागू नाही |
| २. | बँका/वित्तीय संस्था व इतर यांचेकडील ठेवी याना लागू होणारे कायदे, नियम, नियमने व शासकीय निर्देश यांच्याशी सुसंगत आहेत का ? | लागू नाही |
| ३. | या कंपनीच्या व्यवहाराशी संबंध नसलेल्या अन्य सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम किंवा उद्योगसंस्था यांना मोठी कर्जे दिली का ? तसेच त्यांच्याकडे ठेवी ठेवल्यात काय किंवा कसे . | लागू नाही |
| ४. | ज्या उदयोगात किंवा उत्पादनात गतिमान बदल होत आहेत. अशामध्ये कंपनीने महत्त्वाच्या गुंतवणूकी केल्या आहेत काय ? | नाही |

| अ. क्र | तपशील | उत्तर |
|---|---|---|
| ५. | ज्यांचा कंपनीशी व्यवहार नाही असे सार्वजनिक क्षेत्रातील किंवा इतर उदयोग संस्था यांचेकडून मोठया प्रमाणात कर्जे कंपनीला मिळाला काय ? | कंपनीने प्रतिवेदन केल्याप्रमाणे कंपनीचे फक्त महवितरण आणि महानिर्मिती या कंपन्यासोबत चालू खात्याचे व्यवहार आहेत. त्यापैकी महावितरण ही सूत्रधारी कंपनी आहे.त्यांचेकडून कोणतीही कर्जे मिळालेली नाहीत. |
| ६. | उच्च खर्चाची कर्जे घेण्याऐवजी इतर साधने Instruments किंवा Derivatires उपलब्ध करण्यासाठी काही अभ्यास करण्यात आला का ? | नाही |
| **IX** | **कंत्राटे देणे व ते अंमलात आणेणे** | |
| १. | कंपनीने विविध कंत्राटे देण्यासाठी निविदा काढण्याची योग्य पध्दतीची आखणी केली आहे का ? | कंपनीने आम्हास दिलेल्या माहितीनुसार महानिर्मिती (MSPGCL) ही कंपनी या प्रकल्पाची सल्लागार असून तिच्या शिफारसीनुसार कंत्राटे दिली. |
| २. | कंत्राटदार/पुरवठादार यांना दिलेल्या अग्रिमांवर लक्ष ठेवणे आणि त्यांचे समायोजन करणे यासाठी कंपनीची प्रभावी यंत्रणा आहे काय ? | महानिर्मिती कंपनी ही सल्लागार संस्था, याबाबत लक्ष ठेवण्याचे कार्य करते. |
| ३. | प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर लगेच कंपनीने पुढील बाबींचा चुकता केला का? म्हणजे कार्यपालन हमी चाचण्या रोखीमध्ये नुकसानाची वसुली आणि अंतिम चुकारा इ. यामध्ये पुरेशा समर्थन न करता जादा विलंब झाला काय? | लागू नाही |
| ४. | दीर्घकाळ ज्यांचा चुकता केलेला नाही असे काही वाद/मागण्या आहेत काय? | आम्हास दिलेल्या माहितीनुसार अशी देणी थकीत नाहीत. |
| ५. | मालकीच्या वस्तू खरेदी करतांना कंपनीने कोणत्या कार्यपध्दतीचे अनुसरुन केले ? ज्या मालाची खरेदी एका विशिष्ट पुरवठादाराकडून झाली आणि त्यासाठी वस्तू मालकीचे या प्रमाणपत्र ज्या अधिका-यांने दिले त्याची विश्वासहिता निश्चित करण्यासाठी कार्यपध्दती काय आहे ? | आढावा वर्षात कोणतीही मालाची खरेदी केली नाही. |

| अ. क्र | तपशील | उत्तर |
|---|---|---|
| ६. | उपकंपन्यामध्ये गुंतवणूकी करताना त्याचे योग्य मूल्यांकन केले का ? उपकंपन्यांची वित्तीय स्थितीचे निरिक्षण केले का ? नसल्यास गुंतवणूकीच्या मूल्यामधील घटीची मर्यादा काय आहे ? | लागू नाही |
| ७. | काही अधिक्य असलेले निधी गुंतवला का? गुंतवणूकीमुळे खेळत्या भांडवलीसाठी लागणा-या निधीच्या उपलब्धतेला बाधा येऊन जादा दराने उसनवारी करावी लागली का ? | नाही |
| ८. | बाजार मूल्याचा आढावा नेहमी घेण्यात येतो का ? आणि गुंतवणूकीच्या विक्रीतून नफा मिळविला जातो का ? | लागू नाही |
| VIII | **दायित्वे व कर्जे** | |
| १. | लेख्यांच्या मुदतीच्या अखेरीस ज्या कर्जाच्या परतफेडीमध्ये कसूर झाली असेल अशा कर्जाची एकूण रक्कम (व्याज, दंडात्मक व्याज आणि वचन बध्दतेचे आकार इ. वेगळे पणे दाखवून) द्यावी. | निरंक |
| २. | कर्जाच्या करारातील अटीनुसार भारत सरकारला देय असणाऱ्या हमी शुल्काचा योग्य लेखा केलेला आहे काय ? | लागू नाही |
| ३. | शासकीय कर्जोचा काही भाग किंवा संपूर्ण कर्ज आणि / किंवा त्यावरील उपर्जित व्याज यांचे समभागात रुपांतर केले किंवा सरकारने सोडून दिले किंवा कसे ? जर तसे असल्यास, त्याचा कंपनीच्या वित्तीय स्थितीवरील परिणाम. | लागू नाही |
| ४. | कर्जाच्या करारतील अटी व विशेषत: व्याजदरातील बदलामुळे कंपनीची स्थिती दुबळी करणाऱ्या आहेत काय ? | लागू नाही |
| ५. | कंपनीच्या कर्जाच्या प्रकाराची तपासणी करावी त्यामध्ये उच्च खर्चाची व कर्जांच्या बद्ल्यात कमी खर्चाची उसनवारी केली किंवा कसे हे शोधावे ? | लागू नाही |

| अ. क्र | तपशील | उत्तर |
|---|---|---|
| X | **खर्चाची प्रणाली** | |
| १. | कंपनीचे काही खर्चाचे धोरण आहे का ? | लागू नाही |
| २. | खर्चाच्या लेख्यांचा वित्तीय लेख्यांसोबत मेळ होतो का? | लागू नाही |
| ३. | मोठे कार्य, नोकऱ्या, उत्पादने, प्रक्रिया आणि सेवा यांचा हिशेब कंपनी नियमितपणे करते का? करत नसल्यास त्याची कारणे द्यावी. | लागू नाही |
| ४. | वापर होत नसलेल्या श्रम, तास व यंत्र तास निश्चित करण्यासाठी कंपनीकडे प्रभावी यंत्रणा आहे का. | लागू नाही |
| ५. | कंपनीत खर्चाचे लेखापरिक्षणाचे आदेश दिले का? असल्यास अलिकडच्या अहवालातील मोठया त्रुटी सागाव्यांत. | लागू नाही |
| ६. | उत्पादन खर्च निश्चित करण्यासाठी नाकारलेला माल व भंगार यांचे लेखे तपासावेत.अन्य उप-उत्पादने व संयुक्त उत्पादने यांचा प्रभाव नमूद करावा. | लागू नाही |
| ७. | अपसामान्य तोटयांचे मूल्यांकनासाठी व त्यांच्या नियंत्रणाकरीता उपाय शोधणारी प्रणाली कंपनीत आहे का? | लागू नाही |
| ८. | वरकड खर्च आकारणीसाठी कंपनीने काही पध्दत अनुसरली का ? वरकडचा दर कसा शोधला जातो ? खर्च + कंत्राट अशा प्रकरणातील वरकडची पूर्णपणे वसूली होते की नाही ? | लागू नाही |
| XI | **अंतर्गत लेखापरिक्षणाची प्रणाली** | |
| | कंपनीमध्ये तिच्या स्वत:च्या कर्मचा-यांचा अंतर्गत लेखापरिक्षण विभाग आहे की, कंपनी अंतर्गत लेखापरिक्षक म्हणून बाहेरच्या सनदी लेखापालंची सेवा भाडयाने घेते ? अंतर्गत लेखापरिक्षण प्रणालीची स्थिती कार्याची व्याप्ती, सक्षमतेचा स्तर इ. पुरेसे आहेत किंवा कसे यावर आपला अभिप्राय द्यावा. नसल्यास त्यातील त्रुटी सांगाव्यात तसेच अंतर्गत लेखा परिक्षण यंत्रणेच्या निरिक्षणांचे पुरेसे अनुपालन होते काय ? | आम्हास दिलेल्या माहितीनुसार कंपनीमध्ये अंतर्गत लेखा परिक्षण प्रणाली नाही कारण कंपनीचे काम पूर्णपणे सुरु झालेले नाही. |

| अ. क्र | तपशील | उत्तर |
|---|---|---|
| २. | अंतर्गत लेखापरिक्षणाची मानके/पुस्तिका/मार्गदर्शक सूचना विहित केल्या आहेत का ? आणि त्या उपयोगात आणल्या आहेत का ? | लागू नाही |
| ३. | अंतर्गत लेखा परिक्षणाचे अहवालवर लेखापरिक्षण समितीने चर्चा झाली का ? | लागू नाही |
| ४. | अंतर्गत लेखा परिक्षण स्वतंत्र आहे का ? आणि ते थेट कंपनीचे अध्यक्ष/मुख्य यांना अहवाल सादर करते का? | लागू नाही |
| ५. | अंतर्गत लेखा परिक्षण बाहय स्त्रोताकडून केले जात असल्यास त्याची निवड प्रकीया रास्त व पारदर्शक आहे का ? | लागू नाही |
| ६. | अंतर्गत लेखा परिक्षणाचे काम व्यावसायिक संस्थेच्या अधिकार क्षेत्राच्यामध्ये नसणाऱ्या संस्थेस दिले का ? | लागू नाही |
| ७. | अंतर्गत लेखा परिक्षणाचे अहवालात ज्याकडे सरकार/ व्यवस्थापनाने तातडीने लक्ष दिले पाहिजे अशी गंभीर अनियमितता आहे का? | लागू नाही |
| ८. | अगदी अलीकडच्या लेखापरिक्षण अहवालात ज्याकडे लक्ष वेधले आहे अशा सर्व त्रुटी /उणिवा यांचा एकूण परिणाम काय? | लागू नाही |
| ९. | अगदी अलिकडच्या लेखा परिक्षण अहवालात दाखविलेल्या चुका/उणिवा यापूर्वीच्या अहवालात दाखविलेल्या प्रमाणेच तशाच प्रकारच्या आहेत का? | लागू नाही |
| **XII** | **कायदेशिर व लवादकडील प्रकरणे** | |
| १. | प्रलंबित कायदेविषयक/लवादाकडील प्रकरणांची संख्या व त्यांचे वयानुसार विश्लेषण व प्रलंबित असण्याची कारणे निर्देशत करावी. | आम्हास दिलेल्या माहितीनुसार कोणतेही कायदेशिर / लवादाकडे प्रकरण प्रलंबित नाही. |
| २. | नवीन खटले व या वर्षात समझोता झालेले खटले यांचा तपशील | आम्हास दिलेल्या माहितीनुसार या वर्षात कोणताही खटल्यात समझोता झालेला नाही. |

| अ. क्र | तपशील | उत्तर |
|---|---|---|
| ३. | मोठया प्रमाणात केलेला /करावयाचा कायदेविषयक खर्च (परकीय व स्थानिक) यासाठी काही प्रमाणके /पध्दती अस्तित्वात आहे का ? तसा प्रस्ताव आहे का ? | लागू नाही |
| ४. | परदेशी तसेच भारतीय संस्था सोबत करार करण्यापूर्वी त्यासाठी योग्य कागदपत्रे तयार करण्याची खात्री देणारी प्रणाली आहे काय ? ( यामध्ये बैठकीची इतिवृत्ते लेखन आकस्मिक घटनांचा अंदाज करणे, परकीय चलनातील चढ उतार इ. बाबी समाविष्ट आहेत.) | आम्हास दिलेली माहिती नुसार करारापूर्वी संचालक मंडळाच्या बैठकीत चर्चा करण्याची पध्दत आहे |
| **XIII** | **इ डी पी लेखा परिक्षण** | |
| १. | या संस्थेकडे मंजूर केलेला माहिती तंत्रज्ञानाची व्युहरचना किंवा योजना आहे किंवा कसे? | आम्हास दिलेल्या स्पष्टीकरणानुसार कंपनी कार्य सुरु करण्याचा प्राथमिक टप्प्यावर आहे. तिचे स्वत:चा इ डी पी विभाग नाही. ती तिच्या सूत्रधारी कंपनीच्या पायाभूत सुविधा वापरते. |
| ३. | ज्यांचे लेखापरिक्षण केले जाते त्यांनी त्यांचे कामाचे किंवा कामाच्या काही भागाचे संगणकीकरण केले असेल तर त्यांचे मूल्यांकन व अहवालासाठी, कंपनीचा किती मोठा माहिती संग्रह इलेक्ट्रानिक स्वरुपात आहे? कोणती मोठी क्षेत्रे म्हणजे वित्तीय लेखानोंदी, विक्रीचे लेखे, कर्मचारी-वृदांची माहिती, वेतनपट, साहित्य/वस्तूसूची व्यवस्थापन इ.चे संगणकीकरण केले आहे का ? | ही कंपनी लेखे व वित्तीय माहिती संग्रह यासाठी एक्सेल प्रोग्रॅम वापरत आहे. |
| ३. | तुमच्या लेख्यांचे लेखेपरिक्षण करण्याचे कामावर याचे परिणाम कसे होतात हे निर्देशत करावे. आणि तुमचे लेखा परिक्षण संपूर्ण संगणकातून होते की त्याच्या बाजूने केले जाते ? | आम्ही आमचे लेखा परिक्षणाचे काम संगणकातून व त्याच्या बाहेरुन अशा दोन्ही प्रकारे केलेले आहे. |
| ४. | कंपनीने माहिती संग्रह (डेटा)/सॉफ्ट वेअर हार्ड वेअर यांच्या सुरक्षेची योग्य व्यवस्था केली आहे का ? | लागू नाही |

| अ. क्र | तपशील | उत्तर |
|---|---|---|
| ५. | संगणकाच्या पर्यावरणामध्ये असलेले अंगभूत तपासणी व वैध ठरविणारी यंत्रणा ज्या क्षेत्रात पुरेसे नाहीत किंवा त्याचा योग्य त्या प्राधिका-यांनी वापर केलेला नाही असे लेखा परिक्षकांचे मत असल्यास ती क्षेत्रे ओळखून निश्चित करावीत. | लेख्यांच्या हेतूसाठी MS-Excel हे सॉफ्ट वेअर वापरले जाते. त्यास पुरेशी सुरक्षा आहे. लेख्यासाठीच्या संगणक पर्यावरणात संबधित अंगभूत तपासणी व्यवस्था आहे. स्वीकारणीय धोक्यांची ओळख निश्चित केलेल्या क्षेत्रातील टक्केवारी 'निरंक' आहे. |
| ६. | संगणकात मागील अभिलेखांचा बॅकअप नसल्याने किंवा अभिलेखांचे करप्शन झाल्याने या फायलीतून माहिती मिळविण्यात काही समस्या निर्माण झाल्याबद्दल अभिप्राय द्यावेत. कागदपत्रे जतन करण्याचे काही धोरण आहे का ? | लेखापरिक्षणाच्या कामात अशी कोणतीही समस्या उद्‌भवली नाही. |
| ७. | प्रशिक्षक कर्मचारी नसल्याने किंवा अन्य योग्य माहिती पुस्तिका/कागदपत्रे इ. उपलब्ध नसल्याने कोणतेही सॉफ्टवेअर वापरले नाही किंवा कमी प्रमाणात वापरता आले असे घडले का ? | नाही |
| ८. | संगणकाच्या सॉफ्टवेअर मध्ये केलेल्या बदलास व्यवस्थापनाची मंजूरी आहे काय आणि त्याचे डॉक्यूमेंटेशन योग्य प्रकारे होते काय तसेच त्याचा वापर करण्यापूर्वी कर्मचारी वर्गाला त्याचा वापरापूर्वी सराव होण्यासाठी पुरेसा अवधी दिला किंवा कसे यावर अभिप्राय द्यावेत. | लागू नाही दिलेल्या माहितीनुसार आढावा वर्षात कोणतेही बद्दल/सुधारणा करण्यात आलेले नाहीत. |
| ९. | कंपनीत जर काही नवीन माहिती तंत्रज्ञानाची रचना करावयाचा प्रस्ताव असेल तर आणि संपूर्ण कंपनीत त्याचा वापर करण्यासाठी मोठया प्रमाणात निधीचा मंजूरी मिळणे आवश्यक  असेल तर त्या विषयी संचालक मंडळाला नियमितपणे माहिती दिली जाते का? ज्या संस्थामध्ये काही काळात माहिती तंत्रज्ञान ऑनलाईन करायचे आहे त्यांच्यासाठी ही कृती विशेषकरुन संबंधित आहे. | लागू नाही |

| अ. क्र | तपशील | उत्तर |
|---|---|---|
| १०. | इ डी पी प्रणाली हार्डवेअर व सॉफ्टवेअर दोन्ही भाडयाने घेणे/खरेदी करणे आणि त्यांच्या अंतिम पैसे देण्यापूर्वी वापर योग्यतेचे प्रमाणपत्र देणे या दोन्ही कामासाठी एकाच सिस्टम डिपार्टमेंट जबाबदार आहे का ?( दोन्ही कामे वेगळी असावीत व वापरकर्ता विभागात नंतर सामील करावे.) | लागू नाही |
| ११. | कंपनीकडे सिस्टिमच्या वापरातून निर्माण केलेले सर्व अहवाल/विवरणपत्रे यांची तपशीलवार सर्वकष यादी आहे का ? | होय |
| १२. | माहिती तंत्रज्ञानासाठी प्रभावी कर्णधार समिती आहे का? | लागू नाही |
| १३. | इ डी पी विभागासाठी प्रभावी आपद्कलिता पुर्नरचना योजना अस्तित्वात आहे का? तिचा निश्चित कालतरांने आढावा व मूल्यांकन केले जाते का ? | लागू नाही |
| १४. | इडीपीच्या लेखापरिक्षणात अहवालात सापडलेला बाबी व केलेल्या शिफारशी महत्त्वाच्या मानल्या का ? आणि ते प्रश्न समाधनकाररित्या सोडविले का ? | लागू नाही |
| XIV | **पर्यावरण व्यवस्थापन :** | |
| | पर्यावरण नियंत्रणाच्या विविध कायद्यांचे अनुपालन, त्याचे परिणाम व या संबंधीचे कंपनीने धोरण याची तपासणी करुन अभिप्राय द्यावेत. | लागू नाही |
| XV | **कंपनीच्या सामजिक जबाबदारी :** | |
| १. | कंपनी तिची सामजिक जबाबदारी कोणत्या प्रकारे पार पाडीत आहे ? | आम्हास दिलेल्या माहितीनुसार कंपनी कामाच्या प्रारंभीच्या टप्प्यावर आहे. त्यामुळे तिने सामाजिक जबाबदारीचे धोरण अद्याप तयार केलेले नाही. |
| २. | मंडळाने मंजूर केलेली धोरणाची अंमलबजावणी योग्य प्रकारे होते काय ? | नाही |

| अ. क्र | तपशील | उत्तर |
| --- | --- | --- |
| ३. | कंपनीच्या सामजिक जबाबदारीसाठी लक्ष्ये निर्धारित करण्याची यंत्रणा आहे का ? | नाही |
| ४. | सी.एस.आर. च्या अमलबजावणीवर लक्ष ठेवणारी पुरेशी यंत्रणा आहे का ? | नाही |
| XVI | **सर्वसामान्य बाबी** | |
| १. | कंपनीने प्रशासकीय मंत्रालयासोबत सामंजास्याचा करार केला आहे किंवा कसे ? केला असल्यास त्या करारातील लक्ष्यांशी प्रत्येक युनीट निहाय विभागणी केली आहे का ? केली असल्यास युनीट निहाय लक्ष्ये व त्यांची पूर्तता व त्याचे करारातील मापदंड यांचे विवरणपत्र सोबत जोडावे. | दिलेल्या माहितीनुसार परिक्षणाच्या कालावधीत कोणताही सांमजस्याचा करार केलेला नाही. |
| २. | भाविष्य निर्वाह निधीचे मालक व कर्मचारी यांची अशंदाने नेहमीच्या व्यवसायाच्या बाहेर वेगळी ठेवली आहेत किंवा कसे ? आणि त्यांच्या रक्षणाची योग्य ती काळजी घेण्यात येत काय ? | कंपनीमध्ये कुणीही कर्मचारी नाहीत त्यामुळे हा खंड लागू होत नाही. |
| ३. | कंपनी ऊर्जा अकेक्षणासाठी योग्य आहे काय ? असल्साय, तज्ञ संस्थेकडून ऊर्जा अंकेक्षण केले काय? | लागू नाही |
| ४. | नवीन प्रकल्पासाठी जमीन संपादन करण्यात आली काय ? आणि त्यामुळे बाधीत होणा-या व्यक्तीची देणी व भरपाई याचे काम त्वरेने व पारदर्शक पध्दतीने केले जाते काय ? त्यातील लाभ ख-या बाधीत व्यक्तीनाच मिळतील आणि दलाल व राजकीय पक्षासह मध्यस्थ यांच्याकडे वळणार नाहीत याची खात्री केली का? | आढाव्याच्या वर्षात कंपनीने कोणतीही जमीन संपादन केलेले नाही मात्र कंपनीने जमीन मिळविण्यासाठी अर्ज केला आहे. |
| ५. | या वर्षात कंपनीने काही विलीनीकरण, किंवा कब्ज्यात घेतले काय ? असे विलीकरण व कब्जे करण्यापूर्वी गरजाचे सखोल विश्लेषण केले काय ? विलीनीकरण /कब्जा करण्याचा निर्णय घेण्यापूर्वी भागधारकांची स्वीकृती घेतली का ? त्याचा कंपनीच्या नफ्यावर काय परिणाम झाला ? | आढावाच्या कालावधीत कोणतेही विलीनीकरण / कब्जा कार्यवाही केलेली नाही. |

भट, केळकर ॲण्ड कंपनी, करिता
सनदी लेखापाल
फर्मचा नोंदणी क्र. १०१२८५ डब्ल्यु

सही /-
सी ए (सनदी लेखापाल) संदिप डी केळकर
भागीदार
सदस्य क्र. १२३४४३

दिनांक : २२ सप्टेंबर २०१५,
स्थळ : डोंबिवली

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद पॉवर कंपनी लिमिटेड
## दि. ३१ मार्च २०१५ रोजीचा ताळेबंद

| अ.क्र. तपशील | टिपा क्र. | ३१.०३.२०१५ रोजी | ३१.०३.२०१४ रोजी |
|---|---|---|---|
| **१. समभाग व दायित्वे** | | | |
| (१) भागधारकांचे निधी | | | |
| (अ) भाग भांडवल | ३ | ५००००० .०० | ५००००० .०० |
| (ब) राखीव व आधिक्य | ४ | ११५५३१.१३ | ८९१९०.४२ |
| | | **६१५५३१.१३** | **५८९१९०.४२** |
| **(२) चालू नसलेली दायित्वे** | | | |
| (अ) दीर्घ मुदतीची कर्जे | | | |
| (ब) स्थगित कर दायित्वे (निव्वळ) | | | |
| (क) इतर दिर्घ मुदतीची दायित्वे (चालु नसलेले) | ५ | ६१३३१६८४.६१ | ६१३००८८३.०० |
| (ड) दिर्घ मुदतीच्या तरतुदी | | - - - | - - - |
| | | **६१३३१६८४.६१** | **६१३००८८३.००** |
| **(३) चालू दायित्वे** | | | |
| (अ) अल्प मुदतीची दायित्वे | | | |
| (ब) व्यापारी देणी | | | |
| (क) इतर चालू दायित्वे | ६ | ८६०२६२.०० | ८६०२६२.०० |
| (ड) अल्प मुदतीच्या तरतुदी | ७ | ५७८८०.६१ | ६७६४०.०० |
| | | **९१८१४२.६१** | **९२७९०२.००** |
| **एकूण** | | **६२८६५३५८.३५** | **६२८१७९७५.४२** |
| **मत्ता** | | | |
| (१) चालू नसलेल्या मत्ता | ८ | - - - | - - - |
| (अ) स्थिर मत्ता | | | |
| (१) मुर्त मत्ता | | | |
| (२) अमुर्त मत्ता | | | |
| (३) प्रगती पथावरील भांडवली कामे | | ६२०२४१२६.०० | ६२०२४१२६.०० |
| (ब) चालू नसलेल्या गुंतवणूकी | | - - - | - - - |
| (क) स्थगित कर मत्ता (निव्वळ) | | - - - | - - - |
| (ड) दिर्घ मुदतीची कर्जे व अग्रिमे | | - - - | - - - |
| (इ) इतर चालू नसलेल्या मत्ता | | - - - | - - - |
| | | **६२०२४१२६.००** | **६२०२४१२६.००** |

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

# औरगांबाद पॉवर कंपनी लिमिटेड
## दि. ३१ मार्च २०१५ रोजीचा ताळेबंद

| अ.क्र. तपशील | टिपा क्र. | ३१.०३.२०१५ रोजी | ३१.०३.२०१४ रोजी |
|---|---|---|---|
| **२. चालू मत्ता** | | | |
| (अ) वस्तुसूची | | - - - | - - - |
| (ब) व्यापारी येणी | | - - - | - - - |
| (क) रोख व बॅंकेतील शिल्लक | ९ | ७९७०५९.७४ | ७३४३०४.४२ |
| (ड) अल्प मुदतीची कर्जे व अग्रिमे | १० | ४४१७२.६१ | ५९५४५.०० |
| (इ) इतर चालू मत्ता | | - - - | - - - |
| | | ८४१२३२.३५ | ७९३८४९.४२ |
| **एकूण** | | ६२८६५३५८.३५ | ६२८१७९७५.४२ |
| **कंपनीची माहिती** | १ | | |
| **महत्वाची लेखा धोरणे** | २ | | |

सोबत जोडलेल्या आमच्या समान तारखेच्या अहवाल नुसार

**मे. भट केळकर ॲण्ड कंपनी, करिता**
सनदी लेखापाल,
फर्मचा नोंदनी क्र. १०१२८५ डब्ल्यु

**सही /-**
**सी ए - संदिप डी केळकर**
भागीदार
सदस्य क्र. १२३४४३

**सही /-**
**ए. एस. चव्हाण**
संचालक

**सही /-**
**पी. यु. शिंदे**
संचालक

**स्थळ : डोंबिवली**
**दि. : २२-९-२०१५**

# औरगांबाद पॉवर कंपनी लिमिटेड
## दि. ३१ मार्च २०१५ रोजीचा संपलेल्या वर्षाचे नफा व तोटापत्रक

| अ.क्र. तपशील | ३१ मार्च २०१५ रोजी संपलेले वर्ष | ३१ मार्च २०१४ रोजी संपलेले वर्ष |
|---|---|---|
| **प्रवर्तनापासून महसूल** | | |
| इतर उत्पन्न | ६८६७८.३२ | ६२८३९.४२ |
| **एकूण महसूल** | **६८६७८.३२** | **६२८३९.४२** |
| **खर्च** | | |
| वीज खरेदी | - - - | - - - |
| कर्मचारी खर्च | - - - | - - - |
| दुरुस्ती व देखभाल | - - - | - - - |
| प्रशासन व सामन्य खर्च | १६७५४.०० | १३७२४.०० |
| इतर खर्च | - - - | - - - |
| घसारा | - - - | - - - |
| घसारा - समायोजित केलेला | - - - | - - - |
| वित्त खर्च | - - - | - - - |
| **एकूण खर्च** | **१६७५४.००** | **१३७२४.००** |
| **नफा/(तोटा) करपूर्व** | **५१९२४.३२** | **४९११५.४२** |
| **कर खर्च** | - - - | - - - |
| चालू वर्षाचे कर खर्च | १६०४४.६१ | १५१७७.०० |
| मागील वर्षाचे कर खर्च | ९५३९.०० | - - - |
| स्थगित कर | - - - | - - - |
| **प्रवर्तन चालू ठेवाल्यामुळे झालेला नफा /(तोटा)** | **२६३४०.७१** | **३३९३८.४२** |
| **वर्षाचा नफा/तोटा** | **२६३४०.७१** | **३३९३८.४२** |
| **प्रतीभाग मिळकत** | | |
| मूळ मिळकत प्रतीभाग रुपयांत | ०.५३ | ०.६८ |
| सौम्यकृत मिळकत प्रतीभाग रुपयांत | ०.५३ | ०.६८ |

सोबत जोडलेल्या आमच्या समान तारखेच्या अहवाल नुसार

**मे. भट केळकर ॲण्ड कंपनी, करिता**
सनदी लेखापाल,
फर्मचा नोंदनी क्र. १०१२८५ डब्ल्यु

| | | |
|---|---|---|
| **सही /-** | **सही /-** | **सही /-** |
| **सी ए - संदिप डी केळकर** | **ए. एस. चव्हाण** | **पी. यु. शिंदे** |
| भागीदार | संचालक | संचालक |
| सदस्य क्र. १२३४४३ | | |

**स्थळ : डोंबिवली**
**दि. : २२-९-२०१५**

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद पॉवर कंपनी लिमिटेड
## दि. ३१ मार्च २०१५ रोजीचे रोकडता प्रवाह विवरण पत्रक

| अ.क्र. | तपशील | ३१.०३.२०१५ रोजी | ३१.०३.२०१४ रोजी |
|---|---|---|---|
| **अ)** | **प्रवर्तन कार्यापासून महसूल** | | |
| | करपूर्व नफा | ५१,९२४.३२ | ४९,११५.४२ |
| | खालील बाबींची समायोजने | - - - | - - - |
| | संकीर्ण खर्चाच्या परतफेडीची तरतूद | - - - | - - - |
| | मुदतींच्या ठेवीवरील व्याजाचे उत्पन्न | (६८,१११.३२) | (६२,८३९) |
| | **खेळत्या भांडवलाच्या बदलापूर्वीचा प्रवर्तनापासून नफा** | (१६,१८७) | (१३,७२४) |
| | समायोजने | - - - | - - - |
| | व्यापारी व अन्य देण्यातील वाढ / (घट) | ५,६१४ | (८,३४८) |
| | प्रवर्तनातून निर्माण केलेली रोकड | (१०,५७३) | (२२,०७२) |
| | प्रायस कर - भरणा | (२५,५८४) | (१५,१७७) |
| | **प्रवर्तन कार्यापासून निव्वळ रोकडता प्रवाह (अ)** | **(३६,१५७)** | **(३७,२४९)** |
| ब) | गुंतवणूक कार्यापासून रोकडता प्रवाह | | |
| | मुदतीच्या ठेवीच्या व्याजाचे उत्पन्न | ६८,१११ | ६२,८३९ |
| | प्रवर्तन - पूर्व खर्च | - - - | (१७,३६,६१८) |
| | **गुंतवणूक कार्यात वापरलेली निव्वळ रोकड (ब)** | **६८,१११** | **(१६,७३,७७९)** |
| **क)** | **वित्तीय कार्यापासून रोकडता प्रवाह** | | |
| | शेअर्स देण्यामुळे उत्पन्न | - - - | - - - |
| | उसनवारी / अग्रिमे यापासून उपन्न | ३०,८०२ | १,७६,७३२२ |
| **वित्तीय कार्यापासून वापरलेली निव्वळ रोकड** | | **३०,८०२** | **१७,६७,३२२** |
| **रोख व रोख सममूल्य यातून निर्मिलेली निव्वळ वाढ/(घट) (अ + ब + क)** | | **६२,७५६** | **५६,२९४** |
| | रोख व रोख सममूल्य (आरंभीचे) | ७,३४,३०४ | ६,७८,०१० |
| | रोख व रोख सममूल्य (अखेरचे) | ७,९७,०६० | ७,३४,३०४ |
| **एकूण** | | **६२,७५६** | **५६,२६४** |

टिपा : १) वरील रोकडता प्रवाह विवरणपत्र हे 'लेखा मानक-३' रोकडता प्रवाहाविषयी यात दिलेल्या 'अप्रत्यक्ष पद्धत' अनुसार तयार केलेले आहे.

२) वर्षाअखेरचे रोख व रोख सममूल्य यामध्ये हाती असलेली रोख रक्कम व बॅंकेतील शिल्लक समाविष्ट आहे.

सोबत जोडलेल्या आमच्या समान तारखेच्या अहवाल नुसार

**मे. भट केळकर ॲण्ड कंपनी, करिता**
सनदी लेखापाल,
फर्मचा नोंदनी क्र. १०१२८५ डब्ल्यु

| | | |
|---|---|---|
| **सही /-** | **सही /-** | **सही /-** |
| **सी ए - संदिप डी केळकर** | **ए. एस. चव्हाण** | **पी. यु. शिंदे** |
| भागीदार | संचालक | संचालक |
| सदस्य क्र. १२३४४३ | | |

**स्थळ : डोंबिवली**
**दि. : २२-९-२०१५**

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

# औरंगाबाद पॉवर कंपनी लिमिटेड वर्ष २०१४-१५ च्या लेख्यासंबंधी टिपा

## टिप क्र.१ कंपनीची माहिती

औरंगाबाद पॉवर कंपनी लिमिटेड, ही कंपनी अधिनियम १९५६ च्यानुसार संस्थापित झालेली एक लिमिटेड कंपनी आहे. ती महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. (महवितरण) या कंपनीची एक उपकंपनी असून ती दि. २० जून २००७ रोजी अस्तित्वात आलेली आहे.

या कंपनीची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत. विद्युत अधिनियम २००३ च्या कलम २(२५) यात 'विद्युत प्रणाली' जशी व्याख्यांकित केलेले आहे त्यानुसार विद्युत प्रणालीची योजना आखणे, ती पुढे नेणे, तिचे संकल्प चित्रे तयार करणे व ती विकसित करणे, त्यासाठी अभियांत्रिकीची कामे करणे, ती कंपनी उभारणे, चालविणे व देखभाल करणे. याशिवाय तिच्यात सर्वोत परी एकात्मिक इंधनप्रणाली अंतर्भूत करणे. यामध्ये तिचे संकल्प चित्र व अभियांत्रिकी कामे समाविष्ट आहेत. तसेच कंपनीची प्रारंभिक जीवक्षमता निर्माण करणे, तपशीलवर प्रकल्प व मूल्यन अहवाल तयार करणे, तिचा स्थापना व मालकी प्रस्थापित करणे, व तिचे संचालन करणे तसेच विद्युत प्रणालीची देखभाल करणे, विद्युत निर्मितीसाठी कारखान्यात कोळसा खाणीची रचना करणे, व मिळालेल्या विजेला बाहेर नेण्याची व्यवस्था करणे, विजेचे पारेषण व वितरण करणे, राज्य विद्युत मंडळे, वीजसंस्था, पारेषण व वितरण कंपन्या, राज्यशासन व इतर संस्थाना विजेचा पुरवठा करणे इ.

या कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय प्रकाशगड इमारत वांद्र (पूर्व) मुंबई- ४०० ०५१. येथे स्थित आहे. अद्याप ही कंपनी पूर्णपणे कार्यरत करण्याच्या टप्प्यावर आलेली नाही. फक्त पुढील प्रारंभिक कामे करीत आहेत. यामध्ये जमीन संपादनासाठी द्यावयाच्या शुल्काबाबत प्रकिया करणे, गायत्री बिझनेस या संस्थेस सल्लागार शुल्क देणे इ. उनात्तापर्यत भूगर्भ शास्त्रीय अहवाल तयार करण्यात आलेले आहेत.

| | |
|---|---|
| सही /- | सही /- |
| **ए एस चव्हाण** | **पी. यु. शिंदे** |
| संचालक | संचालक |

## टिप क्र.२

### अ) महत्त्वाची लेखा धोरणे:- ३१ मार्च २०१५

### लेखा तयार करण्याची आधारभूत तत्वे :

वित्तीय विवरणपत्रे ही चालू असलेली संस्था या आधार ऐतिहासिक खर्च संकेत यानुसार तयार केली आहेत. तसेच कंपनी अधिनियम १९५६ व कंपनी अधिनियम २०१३ यातील संबंधित तरतुदीची आणि भारतात लागू असणारी लेख्यांची तत्वे व इस्टिटयुट ऑफ चार्टर्ड अकांटट्स इंडिया यांनी घालून दिलेली व बंधनकारक असणारी लेखामानके यांचे ते अनुपालन करतात.

### आकस्मिक दायित्वांबाबत पध्दती :

प्राप्त होणा-या कारणे दाखवांच्या सूचना जेंव्हा प्रत्यक्ष मागणीमध्ये रुपांतरीत होतात तेव्हाच फक्त त्या विचारात घेण्यात येतात जर अशा मागण्यासाठी काही पैसे भरले तर ते अग्रिम म्हणून दर्शविले जातात.

विविध वित्तीय कायदयाच्या अंतर्गत असलेल्या आकस्मिक दायित्वांमध्ये, ज्याच्याबाबत कंपनी/विभागांनी अपिल केलेली आहेत, ती सुध्दा समविष्ट आहेत.

आकस्मिक दायित्वे टिपांच्या माध्यमातून प्रकट केल्या आहेत

### कर :

चालू वर्षातील उत्पन्नावरील कर आयकर कायदा १९६१ च्य तरतुदीनुसार करपात्र उत्पन्न व हिशेब केलेली करांची जमा यांच्या आधारे निश्चित केले व ते कर निर्धारण /अपिले यांच्या अपेक्षित निकालावर आधारलेले आहे.

सही /-
**ए एस चव्हाण**
संचालक

सही /-
**पी. यु. शिंदे**
संचालक

# टिप - ३
## भाग भांडवल

| अ.क्र. तपशील | ३१.०३.२०१५ रोजी | ३१.०३.२०१४ रोजी |
|---|---|---|
| १) अधिकृत भांडवल<br>५०,००० समभाग, प्रत्येकी ₹ १०/- चे<br>(मागील वर्षी ५०,०००/- भाग प्रत्येकी ₹ १०/- चे ) | ५०००००.०० | ५०००००.०० |
| २) दिलेले, अभिदत्त व भरणा केलेले<br>(५०००० समभाग प्रत्येकी रु.१०/- चे पूर्ण भरणा केले) | ५०००००.०० | ५०००००.०० |
| | ५०००००.०० | ५०००००.०० |

३) अहवाल वर्षाच्या आरंभी व अखेरीस शेअर्सची संख्या आणि बाकी रक्कम यांचे समायोजन

| तपशील | ३१.०३.२०१५ रोजी | | ३१.०३.२०१४ रोजी | |
|---|---|---|---|---|
| | भागाची संख्या | रक्कम रु. लाखात | भागाची संख्या | रक्कम रु.लाखात |
| आरंभीची शिल्लक | ५०,०००.०० | ५,००,०००.०० | ५०,०००.०० | ५,००,०००.०० |
| नवीन इशू | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| अखेरची शिल्लक | ५०,०००.०० | ५,००,०००.०० | ५०,०००.०० | ५,००,०००.०० |

४. सुत्रधारी कंपनी, अंतिम सुत्रधारी कंपनी, उपकंपन्या व सहयोगी कंपन्या यांनी धारण केलेल्या समभागांच्या संख्याचा तपशील

| | ३१.०३.२०१५ रोजी | ३१.०३.२०१४ रोजी |
|---|---|---|
| महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. | ५०,०००.०० | ५०,०००.०० |

५. ५ टक्क्यापेक्षा जास्त भाग धारण करणाऱ्या भागधारकांनी धारण केलेल्या समभागांचा तपशील

| | ३१.०३.२०१५ रोजी | | ३१.०३.२०१४ रोजी | |
|---|---|---|---|---|
| | धारण केलेले भाग | या वर्गातील धारण केलेल्या भागांची टक्केवारी | धारण केलेल्या भागाची संख्या | या वर्गातील धारण केलेल्या भागांची टक्केवारी |
| महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. | ५०,०००.०० | १०० टक्के | ५०,०००.०० | १०० टक्के |

## टिप - ४ : राखीव आणि आधिक्य

| अ.क्र. तपशील | ३१.०३.२०१५ रोजी | ३१.०३.२०१४ रोजी |
|---|---|---|
| नफा व तोटा पत्रकातील आधिक्य / (तूट) | - - - | - - - |
| आरंभीची शिल्लक | ८९१९०.४२ | ५५२५२.०० |
| अधिक : नफा / (तोटा) वर्षाचा | २६३४०.७१ | ३३९३८.४२ |
| **एकूण** | **११५५३१.१३** | **८९१९०.४२** |

## टिप - ५ : इतर दीर्घ मुदतीची दायित्वे (चालू नसलेली)

| अ.क्र. | तपशील | ३१.०३.२०१५ रोजी | ३१.०३.२०१४ रोजी |
|---|---|---|---|
| १ | (अ) व्यापारी देणी | - - - | - - - |
| | (ब) इतर | - - - | - - - |
| | सुत्रधारी कंपनी - महावितरणला देणे | १४२१४१४०.६१ | १४१८३३३९.०० |
| | महानिर्मिती ला. देणी | ४७११७५४४.०० | ४७११७५४४.०० |
| **एकूण** | | **६१३३१६८४.६१** | **६१३००८८३.००** |

# टिप - ६ : इतर चालू दायित्वे

| अ.क्र. तपशील | ३१.०३.२०१५ रोजी | ३१.०३.२०१४ रोजी |
|---|---|---|
| इव्होनिक एनर्जी सार्विसेस इंडिया प्रा. लि. | ८४३०००.०० | ८४३०००.०० |
| जे एम टी अॅड असोशिएटस | ८२७३.०० | ८२७३.०० |
| शार्प अॅड टन्नन असोशिएटस | - - - | - - - |
| डी एस भट अॅड असोशिएट्स | ८९८९.०० | ८९८९.०० |
| **एकूण** | **८६०२६२.००** | **८६०२६२.००** |

## टिप - ७ : अल्प मुदतीच्या तरतुदी

| अ.क्र. | तपशील | ३१.०३.२०१५ रोजी | ३१.०३.२०१४ रोजी |
|---|---|---|---|
| १) | आयकरासाठी तरतूद-निर्धारण वर्ष २०१५-१६ | १६०४४.६१ | - - - |
| २) | आयकरासाठी तरतूद-निर्धारण वर्ष २०१४-१५ | - - - | १५१७७.०० |
| ३) | आयकरासाठी तरतूद-निर्धारण वर्ष २०१३-१४ | १५१२८.०० | १५१२८.०० |
| ४) | आयकरासाठी तरतूद-निर्धारण वर्ष २०१२-१३ | - - - | १५०२७.०० |
| ५) | आयकरासाठी तरतूद-निर्धारण वर्ष २०११-१२ | ६८५४.०० | ६८५४.०० |
| ६) | आयकरासाठी तरतूद-निर्धारण वर्ष २०१०-११ | १५४५४.०० | १५४५४.०० |
| ७) | आर ओ सी फायलींगसाठी तरतूद | ४४००.०० | - - - |
| **एकूण** | | **५७८८०.६१** | **६७६४०.००** |

# टिप - ८
# स्थिर मत्ता

१) मत्ता

| | मत्ता | ढोक गट (किमंती प्रमाणे) | | | | घसारा / कर्जफेडीचा तरतूद | | | | निव्वळ गट | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | आरंभीची १/०४/२०१४ रोजी | भर | कपात | अखेरची ३१/०३/२०१५ रोजी | आरंभीची १/०४/२०१४ रोजी | कपात | वर्षासाठी | अखेरची ३१/०३/२०१५ रोजी | ३१/०३/२०१५ रोजी | ३१/०३/२०१४ रोजी |
| | | | | | | | | | | | |
| अ) | **मुर्त मत्ता** | | | | | | | | | | |
| | भाड्याची जमीन | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | कार्यालयाची इमारत | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | कारखान्याची इमारत | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | कारखाना व यंत्र सामग्री | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | संगणक | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | फर्निचर व जोंडणी | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | इतर साधने | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | वाहने | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | | | | | | | | | | | |
| | मागील वर्ष | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | **भर : प्रगती पथावरील भांडवली कामे** | ६२०२४१२६ | - | - | ६२०२४१२६ | - | - | - | - | ६२०२४१२६ | ६२०२४१२६ |
| | (प्रवर्तन-पूर्व खर्च) | | | | | | | | | | |
| | **उपबेरीज (अ)** | **६२०२४१२६** | **-** | **-** | **६२०२४१२६** | **-** | **-** | **-** | **-** | **६२०२४१२६** | **६२०२४१२६** |
| | | | | | | | | | | | |
| ब) | **अमूर्त मत्ता** | | | | | | | | | | |
| | तांत्रिक ज्ञान | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | संगणक सॉफ्टवेअर | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | | | | | | | | | | | |
| | मागील वर्ष | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | भर : विकासावर चालू | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| | असलेल्या अमूर्त मत्ता | | | | | | | | | | |
| | **उप बेरीज (ब)** | **-** | **-** | **-** | **-** | **-** | **-** | **-** | **-** | **-** | **-** |
| | | | | | | | | | | | |
| | **एकूण (अ + ब)** | **६२०२४१२६** | **-** | **-** | **६२०२४१२६** | **-** | **-** | **-** | **-** | **६२०२४१२६** | **६२०२४१२६** |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

## टिप - ९ : रोख व बँकेतील शिल्लक

| अ.क्र. | तपशील | ३१.०३.२०१५ रोजी | ३१.०३.२०१४ रोजी |
|---|---|---|---|
| १. | बँकातील शिल्लक (चालू खाते) | - - - | - - - |
| | अ) चालू खाती | ०.०० | ०.०० |
| | ब) ठेवींची खाती | ७९७०५९.७४ | ७३४३०४.४२ |
| २. | चेक - ड्राफ्ट्स - हातातील | - - - | - - - |
| ३. | हातील रोख | - - - | - - - |
| **एकूण** | | **७९७०५९.७४** | **७३४३०४.४२** |

## टिप - १० : अल्पमुदतीची कर्जे व अग्रिमे

| अ.क्र. | तपशील | ३१.०३.२०१५ रोजी | ३१.०३.२०१४ रोजी |
|---|---|---|---|
| १. | प्रतिभूत घांगळी मानलेली | - - - | - - - |
| | स्वंय निर्धारित कर २०१५-१६ | ९२३२.६१ | - - - |
| | स्वंय निर्धारित कर २०१३-१४ | - - - | - - - |
| | स्वंय निर्धारित कर २०१२-१३ | - - - | १०७१७.०० |
| | स्वंय निर्धारित कर २०११-१२ | १३९४.०० | १३९४.०० |
| | स्वंय निर्धारित कर २०१०-११ | १५४५४.०० | १५४५४.०० |
| | मुदतीठेवीवरील टी डी एस वि. वर्ष २०१४-१५ | ६८१२.०० | - - - |
| | मुदतीठेवीवरील टी डी एस वि. वर्ष २०१३-१४ | - - - | ६२८०.०० |
| | मुदतीठेवीवरील टी डी एस वि. वर्ष २०१२-१३ | ५७५०.०० | ५७५०.०० |
| | मुदतीठेवीवरील टी डी एस वि. वर्ष २०११-१२ | - - - | ५०४०.०० |
| | मुदतीठेवीवरील टी डी एस वि. वर्ष २०१०-११ | ५५३०.०० | ५५३०.०० |
| | निर्धारण वर्ष २०१४-१५ चा अग्रिम कर | - - - | ९३८०.०० |
| **एकूण** | | **४४१७२.६१** | **५९५४५.००** |

# टिप - ११ : इतर उत्पन्न

| अ.क्र. तपशील | ३१.०३.२०१५ रोजी संपलेले वर्ष | ३१.०३.२०१४ रोजी संपलेले वर्ष |
|---|---|---|
| अ) व्याजाचे उत्तन्न | | |
| १. बँकेतील ठेवीमधील गुंतवणूकीचे उत्पन्न | ६८,१११.३२ | ६२,८३९.४२ |
| २. आयकर परतावा | ५६७.०० | - - - |
| **एकूण** | **६८६७८.३२** | **६२,८३९.४२** |

## टिप क्र.१२ : प्रशासन व सर्वसामान्य खर्च

| अ.क्र. | तपशील | ३१.०३.२०१५ रोजी संपलेले वर्ष | ३१.०३.२०१४ रोजी संपलेले वर्ष |
|---|---|---|---|
| १. | सांविधिक लेखापरिक्षकांचे शूल्क | ८,९८९.०० | ८,९८९.०० |
| २. | बँक आकार | १६५.०० | २६५.०० |
| ३. | सांविधिक लेखा परिक्षकांचा स्वधनातून खर्च | ७,६००.०० | ४,२००.०० |
| ४. | आर ओ सी फायलींग शुल्क | - - - | - - - |
| **एकुण** | | **१६७५४.००** | **१३७२४.००** |

## टिप क्र. १३ : लेख्यावरील जादा टिपा

**१) संबंधिताविषयी प्रकटने :**

लेखामानक १८ ''संबंधिताची प्रकटने'' याबाबत यावर्षी कंपनीशी संबंधितरित्या केलेल्या व्यवहाराचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ) व्यवस्थापनातील महत्त्वांच्या व्यक्ती :- श्री प्रभाकर यु. शिंदे-संचालक
श्री. अशोक एस चव्हाण - संचालक

ब) सूत्रधारी कंपनी- महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. दि. ३१/०३/२०१५ रोजी

| व्यवहाराचे स्वरुप | वरील (अ) च्या संदर्भात (रक्कम रु. मध्ये) | वरील (ब) च्या संदर्भात (रक्कम रु. मध्ये) |
|---|---|---|
| **अप्रतिभूत अग्रिमे घेतलेली** | ० | **३०८०२.००** |
| **३१ मार्च २०१५ रोजीची थकीत देय अग्रिमाची रक्कम** | ० | **१,४२,१४,१४१.००** |

**२) लेखापरिक्षकांच्या परिश्रमिकांतील समाविष्ट बाबी :**

| तपशील | २०१४-२०१५ (रक्कम रु. मध्ये) | २०१३-२०१४ (रक्कम रु. मध्ये) |
|---|---|---|
| लेखापरीक्षण शूल्क | ८०००.०० | ८०००.०० |
| सेवा कर | ९८९.०० | ९८९.०० |
| **एकूण रु.** | **८९८९.००** | **८९८९.००** |

**३ प्रतिभाग मिळकत :**

लेखा मानक २० - प्रतिभाग मिळकत यानुसार प्रतिभाग मिळकतीचा हिशेब खालील प्रमाणे आहे.

| तपशील | २०१४-२०१५ | २०१३-१४ |
|---|---|---|
| नफा : करोत्तर | २६३४०.७१ | ३३९३८.४२ |
| समभागांची संख्या | ५००००.०० | ५००००.०० |
| प्रतिभाग मिळकत | ०.५३ | ०.६८ |
| समभागाचे दर्शनी मूल्य | १०.०० | १०.०० |

४) कंपनीने दिलेल्या माहितीप्रमाणे ''सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योजक विकास अधिनियम २००६'' यात व्याख्यांकित केलेल्या सूक्ष्म, लघू, इ मध्यम उद्योजकांची दि. ३१ मार्च २०१५ रोजी कोणतीही देणी थकीत नव्हती.

५) औरंगाबाद पॉवर कंपनीला पुढे आणण्यासाठी महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीने महानिर्मितीला काही प्रारंभिक कामे करुन द्यावीत. त्यासाठी (औ.बाद पॉवर) कंपनीची सूत्रधारी कंपनी असलेल्या महाराष्ट्र राज्य विद्युत पॉवर कंपनी

(म्हणजे महावितरण) च्या संचालक मंडळाने महानिर्मिती कंपनीस सल्लामसलत शुल्क म्हणून काही रक्कम देण्याचे तत्वत: मान्य केले होते. अद्याप या सल्लामसलत शुल्क देण्याच्या अटीचे अंतिमीकरण झालेले नाही. तसेच या तारखेपावेतो महानिर्मितीने सलागारीचे काम हाती घेतलेले नाही. म्हणून कंपनीने महानिर्मितीला देय असलेल्या सल्लागार शुल्काचा लेखा चालू वित्तीय वर्षात केलेला नाही.

६) अद्याप प्रकल्प सुरु झालेला नसल्याने या प्रकल्पासंबधीत सर्व खर्चाचे स्थिर मत्तांच्या शीर्षांतर्गत प्रगतीपथावरील भांडवलीकरण (प्रवर्तन पूर्व खर्च) करण्यात आलेले आहे. या प्रवर्तन पूर्व खर्चाची विभागणी खालीलप्रमाणे आहे :

| **तपशील** | **०१.०४.२०१४ रोजी आरंभाची शिल्लक** | **वर्षभरातील भर** | **३१.०३.२०१५ रोजी अखेरची शिल्लक** |
|---|---|---|---|
| जीवन क्षमता व डी आर पी अहवालाचे खर्च | ३९८४११८ | - | ३९८४११८ |
| शोध खर्च | ४३२८१४९७ | - - | ४३२८१४९७ |
| जमीन संपादनाच्या प्रक्रीयेचे शूल्क | ५०५० | - | ५०५० |
| गायत्री बिझनेस लिंक यांच्या सल्लागारीचे महानिर्मितीने दिलेले शुल्क | १०००००० | - | १०००००० |
| संपर्क अधिकारी यांचे महाविरणच्या यवतमाळ (संवसू) मंडळाने दिलेले वेतन | ३२८४२९ | - - | ३२८४२९ |
| व्यावसायिक / मार्गदर्शन शुल्क | १०६४३९५ | - | १०६४३९५ |
| भूगर्भ शास्त्रीय अहवालासाठी खर्च | १२३६०६३७ | | १२३६०६३७ |
| **एकूण** | **६,२०,२४,१२६** | | **६,२०,२४,१२६** |

७) सुधारित अनुसूची तीन यातील गरजांनुसार आणि व्यवस्थापनाने निश्चित केल्याप्रमाणे कंपनीने नेहमीचे प्रवर्तनीय चक यांच्या आधारे कंपनीच्या मत्ता व दायित्वे यांचे पूनवर्गीकरण चालू व चालू नसलेल्या या मध्ये केलेले आहे मागील वर्षाच्या आकडेवारीचे जेथे आवश्यक असेल तेथे, पुनगटीकरण व पुनवर्गीकरण केलेले आहे.

८) धनको व ऋणको यांच्याविषयी शिलकी कायम होण्याच्या अधीन आहेत.

| सही/- | सही/- |
|---|---|
| **ए. एस. चव्हाण** | **पी. यु. शिंदे** |

**आमच्या येथे जोडलेल्या समान तारखेला अहवालानुसार**

**मे. डी. एस. भट ॲंड असोसिएटस्, करिता**
सनदी लेखापाल
फर्मचा नोंदणी क्र. १०१२८५ डब्ल्यू
यांच्या हस्ते दिला

सही /-
**सी. ए. संदिप डी केळकर**
भागीदार
सदस्य क्र. १२३४४३

स्थळ : डोंबिवली
दिनांक : २२ सप्टेंबर २०१५

# महावितरण कंपनी समुहाच्या वित्तीय वर्ष २०१४-१५ च्या एकत्रित वित्तीय विवरण पत्रावर स्वतंत्र/सांविधिक लेखा परिक्षकांचा अहवाल

**प्रति,**

**मा. सर्व सदस्य,**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड. (एकत्रित कंपनी)**

**कंपनी एकत्रित वित्तीय विवरण पत्रांवर अहवाल :**

आम्ही महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड कंपनी (हिचा उल्लेख यापुढे 'सुत्रधारी कंपनी' असा केला आहे) आणि तिची उपकंपनी (औरंगाबाद पॉवर कंपनी लि.) (सुत्रधारी व तिची उपकंपनी यांचा एकत्रित उल्लेख (कंपनी) समूह असा केला आहे.) याची एकत्रित वित्तीय विवरण पत्राचे लेखापरिक्षण केले. या वि. विवरणपत्रामध्ये कंपनी समुहाचा दि. ३१ मार्च २०१५ रोजीचा एकत्रित ताळेबंद तसेच त्या तारखेला संपलेल्या वर्षाचे नफा व तोटा पत्रक आणि रोकडता प्रवाह विवरण पत्रक, तसेच महत्त्वाच्या लेखा धोरणांचा सारांश आणि इतर स्पष्टीकरणात्मक माहिती यांचा समावेश आहे. (यापुढे या सर्वाचा उल्लेख एकत्रित वित्तीय विवरण पत्रे असा केला आहे.)

**एकत्रित वितीय विवरणपत्रकांसबंधी व्यवस्थापनाची जबाबदारी :**

कंपनी अधिनियम २०१३ कायदा यातील कलम १३४ (५) मध्ये नमूद केलेल्या आशंयाप्रमाणे आणि या कायद्याचे कलम, १३३ ज्याचे सहवाचन कंपनी (लेखा) नियमावली २००४ यातील नियम ७ सोबत होते, त्यातील तरतुदीनुसार व भारतात सर्वसाधारणपणे स्वीकारलेल्या लेख्यांची तत्वे यांना अनुसरुन कंपनी समुहाचा एकत्रित वित्तीय स्थिती, वित्तीय कामगिरी आणि रोकडता प्रवाह यांचे सत्य व योग्य दर्शन घडविणारी एकत्रित वित्तीय विवरण पत्रके तयार करणे यास कंपनीचे संचालक मंडळ जबाबदार असते. तसेच या जबाबदारीमध्ये कंपनी समुहाच्या मतांचे रक्षण करण्यासाठी कायद्यातील तरतुदीप्रमाणे लेख्यांचे दस्तऐवजांचे योग्य प्रकारे जतन करणे आणि लबाडी व इतर अनियमितता शोधणे व त्यांना आळा घालणे, लेख्याची योग्य धोरणे आखणे व अमलांत आणणे, वस्तुनिष्ठा व सुज्ञ न्यायनिर्णय असे अंदाज करणे, अंतर्गत वित्तीय नियंत्रणासाठी रचना करुन ती अमलांत आणणे आणि जतन करणे, त्याद्वारे लेख्यांचे अचूक व परिपूर्ण दस्तऐवजांचे संचालन करणे, त्याद्वारे कोणतीही लबाडी किंवा आणि कोणतेही गैर विवरणापासून मुक्त अशी साथ व रास्त दर्शन घडविणारी एकत्रित वित्तीय विवरणपत्रे तयार करणे व ती सादर करणे आदि कामांचा समावेश होतो.

**लेखा परिक्षकांच्या जबाबदाऱ्या :**

या कायदयाच्या कलम १४३ (१०) यात दिलेल्या लेखा परिक्षणाच्या मानकानुसार अनुसरुन आम्ही लेखा परिक्षण करावे आणि त्या आधारे या वित्तीय विवरणपत्रांवर अभिप्राय व्यक्त करावेत, ही आम्हा लेखा परिक्षकांची जबाबदारी आहेत.

यासाठी आम्ही कायदयातील तरतुदी, लेख्यांची व लेखापरिक्षणाची जी मानके प्रकरणे कायदयातील तरतुदी व त्यानुसार केलेली नियमावली नुसार लेखापरिक्षणात समाााविष्ट

आवश्यक आहे, त्या विचारात घेतल्या आहेत. आम्ही आमचे लेखापरिक्षण कायद्याच्या कलम १४३(१०) मध्ये विहित केलेल्या लेखा परिक्षणांच्या मानकांनुसार केले आहे. या लेखामानकांनुसार आम्ही नैतिक गरजांचे अनुपालन करणे, आणि ही विवरणपत्रे कोणत्याही प्रत्यक्ष गैरविवारणपासून मुक्त आहेत किंवा कसे याचे सकारण आश्वासन मिळविणे आवश्यक आहे.

या वित्तीय विवरणपत्रातील रकमा व प्रकरणे याविषयी लेखापरिक्षणातून पुरावे मिळविणे या हेतूने लेखापरिक्षणाची कार्यपध्दती तयार करावी लागते. यासाठी निवडलेल्या कार्यपध्दती लेखापरिक्षकाच्या न्यायनिर्णयावर अवलंबून असतात. तसेच या वित्तीय विवरणपत्रातून लबाडी किंवा चुकीने काही प्रत्यक्ष गैरविवरण होण्याच्या धोक्याचे मूल्यमापन करणे याचाही समावेश असतो. या धोक्याचे मूल्यमापन करताना लेखा परिक्षक सत्य व रास्त दर्शन घडविण्यास सुत्रधारी कंपनीची अंतर्गत नियंत्रण प्रणाली विचारात घेतात. तसेच परिस्थितीस अनुरुप अशी लेखा परिक्षणाची कार्यपध्दतीची रचना करतात. मात्र कंपनी समुहाच्या अंतर्गत वित्तीय नियंत्रणाची पध्दत वित्तीय अहवालाच्या दृष्टीने पुरेशी आहे किंवा कितपत प्रभावी आहे यावर मत व्यक्त करण्याचा हेतू नसतो. लेखा परिक्षणात वापरलेल्या लेखा धोरणांच्या योग्यतेचे मूल्यांकन करणे, संचालक मंडळाने केलेल्या लेख्यांच्या अंदाजाचा कार्यकारण भावशोधणे आणि एकत्रित वित्तीय विवरणपत्राच्या सादरीकरणाचे सर्वागिण मुल्याकंन करणे याचाही समावेश असतो.

आमचा विश्वास आहे की, आम्ही मिळविलेले लेखापरिक्षण विषयक पुरावे पुरेसे व योग्य जागी लागू होणारे आहेत. आम्ही या एकत्रित वित्तीय विवरणपत्रावर आमचे लेखापरिक्षणाद्वारे केलेले आक्षेपित मत याला आधार देण्यासाठी आक्षेपित मताच्या परिच्छेदात नमूद केलेल्या मतांचा अपवाद आहे.

**आक्षेपित मतांचा आधार :**

आम्ही या अहवालाच्या **'जोडपत्र-अ'** यात वर्णन केलेल्या विषयांकडे लक्ष वेधू इच्छितो. काही प्रकरणात व्यक्तीश: किंवा एकूण गैरविवरण झाले असले तरी त्यासाठी आम्ही लेखापरिक्षणातून योग्य पुरावे देण्यास असमर्थ ठरलो. ते वित्तीय विवरणपत्रातून बाधक ठरु शकतील, त्याची माहिती जोडपत्रात दिली आहे. मात्र हे परिणाम प्रत्यक्ष असले तरी व्यापक नाहीत. या जोडपत्रात असे परिणामांचे वर्णन केले आहे. त्यांचे रास्त निश्चित/सांख्यीकरण करता येईल. एकत्रित वित्तीय विवरणापत्रामधील मूलतत्वांवर होऊ शकणा-या परिणामाची माहिती खालील तक्यात दिली आहे :-

(रु. लाखात)

| अनु. क्र. | लेखाशीर्ष | जादा विवरण | कमी विवरण |
|---|---|---|---|
| १. | खर्च :<br>- संशयास्पद कर्जाची तरतूद<br>- विलंबित भरण्याचा आकार | <br>-<br>- | <br>१६७०७<br>५५४६ |
| २. | दायित्वे : व्यापारी देणी | - | ५५४६ |
| ३. | मत्ता :व्यापारी येणी | १६७०७ | - |

**आक्षेपित अभिप्राय :**

आमची मते व आमची सर्वोतपरी माहिती व आम्हास दिलेली स्पष्टीकरणे आणि फक्त आमचा वरील 'पात्र मतांचा आधारे' या शीर्षकातील मते वगळता, वरील 'एकत्रित वित्तीय विवरणपत्राचे सहवाचन भर दिलेले विषय' या शीर्षकाच्या परिच्छेदातील बाबी सोबत केले असता, ही विवरणपत्रे सदर कायद्याच्या आवश्यकतांनुसार संबधित माहिती विहित पद्धदीनुसार देतात. तसेच कंपनी समुहाची दि. ३१ मार्च २०१५ रोजीची स्थिती, त्याच तारखेला संपलेल्या वर्षाचा कंपनी समुहाचा तोटा व रोकडता प्रवाह याचे, भारतात सर्वसाधारणपणे स्वीकारल्या जाणाऱ्या लेखामानकांनुसार, सत्य व योग्य दर्शन या एकत्रित वित्तीय विवरणपत्रातून घडते.

**विशेष लक्षवेधी प्रकरणे :**

आम्ही, एकत्रित वित्तीत विवरणपत्रात संदर्भ दिलेल्या विषयावरील आमचा अहवाल **जोडपत्र 'ब'** येथे दिला आहे. त्याकडे या अहवालाचा उपयोग करणाऱ्यांनी लक्ष देणे आवश्यक आहे. या विषयावरील आमच्या मतात सुधारणा केलेली नाही.

**इतर विषय :**

आम्ही औरंगाबाद पॉवर कंपनी लि. (महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. या सुत्रधारी कंपनीच्या संपूर्ण मालकीची उपकंपनी) वित्तीय विवरण पत्रांचे / वित्तीय माहितीचे लेखापरिक्षण केलेले नाही. यामधे या उपकंपनीची दि. ३१ मार्च २०१५ रोजी एकूण मत्ता रु. ६२८.६५ लाख, एकूण महसूल रु. ०.६९ लाख आणि त्या तारखेला संपलेल्या वर्षाचा निव्वळ रोकडता प्रवाह रु. ०.६३ लाख असा दिसत असून समूहाच्या एकत्रित वित्तीय विवरण पत्रामध्ये तो विचारात घेण्यात आलेला आहे.

औरंगाबाद पॉवर कंपनी लि. च्या वित्तीय विवरणपत्रांचे / वित्तीय माहितीचे लेखापरिक्षण दुसऱ्या अन्य लेखापरिक्षकांनी केलेले आहे. महावितरणच्या व्यवस्थापनाने त्याचे अहवाल आम्हास दिले. महावितरण कंपनी समुहाच्या एकत्रित वित्तीय विवरणपत्रामध्ये औरंगाबाद पॉवर कं. लि. या उपकंपनीच्या रकमेच्या संदर्भात आम्ही जी मते व्यक्त केली आहेत आणि त्या उपकंपन्यांची जी प्रकटने आम्ही कायद्याचे कलम १४३ यातील उपकमे (३) व (११) यातील शर्तीनुसार समाविष्ट केली आहेत. ती पुर्णपणे या दुसऱ्या लेखा परिक्षकांच्या अहवालावर आधारलेली आहेत.

**इतर कायदे व नियामक विषयांच्या आवश्यकता :**

१) केंद्र सरकारने कंपनी अधिनियम २०१३ मधील कलम १४३ चे उपकलम (११) यानुसार जारी केलेले कंपनीचे (लेखा परिक्षकांचे अहवाल) आदेश २०१५ (यापुढे 'आदेश' असा उलेख आहे) यातील आवश्यकते नुसार सुत्रधारी कंपनी व तिची भारतात संस्थापित झालेली उपकंपनी यांच्या लेखा परिक्षकांच्या अहवालातील अभिप्रायाच्या आधारे आम्ही सदर आदेशाचे परिच्छेद क्र. ३ व ४ यात विनिर्देशित केलेल्या विषयावर एक निवेदन आमचे जोडपत्र-क यात देत आहोत.

२) या कायद्याचे कलम १४३ (३) च्या आवश्यकतेप्रमाणे आम्ही अहवाल देतो की,

अ) आम्ही, आमचे सर्वोतपरी ज्ञान व विश्वास यानुसार, मात्र 'आक्षेपित अभिप्रायचा आधार' या परिच्छेदातील विषयांचे परिणाम/ सभाव्य परिणाम वगळता',आमच्या लेखा परिक्षणास आवश्यक असलेली शोधली व मिळविली आहे.

ब) उपरोक्त 'आक्षेपित अभिप्रायचा आधार' या परिच्छेदातील विषयांचे परिणाम / संभाव्य परिणाम वगळता, आमच्या मते कायद्यानुसार आवश्यक असणारी लेख्यांची योग्य ती पुस्तके व्यवस्थित ठेवण्यात आली आहेत असे आम्ही केलेला या पुस्तकांच्या परिक्षणातून आणि इतर लेखा परिक्षकांच्या अहवालातून दिसून येते.

क) या अहवालाशी संबधित एकत्रित ताळेबंद, एकत्रित नफा व तोटा पत्रक व एकत्रित रोकडता प्रवाह विवरण पत्रक ही सर्व एकत्रित वित्तीय विवरण पत्रके ती तयार करण्याच्या उद्देशाने जतन केलेला लेखा नोंद वहया /पुस्तकेयांच्याशी सहमती दर्शवितात.

ड) उपरोक्त 'आक्षेपित अभिप्रायचा आधार' या परिच्छेदातील विषयांचे परिणाम / संभाव्य परिणाम यांचा अपवाद वगळता, ही एकत्रित वित्तीय विवरणपत्रे कायद्यातील कलम १३३ मधे विनिर्देशित केलेली लेखा मानके - ज्यांचे सहवाचन कंपनी (लेखे) नियमावली २०१३ यातील नियम ७ सोबत होते त्यांचे अनुपालन करतात.

इ) वरील 'आक्षेपित अभिप्रायचा आधार' या परिच्छेदात वर्णन केलेले विषय हे आमच्या मते, कंपनी समुहाच्या कामावर विपरीत परिणाम करु शकतात.

एफ) महावितरण कंपनी समुहातील कंपन्या या शासकीय कंपन्या आहेत. त्यामुळे भारत सरकारच्या कंपनी व्यवहार मंत्रालयाची अधिसूचना क्र. एफ. नं. १/२/२०१४-सी. एल. व्ही. दि. ०५.०६.२०१५ यानुसार कंपनी अधिनियम २०१३ यातील कलम १६४ चे उपकलम २ यात दिलेल्या तरतुदी कंपन्यांना लागू नाहीत.

जी) लेखाचे जतन करणे आणि त्या संबंधित इतर विषय यां बाबतची पात्रता ही उपरोक्त 'आक्षेपित अभिप्रायचा आधार' परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे आहे.

एच) कंपन्यांचे (लेखा परिक्षण व लेखा परिक्षक) नियमावली २०१४ यातील नियम १२ यानुसार लेखापरिक्षणाच्या अहवलात समाविष्ट करावयाला इतर बाबी संबंधी, आमच्या मते व आम्हास दिलेली स्पष्टीकरणे यानुसार आम्ही पुढील बाबीचे निवेदन करतो :

१) 'आक्षेपित अभिप्रायचा आधार' या परिच्छेदात वर्णन केलेल्या विषयांचे परिणाम / संभाव्य परिणाम यानुसार प्रलंबित असलेल्या खटल्यांचा कंपनी समुहाच्या वित्तीय स्थितीवर काय प्रभाव पडू शकेल याविषयी कंपनी समुहाने एकत्रित वित्तीय विवरण पत्रांमध्ये काही प्रकटने केली आहेत किंवा कसे याबद्दल काहीही सांगण्यास आम्ही असमर्थ आहोत. यासाठी एकत्रित वित्तीय विवरणपत्रांची टिपा क्र. ३०.१ पहावी.

२) 'आक्षेपित अभिप्रायचा आधार' या परिच्छेदात वर्णन केलेल्या विषयांचे परिणाम / संभाव्य परिणाम यानुसार दिर्घ मुदतीच्या कंत्राटासंबधी जर काही तोटे होण्याचा अंदाज असला तर त्यासाठी लागू होणारी कायदे किंवा लेखामानके यातील आवश्यकते नुसार कंपनी समूहाने काही तजवीज केली किंवा कसे याबद्दल काही सांगण्यास

आम्ही असमर्थ आहोत. आम्हास दिलेली माहिती व स्पष्टीकरणे यानुसार या कंपनी समुहाने कोणतीही डेरिव्हेटीव्ह कॉइक्ट्स केली नाहीत. आणि

३) गुंतवणूकदार शिक्षण व संरक्षण निधी यात स्थानांतरीत करणे आवश्यक आहे, अशी कोणतीही रक्कम या कंपनी समुहाकडे नाही.

**खालील सनदी लेखापालांच्या फर्म्ससाठी व त्यांच्या वतीने :**

**मित्तल ॲण्ड असोसिएट्स**
सनदी लेखापाल,
एफ आर एन १०६४५६ डब्ल्यु

**बी. एन. केडीया ॲण्ड कंपनी**
सनदी लेखापाल,
एफ आर एन ००१६५२ एन

**कलानी ॲण्ड कंपनी**
सनदी लेखापाल,
एफ आर एन ०००७२२ सी

**सही** /-
**(हेमंत आर बोहरा)**
भागीदार
एम नं. १६५६६७

**सही** /-
**(एस.के. केडीया)**
भागीदार
एम नं. ०५२५७९

**सही** /-
**(एस.पी.झंवर)**
भागीदार
एम नं. ०७४४१४

**स्थळ : मुंबई**
**दि. : १९.१२.२०१५**

आमच्या अहवालातील 'पात्र मतांचा आधार' या शीर्षकांच्या परिच्छेदात संदर्भ दिलेले विषय.

**१. शासकीय अनुदाने, अर्थसहाय्य व ग्राहकांचे अशंदान :**

१. शासकीय अनुदाने, अर्थसहाय्य व ग्राहकांचे अंशदान यांच्या मान्यतेसाठी वित्तीय वर्ष २०१३-१४ पर्यंत महावितरण कंपनी समूहाचे लेखाधोरण खालीलप्रमाणे होते. ''लेखा मानक-१२, शासकीय अनुदानाचे लेखे करणे''. यात नमूद केलेल्या तत्वांच्या आधारे, स्थिर मत्तांच्या खर्चासाठी मिळालेल्या शासकीय अनुदानाच्या रक्मा भांडवली राखीव यामध्ये जमा केल्या जातात आणि या अनुदानाद्वारे निर्माण केलेल्या मत्ताच्या घसाऱ्याच्या समान रक्कम नफा तोटा पत्रकात स्थानांतरीत केली जाते. जी अनुदाने सशर्त मिळतात, त्यांना 'स्थगित उत्पन्न' मानले जाते व अनुदान मिळालेल्या वर्षापासून पंधरा वर्षाच्या मुदतीकरिता उत्पनामध्ये या रकमेचे समान स्थानांतरण केले जाते.

वरील धोरण विद्युत (पुरवठा) वार्षिक (लेखे) नियमावली १९८५ याचे परिशिष्ट-३, मधील खंड क्र.२.३३,२.३४,आणि २.३५ या आधारे ग्राहकांचे अंशदान याला लागू करण्यात आलेले आहे.

२. या वर्षी कंपनी समूहाने वरील लेखा धोरणात बदल केला.त्याबाबत ''महत्त्वाची लेखा धोरणे'' यातील टिपा क्र २ चा परिच्छेद ३ (सी) आणि टिपा क्र ३०.१० यात नमूद केलेले आहे.
या बदलामुळे पुढील परिणाम झाले.

(अ) अशा शासकीय अनुदानातून निर्माण केलेल्या मत्तांच्या आकारलेल्या घसाऱ्याच्या प्रमाणात या शासकीय अनुदाने, अर्थसाहय व ग्राहकांची अनुदाने, स्थगित केली नाहीत. हे लेखा मानक १२ शासकीय अनुदानाचे लेखे करणे/लेखा मानक १०: स्थिर मत्तांचे लेखे करणे, यांच्याशी अनुरुप नाही.

(ब) दि.०६.०६.२००५ ते ३१.०३.२०१४ या कालावधीत मिळालेली ग्राहकांची अंशदाने अर्थ साहय व अनुदाने यांच्या १/१५रक्कम ही यापूर्वी जमा केलेल्या रकमेनुसार कमी करुन तिचा लेखा मागील काळातील उत्पन्न रु. १,००,३५४.२६ लाख असा केला आहे. मागील लेखाधोरणानुसार अनुदानातून निर्माण केलेल्या मत्ताच्या घसा-याच्या समान रक्कम उत्पन्नात जमा करण्याच्या आवश्यकता, याबाबत पुरेसे व योग्य असे लेखापरिक्षणाचे

पुरावे उपलब्ध नव्हते. त्यामुळे लेखा मानक ५ यातील परिच्छेद ३२: कालावधीतील निव्वळ नफा व तोटा, मागील काळातील बाबी आणि लेखा धोरणातील बदल यानुसार लेखा धोरणात केलेल्या बद्लांचे परिणाम यांचे अनुपालन झालेले नाही.

**२. प्रगतीपथावरील भांडवली कामे व स्थिर मत्ता :**

१) टिप क्र. ३०.७ यात नमूद केल्याप्रमाणे भांडवली कामाच्या आदेशाचे योग्य व पूर्ण अभिलेख उपलब्ध नव्हते. त्यामुळे स्थिर मत्तांचे भांडवलीकरण केलेले नसणे किंवा ते विलंबाने करणे असे काही प्रकार आम्हास आढळले. याशिवाय भांडवलीकरणाची तारीख प्रमाणपत्राच्या तारीखेनंतरची मानली जाते, ती वापरात आणल्याच्या तारीखेनंतरची असून तशीच प्रत्यक्ष प्रमाणपत्रात प्रमाणित केलेली आहे. त्यामुळे भांडवली करणासाठी विलंब होवून त्यानुसार विलंबित मुदतीकरिता घसा-याच्या आकारावरही परिणाम झाला. तसेच सी डब्ल्यू आय पी चा आरंभ व दीर्घकाळ थकीत राहणे याच्या तपशीलाची पडताळणी करण्यास आम्ही असमर्थ आहोत. याचा एकत्रित वित्तीय विवरणपत्रावर होणाऱ्या परिणामांचा अंदाज करता येत नाही.

२) महत्त्वाची लेखाधोरणे यातील टिप क्र.२ चा परिच्छेद क्र ४ (अ) पहावा. कर्मचारी खर्च व कार्यालय आणि प्रशासकीय खर्चाची रक्कम रु. ३३,९४६ लाख यांचे भांडवलीकरण प्रगती पथावरील कामे यांच्या जादा १५ टक्के या दराने हंगामी तत्वावर यावर्षी करण्यात आले आणि असे खर्च प्रकल्पाचे बांधकाम किंवा स्थिर मत्तांचे संपादन किंवा त्या कामाच्या स्थितीत नेण्याचा खर्च यासाठी आहेत का हे निश्चित केले नाही.ते लेखा 'मानक १०: स्थिर मत्तांचा लेखा' याप्रमाणे नाही.

याशिवाय या वर्षात केलेले खर्च, स्थिरमत्तांच्या भांडवलीकरणाची प्रत्यक्ष तारीखेशिवाय पूर्ण वर्षासाठी वितरीत केले आहेत.

आम्हाला उपलब्ध करुन दिलेल्या अशा वाटपांच्या आधाराची पडताळणी करण्यासाठी लेखापरिक्षणाचे पुरेसे व योग्य पुरावे नसल्यामुळे आम्हाला त्यावर अभिप्राय देता येत नाही.

३) वित्तीय विवरण पत्रासोबतच्या ''महत्त्वाची लेखाधोरणे'' संबंधाचा टिपा क्र.२ चा परिच्छेद क्र.४ (बी) ही पहावी. यात प्रगती पथावरील भांडवली कामामध्ये भर करण्यासाठी खर्चाच्या उसनवारीची रु. १०,४९८.१४ लाख ही १२.३२ टक्के (या रकमेचा हिशोब मागील वर्षातील सरासरी व्याज दराने केला आहे) दराची रक्कम असून ती पात्रतेच्या मत्ता व व्यत्यय आलेले प्रकल्प यांची निश्चिती न करता ती देण्यात आली आहे. ही कृती ''लेखा मानक-१६: उसनवारीचे खर्च'' याच्याशी सुसंगत नाही. याशिवाय पुढे केलेल्या प्रगती पथावरील भांडवली काम या पात्र मत्ता असून त्यांच्या शिलकीवरील आवश्यक त्या व्याजाचे भांडवलीकरण केलेले नाही. लेखापरिक्षणाचे पुरेसे व योग्य पुरावे नसल्याने त्याचे प्रभाव निश्चित करता येत नाही. अशा वाटपाची पडताळणी करण्यासाठी लेखापरिक्षणाचे पुरेसे व योग्य पुरावे नसल्याने, आम्ही त्याचा एकत्रित वित्तीय विवरणपत्रावर होणाऱ्या परिणामांचे सांख्यिकीकरण करण्यास असमर्थ आहोत.

४) व्यवस्थापनाकडून यावर्षी स्थिर मत्तांची प्रत्यक्ष पडताळणी झालेली नाही. अशा प्रत्यक्ष पडताळणीच्या आधारे जर काही संभाव्य परिणाम वित्तीय विवरणपत्रांवर झाले तर तो निश्चितपणे सांगता येत नाही.

**३. घसारा :**

१) '' महत्त्वाची लेखा धोरणे'' यातील घसा-या संबंधीच्या टिप क्र २ आणि टिप क्र ३०.६ पहाव्यात. याविषयी आमचे असे निरीक्षण आहे की, काही प्रकरणात, स्थिर मत्तांचा घसारा योग्य प्रकारे अचूकपणे मोजलेले नाही. त्यात मत्ताचे उपयुक्त आयुष्य ठरविणे, वापराची तारीख, घसा-याचा दर इ. बाबत काही ठिकाणी विसंगती/विचलन आहे. याचे योग्य तपशील नसल्याने आम्ही अशा विसंगतीचे घसाऱ्याच्या रकमेवर आणि नंतर एकत्रित वित्तीय विवरणपत्रांवर होणाऱ्या परिणामांचे साख्यिंकीकरण करण्यास आम्ही असमर्थ आहोत.

२) वित्तीय विवरणपत्राची टिप क्र.३०.६ यात नमूद केले आहे की, सॅप-इआरपी यांची अंमलबजावणी करताना कंपनीने घसा-याचा पून:मोजणी पुर्वलक्षी प्रभावाने केली आहे आणि विविध स्थिर मत्तांवर हा घसारा जादा/कमी प्रमाणात निश्चित करण्यात आला. त्यामुळे मागील वर्षातील संचित घसारा यातून निव्वळ घसारा रु. ५१,२५५.५७ लाख उलट फिरवण्यात आला. आवश्यक माहिती उपलब्ध नसल्याने आम्ही मागील काळातील समायोजनांचा हिशोबांची पडताळणी करण्यास असमर्थ आहेत.

**४) व्यापारी येणी :**

१) लेखा पुस्तके आणि देयके करण्याची व वसुलीची सॉफट वेअर ज्यात समाविष्ट आहेत अशी आय टी डेटा बेस यानुसार मागील वर्ष २०१३-१४ मध्ये व्यापारी येण्यांचा संचित व मेळ न केलेल्या शिलकीची रु.२,२५,४४७ लाख एवढी रक्कम लेख्यांच्या पुस्तकात निर्लेखित करण्यात आली. कारण पुस्तकी शिल्लकीची आय टी डेटा बेस मधील शिलकी रकमेशी बरोबरी करावयाची होती. असे निर्लेखीकरण केल्यानंतरही दि.३१ मार्च २०१५ रोजीची लेखा पुस्तकानुसार व्यापारी येण्याच्या शिलकी, या आय टी डेटा बेसच्या आकडयाच्या तुलनेत रु. १६,७०७ लाखाने जास्त आहेत. याचा तपशील वित्तीय विवरणपत्राच्या टिप क्र.३०.४ मध्ये आहे. यामुळे याप्रमाणात व्यापारी येण्याचे विवरण जास्त झाले असून तोटयाचे कमी विवरण झाले आहे.

२) एकत्रित वित्तीय विवरण पत्रातील ''महत्त्वाची लेखा धोरणे'' यातील टिप क्र.२मधील परिच्छेद क्र.११ पहावा. यामध्ये असे नमूद केले आहे की, म.वि.नि. आयोग, ग्राहकांकडून येणे असलेल्या वार्षिक लेखातील १.५ टक्के या दराने संशयास्पद येण्याची तरतूद मान्य करतो. मात्र ही रक्कम वार्षिक लेखांमध्ये दाखविलेल्या येण्याच्या रकमेच्या ५ टक्केपेक्षा जास्त नसावी. या धोरणांच्या आधारे सुत्रधारी कंपनीने व्यापारी येण्याची चांगली व संशयास्पद अशी वर्गवारी केली आहे. आणि व्यापारी येण्यासाठी ठोक रक्कमेची तरतूदही केली आहे. मात्र असे करतांना व्यापारी येण्यांची वसूलीची स्थिती किती आहे हे पाहून निश्चित करणे, वर्षनिहाय विश्लेषण करणे, वसूलीसाठी केलेले प्रयत्न इ. बाबी विचारात घेतलेल्या नाहीत, याविषयी लेखा परिक्षणाचे पुरेशा प्रमाणातील अणि योग्य असे कागदोपत्री पुरावे नसल्याने आम्ही याबद्दल व्यापारी येण्याची चांगले व

संशयास्पद असे वर्गीकरण व त्यासाठी पारिणामकारक लेखापरिक्षणात्मक पुरावे नसल्याने त्यावर अभिप्राय व्यक्त कारण्यास आम्ही असमर्थ आहोत व्यापारी येणी व त्यासाठी सुत्रधारी कंपनीची तरतूद खालील प्रमाणे आहे.

(रु. लाखात)

| अनु. क्र. | लेखा पुस्तकांप्रमाणे येणी | थकीत रक्कम | केलेला तरतूद |
|---|---|---|---|
| १. | अल्प मुदतीची व्यापारी येणी | १५,८५,२७१.६२ | २३,७७९.०७ |
| २. | दीर्घ मुदतीची व्यापारी येणी | ४,०१,२३०.८२ | ६,२९५.०५ |
| | **एकूण** | **१९,८६,५०२.४४** | **३०,०७४.१२** |

५) **ग्राहकांकडील सुरक्षा अनामती :**

एकत्रित वित्तीय विवरणपत्रकांच्या टिप क्र. ३०.५ यात नमूद केल्याप्रमाणे लेखा पुस्तकातील आणि एम आय एस यातील ग्राहकांच्या सुरक्षा अनामतींच्या शिलकी या मेळ करणे व त्यानंतरचे समायोजन यांच्या अधीन लेखा पुस्तके व आय टी डेटाबेस यांनी शिलकीचे फरक खालीलप्रमाणे आहेत.

(रु. लाखात)

| सुरक्षा अनामत | पुस्तक नोंदीनुसार | आय टी डेटाबेस यानुसार | फरक |
|---|---|---|---|
| ग्राहकांकडून | ५,७७,३२४.८४ | ५,७२,१८९.९६ | ५,१३४.८८ |

पुरेसे व योग्य लेखापरिक्षणात्मक पुरावे नसल्याने सुरक्षा रकमेच्या प्रलंबित मेळांचे एकत्रित वित्तीय विवरणपत्रावर होऊ शकणा-या प्रभावा विषयी अभिप्राय व्यक्त करण्यास आम्ही असमर्थ आहेत.

६) **वस्तुसूची :**

१) टिप क्र. ३०.३ यात सांगितल्याप्रमाणे, सॅप प्रणालीची अमंलबजावणी करताना मंडळ कार्यालये, विभाग कार्यालये यांना त्यांच्याकडील माहिती, सॅप-इआरपी याकडे दिलेल्या अंतिम तारखेपर्यन्त पाठविण्याची गरज होती. मात्र काही विभाग त्यांची माहिती (डेटा) योग्यप्रकारे अपलोड करु शकलेली नाहीत. या संबंधीच्या वित्तीय प्रभावांचा लेखा वित्तीय विवरणपत्रात केला आहे. वस्तूसूचीतील तूट रु.३६,६११ लाखांचा अंदाज, कंपनीने मासा (MASA) पूर्वीचे वस्तूसूचीसाठी FABC (चे मोडयूल) आणि संबंधित लेखा कार्यालयात इआरपी - एस ए पी च्या अमंलबजावणीच्या तारखेला संबंधित तांत्रिक अधिका-यांनी प्रमाणित केलेले प्रत्यक्ष उपलब्ध वस्तूसूचीचे मूल्य खालीलप्रमाणे आहे :

(रु. लाखात)

| लेखाशीर्ष | इ आर पी अंमलबजावणीच्या तारखेचा फरक (वस्तूसूचीतील तूट) |
|---|---|
| प्रगतीपथावरील भांडवली कामे याकडे स्थानांतरीत केलेले | ८,५४४ |
| भाडांरातील वापरलेला माल व सुटे भाग | २५,६४५ |
| आतंर शाखा समायोजने | १,१६४ |
| डेटा (माहिती) स्थानांतरणातील फरक | १,२५८ |
| **एकूण** | **३६,६११** |

याबाबत संबंधित लेखा कार्यालयात इआरपी-सॅपच्या अमंलबजावणीच्या तारखेस तांत्रिक अधिका-यांनी प्रमाणित केलेली प्रत्यक्ष वस्तुसूचीचे कागदपत्र आणि मंडळाने दि.१२ डिसेंबर २०१५ रोजीची मंजूरी, या व्यतिरिक्त या वस्तुसूचीसंबंधी अन्य कागदपत्रे म्हणजे इशू पासेस (देण्याचे परवाने), इतर संबधित कागदपत्र तपशील इ. आम्हाला उपलब्ध झालेला नाही. त्यामुळे प्रगती पथावरील भांडवली काम या वर्षाचा तोटा, वस्तुस्थितीचे मूल्य आदिची पडताळणी करु शकलो नाही.

**७) लेख्यांची उपार्जित पध्दती :**

एकत्रित वित्तीय विवरणापत्रा सोबतची टिप क्र.२ ''महत्वाची लेखा धोरणे'' यातील परिच्छेद १ (बी) पहावा:-आमच्या लेखापरिक्षणाच्या काळात, आम्हाला ज्यांचा लेखा उपाजित / वाणिज्य तत्वानुसार करण्याऐवजी रोकडतेच्या आधारे करण्यात आला असे काही खर्च आढळले. यामध्ये विशेषकरुन दुरुस्ती व देखभालीचे खर्च आहेत.हे खर्च लेख्यांची मुलभूत गृहिते आणि कंपनीचे लेखा धोरण यांच्याशी सुसंगत नाही. त्यात लेखापरिक्षणाचा मागोवा नसल्याने आम्ही त्याचा नफा व तोटा पत्रकावर होणा-या परिणामाचा अंदाज करु शकत नाही.

**८) शिलकीची निश्चिती :**

एकत्रित वित्तीय विवरणपत्रातील टिप क्र. ३०.२ यानुसार व्यापारी येणी, कर्जे व अग्रिमे, ग्राहकांच्या जमा, शिलकी, विविध इतर खर्ची/जमा यांच्या शिलकी, शासनाकडील येणी, प्रवासातील रोकड, लेखा कार्यालयांतर्फे जमा करणारी बॅका व पोस्ट कार्यालये यातील शिलकी या सर्व बाबी, त्यांची खात्री, मेळ व परिणामस्वरुप समायोजने यांच्या अधीन आहेत. तिस-या पक्षाच्या शिलकीची खात्री करण्याची सुत्रधारी कंपनीने अनुसरलेली पध्दत आणखी शक्तीशाली करण्याची गरज आहे. जुन्या येण्यांचा मेळ व समझोते, त्यामुळे नफा व तोटयावर होणारे परिणाम, अपूर्ण किंवा अजिबात वसूली न होणे, आणि दायित्व अपूर्णपणे चुकती होणे या सर्वाबाबत योग्य अहवाल/तपशील उपलब्ध नसल्याने आम्ही त्यांचा अंदाज करु शकलो नाही.

## ९) टपाल खाती व बॅंक खात्यातील शिलकी :

१) एकत्रित वित्तीय विवरणपत्रातील टिप क्र.१८ व टिप क्र.३०.८ पहाव्यात. टपाल कार्यालयातील खाती व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकांच्या शाखा यातील ज्या शिलकीच्या खात्री बाबत माहिती उपलब्ध नाही ती खालील तक्यात दिली आहे.

निर्णयाविरोधात मा. मुंबई उच्च न्यायालय (एकल न्यायासन) यांचेकडे दि. १८ जून २००४ रोजी अपील दाखल केले. पुढे मा. मुंबई उच्च न्यायालय (एकल न्यायासन) यांनी दि. ३ ऑगस्ट २००५ रोजीच्या अपिल मंजूर केले व लवादाचा निर्णय बाजूला ठेवण्याचा निकाल दिला. यानंतर मे. दातार स्विच गियर्स लि. ने दि. २६ ऑगस्ट २००५ रोजी मा. मुंबई उच्च न्यायालय (एकल न्यायासन) यांचे दि. ३ ऑगस्ट २००५ रोजीच्या आदेशविरोधात अपील करुन ६७२/२००५ दाखल केले. या न्यायालयाच्या खंडपिठाने दि. २२ ऑक्टोबर २००५ रोजी एकल न्यायासनाचा आदेश बाजूला ठेवण्याचा निकाल दिला व हे प्रकरण पुन्हा एकल न्यायालयाकडे लवाद विनंती अर्ज क्र. ३७४/२००४ चा न्यायनिर्णय करण्यासाठी परत पाठविले. एकल न्यायालयाने दि. १० मार्च २००९ रोजी महावितरणच्या विरोधात निकालपत्र दिले.तसेच मा. न्यायमूर्ती यांनी दि. ३१ मार्च २००९ रोजी महावितरणला दि. ६ एप्रिल २००९ रोजी किंवा त्यापूर्वी, प्रोथोनोटरी ॲड सिनियर मास्टर बॉम्बे हायकोर्ट यांचेकडे रु.७५.०० कोटीची बॅक गॅरंटी सादर करण्याचा आदेश दिला. त्याप्रमाणे महावितरणने दि. ०४ एप्रिल २००९ रोजी त्यांच्याकडे कॅनरा बॅक, फोर्ट मुंबई यांचे मार्फत बॅक गॅरंटी सादरकेली.

महावितरणने मा. एकल न्यायालयाच्या आदेशाच्या विरोधात खंडपिठाकडे दि. २ में २००९ रोजी अपील दाखल केले. मा. खंडपिठाने कंपनीने दि.२० जून २००९ रोजी किंवा त्यापूर्वी रु. १७९.०० कोटी जमा करावे व उर्वरित रक्कम रु. ६५.०० कोटीसाठी बॅक गॅरंटी सादर करावी या अटीवर अंतरीम स्थगिती दिली. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे दि. २९ जून २००९ रोजी अपील करण्यात आले. याशिवाय महावितरणने मा. सर्वोच्च न्यायालयात दि १५ मे २००९ रोजी खंडपिठाच्या आदेशाच्या विरोधात स्पेशल लिव्ह पिटीशन (SLP )सादर केला. मा. सर्वोच्च न्यायालयाने दि २९ जून २००९ पर्यत स्थगिती देवून मुंबई खंडपिठाच्या आदेशात सुधारणा केली. या सुधारीत आदेशानुसार महावितरणला मा. उच्च न्यायालय मुंबई यांचेकडे रु.. ६५.०० कोटी जमा करणे व रक्कम रु. २००.०० कोटीची बॅक गॅरंटी सादर करणे आवश्यक होते. त्यानुसार महावितरणने रक्कम जमा केली व प्रोथो नोटरी ॲड सिनियर मास्टर बॉबे हायकोर्ट यांचेकडे बॅक गॅरंटी सादर केली. सदर (SLP) मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. दरमान्य सि.मास्टर प्रोथोनोटरी ऑफ बॉबे हायकोर्ट यांनी महावितरण रु. ७५.०० कोटीची बॅक गॅरंटी परत केली.

मा. मुंबई उच्च न्यायालयाने (अपील नं. १६६/०९) या प्रकरणी दि.१८/१०/२०१३ रोजी, महावितरणच्या विरोधात आदेश दिला. या आदेशात मा.खंडपिठ, उच्च न्यायालय, मुंबई यांनी लवादात दिलेले रु. १७९.९५ कोटी व लवादाच्या निकालाच्या तारखेपासूनचे व्याज देण्याचा आदेश कायम ठेवला. या आदेशाने व्यथित झालेल्या महावितरणने मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांचेकडे एस एल पी क्र ३६२६६/२०१३ हा विशेष विनंती अर्ज दि. २८ नोव्हेंबर २०१३ रोजी दाखल केला. त्याची सुनावणी झाल्यावर मा. सर्वोच्च न्यायालयाने मा. खंडपिठ, मुंबई उच्च न्यायालय यांच्या आदेशास हरकत घेवून त्याच्या कार्यवाहीस स्थगिती दिली.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशात, महावितरणला डिमांड ड्राफ्टच्या स्वरुपात रु.१००.०० कोटी व रु. १०० कोटीची बॅक गॅरटी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे जमा करण्यास सांगितले. त्यानुसार महावितरणने प्रोथोनोटरी ॲड सिनियर मास्टर बॉम्बे हायकोर्ट यांचेकडे दि. १५ जानेवारी २०१४ रोजी रक्कम जमा केली व बॅक गॅरेंटी दिली प्रोथोनोटरी ॲड सिनियर मास्टर, बॉबे हायकोर्ट, मुंबई यांनी त्यांच्याकडे न्यायालयाच्या पूर्वीच्या दि. १३/१२/२०१३ नुसार जमा केलेली रु. २०० कोटीची बॅक गॅरंटी परत केली.

- महवितरणने मा. मुंबई उच्च न्यायालय यांचेकडे जमा केलेली रु. १०० कोटीची बॅक गॅरंटी व रु.१०० कोटीचा डिमांड ड्राफ्ट दिली होता. मे डी एस एल ने मा. मुंबई उच्च न्यायालयातील प्रोथो नोटरी व सिनियर मास्टर, बॉबे हायकोर्ट यांचेकडे प्रकरण क्र.३६२६६ वर्ष २०१३ या प्रकरणाकरिता तेवढयाच रकमेची बॅक गॅरंटी देवून रु.१०० कोटी काढून घेतले
- मे.डी.एस.एल एंटरप्रायझेस यांनी पॅनलचे नुकसान व ताब्यात ठेवण्याचा खर्च यासाठी (नासिक न्यायालयात पूर्वीचा दावा क्र. १३८/२०१२) बी एस सी मुंबई येथे दावा क्र. १०२७/२०१४ दाखल केला असून त्यावर प्रक्रिया चालू आहे. योग्य वेळी पुढील तारीख लावली जाईल. यात (मे.डी एल एस एंटरप्रायजेस) यांचे नुसार रु.४२० कोटीचा दावा करण्यात आलेला आहे.
- में.डी.एस.एल ने मुंबई उच्च न्यायालयात दावा क्र. ३७६१ वर्ष २००० दाखल केला आहे. त्यात जुने एल.टी.एस.सी पॅनल (नंबर १२५५५) १९९३-९४ मध्ये केलेल्या मागणी आदेशात पोटी रु. ३४ कोटी नुकसान भरपाई दावा केला आहे. याबाबत मा. मुंबई उच्च न्यायालयात प्रकिया चालू आहे. (मा. न्यायमूर्ति श्रीमती रोशन दळवी यांच्या एकल न्यायासनापुढे) त्यांची सुनावणी झाल्यानंतर मा. न्यायमूर्ती यांनी या दाव्यात उलट तपासणी/साक्ष नोंदणी यांची नोंद करण्यासाठी कमिनशर नियुक्त करण्याचा आदेश दि. १८/२/२०१५ रोजी दिला. या कमिशनरचे शुल्क प्रत्येक सुनावणीसाठी रु. ७,०००/- असेल व ते दोन्ही बांजूनी भरावयाचे आहे.

ब) में. एशियन इलेक्ट्रॉनिक्स यांनी जून २००६ मध्ये स्थापित केलेले एल टी एल एम एस पॅनल काम करीत नसल्याने त्याचे भाडे देण्याचे थांबविले होते. हा वाद में. एशियन इलेक्ट्रॉनिक्सने लवादापुढे नेला व कंपनीवर रु. १५७१२ लाखाचा दावा केला. कंपनीने में एशियन इलेक्ट्रॉनिक्स विरोधात उलटा रु.५०२३१ लाखाचा दावा केला.हे प्रकरण लवादाकडे प्रलंबित आहे.

दोन्ही बाजू (म्हणजे महावितरण व एशियन इलेक्ट्रॉनिक्स लि.) यांच्या कागदपत्रांचे निरीक्षण पूर्ण झाले आहे. यानंतर में. एशियन इलेक्ट्रॉनिक्स लि. यांचा अंतरिम साहय देण्याचा आणि महावितरणाने रु. ५०३२१ लाखासाठी बॅक गॅरंटी मिळावी यासाठीचे अर्ज लवादाने फेटाळले.

मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद पिठाकडे, में एशियन इलेक्ट्रॉनिक्स लि. यांच्या विरोधात ३१ एफ आय आर व गुन्हेगारी अर्जावर प्रक्रीया चालू आहे. लवादापुढे कागदपत्र दाखल करण्याचे व ते नाकारण्याचे कामावर में. एशियन इलेक्ट्रॉनिक्स लि. ची तयारी केली नसल्याने ते प्रलंबित आहेत.

महावितरणाने में. लेक्स ग्लोबल लिगल कन्सलटट्ंस, नवी दिल्ली यांच्यामार्फत महावितरणच्या कर्मचाऱ्याचे साक्षी पुराव्याचे काम चालू आहे. त्यापैकी ३० साक्षीदारांनी हजेरी लावली व संबंधित कागदपत्रे तयार केली.

क) महानिर्मिती या सहोदर उपकंपनीने वर्षभरात महावितरणने उशिरा भरणा केल्याबद्दल विलंबित भरणा आकार/अधीभाराचा दावा केला. कंपनीची वित्तीय स्थिती अडचणीची असल्याने, महावितरणने महानिर्मितील हे विलंब आकार सोडून देण्याची विनंती केली. तसेच यावर उचित कार्यवाही करण्याची विनंती मराविमं सुत्रधारी कं. लि. ला केली.

मराविमं सूत्रधारी कंपनीने महानिर्मिती कंपनीला निर्देश दिले की, महावितरणवर आकारलेले विलंब भरणा आकार सोडून द्यावेत. त्यानुसार महावितरणने महानिर्मितीशी संपर्क साधून रु. ११२५९२ लाख हे विलंब शुल्क सोडून देण्याची विनंती केली आहे.

मराविम सूत्रधारी कंपनीचे निदेश व त्याला अनुसरुन महानिर्मितीला केलेली विनंती विचारात घेवून या वर्षाच्या वित्तीय विवरणपत्रकांत कोणतेही तरतूद केलेली नाही. महानिर्मितीकडून ते कायम होणे प्रलंबित असल्याने ती आकस्मिक दायित्वे म्हणून दाखविली आहे.

२) **शिलकीची खात्री:-** व्यापारी येण्यांच्या शिलकी, कर्जे व अग्रिमे इतर मत्ता चालू व चालू नसलेली दायित्वे या संबंधिताकडून मेळ होणे/खात्री होणे याच्या अधीन आहेत.

३) **वस्तूसूची :**

अ) या वर्षात, विविध तारखांना मंडळे व विभागांच्या कार्यालयात इ आर पी-एस एपी फायनान्स मोडयुल्सची अंमलबजावणी करण्यात आली. सदर इ आर पी-एस एपी प्रणाली संबंधित लेखाकार्यालयात अंमलबजावणीची तारीख संबंधित तांत्रिक व्यक्तींनी दिली, त्यानुसार प्रत्यक्ष उपलब्ध वस्तूसूचीचे मूल्य रु. ४७,८०५ लाख तर संबंधित जागेवरील वस्तूसूचीचे मूल्य रु. ८४,४१६ लाख अंतिम तारखेस होते असे लेखा नोंदी झाल्या होत्या या वस्तूसूचीची तूटीत रु. ३६,६११ लाखाने फरक झाला आहे. असे मटेरियल अॅट साईट (MASA) या पूर्वीच्या FABC इन्व्हेंटरी मोडयुलशी तुलना केल्यावर आढळले याचे कारण म्हणजे चालू वर्षी तसेच मागील काही वर्षात विविध लेखा कार्यालयामध्ये वापरलेल्या मालाची नोंद झाली नव्हती. त्यामुळे तूटींचा संचय कंपनीने आता प्रमाणबद्ध मेळ/अंदाज केले व या फरकांची नोंद खालीलप्रमाणे केली आहे. **(रक्कम ₹ लाखात)**

| लेखाशीर्ष | इ आर पी अमलबजावणीच्या तारखेचा फरक (वस्तू सूचीतील तूट) |
|---|---|
| प्रगतीपथावरील भांडवली कामे | ८,५४४ |
| वस्तूमाल व सुटे भागाचा वापर | २५,६४५ |
| आंतर शाखा समायोजने | १,१६४ |
| माहिती स्थानांतरणातील फरक | १२५८ |
| **एकूण** | **३६६११** |

ब) सॅप-इआर पी अंमलबजावणी दरमान्य तांत्रिक अडचणी उद्‌भवल्याने कंपनीने वस्तूसूचीच्या सूपर्ण शिलकी, अंमलबजावणीच्या तारखेला तांत्रिक व्यक्तीनी प्रमाणित केल्याप्रमाणे अपलोड केल्यानाहीत अशा शिलकी इ आर पी मध्ये वित्तीय वर्षाच्या अखेरीस किंवा वि.वर्ष २०१५-१६ मध्ये खालील तक्याप्रमाणे अपलोड केल्या जातील.
(रु. लाखात)

| इ आर पी - एस ए पी अमलबजावणीच्या तारखेला प्रत्यक्ष उपलब्ध वस्तूसूची मालाचे मूल्य | दि. ३१ मार्च २०१५ पर्यंत अपलोड केलल्या वस्तू सूचीतील मालाचे मूल्य | वित्तीय वर्ष २०१५-१६ मधील वस्तूसूचीचे अपलोड केलेले समायोजन |
|---|---|---|
| ९१६७४.३४ | १६०६६५.६० | ६८९९१.२५ |

आवश्यक समायोजन वित्तीय वर्ष २०१४-१५ मध्ये करण्यात आली.

४) **<u>व्यापारी येणी :</u>**

अ) बिलींग व रिकव्हरी सॉफ्टवेअर समाविष्ट असलेल्या आय टी डेटा बेस मधील आकडेवारीच्या तुलनेत, दि. ३१ मार्च २०१५ रोजी पर्यंतची व्यापारी येण्याची शिल्लक रु. १६,७०७ लाखापेक्षा जास्त होती, याचा तपशील असा.

(रु. लाखात)

| लेखा पुस्तकांप्रमाणे | एम आय एस आय टी डेटा बस प्रमाणे | फरक |
|---|---|---|
| **१६९०९६८** | **१६७४२६१** | **१६७०७** |

माहिती तंत्रज्ञानानुसार आणि लेखा पुस्तकानुसार ग्राहकांकडील व्यापारी येण्याच्या शिलकी या मेळ घालणे व त्यानुसार समायोजन करणे याच्या अधीन आहेत.

ब) मागील वर्षी, लेखा पुस्तके व आय टी डेटाबेस यातील संचित, मेळ न झालेल्या रु. २,२५,४४७ लाखाच्या शिलकी, विश्लेषणानंतर निर्लेखित करण्यात आल्या. विश्लेषणात उघड झाले की प्रणालींचे एकात्रिकीकरण न होणे, यात होणारा मोठया प्रमाणात मानवी हस्तक्षेप, कुशल कर्मचाऱ्यांचा अभाव यामुळे विविध स्वरुपाच्या चुका कंपनीच्या लेखा पुस्तकात, ग्राहकांच्या देयकांची नोंदी करताना झाल्या.

मेळ घातल्यानंतर उघडकीस आले की, लेख्यांच्या पुस्तकातील रक्कम ही ग्राहकांच्या व्यक्तिगत लेजर मधील रकमेच्या तुलनेत जास्त होती. याचा अर्थ लेख्यांच्या पुस्तकातील दाखवलेली रक्कम प्रत्यक्ष ग्राहकांकडून वसूल होण्यासारखी नव्हती. या समस्येवर लेखा परिक्षण समितीमध्ये चर्चा झाली. व संचालक मंडळाने बुडीत कर्जे निर्लेखित करण्यास मान्यता दिली. (कारण ही रकम जरी वसूली योग्य रकम अशा प्रकारे प्राप्तीच्या लेख्यांमध्ये असली तरी ती प्रत्यक्षात वसूल होण्याजोगी नव्हती.)

मात्र चालू वित्तीय वर्षात असे निदर्शनास आले की, लेखा पुस्तके व आय टी डेटाबेस यामध्ये व्यापारी येणी रु. १६,७०७ लाखाचा अद्यापही फरक आहे. असे दिसण्याचे मुख्य कारण म्हणजे मेळ करताना मार्च २०१४ या महिन्याकरीता ग्राहकांच्या देयकांचा आय.टी.डेटाबेसमध्ये येणे म्हणून विचार करण्यात आला नव्हता. कारण त्याची नियत तारीख एप्रिल २०१४ मध्ये होती.

५) **<u>ग्राहकांकडील सुरक्षा अनामती :</u>**

लेखा पुस्तके व एम आय एस यातील ग्राहकांच्या सुरक्षा अनामती या मेळ व त्यानुसार समायोजन करणे याच्या अधीन आहेत. लेखा पुस्तके व आय टी डेटाबेस यातील शिलकींचा फरक खालीलप्रमाणे आहे.

(रु. लाखात)

| तपशील | लेखा पुस्तकांप्रमाणे | एम आय एस प्रमाणे | फरक |
|---|---|---|---|
| ग्राहकांकडील सुरक्षा अनामती | ५७७३२४.८४ | ५७२१८९.९६ | ५१३४.८८ |

सॅप-इआरपी अंमलबजावणीत शिलकींचा मेळ केला नसल्याने हा फरक दिसतो. आवश्यक ते मेळ व त्यानुसार समायोजने वित्तीय वर्ष २०१५-१६ मध्ये केले जातील.

**६) घसारा :**

अ) सॅप-इआर पी अंमलबजावणीच्या वेळी, स्थिर मत्तांची जुन्या माहितीची पुन्हा पडताळणी करताना, या पूवीच्या काही वर्षात स्थिर मत्तांच्या घसाऱ्यात काही विसंगती आढळल्या. कंपनीने नंतर त्या नव्याने अंमलात आणलेल्या सॅप-इआर पी प्रणालीतील घसाऱ्याचा भूतलक्षी पध्दतीने पुन्हा हिशेब केला. तसेच नियामक(MERC) यांच्या आवश्यकतेनुसार विविध स्थिर मत्तांवर आकारलेला घसारा जास्त / कमी असल्याबद्दल खातर जमा केली. निव्वळ रु. ५१२५५.५७ लाख निव्वळ घसारा (यात नियमकानुसार घसारा लावण्याचा पध्दतीत बदलानुसार झालेल्या परिणामाचा समावेश आहे.) आधीच्या वर्षातील संचित घसाऱ्याचा उलट फिरविण्यात आला. त्याचा तपशील खाली दिला आहे.

(रु. लाखात)

| | |
|---|---|
| आधीच्या वर्षातील जादा तरतुद | १००६७६.४२ |
| आधीच्या वर्षातील अल्प तरतुद | ४९४२०.८६ |
| निव्वळ फरक | ५१२५५.५७ |

ब) या वर्षी महवितरणाने घसारा आकारणीसाठी (म.वि.नि आयोगाचे बहुवर्षीय वीज दर नियमने २०११) दि. १/४/२०१३ पासून लागू केली. त्यानुसार घसारा त्या आधारे आकारण्यात आला आहे. लेख्यांच्या अंदाजातील यातील बदलामुळे मागील वर्षाकरिता रु. ११९८६ लक्ष एवढा घसारा आकारणी केली.

क) म.वि.नि आयोगाची नियामके २०११ यानुसार चालू वर्षी घसारा आकारणी करताना काही विसंगती झाल्या. त्यामुळे सांख्यिकी करणाची खात्री नसल्यामुळे काही ठिकाणी सदोष आकारणी झाली आहे.

**७) प्रगतीपथावरील भांडवली कामे व स्थिर मत्ता :**

कंपनीने प्रगतीपथावरील भांडवली कामाच्या बाबतीत योग्य अभिलेख केलेले नाहीत. त्यामुळे आदेशाप्रमाणे पूर्ण झालेल्या काही कामांचे भांडवलीकरण झालेले नाही किंवा तांत्रिक कर्मचा-यांनी दिलेल्या पूर्णतेच्या प्रमाणपत्राच्या आधारे केले, परंतु ज्या तारखेला ही पूर्ण झालेल्या मत्तांचा वापर सुरु केला ती विचारात न घेता भांडवलीकरण केले आहे. त्यामुळे काही ठिकाणी घसारा अजिबात आकारलेला नाही किंवा/ कमी आकारला आहे.

**८) टपाल-कार्यालये, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंका इ. ठिकाणाच्या शिलकी :**

मंडळ / विभाग कार्यालयात संबंधित टपाल कचे-या आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेतील शिलकी कायम केल्याची माहिती उपलब्ध नाही. क्षेत्रीय कार्यालयातर्फे जिल्हा म.स.बॅंका व स्थानिक टपाल कार्यालये यांचेकडे शिलकीची खातरजमा करण्यासाठी व लेखापत्रके मिळविणे यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे. ही कामे त्वरेने करावी व लेखा पुस्तकाप्रमाणे डी.सी.बॅंकेला दिलेली विवरण पत्रे यानुसार शिलकीचा मेळ घालावा, व फरकांच्या बाबींची नोंद घेवून मेळ सबंधीची पत्रके तयार करावीत असे आदेश दिले आहे.

**९) बॅंक मेळ विवरण पत्रे :**

राष्ट्रीकृत बॅंकामधील कार्यरत व निष्क्रीय खात्यांच्या प्रकरणी, बहुतेक सर्व लेखा कार्यालयांत मेळ केला जातो. मात्र योग्य माहितीच्या अभावी मेळ करताना काही बाबी प्रलंबित आहेत. क्षेत्रीय कार्यलयांना मेळ करताना बाबींचा योग्य लेखे करण्यासाठी उचित आदेश देण्यात आले आहेत.

**१०) शासकीय अनुदाने/अर्थसाहय व ग्राहकांचे अंशदान यांच्या लेख्यामध्ये बद्‌ल :**

स्थिर मत्ता करिता मिळणारी शासकीय अनुदाने व ग्राहकांचे अंशदान 'भांडवली राखीव' यात जमा करुन कंपनी अशी अनुदाने आणि ग्राहकांच्या अंशदानातून निर्माण केलेल्या स्थिर मत्तांच्या घसा-याच्या सममूल्याची रक्कम नफा व तोटा पत्रकात जमा करत असे.

मात्र यावर्षी कंपनीने अशा रकमा मिळाल्याच्या वर्षापासून पंधरा वर्षाच्या मुदतीपर्यंत नफा व तोटा पत्रकात त्याच्या समान रकमा जमा कराव्यात असा लेखा धोरणात बदल केला कारण अशा बदलामुळे वित्तीय विवरण पत्रात त्यांचे अधिक योग्य प्रकारे सादरीकरण करता येते. असा कंपनीचा विचार आहे. लेखा धोरणात बदल करण्यासाठी, लेखा मानक ५ च्या परिच्छेद २९ ''कालावधीतील निव्वळ नफा किंवा तोटा, मागील काळातील बाबी व लेखा धोरणात बदल'' यामध्ये मार्गदर्शन केले आहे. ते असे

**''जर संविधानानुसार वेगळे लेखा धोरण स्विकारण्याची आवश्यकता असेल किंवा अन्य लेखा मानकांचे अनुपालनासाठी किंवा जर अशा बद्‌लामुळे सदर उदयोगांच्या वित्तीय विवरण पत्रांचे अधिक योग्य प्रकारे सादरीकरण होणार असेल तरच फक्त लेखा धोरणात बद्दल करावा.''**

मागील वर्षाच्या वित्तीय लेखापत्रावरील स्वतंत्र लेखापरिक्षकांच्या अहवालात परिच्छेद ६ (vii) यात लक्ष वेधण्यात आले होते, त्याचा तसेच व्यवसायाचे स्वरुप व आकारमान यांचा विचार केल्यानंतर कंपनीला अनुदाने/ग्राहकांचे अंशदान यातून निर्माण केलेल्या मत्तांच्या घसा-याच्या सममूल्य रकमा नफा व तोटा पत्रकात लेखा मानक १२ प्रमाणे जमा करण्यात येणारी व लेखापरिक्षकांना लेखापरिक्षणांसाठी पुरेसा मार्ग दर्शन देण्यात येणारी व्यवहार्य अडचण लक्षात आली होती.

याशिवाय लेखामानक ५ यातील परिच्छेद ३० यात नमूद केले आहे की, नवीन लेखा धोरणामुळे उद्योगाची स्थिती कामगिरी किंवा रोकडता प्रवाह यांच्याविषयी अधिक महत्वाची व विश्वसार्ह माहिती मिळते आणि वित्तीय विवरणपत्रांमधून प्रसंगाचे किंवा व्यवहाराचे अधिक समर्पक सादरीकरण घडते.

व्यवस्थापनाचा विश्वास आहे की, नवीन लेखाधोरणामुळे कंपनीच्या वित्तीय स्थिती संबंधी अधिक सुसंबंध व विश्वासार्ह माहिती मिळत आहे.

लेखाधोरणातील या बदलामुळे वर्षातील इतर उत्पन्न अपवादात्मक बाबी यात रु. १००३५४.२६ लाखाची नोंद झाली. जर लेखा धोरणात बदल केला नसता तर या वर्षाचा लेखा याप्रमाणात वाढला असता.

**११) खेळत्या भांडवलच्या सोयीसाठी रचना :**

बॅकाच्या गटासोबत कन्सटियिम खेळत्या भांडवलाच्या सोयीसाठी निधी आधारीत  बिना निधी आधारित रचना करण्यात आली आहे. त्यामध्ये रोख जमा सोय (कॅश क्रेडीट फॅसिलिटी) आणि खेळते भांडवल मागणी कर्ज यांचा समावेश आहे. एकूण रक्कम रु. ५८४४५० लाख (मागील वर्षी रु.४९७००० लाख) असून त्याची कन्सॉटियिम बॅकात केलेल्या व्यवस्थेचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| तपशील | कॅनरा बँक | महाराष्ट्र बँक | बँक ऑफ इंडिया | आय डी बी आय | युनायटेड बी ओ आय | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| निधी आधारीत | १२०००० | ४८७५० | ३४००० | १५००० | ३०००० | २४७७५० |
| विना आधार निधी | १९५००० | ११७०० | ९५००० | ३५००० | ० | ३३६७०० |
| **एकूण** | **३१५०००** | **६०४५०** | **१२९०००** | **५००००** | **३००००** | **५८४४५०** |

उपरोक्त खेळत्या भांडवलाच्या सोयीला गहाणवट म्हणून कंपनीच्या नॉन एस्कोड संर्कलमधील सध्याची व भविष्यातील नोंदीकृत कर्जे ठेवण्यात आला आहेत. ग्रामीण विदयुतीकरण महामंडळाकडून रु.७७०८३.०० लाखाचे मागील वर्ष रु. १३९५८३.३३ लाख मध्यम मुदतीचे कर्ज मिळविण्यात आले. त्यासाठी तारण म्हणून विद्यमान मत्ता ठेवल्या व मराविमं सूत्रधारी कंपनीने हमी दिली.

**१२) <u>नियामक मत्ता :</u>**

म.वि.नि. आयोगाने प्रकरण क्र. १२१ वर्ष २०१४ यामध्ये दि.२६/०६/२०१५ रोजी दिलेल्या आदेशानुसार वित्तीय वर्ष २०१३-१४ च्या समायोजनास मंजूरी दिली. ती विचारात घेवून वर्ष २०१३-१४ मध्ये निर्माण केलेल्या रु. ३९५७९ लाख या रकमेच्या नियमक मत्ता, चालू वर्षी उलट फिरविण्यात आल्या. वि.वर्ष २०१४-१५ साठी रु. २२४००.०० लाखाच्या नियामक मत्तांची तरतूद केली आहे.

**१३) <u>विना देयक महसूल :</u>**

**विनादेयक महसूलामध्ये, इतर बाबीसोबत खालील गोष्टीचाही समावेश होतो :**

कंपनीने, म. वि. नि. आयोगाच्या दि. ११ जून २०१४ रोजी प्रकरण क्र.३८ वर्ष २०१४ च्या आदेशातील वसुली यंत्रणा मान्य न करता, विनंती अर्ज केला होता. आयोगाने त्यातील रु. १६३९०० लाखाची महसूलातील दरी मंजूर केली. या रकमेस वि.वर्ष २०१३-१४च्या लेखा पुस्तकात ‘महसूल’ म्हणून मान्यता देण्यात आली. मात्र, आता मा.म.वि.नि आयोगाने आपला बहुवर्षीय दर आदेश दि. २६ जून २०१५ प्रकरण क्र. १२१ वर्ष २०१४ यात दिलेला नुसार त्याची दि. ०१ जून २०१५ पासून वसुली करण्यास परवानगी दिली आहे. ग्राहकांकडून वर्ष २०१४-१५ मध्ये कोणतीही वसुली केली नसल्याने सदर रु. १६३९०० लाख ही रक्कम विनादेयकाच्या वसुली योग्य महसूल म्हणून पुढे नेण्यात आली आहे.

**१४) <u>वीज दरातील सवलतीसाठी महाराष्ट्र शासनाचे अर्थसहाय्य :</u>** विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ६१ व ६२ अनुसार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास वीज दर निश्चित करण्याचे अधिकार आहेत. तर या कायद्याचे कलम ६५ नुसार राज्य शासनास, कोणत्याही ग्राहकास किंवा ग्राहकांच्या वर्गास वीज दरात सवलती देण्याचे अधिकार आहेत. राज्यशासनाने अशा ग्राहकांना दिलेल्या अर्थसाहयाची रक्कम कंपनीकडे भरावयाची असते. मात्र ही सवलत कंपनीला नाही. त्यामुळे कंपनी लेख्यांच्या वहीत या सवलतीच्या अर्थसाहयाची नोंद महाराष्ट्र शासनाकडून मिळण्याजोगी रक्कम अशी करते आणि म.वि.नि. आयोगाच्या दराप्रमाणे वीज विक्रीचा महसूल नोंदविते ग्राहकांचे अर्थसहाय्य यांची नोंद ‘अर्थसाहय उत्पन्न’ अशी केली जात नाही.

म.वि.नि आयोग वीज दर निश्चित करताना, राज्यशासनाने कोणत्याही ग्राहकास / ग्राहकांच्या वर्गास दिलेल्या सवलतींचा विचार करीत नाही. म.वि.नि. आयोगाने निश्चित केलेले वीज दर हे पूर्ण दर असतात. त्यात कोणतेही अर्थसाहयाचे / सवलतीचे दर नसतात. म्हणून वीज विक्रीचा महसूल यांची नोंद सवलतीच्या दराचा महसूल अशी न करता म.वि.नि. आयोगाच्या दराने म्हणजे कोणत्याही ग्राहकांस / ग्राहकांच्या वर्गास राज्यशासनाने दिलेली सवलत /अर्थसाहय याच्याशिवाय असलेला दर अशी केली जाते. राज्यशासनाने दिलेले अर्थसाहय म्हणजे संबंधित ग्राहक / ग्राहक श्रेणी यांच्या वतीने मिळालेली सवलत / अर्थसाहयाच्या मर्यादेपर्यंत वीज देयकाची अंशत करण्यात येणारी केवळ रक्कम आहे.

या वर्षी कंपनीने रु. ११२८११४ लाख (मागील वर्ष रु.६,०३,०१२ लाख) एवढी रक्कम महाराष्ट्र शासनाने ग्राहकांना / ग्राहक श्रेणीला दिलेले अर्थसाहयाच्या एकूण सवलत म्हणून लेखानोंद केली आणि कृषी संजिवनी योजना या महाराष्ट्र शासनाच्या योजनेतंर्गत ग्राहकांची थकबाकी निर्लेखित करण्यासाठी रु. ४१७३४ इतकी नोंद केली महाराष्ट्र शासनाकडून इतकी नोंद केली आहे. महाराष्ट्र शासनातून रु.१०४९९६१.०० लाख (मागील वर्षी रु. ५,०७,६३० लाख) आणि शिल्लक रक्कम रु. १,१९,८८६.८६ लाख (मागील वर्षी रु.१,४४,८१६ लाख) ही महाराष्ट्र शासनाकडून ३१ मार्च २०१५ पर्यत मिळण्याजोगी आहे.

**१५) <u>वितरण फ्रॅंचायजी करार खंडित करणे :</u>**

औरंगाबाद येथे निर्देशित केलेले वितरणाचे क्षेत्र डी एफ मे.जी टी.एल लि यांना देण्याचा करार दि. १० नोव्हेंबर २०१४ पासून खंडित केला आहे. आणि हे 'डी एफ' क्षेत्र कंपनीने संचालनासाठी पुन्हा आपल्या ताब्यात घेतले आहे. मे.जी.टी. एल. लि. यांचेकडील अंतिम येणी घेण्यासाठी वाटाघाटी करण्यात येत आहेत. म्हणून मे जी टी एल लि. कडून येणे असलेले रु.२२५४१.०० लाख लेखापुस्तकात प्रतिबिंबित झाले असून ते अंतिम समझोत्याच्या अधीन आहेत आणि त्याबाबत रु. १२६०२.०० लाखाची हंगामी तरतूद केली आहे.

**१६) <u>लेखा मानक १५ कर्मचारी लाभ</u>**

**नोकरीनंतरचे लाभ :**

**व्याख्यांकित लाभ योजना :**

**भविष्य निर्वाह निधी :**

कंपनी, भाविष्य निर्वाह निधीसाठीचे अंशदान एका व्याख्यांकित निवृत्ती लाभ योजनेत करते. या भविष्य निर्वाह निधीचे प्रशासन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे अंशदान भविष्य निर्वाह निधी विश्वस्त संस्था यातील विश्वस्तांमार्फत होते. या योजनेनुसार कंपनीला निवृत्ती लाभाच्या योजनेकरीता वेतनाच्या निर्देशत टक्केवारीनुसार अशंदान भरावे लागते.

कंपनी लेखा मानके नियमावली २००६ द्वारे अधिसूचना केलेले कर्मचा-यांच्या लाभसंबंधीचे लेखा मानक १५ (सुधारीत) यातील मार्गदर्शनानुसार मालकांनी स्थापित केलेला भविष्य निर्वाह निधी ही व्याख्यांकित केलेली लाभांची योजना मानली जाते. कारण त्यात समाविष्ट कर्मचा-यांसंबंधी कोणताही व्याजाचा तुटवडा निर्माण झाल्यास त्याची भरपाई करण्याचे कंपनीवर बंधन असते. व्यवस्थापनाच्या मते, भविष्य निर्वाह निधीच्या दायित्वाची विश्वासाने मोजणी

इंडियांचे मार्गदर्शन उपलब्ध नाही. त्यामुळे उपरोक्त लेखा मानक १५, ज्याचे सहवाचन अकाऊटंस स्टॅंडर्ड बोर्ड गायडन्स सोबत होते, त्यातील आवश्यकतेनुसार संबंधित इतर प्रकटने सध्या करण्याच्या स्थितीत कंपनी नाही, मात्र वर्षाच्या अखेरीस लाभार्थ्यांना दयावयाच्या व्याजात कोणतीही तूट नसल्याने कोणत्याही दायित्वाची तरतूद करणे राहिलेले नाही.

एकूण दायित्वाच्या तुलनेत निधीच्या स्थितीत जर काही तूट /आधिक्य असेल तर कंपनीतर्फे त्यांचे जादा अंशदान केले जाते आणि त्यास खर्च / उत्पन्न अशी मान्यता दिली जाते या वर्षभरात अखेरीस योजनेतील मत्तांचे रास्त मूल्य हे अभिदान व व्याज याच्या दायित्वापेक्षा कमी असून ते खालील तक्यात दिले आहेत.

२) सी पी एफ ट्रस्टच्या व्यवस्थापनातील निधीची मत्ता व दायित्वे यामध्ये कंपनीच्या वाटयाची व ताळेबंदात मान्य केलेली रक्कम.

| अनु | तपशील | ३१ मार्च २०१५ रोजी संपलेल्या वर्षासाठी (रक्कम रु. लाखात) |
|---|---|---|
| १. | कर्मचाऱ्यांना वर्षाअखेरीस देय असलेले अभिदान व व्याज यांचे दायित्व | ५०१४८१.३१ |
| २. | योजनेतील मत्तांचे वर्षा अखेरीस रास्त मूल्य | ५०७२४०.२९ |
| ३. | अधिक्य | ५७५८.९८ |

**३) योजनेतील मत्तांचे वर्णन :**

| अ.क्र. | तपशील | ३१ मार्च २०१५ रोजी संपलेल्या वर्षांसाठी ( % टक्केवारीत ) |
|---|---|---|
| १ . | केंद्र सरकारच्या प्रतिभूती | १८.२८ |
| २ . | राज्य शासनाच्या प्रतिभूती | १५.२७ |
| ३ . | सार्वजनिक क्षेत्रातील बंधपत्रे (बॉंड्स) | ३३.९५ |
| ४. | खाजगी क्षेत्रातील बंधपत्रे | ०.८६ |
| ५. | विशेष ठेव योजना | ३१.६४ |

**४) उपदान (निधी नसलेली व्याख्यांकित लाभ योजना) :**

संस्थेच्या सर्व कर्मचा-यांना पेमेंट ऑफ ग्रॅच्युइटी ॲक्ट २०१० आणि एम एस ई बी ग्रॅज्यईटी रेग्युलेशन १९६० या पैकी कर्मचाऱ्यांना जी फायदेशीर असेल त्यातील तरतूदीनुसार उपदान देय असते.

**५) रजा रोखीकरण लाभ (निधी नसलेली व्याख्यांकित लाभ योजना) :**

कंपनीने कर्मचारी सेवा नियम २००५ नुसार सर्व कर्मचा-यांना रजा राखीव देय असते. पगारी रजा (इएल) व अर्ध सरासरी पगारी रजा यांचा संचय अनुक्रमे ३०० व ३६० दिवस करता येतो.

६) **व्याख्यांकित लाभ योजना:-** उपदान व दीर्घ मुदतीची भरपाई गैरहजेरी ३१ मार्च २०१५ च्या विमागणिती मूल्यांकानानुसार आणि वित्तीय विवरणपत्रात 'कर्मचारी लाभ योजना' म्हणून मान्यता दिल्याप्रमाणे आहे. याशिवाय कंपनीने नियोजित मत्तांमध्ये गुतंवणूक केलेली नाही.

लेखा मानक १५ नुसार उपदान व रजा रोखीकरण यांचे प्रकटीकरण खालील प्रमाणे आहे.

**तक्ता नं. - १**

(रु. लाखात)

| | रजा रोखीकरण | | उपदान | |
|---|---|---|---|---|
| **प्रक्षेपित लाभ बंधनाचा मेळ घालणे** | **१ एप्रिल १४ ते ३१ मार्च १५** | **१ एप्रिल १३ ते ३१ मार्च १४** | **१ एप्रिल १४ ते ३१ मार्च १५** | **१ एप्रिल १३ ते ३१ मार्च १४** |
| वर्षाच्या आरंभीचे प्रक्षेपित लाभ बंधने | १४९०२१ | १२१२५५ | १८७४३५ | १५८४२५ |
| चालू सेवा खर्च | १३६०१ | १०८३८ | ९५७१ | ७४८५ |
| व्याज खर्च | १२३४९ | ९१४४ | १५२५८ | ११८५८ |
| प्रत्यक्ष योजनेतील सहभागी झालेल्यांचे अंशदान | - | - | - | - |
| विमा गणितानुसार (लाभ) / हानी | ३७९५६ | २५९१० | ५२८८५ | ३५५२८ |
| परकीय चलन दरातील बदल | - | - | - | - |
| दिलेला लाभ | (२९५८०) | (१८१२५) | (४३१८०) | (२५८६०) |
| मागील सेवा खर्च | - | - | - | - |
| कपातीमुळे हानी / (लाभ) | - | - | - | - |
| समझोत्यामुळे संपलेली दायित्वे | - | - | - | - |
| **वर्षाच्या अखेरीस प्रक्षेपित लाभ बंधन** | **१८३३४७** | **१४९०२१** | **२२१९६८** | **१८७४३५** |

**तक्ता नं. - २**

(रु. लाखात)

| | रजा रोखीकरण | | उपदान | |
|---|---|---|---|---|
| **ताळेबंदातील रक्कम** | **१ एप्रिल १४ ते ३१ मार्च १५** | **१ एप्रिल १३ ते ३१ मार्च १४** | **१ एप्रिल १४ ते ३१ मार्च १५** | **१ एप्रिल १३ ते ३१ मार्च १४** |
| वर्षाच्या अखेरीस प्रक्षेपित लाभाची बंधने | १८३३४७ | १४९०२२ | २२१९६८ | १८७४३६ |
| योजनेतील मत्तांचे रास्त मूल्य | - | - | - | - |
| निधीतील स्थिती मत्ता / ( दायित्व) | (१८३३४७) | (१४९०२२) | (२२१९६८) | (१८७४३६) |
| निधीत नसलेली प्रक्षेपित लाभाची बंधने | - | - | - | - |
| अद्याप मान्यता नसलेल्या मागील काळातील सेवा खर्च | - | - | - | - |

(रु. लाखात)

| | रजा रोखीकरण | | उपदान | |
|---|---|---|---|---|
| **ताळेबंदातील रक्कम** | **१ एप्रिल १४ ते ३१ मार्च १५** | **१ एप्रिल १३ ते ३१ मार्च १४** | **१ एप्रिल १४ ते ३१ मार्च १५** | **१ एप्रिल १३ ते ३१ मार्च १४** |
| परिच्छेद ५८(बी) यातील मर्यादांमुळे न गणलेल्या मत्ता | - | - | - | - |
| **ताळेबंदात गणलेले दायित्व (-) मत्ता (+)** | **(१८३३४७)** | **(१४९०२२)** | **(२२१९६८)** | **(१८७४३६)** |

**तक्ता नं. - ३**

(रु. लाखात)

| | रजा रोखीकरण | | उपदान | |
|---|---|---|---|---|
| **नफा व तोटा विवरणपत्रात मान्यता दिलेली रक्कम** | **१ एप्रिल १४ ते ३१ मार्च १५** | **१ एप्रिल १३ ते ३१ मार्च १४** | **१ एप्रिल १४ ते ३१ मार्च १५** | **१ एप्रिल १३ ते ३१ मार्च १४** |
| चालू सेवा खर्च | १३६०१ | १०८३८ | ९५७१ | ७४८५ |
| व्याज खर्च | १२३४९ | ९१४४ | १५२५८ | ११८५८ |
| योजना मान्यतायोग्य निव्वळ विमागणिती लाभ/हानी | - | - | - | - |
| मागील सेवा खर्च | ३७९५६ | २५९१० | ५२८८५ | ३५५२८ |
| समझोता/कपात/खंडीत/काढून टाकणे यामुळे लाभ/हानी | - | - | - | |
| परिच्छेद ५८(बी) यातील मर्यादांमुळे न गणलेल्या मत्ता | - | - | - | |
| **प्राप्ती (-) खर्च () नफा व तोटा विवरण यात मान्य** | **६३९०६** | **४५८९२** | **७७७१३** | **५४८७१** |

**तक्ता नं. - ४**

(रु. लाखात)

| | रजा रोखीकरण | | उपदान | |
|---|---|---|---|---|
| **मेळ** | **१ एप्रिल १४ ते ३१ मार्च १५** | **१ एप्रिल १३ ते ३१ मार्च १४** | **१ एप्रिल १४ ते ३१ मार्च १५** | **१ एप्रिल १३ ते ३१ मार्च १४** |
| वर्धीत दायित्व (+) दायित्व (-) | (३४३२६) | (२७७६६) | (३४५३३) | (२९०१०) |
| नफा व तोटा - (पी अँड एल) आकार | ६३९०६ | ४५८९२ | ७७७१३ | ५४८७१ |
| वजा - भरणा केलेले लाभ | (२९५८०) | (१८१२५) | ४३१८० | २५८६० |
| **शिल्लक/उपत्न्न (-)/खर्च (+)** | **३४३२६** | **२७७६६** | **३४५३३** | **२९०१०** |

## १७) विभागांचा अहवाल :

कंपनीचा एकच मुख्य विभाग आहे तसेच एकच भौगोलिक विभाग आहे. म्हणून लेखा मानक १७ नुसार विभागश: अहवाल देण्याची गरज नाही

## १८) संबंधित संस्थाचे व्यवहार :

१) लेखा मानक १८ यातील परिच्छेद ९ नुसार इतर राज्य नियंत्रित उद्योग संस्थाशी नातेसंबंध आणि त्यांच्या सोबतचे व्यवहार याबद्दल कोणतेही प्रकटन करण्याची आवश्यकता नाही.

२) लेखामानक १८ प्रमाणे अन्य प्रकटने खालीलप्रमाणे आहेत.

**संचालकांना दिलेले पारिश्रमिक :**

| संबधित व्यक्तिचे नांव | संबधांचे स्वरुप | वि. वर्ष २०१४-१५ | वि. वर्ष २०१३-१४ |
|---|---|---|---|
| श्री. अजय मेहता | व्यवस्थापकीय संचालक (दि. ०५-०१-२०१५ पर्यंत) | १६.५९ | १८.५० |
| श्री. ओ. पी. गुप्ता | व्यवस्थापकीय संचालक (दि. ०५-०१-२०१५ पासून) | ४.०४ | - - - |
| श्री. डी. डी. वाव्हळ | संचालक (वित्त) | १६.२० | १४.९१ |
| श्री. अभिजीत देशपांडे | संचालक (प्रवर्तने) | २१.२७ | - - - |
| श्री. एस. के. दाभाडे | संचालक (प्रकल्प) प्रभारी | २१.४० | १५.४१ |
| श्री. एस. के. देवरे | संचालक (प्रवर्तने) | - - - | १५.६८ |
| श्री. प्रभाकर उमाजीराव शिंदे | संचालक (प्रकल्प) | २५.५१ | ०९.१७ |
| **महत्त्वाच्या व्यवस्थापकीय व्यक्तिंची पारिश्रमिके** | | | |
| सौ. अंजली गुडेकर | कंपनी सेक्रेटरी | १५.०२ | ११.०९ |

३. औरंगाबाद पॉवर कंपनी लिमिटेड (APCL)

अ) व्यवस्थापनातील महत्वाच्या व्यक्ती

श्री. प्रभाकर उ. शिंदे - संचालक

श्री. अशोक एस. चव्हाण - संचालक

ब) सूत्रधारी कंपनी 'महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.' (MSEDCL महावितरण)

(३१/०३/२०१५ रोजी)

| व्यवहाराचे स्वरुप | वरील (अ) संबधी रक्कम रु. लाखात | वरील (ब) संबधी रक्कम रु. लाखात |
|---|---|---|
| अप्रतिभूत अग्रिमे (घेतलेली) | ०.०० | ०.३० |
| ३१ मार्च २०१५ रोजीची देय अग्रिमाची थकीत रक्कम | ०.०० | १४२.१४ |

क) **प्रवर्तन-पूर्व खर्च :** हा प्रकल्प अद्याप सुरु झाला नसल्याने प्रकल्पा संबंधित थेट केलेल्या सर्व खर्चाचे भांडवलीकरण स्थिर मत्ता प्रगतीपथावरील भांडवली कामे (प्रवर्तन पूर्व खर्च) या लेखाशीर्षमध्ये केले. प्रवर्तन पूर्व खर्चाची विभागणी खालील प्रमाणे आहे.

(रु. लाखात)

| तपशील | ०१.०४.२०१४ रोजी आरंभीची शिल्लक | वर्षभरातील भर | ३१.०३.२०१५ रोजी अखेरची शिल्लक |
|---|---|---|---|
| प्रकल्पाची जीवनक्षमता व डी आर पी अहवालाचे खर्च | ३९.८४ | - - - | ३९.८४ |
| शोधकार्याचे खर्च | ४३२.८२ | - - - | ४३२.८२ |
| जमीन संपादनाच्या प्रव्हीयंचे शूल्क | ०.०५ | - - - | ०.०५ |
| गायत्री बिझनेस लिंक यांना सल्लागार - शूल्क (महानिर्मितीने दिले) | १०.०० | - - - | १०.०० |
| संपर्काधिकाऱ्यांचे वेतन महावितरण यवतमळ (संवसू) विभागाने दिले. | ०३.२८ | - - - | ०३.२८ |
| सल्लागार / व्यावसायिक शूल्क | १०.६४ | - - - | १०.६४ |
| भूगर्भशास्त्रीय अहवाल खर्च | १२३.६१ | - - - | १२३.६१ |
| **एकूण** | **६२०.२४** | - - - | **६२०.२४** |

ड) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. लि. (महावितरण) कंपनीच्या संचालक मंडळाने औरंगाबाद पॉवर कंपनीचे काम सुरु करुन पुढे नेण्यासाठी महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी लिमिटेड (महानिर्मिती) या कंपनीस काही रक्कम देण्याचे तत्वत: मान्य केले. महानिर्मितीत सल्लागारी स्वरुपाच्या कामाच्या पैश्याच्या शर्तीचे अद्यात अंतिमीकरण झालेले नाही. तसेच अद्याप पावेतो महानिर्मितीने सल्लागारी स्वरुपाचे काम सुरु केलेले नाही.

म्हणून कंपनीने चालू वर्षी देय असणाऱ्या सल्लागार शुल्काचा लेखा तयार केलेला नाही.

**१९) <u>भाडेपट्टीच्या जागांचे प्रवर्तनासाठी लेखा: लेखामानक १९:</u>**

अ) कंपनीने कार्यालये व कर्मचारी याकरिता विविध कार्यालयीन व निवासी जागा भाडयाने घेतल्या आहेत. त्या कराराने नुतनीकरण किंवा रद्द करणे याचे पर्याय असतात. यावर्षी नफा व तोटा पत्रकात भाडेपट्टीचा मान्य खर्च रु. २७३०.४२ लाख (मागील वर्षी रु. २८१५ लाख आहे.) या तारखेपोवतो कंपनीचा कोणतेही प्रवर्तनीय भाडे करार रद्द करण्याजोगा नाही. भाडे रु. २७३०.४२ लाख (मागील वर्षी रु. २८१५ लाख) ही रक्कम भाडे, दर व कर यात समाविष्ट आहे.(टिप क्र. २६ प्रशासकीय व सामान्य खर्च)

ब) कंपनीने मराविम सुत्रधारी कंपनीसोबत प्रकाशगड इमारत, धारावी येथे व्यापलेली मुख्य कार्यालये नवी दिल्ली येथे अतिथीगृह आणि मुंबईत विविध ठिकाणी निवासी गाळे यासाठी भाडे करार केलेले आहेत. त्यासाठी या वर्षात रु. १९८४ लाख (मागील वर्षी रु.१९५५ लाख) एवढी रक्कम वरील (१) यात समाविष्ट केली आहे.

## २०) प्रतिभाग मिळकत :

प्रतिभाग मिळकत (मूळ व सौम्यीकृत) यांच्या गणनेसाठी विचारात घेतलेली मूलतत्वे खालीलप्रमाणे आहेत :-

| तपशील | महावितरण ३१/०३/२०१५ रोजी | ए.पी.सी.एल. ३१/०३/२०१५ रोजी | महावितरण ३१/०३/२०१४ रोजी | ए.पी.सी.एल. ३१/०३/२०१४ रोजी |
|---|---|---|---|---|
| आकस्मिक राखीव नंतर निव्वळ नफा | (१२७८९०) | ०.२६ | (३६३४२) | ०.३४ |
| प्रतिभाग मिळकत (मूळ) साठी समभागांची संख्या | ५७०३३१०५०० | ५०००० | ५३१६९८१८०० | ५०००० |
| प्रतिभाग मिळकत (मूळ) रु. मध्ये | (२.२४) | ०.५३ | (०.६८) | ०.६८ |
| सौम्यकृत प्रतिभाग मिळकती साठी वेटेड सरासरी समभागाची संख्या | ६१२६८९९९४७ | - - - | ५७५०३७८५०९ | - - - |
| सौम्यकृत प्रतिभाग मिळकत (रु. मध्ये) | (२.०९) | - - - | (०.६३) | - - - |

सौम्यकृतीसाठी अद्याप महाराष्ट्र शासन / मराविमं सूत्रधारी कंपनी यात जे शेअर दिलेले नाहीत त्याचे समान प्रमाणात मूल्य विचारात घेतले आहे.

## २१) कर :

### १) चालू कर :

चालू वर्षी कोणतेही करपात्र उत्पन्न नाही. म्हणून आयकर कायदा १९६१ च्या यातील कलम ११५ (जेबी) यातील तरतूदीप्रमाणे करांचे दायित्व मिनिमात अस्टरनेट टॅक्स (MAT) रेट याप्रमाणे गणण्यात आले आणि टरिंक (मागील वर्ष २ निरंक) अशी त्यासाठी तरतूद करण्यात आली.तोटा पुढे नेण्यात आल्याने आयकरासाठी तरतूद केलेली नाही.

### २) स्थगित कर :

स्थगित करांमध्ये पुढील बाबींचा समावेश होतो. **(रक्कम रु. लाखात)**

| अ. क्र. | तपशील | ३१-०३-२०१५ रोजी | ३१-०३-२०१४ रोजी |
|---|---|---|---|
| | **स्थगित कर दायित्व** | | |
| १. | घसाऱ्यातील फरक | ४३६७४१ | ३३०७०० |
| २. | आयकर कायद्यानुसार निर्लेखित / अमान्य केलेल्या मत्ता | | |
| | **स्थगित कर मत्ता** | | |
| १. | देय तत्वावर मान्य होणारे खर्च | १४०२७१ | १०३९८० |
| २. | आयकर काद्यानुसार निर्लेखित /अमान्य केलेल्या मत्ता | | |
| ३. | अशोषित घसारा / हानी | २८१२८३ | २०१९३९ |
| ४. | बुडीत कर्जासाठी तरतूद | १०४११ | १०८९७ |
| | **निव्वळ स्थगित कर मत्ता / (दायित्व)** | **(४२३५)** | **(१३८८५)** |

अशोषित घसारा/हानी यावरील स्थगिती कर मत्तांना भविष्यात खालील कारणामुळे भविष्यातील करांची निश्चितता असल्याने त्यांना कंपनीने मान्यता दिली आहे.

महावितरण कंपनी पायाभूत सुविधा तयार करण्याच्या योजनांवर मोठया प्रमाणात खर्च करीत आहे. त्यामुळे भविष्यामध्ये कंपनीची वितरण हानी कमी होईल. त्यामुळे महसूल वाढेल व कंपनीची प्रगती होईल.

२२) **मत्ता कमी करणे :**

लेखा मानक२८ मत्ता कमी करणे या मानकांनुसार व्यवस्थापनाने आपल्या मत्तांचा त्यांच्या आर्थिक कामगिरीच्या संबंधात आढावा घेतला. त्याच्या आधारे व्यवस्थापनाचे असे मत आहे की, कंपनीच्या मत्तांची आर्थिक कामगिरी चांगली आहे म्हणून ताळेबंदाच्या तारखेला मत्ता कमी केलेल्या नाहीत.

२३) **सुक्ष्म, लघू व मध्यम उदयोगांच्या लेख्यांच्या निश्चिती :**

सुक्ष्म, लघू व मध्यम उदयोग अधिनियम २००६ यातील आवश्यकतेनुसार प्रकटने केलेले नाहीत. कारण असे सुक्ष्म, लघू व मध्यम उदयोगांचे लेख्यांच्या आधारे निश्चित करण्याचे कामात गुंतागुंती व अडचणी आहेत.

२४) **परकीय चलनातील कंत्राटे :**

दि. ३१ मार्च २०१५ पर्यंत कंपनीच्या परकीय चलनातील कंत्राटाची कोणतीही थकबाकी नाही.

२५) **खरेदी केलेल्या व विक्रीचा तपशील :**

खरेदी केलेल्या व विक्री केलेल्या विजेचा संख्यात्मक तपशील खालीलप्रमाणे :

( मध्ये)

| तपशील | वर्ष २०१४-१५ | वर्ष २०१३-१४ |
|---|---|---|
| एकूण वीज खरेदी | ११२५६५ | १००११५ |
| वीज जाळ्यातील व पारेषणातील हानी | २१०७ | ५४० |
| विक्रीसाठी उपलब्ध वीज | ११०४५८ | ९९५७५ |
| विकलेली वीज | ९४८०५ | ८५६३१ |
| वितरण हानी | १५६५३ | १३९४४ |
| वितरण हानीची टक्केवारी | १४.१७ | १४.०० |

वरील माहिती कंपनीने एकत्र करुन दिली आहे. ती ऊर्जा संतुलन अहवाल यावर आधारित आहे. व त्यावर लेखापरिक्षकांनी विश्वास ठेवला आहे.

२६) **लेखापरिक्षकांचे परिश्रमिक :-**

| अ.क्र. | तपशील | वर्ष २०१४-१५ | | वर्ष २०१३-१४ | |
|---|---|---|---|---|---|
| | | महावितरण | ए.पी.सी.एल | महावितरण | ए.पी.सी.एल |
| १. | लेखापरिक्षकांनी - सांविधिक लेखापरिक्षणासाठी | ५१.०० | ०.९ | ३९.०० | ०.९ |
| २. | इतर सेवा आकार | ०.०० | - - - | ० | - - - |
| ३. | खर्चाची प्रतिपूर्ती | २.४३ | - - - | ५.७८ | - - - |
| ४. | लेखापरिक्षण शुल्कावर सेवा कर | ७.३९ | - - - | ४.८२ | - - - |

२७) **परकीय चलनातील खर्च:-** परकीय चलनातील प्रवास खर्च रु. निरंक आहे (मा.वर्षी रु. ६.२३ लाख)

२८) **मराविम उर्वरित कंपनीच्या शिलकी :**

मराविम उर्वरित कंपनीच्या शिलकी मराविमं सुत्रधारी कंपनीच्या हस्तांतरीत करण्याची गरज आहे. त्यासाठी जमेची शिल्लक मराविमं सूत्रधारी कंपनीच्या लेखा पुस्तकात पडून आहे. मराविम सूत्रधारी कंपनीचे स्वायत्त लेख्याचे यापूर्वीचे अंतिमीकरण झाले असल्याने व सांविधिक लेखापरिक्षकांनी ते प्रमाणित केले असल्याने या शिलकी पुढील वित्तीय वर्षात मराविमं सूत्रधारी कंपनीकडे हस्तांतरीत केल्या जातील.

२९) मागील वर्षातील आकडेवारीचे आवश्यक तेथे, पूनर्गटीकरण/पुर्नरचना केली आहे.

३०) टिपा क्र. १ ते ३० या दि. ३१ मार्च २०१५ रोजी संपलेल्या वर्षाच्या वार्षिक लेख्यांच्या भाग आहेत.

| | | |
|---|---|---|
| **अ. ना. कालेकर**<br>महाव्यवस्थापक (सांघिक लेखा) | **वि. रा. शिरुरकर**<br>मुख्य महाव्यवस्थापक (सांघिकलेखा) | **अं. म. गुडेकर**<br>कंपनी सचिव<br>सदस्य, क्र. ए.सी.एस. १९९३७ |

| | |
|---|---|
| **सु. ल. पिंपळखुटे**<br>संचालक (वित्त) | **बिपीन श्रीमाळी**<br>व्यवस्थापकीय संचालक |

**येथे आमच्या याच तारखेच्या जोडलेल्या अहवालानुसार**

| | | |
|---|---|---|
| **मित्तल ॲण्ड असोसिएटस्**<br>**करिता**<br>**सनदी लेखापाल** | **बी. एन. केडीया ॲण्ड कंपनी**<br>**करिता**<br>**सनदी लेखापाल** | **कलानी ॲण्ड कंपनी**<br>**करिता**<br>**सनदी लेखापाल** |
| **सही /-**<br>**(हेमंत आर बोहरा)**<br>भागीदार<br>एम नं. १६५६६७ | **सही /-**<br>**(एस. के. केडीया)**<br>भागीदार<br>एम नं. ०५२५७९ | **सही /-**<br>**(एस.पी.झंवर)**<br>भागीदार<br>एम नं. ०७४४१४ |

# मत्ता




| मत्ता ३१.०३.२०१५ रोजी | | |
|---|---|---|
| | मत्ता | (रु. कोटीत) |
| | बिगर चालू मत्ता | ३५७३१.३०२३ |
| | चालू मत्ता | २३१५५.३८५५ |
| | एकूण मत्ता | ५८८८६.६८७८ |

# समभाग आणि दायित्वे




| समभाग आणि दायित्वे ३१-०३-२०१५ रोजी | | |
|---|---|---|
| | | (रु. कोटीत) |
| | भागधारकांचा निधी | ५०९९.४८४७ |
| | बिगर चालू दायित्वे | २२१९२.०३१६ |
| | चालू दायित्वे | ३१५९५.१७१५ |
| | एकूण | ५८८८६.६८७८ |

# स्थायी मत्ता आणि भांडवली प्रगतीपथावरील कामे




(रू. कोटीत)

| वर्ष | एकूण स्थायी मत्ता | भांडवली प्रगतीपथावरील कामे |
|---|---|---|
| २००६-०७ | १०५३१ | १४४७ |
| २००७-०८ | ११८०६ | १६८५ |
| २००८-०९ | १३४३९ | १९७६ |
| २००९-१० | १५६८७ | २३४४ |
| २०१०-११ | २०५०० | ४११६ |
| २०११-१२ | २७२६८ | ३९१३ |
| २०१२-१३ | ३३२६८ | २९७२ |
| २०१३-१४ | ३७८४० | २०४८ |
| २०१४-१५ | ४१८७४ | १२८२ |

# वीज विक्रीपासून महसूल आणि वीज खरेदी खर्च

(रु. कोटीत)




(रु. कोटीत)

| वर्ष | वीज विक्रीपासून महसूल | वीज खरेदी खर्च |
|---|---|---|
| २००६-०७ | १८८६४ | १६२७७ |
| २००७-०८ | २०१५९ | १७००६ |
| २००८-०९ | २३४८३ | २०६०६ |
| २००९-१० | २७६४२ | २३८४२ |
| २०१०-११ | ३३२३८ | २८९४९ |
| २०११-१२ | ३९५५५ | ३५१२० |
| २०१२-१३ | ४५५७५ | ३८८५९ |
| २०१३-१४ | ५०६२२ | ३९५२६ |
| २०१४-१५ | ५५५३५ | ४९०८८ |

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

# ग्राहक वर्गवारी नुसार वीज विक्री




## वित्तीय वर्ष २०१४ - १५

| अ. क्र. | ग्राहक वर्ग | रुपये कोटीत | % |
|---|---|---|---|
| १ | घरगुती किंवा निवासी | ९७७७.४ | १८% |
| २ | औद्योगिक लघु व मध्यम दाब | ४६२७.५४ | ८% |
| ३ | वाणिज्यिक लघुदाब | ४१११.४१०२ | ७% |
| ४ | औद्योगिक उच्च दाब | १८०५९.२२ | ३३% |
| ५ | सार्वजनिक दिवाबत्ती | ४०२५.८८६२ | ७% |
| ६ | सिंचन व कृषी उच्च दाब | ३११.२१ | १% |
| ७ | सिंचन व कृषी लघु दाब | ७२७७.३१ | १३% |
| ८ | उच्च दाब व वाणिज्यिक | २४९०.४४ | ४% |
| ९ | इतरांना पुंजीत पुरवठा | ३६३१.२८ | ७% |
| १० | नियामक उत्पन्न | -१७१.७९ | ०% |
| ११ | इतर | १३९४.८२२३ | ३% |
| | **एकूण** | **५५५३४.७२८७** | **१००%** |

# ग्राहक संख्या




## वित्तीय वर्ष २०१४ - १५

| अ. क्र. | ग्राहक वर्गवारी ३१.०३.२०१५ | ग्राहक संख्या |
|---|---|---|
| १ | घरगुती | १६९६०२३९ |
| २ | व्यापारी | १६२३९९१ |
| ३ | औद्योगिक उच्च दाब | १२९३४ |
| ४ | औद्योगिक लघु दाब | ३९२७७१ |
| ५ | सिंचन व कृषी उच्च दाब | १३३८ |
| ६ | सिंचन व कृषी लघु दाब | ३८३१९९८ |
| ७ | सार्वजनिक पाणी पुरवठा उच्च दाब | ९४१ |
| ८ | सार्वजनिक पाणी पुरवठा लघु दाब | ४८३३७ |
| ९ | सार्वजनिक दिवाबत्ती | १६०५४० |
| १० | इतर | २६८६ |
|  | **एकूण** | **२३०३५७७५** |